मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था
(महाराष्ट्रशासन पुरस्कृत)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१
रजि नं. एफ १६०९४ (मुंबई)
दूरध्वनी : २२६५३९६६/ फॅक्स : २२६३१३२५
Email rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क्र./ २०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

ह्या प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणारे ग्रंथ व नियतकालिके प्रतिमुद्राधिकार अधिनियमाची मुदत उलटलेले असल्याने सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध आहेत. ही सामग्री विविध ग्रंथालयांनी जतन करून ठेवल्यामुळेच आज आपल्याला उपलब्ध होत आहे.

सदर पुस्तके अथवा नियतकालिके जशी उपलब्ध होत जातील तसे त्यांचे संगणकीकरण करून जनतेला ती उपलब्ध करून देण्यात येतील. ह्या ग्रंथांच्या/ नियतकालिकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना आपण खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१ सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती ह्या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.

०२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.

०३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्थेची मुद्रा आपणास काढता येणार नाही.

०४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी ह्या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून ह्या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. ह्यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था ह्यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

महाराष्ट्र भाषेचें व्याकरण. आ. ३.

दादोबा पांडुरंग तर्खडकर

सन १८५७.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.

विद्यार्थ्यांच्या उपयोगा करितां केलें.

ग्रंथकार

दादोबा पांडुरंग तर्खडकर.

दक्षिणेंतील सरकारी शाळांचे माजी सुपरिंटेंडेंट्, व हाल्लीं अहमदनगर
हुजूर डेप्युटि कलेकटर व माजिस्त्रेट.

तिसरी आवृत्ति.

पहिली आवृत्ति सुधारून वाढविली.

मुंबईंत

टामस ग्राहाम यानीं छापिलें.

शालिवाहन शके १७७९.

इसवी सन १८५७.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

प्रस्तावना

या व्याकरणाची पहिली आवृत्ति शके १७५८ नांत छापून प्रसिद्ध झाली, त्या नंतर सुमारें आठ नऊ वर्षांत ती संपून दुसऱ्या आवृत्तीचें अगत्य पडल्या वर बोर्ड आव् एड्युकेशन या नामानें जी एतद्देशीय लोकांत विद्याप्रसरण करण्याचें काम पाहण्या करितां सरकारानें सभा स्थापित केली आहे, तिणें मला शके १७६७ अथवा इस्वी सन १८४५ साच्या दिसेम्बर महिन्यांत असें सांगितलें कीं तुमचें व्याकरण पुनः छापणें अवश्य आहे, त्यास तुमच्या मनांत त्यांत कांहीं फेरफार करायाचा असल्यास तो करून तुह्मीं दुसरी आवृत्ति तयार करावी. ही त्या सभेची आज्ञा माझ्या हातीं आल्या वर मला फार संतोष झाला; कारण, ज्या काळीं मीं आपलें व्याकरण प्रथमतः रचिलें, त्या काळीं माझें वय विसाच्या आंत होतें; आणि त्या काळीं मराठी ग्रंथांचा व मराठी लिहिण्याचा तादृश प्रचारहि नव्हता; पुढें उत्तरोत्तर ग्रंथहि वाढत गेले, व दर्पण, प्रभाकर, इत्यादि वर्त्तमानपत्रें निघाल्या पासून मराठींत लिहिण्याचाहि प्रघात फार वृद्धिंगत होऊं लागला, या मुळें व्याकरणनियमांची आवश्यकताहि त्याच मानानें अधिकाधिक वाढूं लागली. पूर्वी जें व्याकरण म्यां केलें होतें, त्याचे गुणदोष, तदुपपन्न भिन्नभिन्न विषयांचा न्युनाधिकभाव, व त्या ग्रंथाच्या पूर्णतेस आणखी नवे नवे असे जे अनेक विषय, त्यांचे प्रतिपादक जे नियम, त्यांचा शोध आणि उपपत्ति यांचें सापेक्षत्व, या सर्व गोष्टींचें मीं फार दिवस मनन करून, स्वशक्त्यनुसार हा ग्रंथ जितका पूर्णतेस नेववेल तितका नेऊन, विद्वज्जनांच्या आदरास पात्रीभूत करण्याचा उपाय शोधित होतों; इतक्यांत त्या सभेची पूर्वोक्त आज्ञा सादर झाली; मग अर्थात् ती मोठ्या उत्साहानें मान्य करून या ग्रंथाची दुसरी आवृत्ति सिद्ध करण्याच्या व्यवस्थेस लागलों. पुढें जसजसा

अनुक्रमणिका

हा ग्रंथ शोधित गेलों, तसतसा हा विस्तृत होऊन पुनः या ग्रंथाची केवळ नवी रचना करावी लागली. या ग्रंथाची पहिली आवृत्ति, आणि ही आवृत्ति, या परस्पर ताडून पाहिल्या असतां, या गोष्टीची सत्यता ध्यानांत यावयास विलंब लागणार नाहीं.

मागल्या दहा पंधरा वर्षां पासून महाराष्ट्र भाषेंत गद्यात्मक ग्रंथ लिहिण्याचा प्रचार वाढूं लागला; तेव्हां पासून, मोठमोठालीं वाक्यें तर काय, परंतु त्यांतील प्रत्येक शब्द, व त्या शब्दांतील प्रत्येक वर्णरूप अवयवहि शुद्ध व नियमास अनुसरून असावा, आणि तेणेंकरून सर्वांची लिहिण्याची पद्धति एकसारखी पडून सांप्रत जी लिहिण्यांत अव्यवस्था आढळत्ये, ती दूर व्हावी, अशी इच्छा माझ्या मनांत उद्भवली होती; कारण, जसी भाषा,तशी तिची लेखनपद्धतिहि, तदंतर्गत गुढस्थित जे नियम त्यांचें उद्घाटन करून त्यांज वर बशिवणें, हाच व्याकरणशास्त्राचा मुख्य उद्देश होय. आणि याच उद्देशानें गालवशौनककात्यायनशाकटायनादि जे प्रातिशाख्यादिवेदव्याकरणभाष्यकार, व त्यां नंतर पुढें यास्कपाणिन्यादि जे वैयाकरण झाले, व तदनंतर अर्वाचीन काळीं भट्टोजीदीक्षित, महीधरभट्ट, बोपदेव, आदिकरून जे व्याकरणग्रंथकार प्रसिद्ध झाले, त्या सर्वांनीं परिश्रम केले; ह्मणोनच संस्कृत भाषा इतक्या प्रगल्भ दशेस येऊन, विद्वज्जनचित्तचकोरास चंद्रीभूत होऊन, वाल्मीकिव्यासशंकरश्रीहर्षकालिदासभवभूत्यादि जे प्राचीन आणि अर्वाचीन कवि त्यांच्या वाग्देवतेस इतकी रम्यस्थानार्ह झाली; नाहींतर, संस्कृत वाणी प्रमाणें जिचें काठिन्य, विस्तार, आणि जिच्या ठायीं, सहस्रशः सूक्ष्मनियमरूप तंतूचें गुंतलेलें जाल, अशा भाषेस मार्दवदशेस आणून, तिचें हें दुर्निवार जाल उकलून, त्या सूत्रांनीं विणून सिद्ध केलेला जो पट तो कविजनचित्रकारांच्या अनेक सुरसरंगभरितकल्पनांस लेखनार्ह झाला नसता. म्हणोन या यशाचे जे अंशभाक् त्यांची परिगणना केली असतां, पतंजलिकात्यायनपाणिन्यादि जे शब्दशास्त्रनियंते त्यांसच आद्यस्थानापन्न केलें पाहिजे.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रदेशभाषेची उत्पत्ति, व तिच्या उत्तरोत्तर ऊर्जितदशेचा इतिहास, व तिची सांप्रतची स्थिती, यां विषयांचें यथास्थित विवरण करणें, हा एक स्वतंत्र ग्रंथाचा विषय होय; अशा लहानशा ग्रंथाच्या उपोद्घातांत यांचा अंतर्भाव करणें अवकाशाच्या अल्पत्वा मुळें केवळ अशक्य होय; तथापि या उपोद्घातांत त्यांतील मुख्य मुख्य विषयांचा आकार तरीं दाखिवणें इष्ट जाणून कांहींसें विवरण करितोंः जो देश निरंतर देशांतरवासी लोकांच्या राजसत्तेखालीं असतो, त्या देशाची जी भाषा, तिचा इतर तद्देशोत्पन्न वस्त्रादि प्रपंचोपयोगी पदार्थां प्रमाणें ऊर्ज्जित दशेस येण्याचा संभव नसतो; तीहि त्यांच प्रमाणें केवळ निर्वाहा पुरती मात्र असतीः शिवाजीच्या पूर्वी हा देश मुसलमानांच्या स्वाधीन होता; त्याच्या पूर्वी केव्हां तरीं हा देश दीर्घकालमर्याद महाराष्ट्र लोकांच्या स्वाधीन होता असें दिसत नाहीं. त्या काळाच्या प्राचीन इतिहासा वरून असें अनुमान होतें कीं, मुसलमानांच्या पूर्वी तगर, पैठण, देवगड, पन्हाळा, इत्यादि कित्येक या देशांतल्या मोठया विख्यात अशा राजवंशांच्या राजधान्या होत गेल्या, परंतु त्यांच्या राज्यांची देशमर्यादा कोणती होती, व हे वंश राज्य करित असतां, या देशांतील लोकांची देशभाषा हीच किंवा दुसरी कोणती होती, या विषयीं लेखादिप्रमाणाभावा मुळें कांहीं दृढ अनुमान करितां येत नाहीं. त्यांत तगर आणि पैठण या राजधान्यांची भरभर असतां या महाराष्ट्र देशांत कोणती भाषा चालत होती, अथवा यद्यपि महाराष्ट्र भाषा असली, तथापि ती कोणत्या रूपानें प्रकट होती, या विषयीं कांहींच चांगली अटकळ होत नाहीं; परंतु आतां शुद्ध मराठी शब्द म्हणोन जे प्रसिद्ध आहेत, त्यांच्या व्युत्पत्ती विषयीं सूक्ष्म विवेचन केलें असतां असें एक अनुमान होतें कीं, ही मराठी भाषा नाटकादि ग्रंथांत मागधी पैशाची म्हणोन संस्कृत भाषे वरून साधलेली जी बालभाषा या नांवेंकरून प्रसिद्ध आहे, तिचाच कांहींएक प्रकार असावा. तेव्हां तगर आणि पैठण या राजधान्यांची समृद्धि असतां ही मराठी भाषा, विवेकसिंधु आणि

अनुक्रमणिका

ज्ञानेश्वरी या ग्रंथांत ज्या प्रकारची भाषा उपलब्ध होत्ये ती, आणि बालभाषा, या दोहोंतील जो संभावनीय मध्यप्रकार, त्या रूपानें प्रसिद्ध असावी, असें एक अनुमान होतें. पुढें बाराशें शकाच्या समाप्तीस, ज्या काळीं देवगड, ज्यास आतां दौलताबाद म्हणतात, तेथें जाधव म्हणजे प्राचीन काळचे यादव या वंशाचे राजे राज्य करित होते, त्या काळीं पूर्वोक्त दोन ग्रंथांत ज्या प्रकारची भाषा उपलब्ध आहे, त्या प्रकाराचा प्रचार होता असें दिसतें; कारण, विवेकसिंधु आणि ज्ञानेश्वरी या ग्रंथांची त्या काळीं रचना झाली असें समजतें; त्यांत विवेकसिंधु हा ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या अगोदरचा असावा असें सर्वांचें मत आहे, परंतु त्याचे कर्त्ते मुकुंदराज हे केव्हां व कोठे झाले या विषयीं यथास्थित अनुमान होत नाहीं; परंतु जसे संस्कृतांत आद्यकवि वाल्मीकि, आणि अनुष्टुभ् छंदांत रचलेला आद्यग्रंथ रामायण, म्हणोन विख्यात आहे, तसे मराठी भाषेंत आद्यकवि मुकुंदराज, आणि ओंवीछंदांत रचलेला आद्यग्रंथ विवेकसिंधु, म्हणोन प्राकृतभाषाभिज्ञ यांचें मत आहे. तेव्हां ज्ञानेश्वराच्या कांहीं वर्षें पूर्वीं मुकुंदराज झाले असावे असें अनुमान होतें. ज्ञानेश्वरी ग्रंथ शकें बाराशें बारांत समाप्तीस गेला या विषयीं ज्ञानेश्वरींचेंच प्रमाण.

शकेंबाराशतेंबारोत्तरें॥तैंटीकाकेलीज्ञानेश्वरें॥सच्चिदानंद बाबाआदरें॥लेखक जाहाला॥ अ०१८, ओं० १८१२.

या काळाच्या इतिहासा वर दृष्टि पोंहचविली असतां असें दिसून येतें कीं ज्या काळीं ज्ञानेश्वरी समाप्तीस गेली, त्या काळीं देवगडास रामराव जाधव राजा होता; कांकीं त्याच सुमारास अल्लाउद्दीन खिलजी याची आणि रामरावाची लढाई होऊन, मुसलमानांचा महाराष्ट्र देशांत संचार होऊन, त्यांचें या देशांत प्राबल्य होण्यास आरंभ झाला. विवेकसिंधु आणि ज्ञानेश्वरी या ग्रंथांत जो महाराष्ट्र भाषेचा प्रकार आढळतो, त्याचा, आणि सांप्रत जो प्रकार आढळतो, त्याचा, तारतम्यभाव पाहिला असतां असें दिसून येतें कीं, त्या काळीं जे कित्येक नामवाचक व क्रियावाचक शब्द व्यवहारांत होते, ते आतां अव्यवहारित

अनुक्रमणिका

होऊन त्यांच्या स्थानीं कित्येक स्थळीं त्यांचेंच रूपांतर होऊन जे नवे शब्द झाले आहेत त्यांचा, आणि कित्येक स्थळीं फारशी आणि अरबी शब्दांचा प्रचार पडला आहे: इतकेंच नाहीं, परंतु, दुसरें एक असें अनुमान होतें कीं नामवाचक आणि क्रियावाचक जे मूलशब्द, त्यांस आतां प्रत्यय लागून तन्निमित्तक जो त्या मूलशब्दांस कार्यविशेष होतो, तत्कार्यविशेषसहित जे जे प्रत्यय, ते ते मूळचे निराळे शब्दच होते, आणि कित्येक स्थळीं या प्रत्ययांतहि भेद होता, अथवा तो कार्यविशेषहि शब्द ह्मटल्यास चिंता नाहीं. अथवा, उलट घेऊन जरीं असें ह्मटलें, कीं अणादिकांचा, ह्मणजे सारे स्वर आणि अंतस्थ संज्ञक जे-य, र, ल, व, आणि ह, एतत्समुदायात्मक वर्ण त्यांचा, पूर्वी परस्परांत संधि नकरितां हे वर्ण निराळे लिहित असत.

हें आतां उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखवितों. जुने मराठी शब्द जे सांप्रत व्यवहारांत प्रसिद्ध नाहींत ते—**अलोट** ह्म० खरें, **अवसांत** ह्म० अकस्मात्, **कीर** ह्म० खरें, **कडसणी** ह्म० विचार, **धिवसा** ह्म० इच्छा, **कुसरी** ह्म० कला—शोभा, **भाणें** ह्म० जेवण, **उळिगी** ह्म० बिगार, **ओरकल** ह्म० परीस, **कांड** ह्म० बाण, **कामठ** ह्म० दुकान, **खेंव** ह्म० आलिंगन, **खालारां** ह्म० खालीं, **गाथागोवो** ह्म० गडबड, **टकळी** ह्म० आशा, **डुडुळ** ह्म० घुबड, **दळवाडें** ह्म० विस्तार, **दुस** ह्म० वस्त्र, **नव्हाळी** ह्म० नवेपणा, **निरुपें** ह्म० खचित—चांगलें, **पाढाऊ** ह्म० संग्रह, **वेंझें** ह्म० युक्ति, **मांदूस** ह्म० पेटी, **येरु** ह्म० तो, **रहाटी** ह्म० तऱ्हा, **लाणो** ह्म० स्थळ, **विदाणी** ह्म० कारागिरी, **सुणें** ह्म० कुत्रें, **सिनें** ह्म० निराळें, **हाततुकें** ह्म० पाहिजे तितकें—घेववेल तितकें; **आरोगणें** ह्म० भक्षणें, **ओसंडणें** ह्म० टाकणें, **घापतणें** ह्म० घालणें, **चेवविणें** ह्म० जागें करणें, **सुणें** ह्म० घालणें. या शिवाय कित्येक धातुसाधितांचीं आणि क्रियापदांचींहि रूपें या काळीं भिन्न भिन्न रूपानें वर्तत होतीं; जसें—**करुनियां** ह्म० करून, **बोलोनियां** ह्म० बोलून, **भक्षिन्नलें** ह्म० भक्षिलें, **करी** ह्म० करितो,

बोलन ह्म० बोलतो–त्ये–तें, **करितोसी** ह्म० करितोस, **मागताती** ह्म० मागतात, **कीजे** ह्म० करावें–केलें जावें, **नेइजे** ह्म० न्यावें, **सांगिजे** ह्म० सांगावें, **करिजेतें** ह्म० केलें जातें, **बोलिजेल** ह्म० बोललें जाईल, **सांगिजेतील** ह्म० सांगितले जातील, इ०.

आतां दुसरा प्रकार दाखवितोंः नामा + याचा=नामयाचा–नाम्याचा, आत्मा + याची=आत्मयाची–आत्म्याची, तो–तें + यानें=तयानें–त्यानें–त्याणें, जी + इनें=जयेनें–जिनें–जिणें, स्त्री + इनें=स्त्रियेनें–स्त्रीनें, तो + लागीं–लागुनी–लागुनीयां= तयालागीं इ०–त्यालागीं–त्याला, माझिया–माझ्या + लागीं, इ० =माझियालागीं–माझ्यालागीं–मजलागीं–मजला–मला, करावें + यास=करावयास–करायास, जावें + यासाठीं=जावयासाठीं –जायासाठीं, लिहावें + याचा=लिहावयाचा–लिहायाचा, करी + ते + समयीं=करिते समयीं–करते समयीं.

आतां तिसरा प्रकार दाखवितोंः व्हावें ⌣ होआवें, त्याला ⌣ तयाला, माझ्या ⌣ माझिया, तिची ⌣ तयेची, इ०.

हा तिसरा प्रकार पाहून जर कदाचित् कोणीं असें अनुमान करील कीं सांप्रत ज्या प्रकारची मराठी भाषा उपलब्ध आहे, त्याच प्रकारची पूर्वीं होती, परंतु ग्रंथांत व पद्यरचनेंतमात्र कविजन छंदा करितां व प्रासा करितां संधि नकरितां वर सांगितले अणादि वर्ण पृथक् पृथक् उच्चारित होते; तर हेंहि अनुमान संभावनीय होय; परंतु मराठी शब्दसिद्धी वर जर सूक्ष्म विचार केला, तर माझी अशी अटकळ होत्ये कीं, अणादि वर्णांचा संधि करून शब्दांस आंखूड करण्याचा प्रकार मागाहून निघाला असावा.

या प्रमाणें मुकुंदराज, ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, आणि निवृत्तिनाथ, यांच्या काळीं, शेवटीं ग्रंथांत तरी, ज्या रूपानें मराठी भाषा वर्तत होती त्याचें दिग्दर्शन केलें. पुढें ग्रंथांत व पद्यरचनेंत याच भाषेची प्रवृत्ति पडून एकनाथ, नामदेव, उद्धवचिद्घन, अमृतराय, मध्वमुनीश्वर, शिवदिनकेशरी, केशवस्वामी, अनंततनय,

अनुक्रमणिका

मुक्तेश्वर, रामदास, श्रीधर, वामन, तुकाराम, आदिकरून जे या महाराष्ट्र भाषेंत परम विख्यात, व ज्यांची वाणी परम रसाळ, असे जे कवि झाले, त्यांणींहि याच भाषेचें अवलंबन करून आपल्या रुचिवैचित्र्यानें ईत भक्तिज्ञानवैराग्योपदेशेतिहासात्मक अनेक ग्रंथ व काव्यें रचून इच्या ठायीं पंडित व रसज्ञ जनांच्या लक्षास पात्रीभूत होण्याची योग्यता आणिली; परंतु ज्या काळीं हे कवि विख्यात झाले, त्या काळीं मुसलमानांचें प्राबल्य होऊन त्यांची राजसत्ता या देशांत चोहों कडेस प्रसृत होऊन गेली होती; ह्मणोन यांच्या ग्रंथांत पुढें उत्तरोत्तर प्राचीन मराठी शब्दांच्या ठिकाणीं यवनी शब्दांची मिसळ बरींच होत गेली. शेवटीं, अलीकडस पेशवाईत बारामतीकर पांडुरंगराव यांच्या पदरीं मोरोपंत या नावाचे कारकून होते, पुढें त्यांची काव्यव्युत्पत्ति सर्वोत्कृष्ट पाहून त्यांस पांडुरंगरावांनीं आपल्या घरचे पुराणिक केलें; त्यांणीं तर आपल्या रसभरित काव्यानें या भाषेस केवळ संस्कृत भाषेचीच प्रौढी आणिली. वामन आणि मोरोपंत यांस अनुक्रमें महाराष्ट्र भाषेचे व्यास व श्रीहर्ष ह्मटल्यासहि साजेल. प्राकृत भाषे विषयीं नाक मुरडणारे जे शास्त्री व पंडित त्यांस यांनींच लाजविलें. आज पावेतों जें कांहीं भांडार संस्कृतभाषारूप पेटींत कुलूप घालून ठेविलें होतें, आणि तिची किल्ली ब्राह्मणांच्याच स्वाधीन होती, तें ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, आदिकरून जे ब्राह्मण कवि झाले, त्यांणीं उघडून काढून, त्याचें प्राकृत लेणें करून, सर्व लोकांस अर्पण केलें; ह्मणोन नुसतें यांचें कौशल्य व चातुर्य वर्णावें इतकेंच नाहीं, परंतु यांची औदार्यपूर्वक जी औपकारिक बुद्धि तिचीहि या प्रसंगीं प्रशंसा केली पाहिजे. मोरोपंतांच्या उत्तरावस्थेच्या समयीं बहुधा त्यांचाच कित्ता घेऊन सोलापुरांत रामजोशी प्रसिद्ध झाले; हे प्राकृत कविमालेंतील शेवटले मणि; यांचें शृंगाररसवर्णनपर आणि लोकाज्ञानध्वंसनपर अत्यंत रसाळ आणि उद्दाम बुद्धिस्फुरण पाहून रसिक पुरुषांस माना डोलविल्या शिवाय राहवत नाहीं. शेवटीं रावबाजीच्या कारकीर्दीत मजल-

शीच्या आखेरीस अनंतफंदी, बाळाकारंजकर, धोंडीबापु, आणि सगनभाऊ, या शाइरांनीं आपल्या तुणतुण्याची तार चांगली सुस्वर चढवून त्या काळचा मराठमोळा शेवटल्या भैरवींत बराच गाइला.

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, कोणतीहि भाषा प्रौढ व विस्तीर्ण दशेस आणावयास जितक्या काळाची अपेक्षा असती, जो प्रयत्न आणि जें चातुर्य खर्चावें लागतें, व विद्येच्या प्रसारास ज्या प्रकारचें उत्तेजन आवश्यक असतें, त्या प्रकारें या सर्व गोष्टी घडवून आणायास समर्थ अशी महाराष्ट्र राजाची सत्ता कधींतरीं मुसलमानांच्या पूर्वीं या महाराष्ट्र देशांत एकसारखी चालली होती अशी अटकळ होत नाहीं. पुढें हिंदूंचीं मांडलिक राज्यें मोडून मुसलमानांचें या भरतखंडांत सार्वभौम्य झाल्या वर सुमारें चारशें वर्षें पर्यंत हा देश त्या लोकांच्या सत्तेंत अविच्छिन्न राहिला. त्यांची भाषा व धर्म निराळा ह्मणून त्यांज कडूनहि या भाषेच्या वृद्धीस कांहीं साह्य नघडतां उलटें त्यांच्या योगानें सहस्रशः यवनी शब्द ईत मिसळून इची निर्मलता मात्र दूषित झाली. आतां मुसलमानांच्या राज्यांत हिंदूंस मोठमोठे राज्याधिकार मिळत होते, या मुळें त्यांच्या राज्यांत सहस्रावधि हिंदू मोठमोठे मानकरी व सरदार होत असत, या योगानें एथील गुणिजनांस आश्रय मिळून त्यांच्या गुणांची बूज होत असे. या कारणा वरून महाराष्ट्र भाषेच्या अभिवृद्धीस कांहीं साहित्य घडलें असावें असें अनुमान करायास यत्किंचित् अवकाश आहे. वरकड, वास्तविक दृष्टीनें पाहिलें, तर या काळीं जे एकनाथ, नामदेव, अमृतराय, वामन, तुकाराम, एतत्प्रभृति कवि झाले, ते बहुधा सर्व साधु होते, ह्मणोन त्यांची जी लोकोपकारिक बुद्धि, हाच या भाषेच्या अभिवृद्धीस मुख्य हेतु असें ह्मणणें हेंच खरें. पुढें शिवाजी पासून बाजीरावरघुनाथा पर्यंत सुमारें सव्वाशें वर्षें, मराठी लोकांचें प्राबल्य चालून हा देश त्यांच्याच सत्तेंत होता; तेव्हां तरीं महाराष्ट्र भाषेच्या अभिवृद्धीस कांहीं अलौकिक उत्तेजन व्हावें तर तसेंहि झालें नाहीं; शास्त्र-

विद्या आणि वेदपारायणविद्या यांस मात्र पेशवाईत विशेष प्रकारचें उत्तेजन होतें ह्मणोन त्या विद्या ब्राह्मण जातींत बऱ्याच वाढल्या. तथापि स्वराज्य होतें ह्मणोन हरिदास, पौराणिक, शाईर, तमासगीर, नकल्ये, इत्यादि गुणिजनांस उदार हस्तानें बिदाग्या, भरगच्ची दुपेटे, व पागोटीं मिळत, तीं या भाषेच्या अभिवृद्धीस कांहीं अल्पकारणभूत झालीं असें नाहीं; यां पासून हें कार्य बरेंच झालें असें मला वाटतें.

इशवी सन १८१८ रांत हा महाराष्ट्र देश शहाण्या इंग्लिश सरकाराच्या हातीं आल्या वर पुढें सात आठ वर्षांनीं त्यांणीं आपलें लक्ष इतर सहस्रावधि राजकीय विषयांत निमग्न असतां, आज पावेतों कोणत्याही सरकारानें ज्या कडेस विशेषेंकरून लक्ष दिलें नाहीं त्या देशभाषे कडेस, व एतद्देशीय लोकांत सद्विद्येचा प्रसार व्हावा या विचारा कडेस लाविलें; हें या सरकाराचें उदार कृत्य परम स्तुत्यर्ह होय. या उद्देशानें सन १८२३ सांत "मुंबईची हैंद शाळा शाळापुस्तकमंडळी" या नावानें एक सभा स्थापित झाली. पुढें या सभेच्या कर्तृत्वाची बरीच घडामोड होऊन तिचें "मुंबईची शिक्षा मंडळी" या नावानें रूपांतर झालें; पुढें ही मंडळी मोडून, इचें काम सांप्रत, तत्स्थानापन्न सरकारानें स्थापित केलेली जी "बोर्डआव् एड्युकेशन" या नावाची सभा, ती करित आहे. पहिली सभा स्थापून आज अठ्ठावीस वर्षें झालीं, इतक्या कालाच्या अवधींत व्हावे तितके जरीं ग्रंथ झाले नाहींत, तरीं या महाराष्ट्र भाषेंत कांहीं कांहीं उपयोगी विषयां वर बरेच ग्रंथ झाले आहेत. या देशांत पूर्वीपासून पद्यात्मक ग्रंथ लिहिण्याची चाल होती; सरकारी कामकाजा शिवाय गद्यात्मक लेख लिहिण्याची चाल अगदीं नव्हती. मराठयांच्या अमलांत मात्र कोणीं कोणीं बखरा लिहून ही चाल नुकतीच पाडिली होती; परंतु तिचा प्रचार फारच थोडा तेव्हां ती होती नव्हती सारिखीच ह्मटल्यास चिंता नाहीं. महाराष्ट्र भाषेंत शुद्धरीतीनें वाक्ययोजना करून रसभरित असे पहिले ग्रंथ सदाशिवकाशीनाथ छत्र्ये यांणीं रचिले; ह्मणोन यांस गद्यात्मक

ग्रंथांचे जनक ह्मटल्यासहि साजेल. याच काळीं कित्येक पंडितांनीं मिळून एक महाराष्ट्र कोश केला हें एक मोठें उपयोगी काम झालें. या नंतर हरिकेशवजी आणि बाळगंगाधर शास्त्री यांणींहि सरकारी शाळां करितां चार पांच ग्रंथ चांगले तयार केले; व या शिवायहि लहान लहान असे पुष्कळ ग्रंथ तयार झाले आहेत व होताहेत. सन १८३६ सांत मीं आपलें महाराष्ट्र व्याकरण प्रसिद्ध केलें, त्याचा उद्देश, व तें कोणत्या स्थितींत असतां रचिलें, या विषयीं कांहींशी सूचना त्याच व्याकरणाच्या प्रस्तावनेंत केली आहे, त्याची पुनरुक्ति एथें नको. अलीकडेस, दर्पण व तदनंतर प्रभाकर हीं वर्तमानपत्रें निघाल्या पासून मोठा लाभ हा झाला कीं, त्यांच्या द्वारें लोकांस ज्ञान होऊन, एथील लोकांत मराठींत गद्यरूपानें लिहिण्याचा प्रचार चांगला वाढत चालला आहे. तेव्हां, अशा समयीं व्याकरणद्वारानें भाषेचें नियमन करणें किती आवश्यक आहे हें सुज्ञ पुरुष जाणतच असतील. हाच हेतु मनांत धरून मीं ही दुसरी आवृत्ति सिद्ध केली. इचा मुख्य उद्देश हाच कीं, जितकें साधेल तितकें करून, आज पावेतों जिला नियमांत आणण्या विषयीं कोणीं प्रयत्न केलाच नाहीं ह्मणोन अत्यंत विस्खलित झालेली, व व्याकरणरूप फणीनें जिला कोणीं विंचरलेंच नाहीं ह्मणोन जींत अनेक ग्रंथि जमून फारच गुंतलेली, अशी जी ही मराठी भाषा, तिला कांहीं तरीं नियमांत आणावी, आणि दीर्घकाळग्रंथित जी तिची गूत ती हातीं घेऊन तिचे पदर सोडवून कांहीं तरीं उकलण्याच्या धोरणांत आणून बसवावी. आतां हें कार्य मीं कसें व कोठपर्यंत सिद्धीस नेलें याचा विचार करणें सुज्ञां कडेस आहे.

ही महाराष्ट्र भाषा आज पावेतों नियमांत नव्हती, ह्मणोन इचे प्रकारहि फार आढळतात. दहाबारा कोशां वर भाषा बदलत्ये, ह्मणून जी लोकांची ह्मण आहे ती अक्षरशः खरी आहे. इतकेंच नाहीं परंतु जे भाषाभिज्ञ आहेत त्यांच्या ऐकण्यांत शब्दवैचित्र्या वरून, स्वरभेदा वरून, व जातिपरत्वेंहि निरनिराळे

अनुक्रमणिका

प्रकार येतात. कोंकणांतच या भाषेचे चार पांच प्रकार आढळतात; दमण पासून मुंबई पर्यंत एक प्रकार, यांत कांहीं कांहीं गुजराथी शब्दांची मिसळ आहे; यांत वर्तमान काळीं एकवचनीं, तृतीय पुरुषाचीं रूपें पुल्लिगीं स्त्रीलिंगा प्रमाणें, आणि प्रथम पुरुषाचीं स्त्रीलिंगीं पुल्लिंगा प्रमाणें होतात. मुंबईच्या दक्षिणेस अष्टागर प्रांताच्या भाषेचा प्रकार निराळा; महाडाच्या खाडी पासून जयगडच्या खाडी पर्यंत जो प्रांत त्यांतील भाषेचा प्रकार निराळा; पुढें रत्नागिरी प्रांताची शुद्ध कोंकणी भाषा या पेक्षा विशेष निराळी; राजापुरप्रांताच्या भाषेचा प्रकार निराळा; तेथून मालवणी भाषा निराळी, ईत गोमंतकी शब्द, व क्रियापदांचीं कांहीं कांहीं रूपेंहि निराळ्या प्रकारचीं आढळतात; पुढें शुद्ध गोमंतकी भाषा, ही मराठी भाषेहून निराळी भाषा ह्मटल्यासहि चिंता नाहीं. देशस्थ भाषेंतहि याच प्रमाणें प्रकार आढळतात; ज्या ज्या देशाच्या सीमे वर महाराष्ट्र देशाची सीमा मिळाली आहे, त्या त्या प्रांतीं त्या त्या भाषेचे शब्द यांत मिसळून स्वरभेदहि निराळा होतो. कर्णाटक देशाच्या सीमे जवळच्या प्रांतीं, ह्मणजे करवीरा पासून सोलापूर पर्यंत जो प्रदेश त्यांत वेगळ्या प्रकारची भाषा आढळत्ये; वऱ्हाड प्रांताच्या थेट देशस्थी भाषेचा प्रकार निराळा; बऱ्हाणपुरा पासून नंदुरबार पर्यंत खानदेशाच्या समीपभागाच्या भाषेचा प्रकार निराळा; पुढें खानदेशाची भाषा गोमंतकी भाषे प्रमाणें मराठी भाषेहून निराळी ह्मटल्यास चिंता नाहीं,—'साहेबा तूं खैं वेता' हें जितकें शुद्ध महाराष्ट्र भाषे पासून निराळें, तितकेंच—'मनाभाऊ तूं कठ जास' हेंहि निराळें होय. आतां हे सर्व प्रकार वजा घालून महाराष्ट्र भाषेचे मुख्य दोन प्रकार मानिले आहेत—देशस्थ भाषा, आणि कोंकणस्थ भाषा; त्यांत या व्याकरणांत, महाराष्ट्र देशाचा मध्यभाग जो पुणेंप्रांत, त्यांत जी भाषा राजकीय आणि विद्वान् लोक बोलतात तिचें अनुसरण केलें आहे. त्यांत माझा व माझ्या वडिलांचा जन्म कोंकणांतला, ह्मणून यांत कदाचित् कोंकणी प्रका-

रांचें यत्किंचित् आधिक्य असलें तरीं मला क्षमा मागायास कांहीं अवकाश आहे.

पहिल्या आवृत्तीचा आणि या आवृत्तीचा तारतम्यभाव पाहिला असतां या दोहोंतील महदंतर त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं, असा मला तर भरंवसा आहे. पहिल्या आवृत्तींत जितकीं प्रकरणें आहेत त्यां पेक्षां ईत अधिक असून तीं प्रत्येक एथें विशद केलीं आहेत. यांत लिंगनिर्बंध, विभक्तिप्रकरण, उपान्त्य वर्णास विभक्तीनें जीं कार्यें होतात तीं, क्रियापदप्रकरण, यांत विशेषेंकरून रूप, भेद, अर्थ, यांहींकरून क्रियापदाच्या बहुधा सर्व रूपांचें कालनियमन, धातुसाधित नामें, आणि शब्दसाधित नामें, इत्यादि प्रकरणांत जो मोठा घोंटाळा आहे, तो दूर करून त्याची यथाशक्ति योग्य व्यवस्था करण्यांत जितका प्रयत्न करवला तितका करण्यांत आळस केला नाहीं. पहिल्या आवृत्ती पेक्षां ईत वाक्यरचने संबंधी नियम विशद करून सात नियम नवे घातले आहेत. तशींच कारक, लेखनपद्धति, वाचनपद्धति, हीं प्रकरणें यांत नवीं घातलीं आहेत. या विषयींचें विवेचन या उपोद्घातांत केलें असतें, परंतु ग्रंथविस्तारभयास्तव आतां करित नाहीं; आणि तें या दोन आवृत्ति परस्पर मिळवून पाहिल्या असतां सहज ध्यानांत यावया जोगें आहे. इतकें जरीं झालें तथापि यांत ग्रंथाच्या पूर्णतेचा आव घालितां येत नाहीं. या प्रकारचा हा बहुधा पहिलाच प्रयत्न आहे, असें ह्मटल्यास चिंता नाहीं, ह्मणोन कदाचित् यांतील लेखांत व छापांत कोंठे कोंठे पूर्वापारविरोधरूप दोष आढळतील, तर या विषयीं ग्रंथकर्त्यास क्षमा असावी. हा भाषारूप समुद्र फार विस्तीर्ण होय, यांत व्याकरणरूप नौकेंत आरोहण करून शोध करूं लागलें असतां, जों जों अंतःप्रवेश होत जातो, तों तों याची लांबी, रुंदी, आणि खोली, अधिकाधिक दृष्टीस पडती; या विषयीं कोणी प्राचीन वैय्याकरणानें ह्मटलें आहे;—

इंद्रादयोऽपियस्यांतंनययुःशब्दवारिधेः ॥
प्रक्रियांतस्यकृत्स्नस्यक्षमोवक्तुंनरःकथम् ॥

अनुक्रमणिका

ह्मणोन आपणास जितका शोध लागेल तितका करून पुढील नाविकांस मार्ग सुगम करून ठेवावा इतकेंच आपलें काम. आतां हें काम म्यां या पुढील ग्रंथरचनेनें कसें व कोठपर्यंत सिद्धीस नेलें या विषयीं यथायोग्य विचार करणें सुज्ञां कडेस आहे; मीं यांत बहुत श्रमानें जे जे नियम शोधून काढिले आहेत, त्यां वर त्यांणीं लक्ष दिलें, आणि त्यां विषयीं यथायोग्य विचार करून, त्यांत जे जे सयुक्तिक त्यांस वाटतील, त्यांचें ग्रहण करून, सांप्रत जी महाराष्ट्र भाषा लिहिण्यांत अव्यवस्था आढळती, ती मोडून, ते ग्रहण केलेले जे नियम त्यांस अनुसरून, ही भाषा नीट सारखी व्यवस्थेवर अणण्या विषयीं ते उद्युक्त होत गेले, ह्मणजे माझ्या इतक्या श्रमाचें साफल्य झालें असें मीं मानीन.

तिसऱ्या आवृत्ती विषयीं सूचना.

ही आवृत्ति दुसऱ्या आवृत्तीचीच प्रत आहे. परंतु ही छापत असतां पूर्वावृत्तींत जीं अशुद्धें पडलीं होतीं, तीं शुद्ध करून ग्रंथकर्त्यानें कोठे कोठे नवे नवे शोधहि घातले आहेत.

मु॥ अहमदनगर

२ अकटोबर १८५७ इस्वी.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.

खंड १.

व्याकरणशास्त्राची व्याख्या आणि त्याचा उपयोग यां विषयीं.

१ व्याकरण ह्मणून एक शास्त्र आहे, जेणेंकरून भाषेचें मर्मज्ञान होतें, ह्मणजे तिचे आंतील नियम कळतात, तेणेंकरून शुद्ध कोणतें आणि अशुद्ध कोणतें, हें यथास्थित समजतें.

या वरून जर कोणी पुसेल कीं, 'काय व्याकरण जाणल्या वांचून शुद्ध बोलतां येत नाहीं'? तर याचें उत्तर असें आहे कीं, आपली भाषा शुद्ध बोलण्यास जरीं व्याकरणाचें विशेष अगत्य नाहीं, तरीं जो त्याज विषयीं अज्ञान, तो यद्यपि बहुवक्ता आहे, आणि जरीं स्वतां अशुद्ध बोलत नाहीं, तथापि इतरांचें भाषण शुद्ध आहे किंवा अशुद्ध आहे, हें त्यास नीट दाखवितां येत नाहीं; त्या वेळेस तो गोंधळांत पडतो. तुह्मींच पाहा कीं ज्या कोणास व्याकरणाचें ज्ञान नाहीं, त्यास जर त्याच्या भाषेंत एकादें अशुद्ध वाक्य ह्मणून दाखविलें आणि विचारिलें कीं, हें शुद्ध आहे कीं अशुद्ध आहे, तर तो अशुद्ध ह्मणून सांगेल; परंतु 'कां अशुद्ध?' ह्मणून त्यास कोणीं प्रश्न केला असतां त्याच्यानें त्या पुसणाराचें समाधान करवणार नाहीं: घटकाभर पाहा, ज्याची स्वभाषा मराठी आहे, परंतु ज्यास व्याकरण ह्मणून काय वस्तु आहे हें ठाऊक नाहीं, अशा एका मनुष्यास पुसलें, कीं 'तीं मुलें तेथें खेळतो, हें शुद्ध किंवा अशुद्ध?' तर तो ह्मणेल कीं अशुद्ध, परंतु कां अशुद्ध असें विचारिलें असतां त्याच्यानें यथास्थित

अनुक्रमणिका

उत्तर देववणार नाहीं, कदाचित् ह्मटलें तर असें ह्मणेल कीं का ह्मणजे तें कानांसच वाईट लागतें, असें कोणी बोलत नाहीं'; परंतु अशा उत्तरानें विद्वान् लोकांचें समाधान व्हावयाचें नाहीं. अहो, व्याकरण ह्मणजे शास्त्र होय, आणि भाषा बोलणें ही केवळ व्यावहारिक आणि स्वाभाविक गोष्ट होय, ह्मणोन या उभय गोष्टीं मध्यें फार अंतर आहे. या शिवाय स्वभाषेंत व्याकरणाचा एक मोठा उपयोग असा आहे कीं, त्याच्या योगानें सर्वांची भाषा, व लिहिण्याची पद्धति एक पडून एतद्विषयक कित्येक संशय दूर होतात. तसेंच, एकाद्या कठीण वाक्याचा अर्थ कोणा एकाच्या ध्यानांत यथास्थित आला किंवा नाहीं, हें जाणायाचें असल्यास, त्याज कडून त्या वाक्याचा व्याकरणरूपानें पदच्छेद करवावा, ह्मणजे जर त्यास यथास्थित अर्थ समजला असला, तर तो अर्थास अनुकूल असा पदच्छेद करील, नाहीं तर चुकेल; सारांश व्याकरण हें अर्थाचें ही मोठें सूचक होय. आणखी स्वभाषे खेरीज इतर भाषा शुद्ध रीतीनें व त्वरित शिकायास या व्याकरण शास्त्राचा तर फारच आवश्यक उपयोग आहे.

२ व्याकरणाचे मुख्य भाग तीन आहेत ; **वर्णविचार**, **शब्दविचार**, आणि **वाक्यरचना**.

खंड २.

वर्णविचार.

३ वर्णविचारांत वर्ण संबंधी विचार सांगितला आहे, ह्मणजे वर्णांचें लक्षण, त्यांचा **संयोग**, त्यांचीं **स्थानें**, आणि त्यांचे **संधि**, यांचें विवेचन या भागांत केलें आहे.

४ वर्ण ह्मणजे **अ** पासून **ज्ञ** पर्यंत जीं मूळाक्षरें तीं प्रत्येक.

५ वर्णांमध्यें दोन भेद आहेत—**स्वर** आणि **व्यंजनें**.

६ **स्वर** ह्मणजे ज्यांच्या आश्रया वांचून अक्षर सिद्ध

अनुक्रमणिका

होत नाहीं, व ज्यांचा उच्चार व्यंजना वांचून करितां येतो, असे जे वर्ण ते; हे स्वर सोळा आहेत.

स्वर.

*अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः.

यांत ऋ, ॠ, ऌ, ॡ, हे स्वर केवळ संस्कृत भाषेंतच येतात.

अं अः यांस स्वरांत लेखणें कित्येक पंडितांस प्रशस्त वाटत नाहीं, कारण ते असें ह्मणतात कीं, अं, अः यांस जर निराळे स्वर मानावें तर मग इं, इः, उं, उः, इ० यांस निराळे स्वर कां मानूं नये? हा त्यांचा पूर्वपक्ष खरा आहे; परंतु एथें यांस स्वरांत गणिलें आहे, या वरून त्यांहीं इतकेंच समजावें कीं, अनुस्वार आणि विसर्ग ह्मणून जे स्वरांच्या उच्चारणांत भेद आहेत, त्यांचे सूचक हे वर्ण होत.

७ कोणताही वर्ण उच्चारायास जो काळ लागतो त्यास **मात्रा** असें ह्मणतात.

८ या मात्राभेदेंकरून मराठींत स्वरांचे दोन भेद आहेत—**ऱ्हस्व** आणि **दीर्घ**.

९ ऱ्हस्व स्वर उच्चारायास एक मात्रा लागती, आणि दीर्घ स्वर उच्चारायास दोन मात्रा लागतात; अर्थात् जितका काळ ऱ्हस्वस्वर उच्चारायास लागतो, त्याच्या दुप्पट काळ दीर्घ स्वरास लागतो.

१० अ, इ, उ, ऋ, ऌ, हे **ऱ्हस्वस्वर**.

११ आ, ई, ऊ, ॠ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, हे **दीर्घस्वर**.

१२ ऌ या वर्णास दीर्घत्व नाहीं असा संस्कृत व्याकरणांत नियम आहे.

---

* अ याची आकृती आणखी ऒ अशी ही आढळते.

१३ ए, ऐ, **ओ, औ,** यांस कोणी **संयुक्तस्वर**ही ह्मणतात.

१४ **अ** पासून **ऌ** पर्यंत जे दहा स्वर, त्यांस **मुख्य-स्वर** ह्मणतात.

१५ **अं, अः** यांची वास्तविक पाहतां स्वर ह्मणून निराळी गणना नसावी, व मूळ संस्कृतांतही ती नाहीं, परंतु बाळबोध लिपि शिकविणारे पंतोजी मुलांस **अनुस्वार** आणि **विसर्ग** यांचें ज्ञान व्हावें ह्मणोन यांसही स्वरांत लेखितात. यांत अक्षरां वर जो बिंदु देतात त्यास **अनुस्वार,** आणि पुढें जे दोन बिंदु देतात त्यांस **विसर्ग,** असें ह्मणतात.

१६ अनुस्वार ह्मणजे नाकांतून जो उच्चार होतो तो; हा उच्चार जाणविया करितां वर्णाच्या माथ्या वर असा एक बिंदु देतात, आणि ज्या वर्णाच्या माथ्या वर हा अनुस्वार असतो, त्यास **अनुनासिक** अथवा **सानुस्वार** ह्मणावें. मराठींत अनुनासिक वर्णांचा उच्चार कर्तव्य असतां कोठें तो वर्ण केवळ नाकांतून मात्र उच्चारावा लागतो; जसें—कां, आंत, कांटा, तीं, इत्यादि. आणि कित्येक ठिकाणीं संस्कृता प्रमाणें या अनुस्वारा पुढें जो वर्ण असेल त्याशीं सवर्ण असे जे **ङ, ञ, ण, न, म,** यांचा उच्चार कर्तव्य असतां हा अनुस्वराची योजना करितात; जसें—

रंक, अंग.	यांचा उच्चार	**रङ्क, अङ्ग.**	होय.
यांचा, भंजन.	यांचा उच्चार	**याञ्चा, भञ्जन.**	होय.
पंडु, तंटा, धिंड.	यांचा उच्चार	**पण्डु, तण्टा, धिण्ड.**	होय.
संतान, पंतोजी. मंथन, धंदा.	यांचा उच्चार	**सन्तान, पन्तोजी. मन्थन, धन्दा.**	होय.
आंबा, रंभा, अंमा.	यांचा उच्चार	**आम्बा, रम्भा, अम्मा.**	होय.

(अ) आतां मराठी भाषेंत बहुधा असा नियम आहे कीं कित्ये-

अनुक्रमणिका

क मराठी शब्दांत आद्य अक्षरा वर आणि बहुधा सर्वत्र अंत्य अक्षरा वर अनुस्वार असतां, आणि अनुनासिक जे **आ, ओ,** यां पुढें **च्च ज्ज झ** हे वर्ण असतां, त्याचें उच्चारण केवळ नाकांतून करावें लागतें; व हा भेद जाणवायाचा असतां क्वचित् त्या अनुस्वारा खालीं ँ अशी अर्धचंद्राकार कुंडली करितात; जसें–काँ, कीँ, तूँ, आँत, तेँ, काँच, साँज, खोँच, इ०.

(इ) परंतु मराठींत वर सांगितला नियम आहे, ह्मणोन शब्दाच्या शेवटीं ँ हें असें चिन्ह करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. तसेंच सर्व सप्तम्यंत शब्दांचा उपांत्य याच प्रमाणें अनुनासिक जाणावा; जसें–घरांत, भिंतींत, वायूंत, इ०.

सानुनासिक वर्णा पुढें **च्च ज्ज झ** हे वर्ण आले, तर अनुस्वाराचा कोंकण आणि देश यां परत्वें विकल्पें अनुनासिक उच्चार होतो; जसें–चिंच, झांज, इ०.

(उ) परंतु जेथें उच्चारणांत विकल्प होत असेल, तेथें हा भेद अवश्य दाखविला पाहिजे; जसें–**सर्वांत** एथें सर्व शब्दाच्या सप्तमीचें रूप, आणि **सर्व** आणि **अंत** यांचा संधि होऊन जो **सर्वांत** शब्द होतो त्याचें रूप, हीं सारिखीं असतां स्पष्ट रीतीनें लिहिणें झाल्यास पूर्व शब्द **सर्वांत** असा लिहावा, आणि दुसरा शब्द **सर्वान्त** असा लिहावा.

पुढें अकारान्त, इकारान्त, इ० शब्द याच प्रकारें लिहिले आहेत.

(ऋ) आणखी अनुस्वारा पुढें **य, र, ल, व, श, ष, स, ह,** हे वर्ण असतां, अनुस्वाराच्या उच्चारणांत कांहीं भेद पडतो; पूर्व वर्णा वर अनुस्वार असून, तो वर्ण जर अनुनासिक असला, आणि पुढें जर **य** आणि **ल** हे वर्ण असले,

तर त्यांस द्वित्व होतें; जसें—**संयोग, संलग्न,** इ०. आणखी **र, व, श, ष, स, ह,** हे वर्ण पुढें असतां प्रथम वर्ण अनुनासिक उच्चार्यमाण असून त्यास किंचित् दंतौष्ठ्य ह्मटलें पाहिजे; जसें—संरक्षक, संवाद, संशय, दंष्ट्रा, संसार, कंस, संहार, सिंह, इ०.

१७ ज्या अक्षरा पुढें विसर्ग असतो, त्या अक्षराचा अंत्यस्वर उच्चारून तो मुखांत वायू वर किंचित् आदळावा लागतो; जसें—छिः, अंः, दुःख, अंतःकरण, इ०.

१८ यांत **ऋ, ॠ, ऌ, ॡ, अः** इतके स्वर संस्कृत शब्दां वांचून इतर प्राकृत शब्दांत येत नाहींत; परंतु हे स्वर ज्यांत असतात असे जे संस्कृत शब्द, ते मराठी भाषेंत पुष्कळ आहेत, ह्मणोन यांस एथें स्वरांत अवश्य गणिलें पाहिजे.

१९ व्यंजन ह्मणजे स्वरा वांचून ज्याचा स्पष्ट उच्चार होत नाहीं असा जो वर्ण तें. हीं व्यंजनें चौतीस आहेत.

व्यंजनें.

क्,	ख्,	ग्,	घ्,	ङ्,
च्,	छ्,	ज्,	झ्,	ञ्,
ट्,	ठ्,	ड्,	ढ्,	ण्,*
त्,	थ्,	द्,	ध्,	न्,
प्,	फ्,	ब्,	भ्,*	म्,
य्,	र्,*	ल्,	व्,	श्,
ष्,	स्,	ह्,	ळ्.	

यांतून प्रत्येक व्यंजनाची अर्ध मात्रा जाणावी.

२० दुसरें यांत **च्, ज्, झ्,** यां व्यंजनांचा उच्चार

* **ण, भ, र** यांची आकृति कधीं **ण, भ, र** अशीही आढळती.

अनुक्रमणिका

मराठी भाषेंत दोन प्रकारचा आहे, एक तर मूळ संस्कृता प्रमाणें शुद्ध तालव्य; जसें—चंद्र, चार, चित्त, चौर्य, जन, जाया, जीर्ण, झल्लरी, झांझा, इ०; आणखी दुसरा दांतांशीं जीभ आणून जो दंततालव्य उच्चार होतो तो; याचीं उदाहरणें—चणें, चार, जासूद, जो, झांज, झुकणें, इ०. या वर्णांचा दंततालव्य उच्चार असतां त्यांच्या वरल्या रेघेच्या डावे कडेस एक बिंदु द्यावा.

या वर्णांच्या तालव्य आणि दंततालव्य उच्चारां विषयीं मराठींत बहुधा असा नियम आहे, कीं—

(अ) शुद्ध संस्कृत, अरबी, अथवा फारसी शब्द, अथवा यां वरून साधलेले जे शब्द, त्यांत **च**, **ज**, **झ**, यां वर्णांचा उच्चार तालव्य जाणावा.

(आ) जे शुद्ध मराठी शब्द, अथवा परभाषेंतून येऊन जे केवळ मराठी होऊन गेलेले शब्द, त्यांतील **च**, **ज**, **झ**, यां वर्णांच्या अंतीं जर **अ**, **आ**, उ, ऊ, ऐ, **ओ**, **औ**, ह्मणजे इ, आणि ए, हे स्वर वर्ज करून अवशिष्ट राहिलेले स्वर असले, तर बहुधा त्यांचा दंततालव्य उच्चार होतो.

(इ) यांत ए असतां कोंकण आणि देश यां परत्वें विकल्पें दंततालव्य उच्चार होतो; जसें—त्याचें अ० त्याचें, माझें अ० माझें, खाजें अ० खाजें, इ०.

यांत बहुधा आरंभीं असल्या पेक्षां शेवटीं एकार असतां दंततालव्य उच्चार विशेष आढळतो.

ही बिंदु देण्याची रीति अलिकडेस निघाली आहे. आणखी यद्यपि, महाराष्ट्र लोकांस या चिन्हाची मोठी आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं, तथापि सामान्यतः सर्वांस या वर्णांचें उच्चारण, आणि कोठें कोठें अर्थ ग्रहण हीं निःसंशय व्हावें, ह्मणोन हें चिन्ह लिहिणें मला कांहींसें आवश्यक वाटतें. परंतु

हें जोडिते वेळेस सर्वांहीं अनुस्वारा प्रमाणें याज विषयीं फार सावध असावें; या चिन्हाची आवश्यकता पुढें विभक्तिप्रकरणीं यथास्थित प्रतिपादिली आहे.

ङ, ञ, आणि ष, हीं अक्षरें संस्कृत शब्दांत मात्र येतात.

२१ ड, या वर्णाचा उच्चार मराठींत दोन प्रकारचा आहे; त्याचा नियम असा आहे कीं, हा वर्ण शब्दाच्या आरंभीं असतां याचा उच्चार शुद्ध **ड** सारिखा होतो; परंतु शब्दाच्या मध्यें, अथवा शेवटीं, असला तर, शुद्ध **ड** उच्चारिते वेळेस जितकी जीभ टाळ्यावर दाबावी लागती तितकी न दाबितां मध्येंच किंचित् पसरावी लागती; **डाग** आणि **बडबड**, या दोहों शब्दांत डचा उच्चार सारिखा नाहीं.

(अ) शेवटीं द्वित्त **ड** असला, अथवा उपांत्य वर्ण जर अनुनासिक असला, तर डच्या शुद्ध उच्चारांत कांहीं फेर पडत नाहीं. जसें—**अड्डा, सांड**, इ०.

या उच्चारणा विषयीं कित्येकांस संशय आहे, ते ह्मणतात डचे दोन उच्चार कोठें ही नाहींत; मुंबईप्रांतांत मुसलमान, पारशी आदिकरून लोकां मध्यें मात्र असा हा डच्या उच्चारणांत फेर पडतो. परंतु मला वाटतें ही त्यांची चूक आहे. मुसलमान आदिकरून लोक तर केवळ डचा र सारिखांच उच्चार करितात, तो तर केवळ अप्रशस्त, परंतु मराठी शब्दांत शेवटल्या व मधल्या डच्या उच्चारांत आणि पहिल्या डच्या उच्चारांत किंचित् फेर असतो, यांत संशय नाहीं. **गडबड, भडभडचा**, यांत आणि **डाग, डुकर**, यांत, डच्या उच्चारणांत फेर आहे या विषयीं मला तर संशय वाटत नाहीं.

२२ **क्ष**, आणि **ज्ञ**, हीं अक्षरें बहुधा सर्व व्यंजनांत लेखितात, परंतु हें ठीक नव्हे; तीं संयुक्त व्यंजनें होत; तीं कशीं हें पुढें लौकरच समजण्यांत येईल.

आतां सर्वत्र परिपाठ पडला आहे ह्मणोन, **क्ष**, आणि **ज्ञ** यांस

अनुक्रमणिका

षर्णानुक्रमांत धरिलें ह्मणोन चिंता नाहीं, परंतु व्याकरणा मध्यें मात्र त्यांच्या या प्रमाणें भेद दाखविला पाहिजे.

२३ आतां स्वर व्यंजनांशीं मिळाल्यानें विशेष काय होतो तो सांगतों; व्यंजनास जेव्हां अ, मिळतो तेव्हां त्याचें, असें जें अपूर्णपणाचें चिन्ह असतें तें मात्र जातें, परंतु **आ** मिळाला असतां तें जाऊन पुढें ा अशी खूण लिहितात, ईस **काना** ह्मणतात. स्वर, यांच्या खुणा, आणि त्या खुणांच्या संज्ञा खालीं लिहून दाखविल्या आहेत.

स्वर.	खुणा.	संज्ञा.
आ	ा	काना
इ	ि	ऱ्हस्व वेलांटी
ई	ी	दीर्घ वेलांटी
उ	ु अ ० ा	ऱ्हस्वउकारचिन्ह
ऊ	ू	दीर्घउकारचिन्ह
ऋ	ृ	ऱ्हस्वऋकारचिन्ह
ॠ	ॄ	दीर्घऋकारचिन्ह
ऌ	ॢ	ऱ्हस्वऌकारचिन्ह
ॡ	ॣ	दीर्घऌकारचिन्ह
ए	े	मात्रा
ऐ	ै	दुमात्रा
ओ	ो	कानामात्रा
औ	ौ	द्विमात्रकाना
अं	ं	अनुस्वार
अः	:	विसर्ग

व्यंजनास स्वर मिळविल्यानें अक्षरें कशीं होतात, व ते

मिळाले असतां व्यंजनास विशेष काय होतो, हें स्वरांच्या अनुक्रमानें खालीं लिहून दाखविलें आहे.

क् या व्यंजनास अ स्वर मिळतो, तेव्हां क, असें अक्षर सिद्ध होतें.

क्.	आ.	का . . . . .
क्.	इ	कि. . . . . .
क्.	ई	की. . . . . .
क्.	उ	कु. . . . . .
क्.	ऊ	कू. . . . . .
क्.	ऋ	कृ. . . . . .
क्.	ॠ.	कॄ. . . . . .
क्.	ऌ	कॢ. . . . . .
क्.	ॡ.	कॣ. . . . . .
क्.	ए	के. . . . . .
क्.	ऐ	कै. . . . . .
क्.	ओ.	को . . . . .
क्.	औ.	कौ . . . . .
क्.	अं	कं. . . . . .
क्	अः.	कः . . . . .

२४ या प्रमाणें कोणत्याही व्यंजनास अनुक्रमें स्वर मिळविले ह्मणजे त्या पंक्तीस **बाराखडी** ह्मणतात.

(अ) यांत बहुधा ऋ, ॠ, ऌ, ॡ, हे स्वर व्यंजनांशीं मिळवून पंतोजी सांगत नाहींत.

(आ) उच्या खुणा दोन सांगितल्या, त्यांत ा ही शेवटली खूण, ज्या वर्णास स्वाभाविक काना असतो त्यास मात्र, विकल्पें लिहितात. र यास निरंतर उचा ही शेवटलीच

अनुक्रमणिका

खून लिहितात; जसें–रु; व दीर्घ रू या प्रमाणें काढितात.

भाग १.

जोडाक्षरविचार.

२५ **जोडाक्षर** ह्मणजे जोडलेलें अक्षर, हा अर्थ तर उघडाच आहे, परंतु अर्थविस्तार केला असतां असा आहे कीं, दोन किंवा अधिक व्यंजनांस पुढें एकादें अक्षर जोडिल्यानें, अथवा दोन किंवा दोहों पेक्षां अधिक व्यंजनें एकत्र जोडून मग त्यांस स्वराचा योग केल्यानें, जोडाक्षरें होतात; जसें-क् यास **अ** मिळविल्यानें **क्क**; **आ** मिळविल्यानें **क्का**; इ मिळविल्यानें **क्कि**; इ०.

२६ हीं जोडाक्षरें काढायाची रीति अशी आहे कीं, जें जोडाक्षर लिहायाचें असेल त्याचा पहिला वर्ण अर्धा काढून पुढें दुसरें अक्षर लिहावें. **ग्म** लिहायाचा आहे असें मनांत आणा; आतां पाहा--पूर्व **ग्** हा **ग** असा अर्धा काढून त्यास **म** जोडिला ह्मणजे या प्रमाणें **ग्म** हें अक्षर सिद्ध होतें; याच प्रमाणें **ग्म्य**, **क्त्य**, **त्स्यू**, इत्यादि तीन वर्णांचीं जोडाक्षरें जाणावीं. ज्या वर्णास स्वाभाविक काना असतो, त्याचा तो काढून टाकिला ह्मणजे त्या वर्णाचा आकार अर्द्धा होतो.

२७ कोणत्याही व्यंजनास र जोडणें तर_हें चिन्ह जोडितात; परंतु ज्या व्यंजनास स्वाभाविक काना असतो त्यास र जोडणें तर त्याच्या कान्यास डावे कडे_ही अशी रेघ ओढितात; जसें–**क्र**, **प्र**, **म्र**, **स्र**, इ०. परंतु ज्यास तो स्वाभाविक काना नसतो, त्यास खालीं ॖ असें चिन्ह लिहिल्यानें र जोडिला जातो; जसें–छ्र, ट्र, ठ्र, ड्र, ढ्र, इ०.

अनुक्रमणिका

तात्पर्य हेंच कीं, ऱ्‍ या वर्णाची दुसऱ्या प्रकारची आकृति न अशी आहे, तिचा हा अंश जोडितात.

२८ ज्यास स्वाभाविक काना नसतो, त्यास जर कोणतें ही अक्षर जोडणें तर, जें जोडायाचें तें अक्षर त्याच्या खालीं लिहावें, ही उत्तम रीति; परंतु कधीं त्याच्या सन्निकृष्टही लिहितात. परंतु अक्षरां वरील जी स्वाभाविक रेघ ती त्यांस एकच असली पाहिजे; जसें—ट्म ट्म, ट्क ट्क, ड्न ड्न, क्ल क्ल, इ०.

२९ जोडाक्षरां मध्यें र अंमळ विलक्षण आहे; पाहा, त्यास कोणतेंही अक्षर किंवा अक्षरें जोडणें तर, त्याच अक्षरा वर ` अशी खूण करावी लागती; या चिन्हास **रेफ** अशी संज्ञा आहे; उदाहरण—र्क, र्म, र्गा, र्चि, र्श्य, इ०.

३० कित्येक जोडाक्षरें दोन रीतींनीं लिहितात, त्यांत जीं विपरीत असतात, तीं लिहिण्यांत फार, दुसरीं क्वचित्. तीं शिकणारांनीं ध्यानांत धरावीं. त्र हें त्र होय; क्र हें क्र; क्त हें क्त; त्त हें त्त; स्त्र हें स्त्र; स्थ हें स्थ; ह्य, हें ह्य; ह्म हें ह्म अ० म्ह; द्य हें द्य होय.

३१ श या अक्षरास र, ल, व, न, आणि च, हीं अक्षरें जोडायाचीं असलीं तर, त्याचें वहुत करून श्‍ असें रूपांतर होतें; जसें—श्री, श्ला, श्वा, श्न, श्च.

भाग २.

स्थानविचार.

३२ ज्या वर्णाचें उच्चारण मुखाच्या ज्या स्थाना पासून घडतें, तें त्या वर्णाचें **स्थान** होय.

अ, आ, क, ख, ग, घ, ङ, ह, यांचें **कंठस्थान.** हे वर्ण **कंठ्य** जाणावे.

इ, ई, च, छ, ज, झ, ञ, य, श, यांचें **तालुस्थान** हे वर्ण **तालव्य** जाणावे.

ऋ, ॠ, ट, ठ, ड, ढ, ण, र, ष, ळ, यांचें **मूर्द्धास्थान.** हे वर्ण **मूर्द्धन्य.**

ऌ, ॡ, त, थ, द, ध, न, ल, स, यांचें **दंतस्थान.** हे वर्ण **दंत्य.**

उ, ऊ, प, फ, ब, भ, म, यांचें **ओष्ठस्थान.** हे वर्ण **ओष्ठ्य.**

ए, ऐ, . . . यांचें **कंठतालुस्थान.** हे वर्ण **कंठतालव्य.**

ओ, औ, यांचें **कंठौष्ठस्थान.** हे वर्ण **कंठौष्ठ्य.**

व यांचें **दंतौष्ठस्थान.** हा वर्ण **दंतौष्ठ्य.**

च, छ, ज, झ, यांचें **दंततालुस्थान.** हे वर्ण **दंततालव्य.**

अनुस्वराचें **नासिकास्थान** जाणावें.

विसर्गाचें **कंठस्थान** जाणावें.

ङ्, ञ्, ण्, न्, म्, यां वर्णांचीं पूर्वोक्त तीं तीं स्थानें असून, आणखी यांचें **नासिकास्थान**ही होय. हे वर्ण **अनुनासिक** जाणावे.

भाग ३.

संधिविचार.

३३ दोन वर्ण जेथें मिळतात त्या स्थळीं त्यांचा **संधि** ह्मणतात.

अनुक्रमणिका

३४ दोन **स्वर** जेथें मिळतात त्या संधीस **अच्संधि**,* अथवा **स्वरसंधि** ह्मणतात.

३५ दोन व्यंजनें जेथें मिळतात त्या संधीस **हल्संधि**, अथवा **व्यंजनसंधि** ह्मणतात.

वास्तविक पाहिलें असतां, हें संधिप्रकरण संस्कृत व्याकरणाचा भाग होय; शुद्ध मराठी शब्दांत संधि होत नाहीं. तथापि या भाषेंत संधि जाणण्यास अथवा करण्यास विरळा प्रसंग येतो असें नाहीं; कांकीं या भाषेंत संस्कृत शब्दांचा भरणा फार आहे ह्मणोन संस्कृताच्या नियमा प्रमाणें **संधि** करण्याचा वारंवार प्रसंग पडतो, या करितां या प्रकरणीं उपयुक्त नियम सांगणें आवश्यक आहे.

संस्कृत व्याकरणांत हा संधि साधण्या करितां वर्णांची कृत्रिम रचना केली आहे, त्या सारिखी कांहींशी रचना करून एथें हल्संधिप्रकरणीं दाखविली आहे.

विभाग १.

अच्संधि अ० स्वरसंधि.

३६ मुख्यस्वरांतून एकजातीय दोन स्वर असले तर, त्या दोहोंचा संधि दीर्घ होतो—**अ** किंवा **आ** आदीं असून, पुढें **अ** किंवा **आ** आला, तर त्या दोहों स्वरांच्या स्थानीं **आ** असा दीर्घ आदेश होतो. तसेंच इ किंवा ई यांच्या पुढें इ किंवा ई असतां त्यांच्या स्थानीं ई आदेश होतो; या वरून पुढें जाणावें.

---

* संस्कृत व्याकरणांत स्वरांस बहुतकरून **अच्** ह्मणतात, आणि व्यंजनांस **हल्** ह्मणतात. हीं नावें, संस्कृतांत प्रत्याहार ह्मणून जी या संधी करितां वर्णरचना केली आहे, त्या वरून पडलीं आहेत. संस्कृत व्याकरणांत याच संज्ञा फार प्रसिद्ध आहेत, ह्मणोन एथेंही त्यांचेंच ग्रहण केलें आहे.

उदाहरणें.

वस्त्र + अन्न = वस्त्रान्न.	हरि + इच्छा = हरीच्छा.
धर्म + आश्रय = धर्माश्रय.	करी + इंद्र = करींद्र.
गंगा + अर्पण. = गंगार्पण.	भानु + उदय = भानूदय.
रंभा + आज्ञा = रंभाज्ञा.	भू + उत्तर = भूत्तर.

पितृ + ऋण = पितॄण.

३७ **अ** किंवा **आ**, आणि दुसरे विजातीय स्वर यांचे संधि येणेंप्रमाणें होतात;—ह्मणजे, पूर्वी **अ** किंवा **आ** असून पुढें जर इ किंवा ई असला, तर या उभय स्वरांच्या स्थानीं ए आदेश होतो; उ किंवा ऊ असला, तर **ओ**; ऋ किंवा ॠ असला तर **अर्**; ऌ असला तर **अल्**; ए किंवा ऐ असला तर ऐ; आणि **ओ** किंवा **औ** असला तर **औ**; असे आदेश होतातः—

उदाहरणें.

मुख + इंदु = मुखेंदु	तव + ऋद्धि = तवर्द्धि.
सुर + ईश्वर = सुरेश्वर	एक + एक = एकैक.
शीत + उष्ण = शीतोष्ण	देव + ऐश्वर्य = देवैश्वर्य.
गंगा + उदक = गंगोदक	गंगा + ओघ = गंगौघ.

माया+औपाधिक = मायौपाधिक.

३८ मुख्यस्वरांतले **अ आ** यां शिवाय इतर जे स्वर, त्यांचा मुख्यस्वरांशीं अथवा संयुक्तस्वरांशीं या प्रमाणें संधि होतोः— इ ई यांच्या स्थानीं **य्**; उ ऊ यांच्या स्थानीं **व्**; ऋ ॠ यांच्या स्थानीं **र्**; ऌच्या स्थानीं **ल्**; एच्या स्थानीं **अय्**; ऐच्या स्थानीं **आय्**; **ओ**च्या स्थानीं **अव्**; आणि **औ**च्या स्थानीं **आव्**; असे आदेश होतातः—

उदाहरणें.

इति + अर्थ = इत्यर्थ.	मातृ + अर्थ = मात्रर्थ.
प्रति + उत्तर = प्रत्युत्तर.	पितृ + आनंद = पित्रानंद.
गौरि + आनंद = गौर्य्यानंद.	ऌ + अनुबंध = लनुबंध.
मनु + अंतर = मन्वंतर.	ने + अनं = नयनं.

गो + उत्साह = गवुत्साह.

इ० इ०

या **अच्**संधी मध्यें दोन प्रकार आहेत. एक **गुण**, आणि एक **वृद्धि.**

३९ जेव्हां इचा ए होतो, उचा **ओ**, **ऋ**चा **अर्**, आणि ऌचा **अल्** होतो, तेव्हां त्या विकारास **गुण** ह्मणतात.

४० जेव्हां **अ**चा **आ**, इ आणि ए यांचा ऐ, उ आणि **ओ** यांचा **औ**, **ऋ**चा **आर्**, आणि ऌचा **आल्** होतो, तेव्हां त्या विकारास **वृद्धि** ह्मणतात.

विभाग २.

हल्संधि अ० व्यंजनसंधि.

४१ व्यंजनांचे संधि स्पष्ट कळाया करितां अगोदर प्रत्याहार सांगतों.

अ, इ, उ; ऋ, ऌ;–ए, ओ; ऐ, औ;–

ह, य, व, र; ल;–ञ, म, ङ, ण, न;–झ, भ; घ, ढ, ध;–ज, ब, ग, ड, द;–ख, फ, छ, ठ, थ, च, ट, त; क, प;–श, ष, स; ह;

यां मध्यें असा नियम आहे कीं, कोणतींही दोन अक्षरें ह्मटलीं ह्मणजे त्यांत त्यां सुद्धां त्यां दोहों मधल्या सर्व अ-

क्षरांचा समावेश जाणावा; जसें;– **अ–ऌ** ह्मटलें ह्मणजे अ, इ, उ, ऋ, ऌ, इतक्या वर्णांचा प्रत्याहार जाणावा; तसेंच **अ–ब** ह्मटलें ह्मणजे त्यांत **अ** पासून **ब** पर्यंत जितके वर्ण आहेत त्यां सर्वांचा समावेश होतो; तसेंच ज–द ह्मटलें ह्मणजे यांत ज, ब, ग, ड, द, इतके वर्ण येतात.

४२ आतां व्यंजनांच्या संधी विषयीं सामान्य रीति अशी आहे कीं, पदाच्या अथवा शब्दाच्या अंतीं झ–ह (एथें शिकणारानें लक्षांत ठेवावें कीं झ–ह ह्मटलें ह्मणजे झपासून हपर्यंत जितके वर्ण ते सारे) असतां पुढें कोणताही वर्ण येऊ अथवा न येऊ तथापि विवक्षा असतां त्याच्या स्थानीं ज–द होतो; ह्मणजे **क्** अ॰ **ख्** यांच्या स्थानीं **ग्**; **च्** अ॰ **छ्** यांच्या स्थानीं **ज्**; **ट्** अ॰ **ठ्** यांच्या स्थानीं **ड्**; **त्** अ॰ **थ्** यांच्या स्थानीं **द्**; आणि **प्** अ॰ **फ्** यांच्या स्थानीं **ब्** आदेश होतो.

उदाहरणें.

वाक्	+	वर	=	वाग्वर.	षट्	+	रिपु	=	षड्रिपु.
वाक्	+	ईश	=	वागीश.	तत्	+	आश्रय	=	तदाश्रय.
अच्	+	अंत	=	अजंत.	अप्	+	द	=	अब्द.
				इ॰.					इ॰.

यांत नियम हाच कीं, पुढें वर्ण नसतां विकल्पें ज–द होतो. आणि पुढें वर्ण असल्यास ज–द केलाच पाहिजे.

४३ यांत आणखी असा नियम आहे कीं, पूर्वी **त्**, **थ्**, **द्**, **ध्**, **न्**, असून जर पुढें **च्**, **छ्**, **ज्**, **झ्**, **ञ्**, अथवा **ट्**, **ठ्**, **ड्**, **ढ्**, **ण्**, हे वर्ण आले, तर त्यांच्या स्थानीं पुढल्या वर्णांचा

अनुक्रमणिका

आदेश होतो; परंतु छ् अ० झ्, आणि ठ् अ० ढ् यांच्या स्थानीं सवर्णांचा आदेश न होतां च् अ० ज्, आणि ट् अ० ड् याच वर्णांचा अनुक्रमें आदेश होतो.

उदाहरणें.

तत् + चरित्र = तच्चरित्र.	सत् + जन = सज्जन.
तद् + छत्र = तच्छत्र.	तत् + टीका = तट्टीका.

भगवत् अ० द् + डमरू = भगवड्डमरू.

४४ तवर्गा पुढें ल् असतां तवर्गाच्या स्थानीं ल्चा आदेश होतो; जसें—भगवत्+लीला=भगवल्लीला.

४५ तवर्गा पुढें श् असतां तवर्गाच्या स्थानीं चवर्ग, आणि श्च्या स्थानीं छ् असे आदेश होतात.

उदाहरणें.

सत् + शास्त्र=सच्छास्त्र	तद् + श्लोक = तच्छ्लोक.

४६ झ–प पुढें जर ह् असला, आणि त्यांचा संधि कर्तव्य आहे, तर ह्च्या स्थानीं विकल्पें पूर्व वर्णाच्या वर्गांतील जे चतुर्थ वर्ण झ्, भ्, घ्, ढ्, ध् यांचा त्याच्या त्याच्या सवर्णा प्रमाणें आदेश होतो.

उदाहरणें.

वाक् अ० ग् + हरि = वाग्हरि अ० वाग्घरि.
अच् अ० ज् + हल् = अज्हल् अ० अज्झल्.
षट् अ० ड् + हृदय = षड्हृदय अ० षड्ढृदय.
एतत् अ० द्+हवि = एतद्हवि अ० एतद्धवि.
इ० इ०

४७ य–स जर शब्दाच्या अंतीं आहेत, आणि त्यां पुढें

ञ्, म्, ङ्, ण्, न् यांतून कोणताही अनुनासिक वर्ण आला तर पूर्व वर्णाच्या स्थानीं विकल्पें सवर्ण अनुनासिकाचा आदेश होतो.

उदाहरणें.

वाक् + मन = वाङ्मन अ० वाग्मन.

षट् + मास = षण्मास अ० षड्मास.

चित् + मय = चिन्मय अ० चिद्मय.

तत् + नयन = तन्नयन अ० तद्नयन.

हा संधिविचार संस्कृतांत फार मोठा आहे, ह्मणोन त्यांतल्या ज्या मुख्य मुख्य रीति, ज्यांचा मराठींत उपयोग पडतो, त्या एथें सांगितल्या आहेत. त्यांत या हल्संधीचे जे नियम एथें सांगितले आहेत त्यांस कित्येक बाधकही शब्द आहेत, परंतु तितक्या बारकाईत जाण्याचें एथें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. या इतक्या नियमां वरून प्राकृतांत बहुधा सर्वत्र निर्वाह होईल असा मला भरंवसा आहे.

खंड २.

शब्दविचार.

४८ या विचारा मध्यें भाषेस मूलरूप जे शब्द, त्यांची उत्पत्ति, साधन, जाति, आणि इतर शब्दांशीं त्यांचा संबंध, यां विषयीं विचार सांगितला आहे.

भाषा ह्मणजे मनुष्यांस व्यवहारांत परस्परांचे मनोभाव समजावे ह्मणोन परंपरागत शब्दांचें अवलंबन करून मुखानें जें बोलतात ती होय. या वरून अनुमान केलें असतां होईल कीं, भाषे मध्यें शब्दमात्रास नियम असावे; हे नियम कसकसे हा विचार या पुढल्या भागांत केला आहे.

अनुक्रमणिका

कदाचित् कोणीं शिकणारानें पहिल्यानेंच पुसलें कीं, भाषे मध्यें नियम आहेत? तर त्याणें समजावें कीं, जर भाषे मध्यें नियम नसते तर भाषाच नसती; कांकीं जेव्हां मुलें लहान असतात, त्या काळीं 'बाबा आला,' 'आई आली,' 'पोर आलें,' असें ह्मणतात; नियम नसता तर या तिघांस **आला, आली, आलें,** अशीं निराळीं रूपें कां असतीं? बाबा पुरुष आहे, ह्मणोन त्यास **आला**; आई स्त्री आहे, ह्मणोन तीस **आली**; आणि पोर हलकें, अथवा तेथें मुलगा किंवा मुलगी अशी विवक्षा नाहीं, ह्मणोन त्यास **आलें**, असें ह्मणतात; यासच नियम ह्मणावा: जर हा नियम नसता, तर एक मूल 'बाबा आली,' दुसरें मूल 'आई आला,' 'टिपू आलें,' आणि तिसरें मूल या परीस विलक्षण ह्मणतें; कांकीं मग कोणत्याही गोष्टीचा नियमच न राहता; परंतु पुरुषाला पुरुषा प्रमाणें, स्त्रीला स्त्री प्रमाणें ह्मणावें, हा त्यांच्या वडिलांचा परंपरागत नियम आहे, ह्मणोन पुढें मुलेंही त्यासच अनुसरून बोलतात.

४९ **शब्द** ह्मणजे ज्या पासून अर्थ निष्पन्न होतो असा जो मुखांतून एकवर्णात्मक अथवा बहुवर्णात्मक ध्वनि निघतो तो; अथवा, त्यातें दाखविणारा जो लिखित वर्णसमुचय त्यासही **शब्द** ह्मणावें. जसें–तो, हा, घोडा, मनुष्य, खटपट, इत्यादि प्रत्येक शब्द जाणावे.

या प्रमाणें वैयाकरणांची शब्दाची व्याख्या होय. वेदांती व नैयायिक हे तर श्रोत्रेंद्रियविषयक जो ध्वनि त्यास शब्द ह्मणतात, मग तो सार्थ अथवा व्यर्थ कां असेना.

५० शब्द दोन प्रकारचे–**सिद्ध** आणि **साधित.**

५१ **सिद्ध** शब्द ह्मणजे जे शब्द इतर शब्दां पासून व्युत्पन्न नसून, स्वतःसिद्ध असतात ते; जसें– घोडा, लांकूड, डोळा, नाक, तोंड, इ०.

५२ **साधित**शब्द ह्मणजे जे इतर शब्दां पासून व्यु-

अनुक्रमणिका

त्पन्न झाले असतात; जसें—शास्त्री, विद्वान्, याज्ञिक, नैयायिक, लांकूडतोड्या, वाघनख्या, इ०.

वास्तविक विचार केला असतां असें ध्यानांत येतें कीं, कोणत्याही भाषेंत केवळ सिद्ध शब्द तर फार थोडे निघतील; कांकीं भाषेंत जे शब्द वाढतात, ते बहुधा अनेक प्रकारच्या प्रत्ययांच्या अथवा समासाच्या योगेंकरून; तेव्हां केवळ मूळ प्रकृतीलाच जर सिद्ध शब्द ह्मटलें तर असे सिद्ध शब्द फार थोडे निघतील. त्यांत आणखी कित्येक शब्दांच्या व्युत्पतीचें ज्ञान होत नाहीं, तेव्हां अर्थात् तें ज्ञान होई तों पर्यंत त्यांस सिद्धच ह्मटलें पाहिजे; यास उदाहरणः **माती** ह्मटलें असतां सामान्यतः सर्वांस पहिल्या दृष्टीस सिद्ध शब्दसा वाटतो, परंतु अंमळ विचार करून पाहिलें असतां लागलेंच समजतें कीं, हा संस्कृत शब्द जो **मृत्तिका** त्याचा अपभ्रंश होय. परंतु पुनः मनांत आशंका उत्पन्न होती कीं, **मृत्तिका** हा तरीं मुळचा सिद्ध शब्द आहे काय? तर नाहीं. मूळ **मृत्** शब्दा वरून स्वार्थी **तिकन्** प्रत्यय होऊन पुढें त्यास स्त्रिलिंगीं **टाप्** प्रत्यय होऊन मृत्तिका शब्द संस्कृतांत सिद्ध झाला आहे. तेव्हां अशा विचाराच्या जाळांत सर्व पडले असतां निर्वाह लागणार नाहीं; अतएव, असा विवाद न करितां सामान्यतः व्याकरणाचा व्यवहार चालविण्या करितां ज्या कोणास एकादा शब्दाची व्युत्पत्ति माहित नसेल त्याणें त्यास सिद्ध शब्द ह्मटलें असतां त्यांत मोठा दोष आहे असें कोणीं मानूं नये.

५३ या साधित शब्दां मध्यें **सामासिक** शब्द असा आणखी एक भेद आहे. दोन अथवा अधिक शब्दांचा संयोग होऊन त्यांचा एक शब्द होतो तो **सामासिक** शब्द; जसें—आईबापें, बहिणभावंडें, भक्तिरस, कृपावलोकन, चक्रपाणि, इत्यादि.

अनुक्रमणिका

भाग १.

सविभक्तिकशब्दविचार.

५४ आणखी प्रक्रिये वरून व्याकरणांत शब्दांचे मुख्य दोन भेद आहेत; एक **सविभक्तिक**, आणि दुसरा **अविभक्तिक अ० अव्यय.**

५५ **सविभक्तिक** शब्द ह्मणजे ज्यां वरून विभक्तिकार्यें होतात असे शब्द; जसें—राम, घर, मी, बरा, जाणें, येणें, इ०.

५६ **अविभक्तिक अ० अव्यय** ह्मणजे ज्यां वरून विभक्तिकार्यें होत नाहींत असे शब्द; जसें—सट्कन, आणि, जर, खालीं, छिः, इ०.

५७ महाराष्ट्र भाषेंत शब्दमात्राचे आठ वर्ग अथवा जाति आहेत; त्यांत सविभक्तिकांत चार—**नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद;** आणि अविभक्तिकांत अथवा अव्ययांत चार—**क्रियाविशेषण, उभयान्वयी, शब्दयोगी,** आणि **केवलप्रयोगी** अ० **उद्गारवाची** मिळून आठ.

या व्याकरणाच्या प्रथमावृत्तींत शब्दांच्या जाति पांच केल्या होत्या. परंतु त्यांत सविभक्तिकादि मुख्य भेद दर्शविले नव्हते. हे भेद दर्शविल्या वर या आठ जाति पृथक् कल्पिणें कांहीं अप्रशस्त नाहीं, असें माझ्या एका विद्वान् मित्राचें मत पडलें, व तें मला प्रशस्त दिसलें, या वरून या आठ जाति एथें दर्शविल्या आहेत.

तथापि या शब्दांच्या जाती विषयीं निरनिराळ्यां पंडितांचीं निरनिराळीं मतें पडलीं असतां नवल नाहीं. अव्ययांत जे चार भेद सांगितले आहेत त्यांचा अंतर्भाव एका अव्ययांत करून पांच जाति मानिल्या असतां होतील; कोणी नुसतें क्रियाविशेषण अव्यय मात्र निराळें मानून सहा गणितात. या प्रमाणें भिन्न

भिन्न मतांची संभावना आहे; परंतु विचारपूर्वक पाहिलें असतां या भाषे मध्यें शब्दांच्या पूर्वोक्त आठ जाति मानणें हेंच प्रशस्त दिसतें.

५८ **नाम** ह्मणजे पदार्थ मात्राचें नांव, मग ते पदार्थ प्रत्यक्ष दिसोत, अथवा त्यांचा नुसता संस्कार मनाच्या ठायीं होऊ; जसें—मनुष्य, पोथी, लेखणी, अहंकार, राग, इ०.

५९ **सर्वनाम** ह्मणजे नामाचा वारंवार उच्चार नव्हावा, ह्मणोन समयविशेषीं त्याच्या स्थानीं जे शब्द येतात ते प्रत्येक; जसें—मी, तूं, हा, जो, ती, तें, इ०.

६० **विशेषण** ह्मणजे नामाच्या गुणाचा दर्शक जो शब्द तो; जसें—काळा, गोरा, बरा, वाईट, लंगडा, शहाणा मूर्ख, इ०.

६१ **क्रियापद** ह्मणजे ज्या शब्देंकरून कोणत्याही क्रियेचा अथवा स्थितीचा बोध होतो तो; जसें—करणें, बोलणें, चालणें, निजणें, असणें, इ०.

६२ **क्रियाविशेषण** ह्मणजे ज्या शब्देंकरून क्रियेच्या गुणाचा अथवा प्रकाराचा बोध होतो तो शब्द; जसें—हळू, झट्करून, त्वरित, भडभडां, इ०.

६३ **उभयान्वयी अव्यय** ह्मणजे ज्या शब्दांच्या योगेंकरून दोन शब्द अथवा दोन वाक्यें यांचा अन्वय होतो ते; जसें—आणि, व, जर, तर, परंतु, तथापि, इ०.

६४ **शब्दयोगी अव्यय** ह्मणजे ज्यां शब्दांचा प्रयोग नामवाचक शब्दांशींच होतो, व ज्यां शब्दांशीं यांचा संबंध असतो, त्यांचें यांच्या योगानें सामान्यरूप होतें; जसें —वर, खालीं, कडे, मध्यें, पुढें, मागें, इ०. यांत **शुद्धशब्दयोगी** अव्यय ह्मणून एक उपभेद आहे त्याच्या योगानें हें सामान्यरूप होत नाहीं.

अनुक्रमणिका

६५ **केवलप्रयोगी अव्यय** अ० **उद्गारवाची अव्यय** ह्मणजे जेणेंकरून मानसिक विकारांचा उद्बोध होतो असे जे उद्गाररूप शब्द ते; जसें–छिः, वाःवा, अंः, ववव, इ०.

विभाग १.

नामविचार.

६६ **नाम** ह्मणजे पदार्थमात्राचें नांव, मग ते पदार्थ प्रत्यक्ष दिसोत, अथवा त्यांचा नुसता संस्कार मनाच्या ठायीं असो; जसें–मनुष्य, पोथी, लेखणी अहंकार, राग, इ०.

६७ या नामांत **सामान्य, विशेष,** आणि **भाववाचक,** असे तीन भेद आहेत.

६८ नामांस **लिंग, वचन,** आणि **विभक्ति,** हीं असतात.

६९ **सामान्यनाम** ह्मणजे जातिबोधक संज्ञा, ज्यांत या नामजातीचा धर्म अनेकांवर राहतो; जसें–मनुष्य, झाड, पशु, घर, इ०. यांत मनुष्य या शब्दाचा प्रयोग सर्व मनुष्यजाती वर होतो.

यांत मनुष्य, झाड, इ० सामान्य नामांतील एक एक निराळी जाती घेतली तथापि तेंही सामान्यनाम होतें; जसें–ब्राह्मण, आंबा, गाय, इ०. यांत ब्राह्मण हेंही सामान्य नाम; कारण. ब्राह्मण्यरूप जो कांहीं त्याज वर आरोपित धर्म तो एका वरच आहे असें नाहीं, जेवढे ब्राह्मण तेवढ्यां वर तो आहे ह्मणोन हेंही **सामान्यनाम** होय. तसेच आणखी शब्द जाणावे.

७० **विशेषनाम** ह्मणजे व्यक्तिबोधक संज्ञा, ज्यांत या नामाचा धर्म एका वरच राहतो; जसें–कृष्ण, काशी, भागीरथी, खंडू, इ०.

अनुक्रमणिका

विशेषनामाचें मुख्य लक्षण असें आहे कीं, तें एकाच अधिकरणास धरून राहतें; या वरून जितकीं ठेविलेलीं अथवा दिलेलीं नांवें तितकीं सारीं विशेषनामें जाणावीं. जसें— मनुष्य, नदी, पर्वत, इत्यादिकांचीं जीं नांवें तीं सारीं विशेषनामें जसें—राम, हरि, दादा, तात्या, मनी, गंगा, सह्याद्रि, इ०.

कदाचित् कोणी असा आक्षेप घेईल कीं विशेषनामा मध्येंही सामान्यनामाचें लक्षण उमगतें; जसें—**मनी** ह्मटलें असतां एकच मनी आहे असें नाहीं, या नांवाच्या व्यक्ति पुष्कळ असतात, तर असें नव्हे;—ठेविलेलीं जितकीं नांवें तितकीं सारीं विशेषनामें होत; कारण, जरीं मनी एकच नाहीं असें दिसतें, तरीं वस्तुतः पाहिलें असतां उक्त जी मनी ती एकच होय; हें कांहीं जातिबोधक नाव नव्हे, एका मनीचें जें कांहीं लक्षण तेंच दुसऱ्या मनींत असतें असें नाहीं; अथवा, एका मनीच्या लक्षणा प्रमाणें दुसरी स्त्री असली ह्मणजे तिला मनीच नाव देतात असेंही नाहीं, हें केवळ स्वेच्छे प्रमाणें एका व्यक्तीस ओळखाया करितां नाव दिलें असतें, ह्मणोन मनी हें विशेषनाम.

आतां 'तो रावण आहे,' 'तो कर्ण आहे,' 'सर्व बाया लक्ष्मी नसतात', अशा ठिकाणीं विशेषनामाचा प्रयोग सामान्यनामा प्रमाणें करितात तथापि वस्तुतः हें विशेषनामच होय. 'तो कर्ण आहे' ह्मणजे कर्ण नामा कोणी दातृत्वगुणविशिष्ट प्रख्यात पुरुष होऊन गेला त्या सारिखा दाता आहे असा अर्थ. असा बोलण्याचा प्रकार एक वाक्यालंकार होय, ज्यास उपमा असें ह्मणतात. अथवा एथें **कर्ण** या शब्दाचा विशेषणा सारिखा प्रयोग केला आहे असें मानिलें तरीं चालेल.

७१ ज्या नामां वरून कोणत्याही व्यक्तीचा शुद्ध भाव अथवा धर्म यांचा उद्बोध होतो तीं सारीं भाववाचकनामें; जसें— काळेपणा, उधळेपणा, मैत्री, इष्टत्व, औदार्य, इ०.

अनुक्रमणिका

वर्ग ९.

लिंगविचार.

७२ नाममात्रास लिंग असतें. तीं लिंगें तीन आहेत—**पुल्लिंग, स्त्रीलिंग,** आणि **नपुंसकलिंग.**

७३ ज्यां नामेंकरून प्राणिवाचक अथवा अप्राणिवाचक पदार्थांच्या पुरुषत्वाचा बोध होतो त्यांस, अथवा त्यांचें, **पुल्लिंग** ह्मणतात; जसें—रामा, मुलगा, वाघ, बईल, आंबा, बडगा, इ०.

७४ ज्यां नामेंकरून प्राणिवाचक अथवा अप्राणिवाचक पदार्थांच्या स्त्रीत्वाचा बोध होतो त्यांस, अथवा त्यांचें, **स्त्रीलिंग** ह्मणतात; जसें—जानकी, मुलगी, वाघीण, गाय, चिंच, काठी, इ०.

७५ ज्यां नामेंकरून प्राणिवाचक अथवा अप्राणिवाचक पदार्थांच्या पुरुषत्वाचा अथवा स्त्रीत्वाचा बोध होत नाहीं, परंतु जीं सामान्येंकरून सर्व जातीचीं अथवा त्या जातींतल्या एकाद्या क्षुद्र व्यक्तीचीं वाचकें असतात त्यांस, अथवा त्यांचें, **नपुंसकलिंग** ह्मणतात; जसें—माणूस, ढोर, कुत्रें, लांकूड, तेल, इ०.

७६ ज्यां नामेंकरून वर सांगितल्या कोणत्याही लिंगाचा ज्या काळीं एकाद्या वाक्या मध्यें निश्चय करितां येत नाहीं, त्या काळीं त्याचें **सामान्यलिंग** ह्मणावें; जसें—मित्र मीं, तूं, पक्षी, इ०.

७७ हा नामाचा लिंगभेद समजायास मुख्य साधन असें आहे कीं, ज्या नामां मागें **तो** हें सर्वनाम लागतें, तीं सारीं पुल्लिंग नामें जाणावीं; जसें—**आंबा** ह्मटलें ह्मणजे '**तो**

अनुक्रमणिका

आंबा' असें लागतें, 'ती आंबा' अथवा 'तें आंबा' असें लागत नाहीं; ह्मणोन **आंबा** या नामाचें पुल्लिंग जाणावें. याच प्रमाणें **चिंच** ह्मटलें ह्मणजे 'ती चिंच' असें लागतें, ह्मणोन **चिंच** या नामाचें स्त्रीलिंग जाणावें. आणि **लांकूड** ह्मटलें ह्मणजे 'तें लांकूड' असें लागतें, ह्मणोन याचें नपुंसकलिंग जाणावें.

आतां जे प्राणिवाचक शब्द आहेत (जसें पुरुष, बायको, घोडा, गाय, मांजर, इ०) त्यांचें लिंगविवेचन करणें शक्य होय, कांकीं त्यां मध्यें जे पुरुषजातीय प्राणी ते पुल्लिंग, स्त्रीजातीय ते स्त्रीलिंग, आणि ज्यांचें लिंगविवेचन करितां येत नाहीं (जसें— माणूस, कुत्रें, मूल, ढोर, इ०.) ते नपुंसकलिंग जाणावें; परंतु अप्राणिवाचक अथवा निर्जीवपदार्थवाचक जीं नामें (जसें—आंबा, चिंच, शाई, पेरू, इ०) यांसही पुंस्त्व, स्त्रीत्व मानणें हें विचारपूर्वक पाहिलें असतां आपल्या भाषेंत मोठें आश्चर्य आहे; या लिंगभेदा वर नियम चालत नाहीं, एथें लोकव्यवहार हाच नियम; ह्मणोनच अन्यदेशी मनुष्यांस एकाएकीं शुद्ध बोलतां येत नाहीं. आपण नित्यशः पाहतों तैलंग लोक कसें बोलतात तें, ते 'लांकूड मोडला,' 'आह्मांस एवढाच दक्षिणा दिल्हा' इत्यादि लिंगाच्या अज्ञानेंकरून अशुद्ध बोलतात.

७८ या लिंगानुशासना विषयीं असें अनुमान आहे कीं, कोणत्याही भाषेंत मुळीं नामांस लिंगें पडायास मुख्य तीन कारणें असतात;—एक तर त्यांचा अर्थ, दुसरें शब्दाचें शेवटील अक्षर अथवा प्रत्यय, आणि तिसरें शुद्ध लोकव्यवहार.

त्यांत अर्था वरून जें लिंगविवेचन करितात तें असें कीं, जीं नामें पुंस्त्ववाचक अथवा बल, प्रताप, तेज, स्थौल्य, इत्यादि पुरुषधर्मांचीं प्रदर्शक असतात तीं पुल्लिंग जाणावीं. जीं नामें स्त्रीत्ववाचक अथवा सौंदर्य, मार्दव, कोमलता, इत्यादि स्त्रीधर्मांचीं प्रदर्शक असतात, तीं स्त्रीलिंग जा-

अनुक्रमणिका

णावीं. आणि जीं नामें सौक्ष्म्य, निर्बलता, लाघव, इत्याद्यर्थप्रदर्शक असतात, तीं नपुंसक जाणावीं. यांत बहुधा लोकांच्या कल्पने वर हा नियम राहतो. कोणा देशांत समुद्र मोठा पराक्रमी व बलवान् वाटतो, तेथील लोक त्याचें पुल्लिंग ह्मणतात; कित्येकांस शांत व स्थिर वाटतो, ते लोक त्याचें स्त्रीलिंग ह्मणतात. ह्मणोनच एका अर्थाच्या नामाचीं निरनिराळ्या भाषांत निरनिराळीं लिंगें असतात. आतां कित्येक भाषांत या लिंगविवेचना विषयीं फार सुलभ नियम आहेत, ते असे कीं,-प्राणिवाचक नामांत जे पुंस्त्ववाचक शब्द ते पुल्लिंग; जे स्त्रीत्ववाचक शब्द ते स्त्रीलिंग; आणि कृमिकीटकादि ज्यांचें लिंगज्ञान होत नाहीं, तद्वाचक सर्व, व अप्राणिवाचक जे शब्द, ते नपुंसकलिंग. कित्येक भाषांत दोनच लिंगें आहेत; कित्येक भाषांत मुळीं लिंगेंच नाहींत; तेव्हां या भाषांत हें लिंगविवेचन तारतम्यभावेंकरून सुलभ होय. परंतु संस्कृत, महाराष्ट्र, गुर्जर, आदिकरून कित्येक भाषांत तसा कांहीं नियम नसून आणखी त्यांत तीन लिंगें; तेव्हां यांत हें लिंगविवेचन अंमळ कठीण होय.

७९ या निर्जीव अथवा अप्राणिवाचक नामांच्या लिंगांवर कांहीं नियम आहेत ते कळविण्याच्या अगोदर अकारान्त, आकारान्त, इकारान्त, इत्यादि शब्द एथें सांगितले पाहिजेत.

पुल्लिंग.

अकारान्त-खांब, भोग, बेत, नाद, इ०. आकारान्त-आंबा, खाडा, लाखोटा, रस्ता, इ०. इकारान्त-हरि, कवि, कोळी, धोबी, तांबोळी, इ०. उकारान्त-भानु, वेणु,

अनुक्रमणिका

लाडू, पेरू, चेंडू, इ०. **ऋ**कारान्त–(संस्कृत) पितृ, भ्रातृ, इ०. **ओ**कारान्त–टाहो, लाहो, इ०. मराठी भाषेंत एकारान्त पुल्लिंग व स्त्रीलिंग शब्द आढळत नाहींत.

स्त्रीलिंग.

अ–कंड, खरूज, गाय, ह्मैस, इ०. **आ**–जागा, गंगा, रेवा, इ०. **इ**–रीति, रुचि, साडी, नदी, खोली, लेखणी, इ०. **उ**–धेनु, जळू, सासू, जाऊ, इ०. **ऋ**–मातृ, स्वसृ, इ०. **ओ**–बायको, इत्यादि.

नपुंसकलिंग.

अ–नाक, तेल, ताक, पोर, मूल, इ०. **इ**–दधि, पाणीं, लोणीं, इ०. **उ**–मधु, किरडूं, मेंढरूं, इ०. **ए**–भांडें, आंडें, तळें, सोनें, बोलणें, इ०.

८० या प्रसंगीं शिकणारांनीं **उपांत्य** काय तें माहीत करून घ्यावें; कांकीं पुढें या विषयीं कांहीं सांगायाचें आहे. **उपांत्य** ह्मणजे शब्दाच्या अंत्याक्षराच्या शेजारचा जो वर्ण तो; जसें–**दर्उत** यांत ऊ हा उपांत्य; **बाईल** यांत **ई** हा उपांत्य; **बुरूड** यांत ऊ हा उपांत्य होय.

८१ आणखी, इ ई, उ ऊ, ऋ ॠ, आणि ऌ यांचा, आणि **य्**, **व्**, **र्**, **ल्**, यांचा, जो अन्योन्य आदेश, ह्मणजे इच्या स्थानीं **य्**, अथवा **य्**च्या स्थानीं इ; उच्या स्थानीं **व्**, अथवा **व्**च्या स्थानीं उ, इत्यादि, त्यास **संप्रसारण** ह्मणतात.

संस्कृत व्याकरणांत तर **य्**, **व्**, **र्**, यांच्या स्थानीं जे अनुक्रमें **इ**, **उ**, **ऋ**, आदेश होतात त्यां आदेशांस मात्र **संप्रसारण** अशी संज्ञा आहे; परंतु तिचा एथें अतिदेश करून **य्**, **व्**, **र्**, या आदेशांसही ती संज्ञा दिली आहे; कारण प्राकृतांत **इ**, **उ**

इ० कांच्या स्थानीं य्, व् इ० जे आदेश त्यांची व्याप्ति विशेष होय.

८२ तथापि अर्था वरून, आणि शब्दाच्या शेवटील अक्षरा वरून, अथवा प्रत्यया वरून, या लिंगविवेचना विषयीं कित्येक अबाधित नियम आहेत, त्यांतून मुख्य एथें सांगतों.

अर्था वरून नामांचा लिंगनिर्बंध.

८३ प्राणिवाचक नामांत जे पुरुषवाचक शब्द ते पुलिंग जाणावे; जसें—रामा, माधव, कृष्ण, इंद्र, गज, वृषभ, वाघ, परीट, शास्त्री, तेली, न्हावी, इ०.

८४ प्राणिवाचक नामांत जे स्त्रीवाचक शब्द ते स्त्रीलिंग जाणावे; जसें—रमा, सरस्वती, गंगा, रंभा, धेनु, कुत्री, परिटीण, तेलीण, न्हावीण, इ०.

८५ प्राणिवाचक नामांत सामान्यजातिवाचक जे शब्द त्यांचें, अथवा जेथें लिंगाची विवक्षा नसती तेथें, नपुंसकलिंग जाणावें; जसें—माणूस, मुलगें, पोर, घोडें, कुत्रें, इ०.

८६ कृमिकीटकादि जे क्षुद्र जंतु असतात, त्यांच्या जातीचा निर्देश एका शब्दानें होत असतो; आणि त्या शब्दाच्या लिंगाची उपलब्धि व्यवहारा वरून होती. जसें.—माशी, मुंगी, भुंगा, पोपट, ऊ, ढेकूण, पिसू, मुरकूट, इ०. यांत बहुधा इकारान्त, उकारान्त जे शब्द ते स्त्रीलिंग जाणावे, आणि आकारान्त पुल्लिंग जाणावे.

८७ प्रवाहीपदार्थवाचक जीं नामें तीं नपुंसक जाणावीं; जसें—पाणीं, लोणीं, चिंचवणीं, कालवण, तेल, तूप, एरंडेल, इ०.

अनुक्रमणिका

यांत नदी, ओढा, काढा, सडा, शाई, काकवी, मध, लस, कढी, बासुदी, आमटी, ताकतई, इ०. किती एक शब्द अपवादक होत; यांत आकारान्ता शिवाय इतर सर्व शब्द स्त्रीलिंग जाणावे.

८८ सुवर्णादिधातुवाचक जीं नामें तीं नपुंसक जाणावीं; जसें—सोनें, रुपें, तांबें, कथील, पितळ, इ०.

२ प्रत्यया वरून अथवा अंत्यवर्णा वरून लिंगनिर्बंध.

८९ शुद्ध मराठी जीं आकारान्त नामें तीं पुल्लिंग जाणावीं; जसें—सोटा, गोटा, बडगा, मठ्ठा, वांसा, भाला, बरेपणा, भलेपणा, इ०.

९० 'तें ज्यास आहे' अथवा 'तत्संबंधी' अशा अर्थी, ईप्रत्यय लागून जे शब्द सिद्ध होतात तद्व्यतिरिक्त जे शुद्ध इकारान्त मराठी शब्द ते बहुधा स्त्रीलिंग जाणावे; जसें—नदी, आई, काकी, काकवी, कसोटी, भाकरी, पाटिलकी, मुलुखगिरी, सावकारी, इ०.

९१ ज्या मराठी नामांचे अंत्य वर्ण अनुनासिक असतात, तीं सारीं नपुंसकलिंग जाणावीं: हीं नामें बहुधा इ—ऊ—एकारान्त असतात, जसें—मोतीं, गुरूं, बकरूं, आंडें, तळें, घोंसाळें, पोंवळें, बोलणें, चालणें, इ०.

परंतु गहूं, हा शब्द अनुनासिक असतांही पुल्लिंग जाणावा मला वाटतें हा शब्द **गहू** असा लिहिला असतां मग हा अपवाद करायास नको.

९२ ओकारान्त मराठी शब्द फार थोडे आहेत, आणि ते बायको, बायो, इ० कित्येक स्त्रीलिंग शब्दा शिवाय सारे पुल्लिंग जाणावे; जसें—लाहो, टाहो, डोहो,

अनुक्रमणिका

मोहो इ०. यांत **मोहो** याचें विकल्पें नपुंसकलिंगही होतें.

९३ भावार्थी जो **पण** प्रत्यय होतो तदंत जे शब्द ते नपुंसकलिंग जाणावे; जसें—बरेपण, भलेपण, चांगुल-पण, इ०.

९४ शब्दाची अथवा शब्दावयवाची द्विरुक्ति होऊन जे अनुकरणवाचक शब्द सिद्ध होतात ते स्त्रीलिंग जा-णावे; जसें—पळपळ, चळचळ, कटकट, झटापट, मारा-मार, पळापळ, दाणादाण, इ०.

९५ पूर्वोक्त अनुकरणवाचक जे शब्द त्यांहून अति-शयार्थी जो **आट**प्रत्यय तदंत, आणि **आड** आणि **आण** हे प्रत्यय ज्यांच्या अंतीं आहेत असे जे शब्द ते, पुल्लिंग जा-णावे; जसें—पळपळाट, चकचकाट, भडाड, गडाड, दणाण, इ०.

९६ व्यापारद्योतक जीं **णान्त** अथवा **नान्त** धातुसाधित नामें तीं नपुंसकलिंग जाणावीं; जसें—दळण, कांडण, स-डण, भरण, पोषण, भूषण, कंदन, साधन, मोहन, भंजन, रंजन, इ०.

९७ व्यापारादिदर्शक **ण्यन्त** ह्मणजे **णी** आहे अंतीं ज्यांच्या, अशीं जीं धातुसाधित नामें तीं स्त्रीलिंग होत, जसें—कापणी, काढणी, लावणी, रोपणी, आंकणी, चाळणी, भाजणी, ओढणी, इ०.

९८ पौनःपुन्य अथवा अतिशय यां अर्थी जीं इकारान्त द्विरुक्त धातुसाधित नामें तीं स्त्रीलिंग जाणावीं; जसें-मा-रामारी, उडाउडी, फाडाफाडी, तोडातोडी, ओढाओढी, ताणाताणी, इ०.

९९ व्यापारदर्शक जीं **णूक**प्रत्ययान्त धातुसाधित नामें

अनुक्रमणिका

तीं स्त्रीलिंग जाणावीं; जसें—वर्त्तणूक, जाचणूक, वर्णणूक, आठवणूक, आडणूक, नांदणूक, इ०.

१०० व्यापार अथवा व्यापृतार्थद्योतक जीं आकारान्त धातुसाधित नामें तीं पुल्लिंग होत; जसें—आरडा, आंसडा, हिसका, झपाटा, रपाटा, भरडा, रांधा, सांधा, ठेंचा, ठेवा, इ०.

१०१ प्रकृतिरूप जीं धातुसाधित नामें तीं बहुधा पुल्लिंग होत; जसें—आट, आटोप, व्याप, गाळ, जाळ, नाच, साज, मोड, इ०.

जळ, भेट, भेळ, ठेव, खोंच, ह्मण, ओळख, इ० किती एक शब्द स्त्रीलिंग होत.

१०२ मूल्यदर्शक जीं **णावळ** प्रत्ययान्त धातुसाधित नामें तीं स्त्रीलिंग जाणावीं; जसें—घडणावळ, शिवणावळ, दळणावळ, खाणावळ, लिहिणावळ, इ०.

१०३ मराठी भाषेंत जे संस्कृत शब्द शुद्धस्वरूपानें वर्त्ततात त्यांचें लिंगविवेचन त्या भाषेच्या अनुरोधानें होतें.

१०४ ***आकारान्त** जे संस्कृत शब्द ते सारे स्त्रीलिंग जाणावे. जसें—गंगा, श्रद्धा, मृत्तिका, इच्छा, स्पृहा, निद्रा, तंद्रा, व्याख्या, टीका, इ०.

१०५ भावार्थी जे **ता**प्रत्ययान्त संस्कृत शब्द ते सारे स्त्रीलिंग जाणावे; जसें—दक्षता, मधुरता, व्याकुलता, विद्वत्ता, इ०.

१०६ भावार्थी जे **त्व**प्रत्ययान्त शब्द ते नपुंसकलिंग

---

* एथें शिकणारांनीं लक्षांत ठेवावें कीं, संस्कृतांत स्त्रीलिंगीं जो **टाप्** प्रत्यय होतो, त्यांतील **ट**कार **प**कार जाऊन जो **आ** ह्मणोन स्त्रीप्रत्यय अवशिष्ट राहतो तदंत जे शब्द त्यांचें विधान केलें आहे; नाहींतर आत्मा, ब्रह्मा, राजा, चंद्रमा, प्रेमा, पिता, इ० शब्द अपवादक होतील: हे संस्कृतांत मूळचे आकारान्त शब्द नाहींत.

अनुक्रमणिका

जाणावे; जसें—ब्राह्मणत्व, मनुष्यत्व, पटुत्व, स्त्रीत्व, पुंस्त्व, इ०.

१०७ भावार्थी किती एक प्रत्यय लागून पूर्व स्वरास वृद्धि होऊन जे शब्द सिद्ध होतात ते सारे नपुंसकलिंग जाणावे; जसें माधुर्य, क्षात्र, वैभव, चांचल्य, स्थैर्य, धैर्य, क्रौर्य, धौर्त्य, इ०.

१०८ ***इमा** प्रत्ययान्त जे संस्कृत शब्द ते महाराष्ट्रांत विकल्पें पुल्लिंग अथवा स्त्रीलिंग जाणावे; जसें—महिमा, अणिमा, गरिमा, इ०.

या नियमां शिवाय आणखी आदि, उपांत्य, आणि अंत्यवर्ण, यां वरून कांहीं या लिंगविवेचना विषयीं नियम शोधूं गेलें असतां सांपडतील असें मला वाटतें; परंतु जरीं सांपडले तरीं ते केवळ सर्वव्यापक होणार नाहींत; यास्तव, त्यांचा विस्तार एथें केला नाहीं.

३ लोकव्यवहारा वरून लिंगनिर्बंध.

१०९ पूर्वोक्त नियमा शिवाय जे शब्द राहिले त्यांचें लिंगविवेचन बहुधा लोकव्यवहारा वरून जाणावें.

११० प्राणिवाचक कित्येक स्त्रीत्वबोधक शब्द असून त्यांचें ग्रहण क्वचित् व्यवहारांत नपुंसकलिंगेंकरून होत असतें; जसें—कुटुंब, कलत्र, लांडोर, बटकूर, रांडरूं, रांडमाणूस, इ०. तसेंच—दार, सखिजन, कबीला, हे शब्द स्त्रीत्वबोधक असून नित्यपुल्लिंग जाणावे.

१११ द्वंद्वसमास होऊन जीं कित्येक शुद्ध मराठी नामें सिद्ध होतात तीं नपुंसकलिंग जाणावीं; जसें—आईबापें, बहीणभावंडें, दादलाबायलें, इ०.

११२ अकारान्त जीं वृक्षांचीं नावें तीं बहुधा स्त्रीलिंग

---

* मुळीं संस्कृतांत भावार्थी हा इमनच् (इमन्) प्रत्यय होतो, आणि एकदंत जे शब्द ते संस्कृतांत निरंतर पुल्लिंग असतात.

असतात; जसें—भोंकर, बकूळ, नारळ, फोफळ, जांबूळ, जासवन, गुलबास, इ०.

यांत—माड, ताड, देवदार, फणस, वड, पिंपळ, इ०. शब्द पुल्लिंग जाणावे.

११३ तेच जर फल अथवा पुष्प यांचे वाचक शब्द असले तर त्यांचें बहुधा नपुंसकलिंग जाणावें; जसें—भोंकर, बकूळ, फोफळ, जांबूळ, इ०.

यांत—नारळ, फणस, गुलाब, जांब, इ० पुल्लिंग जाणावे.

११४ कित्येक शब्द कोंकण देश इत्यादि स्थानपरत्वें अनेक लिंगीं वर्त्ततात; जसें—तपकीर, तंबाकू, गुडाखू इ०.

११५ प्राणिवाचक नामाचें कोणतें एक लिंग समजल्यानें त्याज वरून दुसरीं लिंगें साधितां येतात. अकारान्त, इकारान्त, आणि उकारान्त प्राणिवाचक पुल्लिंग नामास पुढें **ईण** प्रत्यय लाविल्यानें त्याच नामाचा स्त्रीलिंगवाचक शब्द होतो. परंतु हा प्रत्यय लाविते समयीं शब्दाच्या अंत्यस्वराचा लोप होतो; आणि त्या पुल्लिंग शब्दाचा उपांत्य जर इकार किंवा उकार आहे, तर त्यांस हा स्त्रीत्वबोधक प्रत्यय लाविते समयीं त्या उपांत्य स्वराच्या स्थानीं **अ** आदेश होतो; पक्षीं ते उपांत्य स्वर दीर्घ असल्यास ऱ्हस्वही होतात; उदाहरण—

पु०	स्त्री०	पु०	स्त्री०
वाघ	वाघीण	तेली	तेलीण
सिंह	सिंहीण	न्हावी	न्हावीण
सोनार	सोनारीण	तांबोळी	तांबोळीण
सुतार	सुतारीण	रामोशी	रामोशीण
लोहार	लोहारीण	परभू	परभीण
ठाकूर	ठाकरीण	परीट	परिटीण

अनुक्रमणिका

११६ शुद्ध मराठी शब्दांत, अथवा मराठींत मिसळलेल्या अन्य भाषेंतील शब्दांत, जर उपांत्यस्वर दीर्घ ई अथवा ऊ असला, आणि त्यांस कोणताही प्रत्यय लागून जर त्या मूळ उपांत्याचा पुढील वर्ण दीर्घ होत असला, तर त्यास हा स्त्रीप्रत्यय लाविते समयीं त्या उपांत्य स्वराच्या स्थानीं अ आदेश होतो; पक्षीं हे उपांत्यस्वर ऱ्हस्वही होतात.

(अ) त्यांत आणखी उपांत्य स्वराचा मागला वर्ण जर दीर्घ असला, तर ई आणि ऊ या उपांत्यांच्या स्थानीं अच आदेश होतो.

उदाहरणें.

पु०	स्त्री०	पु०	स्त्री०
परीट	परटीण, परिटीण	बेडूक	बेडकीण
बुरूड	बुरडीण, बुरुडीण.	ठाकूर	ठाकरीण.
	इ०		इ०

यांत बहुधा असा नियम आहे कीं, ई, अथवा ऊ, या उपांत्याच्या मागील अक्षर जर दीर्घ असलें तर अ हाच आदेश होतो; तेथें वैकल्पिक रूपांचा संभव दिसत नाहीं; कारण, या भाषेंत मागें पूर्ण अक्षर असतां, त्यांत विशेषेंकरून दीर्घ अक्षर असतां, पुढील ऱ्हस्व अक्षरांचें, आणि विशेषकरून अकारान्त अक्षरांचें अर्धोच्चारण होत असतें, असा स्वाभाविक नियम आहे; तेव्हां मात्रांची गणना केली असतां दीर्घ अक्षरा पुढील उपांत्याच्या स्थानीं अकारच आदेश करणें सयुक्तिक दिसतें.

११७ परंतु शुद्ध मराठी ह्मटलें या वरून जर ते शब्द संस्कृत, अथवा यवनी, अथवा कोणत्येही अन्यभाषेचे, अथवा उपनाववाचक असले, तर उपांत्य स्वरास कांहीं विकार होत नाहीं. परंतु तेच शब्द जर मराठी भाषेंत फार रूढींत आलेले असले तर विवक्षा असतां त्यांचा उपांत्य ऱ्हस्व करणें हा उत्तम पक्ष.

उदाहरणें.

पु०	स्त्री०	पु०	स्त्री०
अतीत.	अतीतीण, अतितीण.	वकील.	वकीलीण, वकिलीण.
गरूड.	गरूडीण, गरुडीण.	फडनीस.	फडनीशीण, फडनिशीण.
फकीर.	फकीरीण, फकिरीण.	रजपूत.	रजपूतीण, रजपुतीण.
अमीर.	अमीरीण, अमिरीण.	गाडगीळ.	गाडगीळीण, गाडगिळीण.

११८ तसेंच जर ते उपांत्य स्वर हकारयुक्त असले तर त्यांसही वर सांगितलाच नियम लागतो; जसें—

पु०	स्त्री०
अहीर	अहीरीण, अहिरीण
माहूत	माहूतीण, माहुतीण.

११९ जर उपांत्य वर्ण केवळ ई किंवा ऊ असला, तर त्यास पुढील प्रत्ययाच्या योगानें विकल्पें संप्रसारण होतें; जसें—

पु०	स्त्री०	पु०	स्त्री०
शाईर	शाइरीण, शायरीण	राऊळ	राउळीण, रावळीण

१२० यांत बहुधा मनुष्यजाती शिवाय इतर जे प्राणी तद्वाचक शब्द, आणि दोहों पेक्षां अधिक ज्यांत अक्षरें आहेत असे जे अकारान्त पुल्लिंग शब्द, त्यांस स्त्रीप्रत्यय ई होतो.

एथें उपांत्य स्वरा विषयीं ईण प्रत्यय लागते समयीं जशीं कार्यें होतात तशींच राहतात.

पु०	स्त्री०	पु०	स्त्री०
पोपट	पोपटी	गाढव	गाढवी
हरीण	हरिणी, हरणी	बेडूक	बेडकी
सांभर	सांभरी	ढेंकूण	ढेंकणी
उंदीर	उंदरी	गोचीड	गोचडी

अनुक्रमणिका

१२१ आकारान्त पुल्लिंग प्राणिवाचक नामास शेवटीं ई होऊन तज्जातीय स्त्रीचा बोध होतो, आणि एँ होऊन त्याचें पिलूं किंवा त्या जातींत एकादें हलकें अशा नपुंसकाचा बोध होतो; जसें—

पु०	स्त्री०	न०	पु०	स्त्री०	न०
कुत्रा	कुत्री	कुत्रें	कोल्हा	कोल्ही	कोल्हें
लांडगा	लांडगी	लांडगें	बकरा	बकरी	बकरें
मुलगा	मुलगी	मुलगें.	मेंढा	मेंढी	मेंढें.

यांत कित्येक नपुंसक शब्द क्वचित् बोलण्यांत येत नाहींत.

१२२ आकारान्त शरीरसंबंधवाचक शब्दास, अथवा प्रतिष्ठाशब्दासही स्त्रीलिंगीं ईकार होतो; जसें—

उदाहरणें.

पु०	स्त्री०	पु०	स्त्री०
काका	काकी	दादा	दादी
मामा	मामी.	आजा	आजी

१२३ कित्येक अकारान्त जातिवाचक संस्कृत शब्दांस त्या भाषेच्या नियमा प्रमाणें स्त्रीलिंगीं ई प्रत्यय होतो; जसें—

उदाहरणें.

पु०	स्त्री०	पु०	स्त्री०
देव	देवी	सिंह	सिंही
गोप	गोपी	शूद्र	शूद्री
दास	दासी.	ब्राह्मण	ब्राह्मणी.

१२४ संयोगपूर्वक आकारान्त जे शब्द, ज्यांचीं जाती वरून अथवा वृत्तिसंबंधानें नावें पडलीं आहेत, त्यां

वरून स्त्रीलिंगीं ईण प्रत्यय होतो; परंतु तो होते समयीं शेवटील याचा लोप होतो; उदाहरण–भाट्या, भाटीण; देशपांड्या, देशपांडीण; आगलाव्या, आगलावीण; इ०.

१२५ परंतु या सांगितल्या नियमां वर न चालणारे असे कित्येक शब्द आहेत ते सांगतों.

पु०	स्त्री०	पु०	स्त्री०	पु०	स्त्री०
बैल	गाय	पुरुष	बायको	बाप	आई
ह्मैसा	ह्मैस	दीर	जाऊ	पोर	पोर
मोर	लांडोर	बोकड	शेळी	मूल	मूल
बोका	भाटी, मांजर	गवळी	गवळण	मावळा	मावळण
काळवीट	हरणी	सासरा	सासू	राजा	राणी
उंट	सांड.	भाऊ	भावजय	वाघ्या	मुरळी.*

१२६ प्राणिवाचक नामाचें नपुंसक सामान्यतः स्वजातीचा बोध करितें; उदाहरण–'तें कुत्रें येत आहे,' एथें तो कुत्रा किंवा कुत्री आहे हें विवक्षित नाहीं; परंतु कुत्रें ह्मटलें ह्मणजे कुत्र्याची जात आहे, इतकें मात्र समजतें; याच प्रमाणें–पोर, बकरें, मनुष्य, इ०.

१२७ पदार्थाचें स्थूलत्व दाखवायाची विवक्षा असतां, कधीं विनोदानें स्त्रीलिंग शब्दांस, व नपुंसकलिंग शब्दांस, आकारान्त करून पुल्लिंग करितात; जसें–पोळा, भाकरा, पागोटा, इ०.

वर्ग २.

वचनविचार.

१२८ वचन ह्मणजे नामाच्या ठायीं एकत्वरूपानें अ-

---

*एथें वाघ्याची बायको मुरळी असा अर्थ कोणी समजूं नये; तर खंडोबास जो मुलगा वाहतात तो वाघ्या, आणि मुलगी वाहतात ती मुरळी, असा अर्थ समजावा.

थवा अनेकत्वरूपानें जी अर्थाची उपस्थिति तें. हीं वचनें दोन आहेत, **एकवचन** आणि **अनेकवचन** अथवा **बहुवचन**.

१२९ **एकवचन** ह्मणजे नामाच्या ज्या रूपा वरून त्याच्या एकत्वाचा बोध होतो तें, अथवा त्या नामाचें, 'एकवचन' असें ह्मणतात; जसें–केळें, नारिंग, पागोटें, अंगरखा, इ०.

१३० ज्या रूपा वरून अनेकत्वाचा बोध होतो त्यास **अनेकवचन** ह्मणतात, कोणी **बहुवचन**ही ह्मणतात; जसें–केळीं, नारिंगें, पागोटीं, अंगरखे, इ०.

१३१ एकवचनी शब्द अनेकवचनांत आणायाच्या रीती बहुत आहेत. या भाषेंत नामांच्या अंत्य स्वराच्या आधारा वरून, आणि त्यांच्या लिंगा वरून, अनेकवचनांचीं रूपें साधतात.

या भाषेंत वचना विषयीं अतिसंक्षिप्त आणि बहुधा सर्वव्यापक असे नियम बांधिले असतां त्यांचें आकलन वक्ष्यमाण रीतीनीं होईल.

(१) **अ–ई–ऊ–ओ**–कारान्त पुल्लिंग, आणि **आ**कारान्त स्त्रीलिंग नामांचीं उभय वचनांचीं रूपें समान होतात.

(२) **आ**कारान्त पुल्लिंग, आणि **अ–इ–उ**–कारान्त नपुंसकलिंग नामांस अनेकवचनीं अंतीं एकार होतो.

(३) **अ–इ–उ–ओ**–कारान्त स्त्रीलिंग नामांस अनेकवचनीं **आ** विकार होतो.

(४) अकारान्त स्त्रीलिंग, आणि एकारान्त नपुंसकलिंग नामांस अनेकवचनीं **ई** विकार होतो.

(५) **ई–ऊ**–कारान्त शब्दांस पूर्वोक्त विकार होण्याच्या पूर्वी संप्रसारण होतें.

(६) नपुंसकलिंग शब्दांस शेवटील वर्ण अनुनासिक होतो.

अनुक्रमणिका

(७) संस्कृत शब्द, अथवा परभाषेंतून येऊन जे शब्द फार रूढींत पडले नाहींत, त्यांचीं उभय वचनें समान होतात.

(८) ज्यांच्या ठायीं संख्येकरून गणण्याचा असंभव आहे अशा पदार्थांचे जे वाचक शब्द त्यांचा प्रायः एकवचनींच प्रयोग होतो.

या सर्व नियमांचा पुढें त्या त्या स्थळीं विस्तार केला आहे.

प्रकरण १.

पुल्लिंग.

१३२ अ–इ–उ–ओ–कारान्त नामांचीं उभय वचनें समान होतात; त्यांचीं वचनें अर्थानुसंधानानें जाणावीं.

उदाहरणें.

अकारान्त.		इकारान्त.	
एक०	अने०	एक०	अने०
खांब	खांब	कवि	कवि
बैल	बैल	अग्नि	अग्नि
गाढव	गाढव	भूपति	भूपति
पुरुष	पुरुष	शास्त्री	शास्त्री
चिरंजीव	चिरंजीव	तेली	तेली

उकारान्त.		ओकारान्त.	
एक०	अने०	एक०	अने०
वेणु	वेणु	टाहो	टाहो
शत्रु	शत्रु	डोहो	डोहो
साडू	साडू	लाहो	लाहो
परभू	परभू	छापो	छापो.

१३३ आकारान्त पुल्लिंग नामाच्या एकवचनास अनेकवचनीं अंत्य स्वरास ए होतो; जसें—

एक०	अने०	एक०	अने०
आंबा	आंबे	भाल्या	भाल्ये
घोंडा	घोंडे	अंबाडा	अंबाडे
पानपुडा	पानपुडे	देशपांड्या	देशपांड्ये.

संयोगपूर्वक आकारान्त पुल्लिंग शब्दाच्या शेवटील **य**चा लोप करून अनेकवचनीं ए आदेश करून लिहिण्याचा प्रचार फार आढळतो; परंतु ही शुद्ध रीति नव्हे; कारण, एक तर **य**-चा लोप करण्यास या वरील नियमा वरून आधार नाहीं; आणखी, असा लोप केला असतां संयोगपूर्वक आणि असंयोगपूर्वक आकारान्त पुल्लिंग शब्दांच्या अनेकवचनाचीं सारखीं रूपें होऊन जी अडचण प्राप्त होईल ती आणखी हा लोप न केला असतां टळती; जसें—**धाम्या** आणि **धामा**, यांत पूर्व शब्दांत **य**चा लोप केला असतां या दोहों शब्दांचें अनेकवचनीं **धामे** असें एक रूप होईल; परंतु **धाम्ये** आणि **धामे** अशीं निराळी रूपें लिहिलीं असतां त्यां वरून त्यांचें एकवचन शोधून काढण्यास कांहींच अडचण पडणार नाहीं. ह्मणोन माझ्या बुद्धीनें **भाल्ये, देशपांड्ये, धोंडफोड्ये, लांकुडतोड्ये, आगलाव्ये, वाघमाऱ्ये**, अशीं रूपें विशेष ग्राह्य होत.

१३४ **ब्रह्मा, सोमपा, धूम्रपा, शंखध्मा**, इत्यादि जे शुद्ध आकारान्त संस्कृत शब्द, त्यांतून जे फारसे प्राकृतांत प्रसिद्ध नाहींत, त्यांचीं उभय वचनीं समान रूपें होतात.

१३५ **आत्मा, ब्रह्मा**, इत्यादि जे लोकप्रसिद्ध संस्कृत शब्द, त्यांच्या अनेकवचनीं विवक्षा असल्यास पक्षीं ए आदेश होतो. **आत्मा** शब्दास विकल्प नाहीं; जसें—आत्मा, आत्मे; ब्रह्मा, ब्रह्मे अ० ब्रह्मा.

अनुक्रमणिका

१३६ **मामा**, **काका**, इत्यादि जे आकारान्त शरीर-संबंधवाचक शब्द त्यांचींहि रूपें उभय वचनीं समान होतात; पक्षीं विवक्षा असल्यास ए आदेश होतो; जसें—

एक०	अने०	एक०	अने०
मामा	मामा, मामे	काका	काका, काके

उदाहरण. 'तुह्मास मामा किती आहेत', 'माझे चौघे मामे काशीस गेले', 'तुमचे दादा जरीं आले तरीं हें कार्य त्यांच्यांनीं होणार नाहीं', इ०.

'हे कोण बायकोंचे मामे घरांत हिंडती रिकामे'.

(अ) हींच जर प्रतिष्ठानामें असलीं तर त्यांचीं उभय वचनीं समान रूपें होतात. उदाह०—या मंडळींत चार अण्णा आहेत, आणि दोन बाबा आहेत, तुला कोणते पाहिजेत.

१३७ ऋकारान्त शब्द या भाषेंत नाहींत. जे ऋकारान्त संस्कृत शब्द आहेत, जसें—**पितृ**, **मातृ**, **भ्रातृ**, **स्वसृ**, **कर्तृ**, **दातृ**, **धातृ**, इ०, आणि ज्यांचीं संस्कृत रीतिप्रमाणें जीं प्रथमेचीं रूपें तींच मूळशब्द ह्मणून या भाषेंत वर्त्ततात, जसें—**पिता**, **माता**, **भ्राता**, **स्वसा**, **कर्त्ता**, **दाता**, **धाता**, इ०. त्यांचीं अनेकवचनें त्या त्या आकारान्त शब्दांच्या नियमा प्रमाणें होतात.

१३८ ए—ऐ—**औ**—कारान्त शब्द या भाषेंत नाहींत.

१३९ बहुधा जितक्या शब्दांच्या अंतीं या भाषेंत, **अई** अ० **अय**, आणि **अऊ आऊ** अ० **अव**, असे वर्ण येतात, ते शब्द कोणीं विकल्पें अनुक्रमें ऐकारान्त आणि औकारान्तही लिहितात; तथापि त्यांचीं अनेकवचनाचीं रूपें त्या त्या मूळच्या शब्दांच्या नियमां प्रमाणेंच होतात. जसें—पौ [पऊ अ० पव] यांचीं उभयवचनें समान जाणावीं.

प्रकरण २.

स्त्रीलिंग.

१४० अकारान्त स्त्रीलिंग शब्दाचे या भाषेंत वचना वरून आणि विभक्ती वरून तीन निरनिराळे मुख्य गण केले पाहिजेत;–

त्यांतून प्रथम गणांतील अकारान्त स्त्रीलिंग शब्दांस अनेकवचनीं अंत्य स्वरास ई विकार होतो. दुसऱ्या गणांतील अकारान्त शब्दांस आ, आणि तिसऱ्या गणांतील अकारान्त शब्दांस विकल्पें हे दोन्ही विकार होतात. यांस एथें अनुक्रमें **भिंतीचागण**, **आतेचागण**, आणि **झेंपेचागण**, असें ह्मटलें आहे.

भिंतीचागण.

एक०	अने०	एक०	अने०
भिंत	भिंती	कावड	कावडी
केळ	केळी	उतरड	उतरडी
वांक	वांकी	पोंखरण	पोंखरणी
फोफळ	फोफळी	तगर	तगरी

आतेचागण.

एक०	अने०
आत	आता
वेळ	वेळा
नणंद	नणंदा
सनद	सनदा
रकम	रकमा

झेंपेचागण.

एक०	अने०
झेंप	झेंपा, झेंपी
लात	लाता, लाती
शपथ	शपथा, शपथी
तरवार	तरवारा, तरवारी
अकल	अकला, अकली.

या अकारान्त स्त्रीलिंग शब्दांचे जे वर तीन वर्ग दाखविले आहेत, त्यां विषयीं सर्वव्यापक असे काहीं नियम आढळत नाहींत; तथापि या विषया वर बहुत विचार करितां खालीं लिहिल्या प्रमाणें काहींसें धोरण माझ्या हातीं लागलें आहे.

१४१ द्व्यक्षरी अथवा त्र्यक्षरी अकारान्त स्त्रीलिंग शब्द जर व्युत्पन्न असले, त्यांत विशेषेंकरून ज्यांची व्युत्पत्ति धातू पासून असली असावी, तर त्यांच्या अनेकवचनीं बहुधा ई विकार होतो; जसें—ह्मण, ह्मणी; फूट फुटी; इ०. आणखी उदाहरणें सांगतों.

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
वांक*	वांकी	फाड	फाडी	तोंड	तोंडी
भेट	भेटी	तूट	तुटी	झोंड	झोंडी
फूग	फुगी	नड	नडी	खाण*	खाणी
धण*	धणी	वण	वणी	शेण*	शेणी
गूत	गुती	भर	भरी	जळ	जळी
ओळख	ओळखी	समज	समजी	सुकट	सुकटी
लगट	लगटी	थापट	थापटी	उकड	उकडी
कोरड	कोरडी	निवड	निवडी	गोठण	गोठणी
पाखर	पाखरी	तसर	तसरी	उभार	उभारी
ठेवण	ठेवणी	चाळण	चाळणी	चूण	चुणी

* **वांक** हा शब्द मूळचा **वांकणें** या धातू पासून झाला असावा; ह्मणजे, सोनें वांकवून केलेलें जें दंडभूषण तें.

* **धणी** या शब्दा पासून, अथवा **धाणें** या धातू पासून हा शब्द व्युत्पन्न असावा.

* **खाण** हा शब्द **खणणें** अथवा **खाणणें** या धातू पासून व्युत्पन्न झाला असावा. जी खणलेली जागा, अथवा धातू काढण्या साठीं खणायास योग्य जें स्थळ, ती.

* शेणाची थापून केलेली गोंवरी ती.

(अ) पूर्वोक्त नियमांत नाहींत असेही शब्द पुष्कळ आहेत, त्यांतून मुख्य खालीं लिहिले आहेत.

व्यभिचरितशब्द.

शिंक, चूक, झडप, झटक, झोंप, नीज, खोक, थुंक, थाप, फुंक, रीघ, खीज, धाप, इत्यादि. हा **शिंकेचागण** जाणावा.

१४२ त्र्यक्षराहून अधिकाक्षरांचे जे अकारान्त स्त्रीलिंग शब्द, त्यांच्या अनेकवचनीं अंतीं ई विकार होतो; उदाहरण—

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
चकमक	चकमकी	तबलक	तबलकी	पावधूक	पावधुकी
वरेकज	वरेकजी	तजवीज	तजविजी	भांजगड	भांजगडी
बसकट	बसकटी	उसनवट	उसनवटी	घोरपड	घोरपडी
खरखटवड	खरखटवडी	सासुरवड	सासुरवडी	तारंबळ	तारंबळी
पोंखरण	पोंखरणी	सोईरगत	सोईरगती	तकरार	तकरारी
अबदागीर	अबदागिरी	कोशिंबीर	कोशिंबिरी	अदलाबदल	अदलाबदली.

वैकल्पिकशब्द.

(अ) तरवार, टकमक, उघडीक, कोरडीक, भरताड, अखबर, बकमार, सुरवार, खसखस, कुरनीस, पुरशीस, तसबीर, इ०. हा **तरवारीचागण** जाणावा.

(आ) एरजार, वळविंज, हुरमूज, तसरीफ, इ०. हा **एरजारेचागण** जाणावा.

१४३ वनस्पतिवाचक जे अकारान्त स्त्रीलिंग शब्द, त्यांच्या अनेकवचनीं ई विकार होतो.

उदाहरणें.

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
बोर	बोरी	केळ	केळी	नारळ	नारळी
तगर	तगरी	भारंग	भारंगी	भोंकर	भोंकरी
सुरंग	सुरंगी	नारिंग	नारिंगी	कौंठ	कौंठी
बाऊट	बाउटी, वावटी	नांदिट	नांदेटी	जास्वन	जास्वनी
नांदरूख	नांदरुखी	वावडंग	वावडंगी	महाळुंग	महाळुंगी
आबोल	आबोली	गुलबास	गुलबासी	शिताफळ	शिताफळी

(अ) व्यभिचारितशब्द– चिंच, चिंचा.

१४४ परंतु शिकणारांनीं आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, कित्येक शब्द राजापूरप्रांतांत ईकारान्त असतां त्यांस अष्टागरप्रांतांत व उत्तर कोंकणांत व देशावर बहुधा अकारान्त करितात; जसें– भाकरी, भाकर; धावळी, धावळ; इ०. अशा अकारान्त शब्दांचीं अनेकवचनें ईकारान्त होतात. आणखी उदाहरणें–

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
टीर	टिरी	करवंद	करवंदी	खातर	खातरी
शिंप	शिंपी	चिलीम	चिलिमी	जाळ	जाळी
हुंबर	हुंबरी	गोंद	गोंदी	चुंग	चुंगी.

१४५ तसेंच कित्येक संस्कृत ईकारान्त स्त्रीलिंग शब्द महाराष्ट्र भाषेंत विकल्पें अकारान्त होतात; जसें-- संस्कृत रीति, प्राकृत रीत; अशा अकारान्त स्त्रीलिंग शब्दांस अनेकवचनीं ई विकार होतो; जसें–

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
रीत	रिती	बुद्ध	बुद्धी	व्याध	व्याधी
गत	गती	जात	जाती	रूच	रुची

१४६ ईणप्रत्ययान्त अथवा अणप्रत्ययान्त जीं स्त्रीवा-

चक नामें, त्यांच्या अनेकवचनीं अंत्य वर्णास ई आदेश होतो; जसें–

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
शिंपीण	शिंपणी	कोळीण	कोळणी	परिटीण	परिटिणी
रजपुतीण	रजपुतणी	भडभुंजीण	भडभुंजणी	सोनारीण	सोनारणी.

१४७ जे केवळ अव्युत्पन्न अकारान्त स्त्रीलिंग शब्द आहेत त्यांचीं अनेकवचनें आकारान्त होतात.

उदाहरणें.

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
डांक	डांका	वेळ	वेळा	नणंद	नणंदा
आत	आता	समीध	समिधा	आण	आणा
हाक	हाका	खारीक	खारका	पेंठ	पेंठा
तारीख	तारखा	खूण	खुणा	भूक	भुका.

१४८ आकारान्त अथवा उकारान्त संस्कृत शब्दांचा अपभ्रंश होऊन जे अकारान्त स्त्रीलिंग शब्द या भाषेंत झाले आहेत, त्यांचीं अनेकवचनें आकारान्त होतात.

उदाहरणें.

एक०		अने०	एक०		अने०
कांख	(कुक्षा)	कांखा	खाट	(खट्वा)	खाटा
जीभ	(जिव्हा)	जिभा	शाक	(शाखा)	शाका
धार	(धारा)	धारा	माळ	(माला)	माळा
वस्त	(वस्तु)	वस्ता	मध	(मधु)	मधा.

[अ] व्यभिचरित एक० भालूक (भलुका), अनेक० भालुकी; एक० धात (धातु), अनेक० धातीं; एक० कावीळ (कामिला), अनेक० कावळी.

१४९ वर जे नियम सांगितले त्यांहींकरून बहुधा सर्व अकारान्त स्त्रीलिंग शब्दांचें आकलन होतें, परंतु जेथें या शब्दांच्या व्युत्पत्ती विषयीं निश्चय करवत नाहीं अशा शब्दांच्या अनेकवचनांचीं रूपें बहुधा वैकल्पिक होतात असें जाणावें.

१५० आतां वर सांगितल्या नियमां प्रमाणें ज्यांचीं अनेकवचनांचीं रूपें होत नाहींत असे अपवादक शब्द पुष्कळ आढळतील परंतु त्यांतून मुख्य खालीं लिहिले आहेत.

अपवादक शब्द.

कळंक, शिळक, टोंक, चितंग, डग, कणिंग, कणंग, रणंग, कुपट, धापट, सांपट, फट, बांबट, कोरट, होरट, सावट, शिळट, बांबूट, आगोठ, इ०.

आकारान्त.

१५१ आकारान्त स्त्रीलिंग शब्दांचीं उभयवचनांचीं रूपें समान होतात; जसें–

एक०	अने०	एक०	अने०
जागा	जागा	मृत्तिका	मृत्तिका
पागा	पागा	अवस्था	अवस्था
गुहा	गुहा	मज्जा	मज्जा.

इकारान्त आणि **उकारान्त.**

१५२ एतदंत स्त्रीलिंग शब्दाच्या एकवचनाच्या अंत्य स्वरास अनेकवचनीं संप्रसारण होऊन पुढें **आ** विकार होतो.

उदाहरणें.

इकारान्त.

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
चुलती	चुलत्या	भाजी	भाज्या	आंथरी	आंथऱ्या
काठी	काठ्या	सखी	सख्या	नदी	नद्या.

अनुक्रमणिका

[अ] जर इकारान्त अथवा उकारान्त शब्द शुद्ध संस्कृत असले, व त्यांचा व्यवहारी भाषणांत अत्यंत परिपाठ नसला, तर त्यांचीं उभयवचनीं समान रूपें होतात; उदाहरणें—

इकारान्त.

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
रुचि	रुचि	भक्ति	भक्ति	जाति	जाति
शांति	शांति	आहुति	आहुति	प्रकृति	प्रकृति
गोपी	गोपी	ब्राह्मणी	ब्राह्मणी	अतिशूद्री	अतिशूद्री.

[आ] परंतु जर तेच शब्द नित्य रूढींतले असले तर त्यांचीं अनेकवचनांचीं रूपें वरल्या नियमा प्रमाणें होतात; जसें—नदी, नद्या; सखी, सख्या; इ०.

[इ] जर ते शब्द एकाक्षरी असले तर विकल्पें संप्रसारणास **इय्** आणि **उव्** असे अनुक्रमें आदेश होऊन पुढें **आ** विकार होतो; जसें—

धी, धी, धिया; ऱ्ही, ऱ्ही, ऱ्हिया; श्री, श्री, श्रिया; भ्रू, भ्रू, भ्रुवा; इ०.

[ई] **बी, स्त्री** यां शब्दांचीं अनेकवचनें **बिया, स्त्रिया** अशींच होतात.

[उ] जर शब्दाचें अंत्याक्षर **ई** असलें तर त्यास विकल्पें **या** आदेश होतो; जसें—

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
आई	आई, आया	बाई	बाई, बाया	गाई	गाई, गाया
राई	राई, राया	खाई	खाई, खाया	कुई	कुई, कुया
तवई	तवई, तवया	अवई	अवई, अवया	संवई	संवई, संवया.

अनुक्रमणिका

[ऊ] **उकारान्त.**

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
सासू	सास्वा	जळू	जळ्वा	पेळू	पेळ्वा
वाळू	वाळ्वा	टाळू	टाळ्वा	पिसू	पिस्वा.

यांत **सासू** आणि **पिसू** यांचीं देशस्थ रीती प्रमाणें अनेकवचनाचीं **सासा** आणि **पिसा** अशींही रूपें होतात.

अपवादक शब्द—खडू, गेरू, गुडाखू, तमाखू.

[ऋ] जर ते शब्द मूळचे अकारान्त असून अपभ्रंशेंकरून उकारान्त झाले असले, अथवा विकल्पें अकारान्त असले, तर त्यांचीं अनेकवचनांचीं रूपें विकल्पें मूळ शब्दाच्या नियमा प्रमाणें होतात; जसें—

एक०	अने०	एक०	अने०
पाचू (पाच)	पाचा, पाचू	माऊ (माव)	मावा, माऊ
शेळू (शेळ)	शेळा, शेळू	शेपू (शेप)	शेपा, शेपू.

[ॠ] परंतु अंत्य अक्षर ऊ असल्यास विकल्प नाहीं; **जाऊ, पाऊ,** इ० शब्दांचीं अनेकवचनें **जावा, पावा** अशींच होतात.

[ऌ] उकारान्त संस्कृत शब्द (पाहा पृष्ट ५०, लेख १.५२ [अ])

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
धेनु	धेनु	धातु	धातु	रज्जु	रज्जु
चमू	चमू	वधू	वधू	भू	भू.

[ॡ] **आऊ, माऊ** या शब्दांचीं उभयवचनांचीं रूपें समान होतात.

[ए] ऊ या शब्दाचें अनेकवचन **उवा** असें होतें.

[ऐ] धू* शब्दाचें अनेकवचन **धुवा** असें होतें.

[ओ] परंतु जर ते शब्द मूळचे ईकारान्त असून ईचा लोप होऊन उकारान्त झाले असले तर मूळरूपा प्रमाणेंच त्यांच्या अनेकवचनांचीं रूपें होतात; जसें—**सू** (सुई) अने० **सुया.**

ईकारान्त फारसी शब्दाचें अनेकवचन मराठी ईकारान्त शब्दा प्रमाणेंच होतें; उदाह० "आह्मीं नानाच्या अमलांत सुभेदाऱ्या मुजूमदाऱ्या फडणिश्या वांकनिश्या करून पुढें मोठमोठ्या मुलूखगिऱ्या केल्या, नंतर दैवाची रेषा फिरली तेव्हां लोकांच्या खिदमतगाऱ्याही कराव्या लागल्या परंतु, अश्या खोट्या सह्या करून दगलबाज्या कधीं केल्या नाहींत."

[औ] जे उकारान्त शब्द परभाषेंतून या भाषेंत आले आहेत त्यांचीं उभयवचनांचीं रूपें समान होतात; जसें—

एक०	**अने०**	**एक०**	**अने०**	**एक०**	**अने०**
बाजू	बाजू	अफू	अफू	अबरू	अबरू
तराजू	तराजू	कानू	कानू	जादू	जादू.

अपवादक शब्द—खडू, गेरू, गुडाखू, कुरकू, कौलू, शाडू, इ०. (हे परभाषेचे शब्द नसतां यांचीं उभयवचनीं समान रूपें होतात).

ऋकारान्त.

१५३ शुद्ध महाराष्ट्र असे ऋकारान्त स्त्रीलिंग शब्द नाहींत. ऋकारान्त जे संस्कृत शब्द आहेत त्यांचीं प्रथमेचीं रूपें या भाषेंत वर्त्ततात. त्यांचीं वचनें आकारान्त स्त्रीलिंग शब्दां प्रमाणें जाणावीं; जसें—माता, स्वसा, श्वसा, इ०.

---

* या शब्दाचा व्यवहार बहुधा मुंबईंत कितीएक जातीं मध्यें मात्र आढळतो.

अनुक्रमणिका

ए–ऐ–औ–कारान्त.

१५४ **आते** या शब्दा शिवाय एकारान्त शब्द या भाषेंत आढळत नाहीं. याचें अनेकवचन **आत** शब्दाच्या प्रमाणें **आता** असें होतें.

१५५ **संवे** हा **संवई** शब्दाचा अपभ्रंश ; याचें अनेकवचन **संवया** असें होतें.

१५६ **ऐ–औ**–कारान्त स्त्रीलिंग शब्दांविषयीं जो नियम पुल्लिंगप्रकरणीं सांगितला तोच जाणावा. (पाहा पृ० ४४, ले० १३९).

एक०			अने०	एक०			अने०
तिवै	तिवई	तिवय,	तिवया	गै	गई	गय,	गया
खै	खई	खय,	खया	जिल्है	जिल्हई	जिल्हय,	जिल्हया.

एक०–चौ चऊ चव अने०–चवा.

ओकारान्त.

१५७ **ओ**कारान्त स्त्रीलिंग शब्द या भाषेंत एकच आहे असें वाटतें, त्याचें अनेकवचन **आ**कारान्त होतें; जसें–बायको बायका.

कोंकणांत निंदेनें ढमाल बायकोस **ढंबो, ताटको** असें ह्मणतात; तेव्हां या शब्दांचा अनेकवचनीं प्रयोग कर्तव्य असतांही हाच नियम जाणावा. उदाह०–"ही ढंबो आली ह्मणजे कांहीं केल्या जात नाहीं, ह्या नुकत्याच ढंबा येऊन गेल्या आतां ताटका येतील."

प्रकरण ३.

नपुंसकलिंग.

अकारान्त.

१५८ अकारान्त नपुंसक शब्दास अनेकवचनीं एं आदेश होतो ; जसें–

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
पान	पानें	वस्त्र	वस्त्रें	अंग	अंगें
छिद्र	छिद्रें	तेल	तेलें	घर	घरें
सूप	सुपें	तूप	तुपें	रूप	रूपें
रेजीम	रेजमें	दफतर	दफतरें	लांकूड	लांकडें.

आकारान्त.

१५९ आकारान्त नपुंसक शब्द नाहीं.

इकारान्त आणि उकारान्त.

१६० र्‍हस्वइकारान्त जे संस्कृत शब्द त्यांचीं उभयवचनांचीं रूपें समान होतात; जसें—

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
अस्थि	अस्थि	अक्षि	अक्षि	वारि	वारि.

१६१ इकारान्त आणि उकारान्त नपुंसक नामांस संप्रसारण होऊन अनेकवचनीं एँ आदेश होतो; जसें—

एक०	अने०	एक०	अने०
मोतीं	मोत्यें	मिरीं	मिऱ्यें
गुळीं	गुळ्यें	आशीं	आश्यें*
कुणीं	कुण्यें	कैंबरीं	कैंबऱ्यें.

१६२ विवक्षा असतां बीं याचें अनेकवचन **बियें** असें होतें.

१६३ आर्द्रपदार्थवाचक जीं इकारान्त नपुंसक नामें त्यांच्या अनेकवचनांचा संभव नसतो. आणि जरीं अनेकवचनीं प्रयोग कर्तव्य असला तथापि त्यांचीं उभयवचनीं रूपें समान होतात. जसें—पाणीं, दहीं, लोणीं, इ०.

* हा शब्द महाराष्ट्र कोशांत नाहीं, परंतु कोंकणांत फार प्रसिद्ध आहे याचा अर्थ पोहे पाखडल्या नंतर जें तुसा सकट अवशिष्ट कण राहतात ते.

अनुक्रमणिका

आतां एथें अशी आशंका प्राप्त होती कीं **मोतीं, मिरीं**, इ० शब्दांचीं अनेकवचनीं **मोतें, मिरें** अशीं रूपें न लिहितां त्यांस संप्रसारण करून **मोत्यें, मिऱ्यें** अशीं रूपें लिहिण्यास आधार कोणता? लोकांचें उच्चारण आधार ह्मणावा तर तो कांहीं सबळ आधार नव्हे, कारण **मोत्यें** आणि **मोतें** यांच्या उच्चारणांत फारसा भेद लक्षांत येत नाहीं. त्यांत आणखी कोंकणांत **यकार** स्पष्ट उच्चारून **मोत्यें, मिऱ्यें** असें ह्मणतात; देशावर तितका **य**वर नेट ठेवित नाहींत, तेव्हां हें कांहीं अशीं रूपें लिहिण्यास सबळ कारण नव्हे. त्यास एक तर या भाषेंत इकारान्त, उकारान्त शब्दांस पुढें अजादि* प्रत्यय लागले असतां बहुधा ईस आणि ऊस संप्रसारण होत असतें हा आधार. दुसरें, इकारान्त नपुंसक शब्दांचे बंधु जे कित्येक उकारान्त नपुंसक शब्द, त्यांस तर हें संप्रसारण अवश्य होतें; जसें **तारूं** याचें अनेकवचन **तारवें** असें होतें **तारें** असें कदापि होत नाहीं. तेव्हां **मोतीं** याचें अनेकवचनाचें रूप **मोत्यें** असेंच लिहिलें पाहिजे; **मोतें, मिरें** अशीं रूपें लिहिणें हा विधिभंग होय. तिसरा आणखी असा नियम आहे कीं, इकारान्त आणि उकारान्त शब्द ज्यांस अनेकवचनीं संप्रसारण होत असतें ते जर एकाक्षरी असले तर संप्रसारणाच्या स्थानीं **इय्** आणि **उव्** असे आदेश होऊन पुढें जो अनेकवचनीं प्रत्यय लागायाचा तो लागतो. जसें **स्त्री** आणि **धू** यांत संप्रसारणाच्या स्थानीं **इय्** आणि **उव्** हे आदेश होऊन पुढें अनेकवचनाचा प्रत्यय जो **आ** तो होतो; तेव्हां **स्त्रिया** आणि **धुवा** अशीं अनेकवचनाचीं रूपें होतात; याच नियमास अनुसरून **बीं** या इकारान्त नपुंसकाचें **बियें** असें रूप होतें; एथें अनेकवचनाचा प्रत्यय **ए** होय; या वरून आर्थात् सिद्ध होतें कीं, जसें **काठी, सासू** यांचीं अनेकवचनीं **काठ्या, सास्वा** अशीं रूपें होतात, त्याच नियमास अनुसरलें असतां **मोतीं, मिरीं** यांचींही **मोत्यें, मिऱ्यें** अशींच रूपें लिहिलीं पाहिजेत.

---

* ह्मणजे स्वरादि.

अनुक्रमणिका

उकारान्त.

१६४

एक०	अने०	एक०	अने०
तारूं	तारें	असूं	अस्वें
अळूं	अळ्वें	गळूं	गळ्वें.

वरील नियमा प्रमाणें उकारान्त नपुंसक नामांचीं रूपें अशींच लिहावीं, **तारवें, अळवें, असवें** या प्रमाणें रूपें लिहिण्याचा परिपाठ फार आहे, परंतु तो शुद्ध नव्हे.

१६५ दोहों पेक्षां अधिकाक्षरी जीं उकारान्त नपुंसक नामें, अथवा कुत्सितार्थदर्शक किंवा लघुत्वार्थदर्शक जीं उकारान्त द्व्यक्षरी नामें, त्यांस अनेकवचनीं संप्रसारण होत नाहीं; जसें—

एक०	अने०	एक०	अने०
लेंकरूं	लेंकरें	गुरूं	गुरें
पांखरूं	पाखरें	रताळूं	रताळें
वांसरूं	वांसरें	तट्टूं	तट्टें.

१६६ **लिंबूं** अ० **निंबूं** शब्दाचें अनेकवचन **लिंबें** अ० **निंबें** होतें. **सुकाणूं, जिवाणूं** या शब्दांचीं अनेकवचनें कोंकणांत **सुकाण्वें, जिवाण्वें** अशीं होतात.

[अ] यांत ज्यांस संप्रसारण होऊन ए आदेश होतो त्यांस **तारवादिकांचा** गण, आणि ज्यांस हें संप्रसारण होत नाहीं त्यांस **लेंकरादिकांचा** गण ह्मटलें आहे.

एकारान्त.

१६७ एकारान्त नपुंसक नामास अनेकवचनीं इँ आदेश होतो; जसें—

एक०	अने०	एक०	अने०
तळें	तळीं	भांडें	भांडीं
घोंसाळें	घोंसाळीं	बोलणें	बोलणीं.

प्रकरण ४.

वचनसंबंधी स्फुट विचार.

१६८ कितीएक शब्द बहुधा एकवचनांतच वर्त्ततात; जसें—पाणीं, सोनें, रूपें, ताक, तेल, दूध, गहूं, बाजरी, कांजी, इ०.

१६९ कितीएक शब्द बहुधा अनेकवचनांतच वर्त्ततात; जसें—मुस्क्या, कात्या, खडावा, मिऱ्या,* कारेवारे, मिटक्या, ख्याल, इ०.

प्रकरण ५.

उपान्त्यनियम.

१७० उपांत्य ई अथवा ऊ असतां ११६ व्या नियमा प्रमाणें त्या उपांत्यास कार्यें होऊन अनेकवचनांचीं रूपें सिद्ध होतात; जसें.—

स्त्रीलिंग.

एक०	अने०	एक०	अने०
जीभ	जिभा	बंदूक	बंदूका—की
टीक	टिका	संदूक	संदूका
खारीक	खारखा	कावीळ	कावळी

* लहान असल्यास मिरी ह्मणतात.

अनुक्रमणिका

सोयरीक	सोयरिकी—का	तिडीक	तिडिका—डका
बाभूळ	बाभळी	निंबूण	निंबणी
जांबूळ	जांबळी	माजूम	माजुमी
बकूळ	बकुळी	बटीक	बटिकी—टकी
चूल	चुली	विहीर	विहिरी
तजवीज	तजविजा—जी	चाहूल	चाहुली

नपुंसकलिंग.

एक०	अने०	एक०	अने०
भरीत	भरितें—रतें	रेजीम	रेजमें
भोरीप	भोरपें	कणीस	कणिसें-णसें
रेशीम	रेशमें	अंबसूल	अंबसुलें
जोखीम	जोखमें	वाघूळ	वाघळें.

१७१ उपांत्य जर ई अथवा ऊ हे वर्ण असले, आणि अनेकवचनीं अंत्यवर्णास दीर्घत्व प्राप्त झालें, तर ११९ व्या नियमा प्रमाणें ते उपांत्य ऱ्हस्व होतात; विकल्पें त्यांस संप्रसारणही होतें; जसें—

स्त्रीलिंग.

एक०	अने०		एक०	अने०	
काईल	काइली	कायली	ताईत	ताइती	तायती
अईन	अइनी	अयनी	कवाईत	कवाइती	कवायती
सुईण	सुइणी	सुयणी	पंचाईत	पंचाइती	पंचायती
दऊत	दउती	दवती	ओंऊळ	ओंउळी	ओंवळी
माऊली	माउल्या	मावल्या	माऊशी	माउश्या	मावश्या.

अनुक्रमणिका

नपुंसकलिंग.

एक०	अने०		एक०	अने०	
कुईट	कुइटें	कुयटें	बाईल	बाइला	बायला
देऊळ	देउळें	देवळें	पाऊल	पाऊलें	पावलें
कऊल	कउलें	कवलें	राऊळ	राउळें	रावळें.

१७२ शुद्ध संस्कृत शब्दांच्या उपांत्यास अनेकवचनीं कांहीं विशेष होत नाहीं; जसें—

एक०	अने०	एक०	अने०	एक०	अने०
गीत	गीतें	रूप	रूपें	सूत्र	सूत्रें.

प्रकरण ६.

च ज इ० वर्णां विषयीं नियम.

१७३ **च ज झ स** हीं अक्षरें नामाच्या अंतीं असून जर त्यांस अजादि प्रत्ययें करून ए अथवा इ असा विकार होत असला, तर त्यांचा विकल्पें तालव्य उच्चार होऊन पुढें ते प्रत्यय लागत असतात, यांत इ असतां विकल्प नाहीं, असलाच तर स असतां होतो.

एक०	अने०		एक०	अने०	
राजा	राजे	राजे	चमचा	चमचे	चमचे
सांजा	सांजे	सांजे	भाचा	भाचे	भाचे
आरसा	आरसे	आरशे	मासा	मासे	माशे
चोंच	चोंचा	चोंची	खोंच	खोंची	
तजवीज	तजविजी		तज	तजी	
रास	राशी	रासी	घूस	घुशी	घुसी.

कोणांस असें वाटेल कीं, या नियमाची कांहीं आवश्यकता नाहीं; परंतु त्यांहीं असें समजावें कीं, असें कोंकणांत **राजे**

अनुक्रमणिका

भाचे या प्रमाणें उच्चारण्याचा प्रचार आहे, तसा देशांत व इतर ठिकाणीं **राजे भाचे** इ० उच्चारण्याचाही प्रचार आढळतो. त्यास आणखी एक दुसरें प्रमाण;– या भाषेंत **च ज झ** आणि **स** यांज पुढें ए आणि इ हे स्वर असतां त्यांचा दंततालव्य उच्चार बहुधा राहत नाहीं, असा एक नियम आढळतो; कांकीं **ची जी चे जे** हीं अक्षरें आरंभीं अथवा मध्यें आहेत ज्यांच्या असे शब्दच या भाषेंत आढळत नाहींत. तेव्हां कार्यविशेषेंकरून **च, ज, स,** इ० वर्णां पुढें शब्दांच्या अंतीं ए अथवा इ आला असतांही त्याच नियमास अनुसरून कितीएक प्रांतीं **राजे भाचे राशी** इत्यादि प्रकारें बोलतात; हा नियम आपण कोणत्या आधारा वरून समूळ काढून टाकावा; ह्मणोन एथें वैकल्पिक असींही रूपें होतात असें लिहिलें आहे. वरकड शुद्ध रीति ह्मटली असता–**राजे,–भाचे,–मासे,** हीच जाणावी.

[अ] एकार आणि ईकार ह्मटलें यावरून अन्य विकार झाला असतां दंततालव्योच्चारच राहतो; जसें–

एक०	अने०	एक०	अने०
कांच	कांचा	टांच	टांचा
बाज	बाजा	वीझ	विझा
कांस	कांसा	जिन्नस	जिनसा.

वर्ग ३.

विभक्तिविचार.

१७४ नामाशीं आणि क्रियेशीं जो संबंध त्यास **कारक** अशी संज्ञा आहे, आणि हा संबंध सुचविणारे जे प्रत्यय तदन्त जे शब्द त्यांस **विभक्ति** ह्मणतात.

१७५ या विभक्ति आठ आहेत– **प्रथमा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी,** आणि **संबोधन.**

अनुक्रमणिका

प्रथमा विभक्ति असतां नामास कांहीं कार्य होत नाहीं; जे मूळचें रूप तीच प्रथमा; इतर विभक्ति असतां नामां वरून तत्तद्विभक्तिदर्शक जे प्रत्यय होतात ते असे.–

विभक्ति०	**एकवचन.**	**अनेकवचन.**
द्वितीया.	ला. स. तें.	ना. ला. स. तें.
तृतीया.	नें. एँ. शीं.	नीं. हीं. ईं. शीं.
चतुर्थी.	ला. स. तें. अर्थ.	ना. स. तें. अर्थ.
पंचमी.	ऊन. हून. ॰तून.	ऊन. हून. ॰तून.
षष्ठी.	चा. ची. चें.	चा. ची. चें.
सप्तमी.	॰त. ईं. आँ.	॰त. ईं. आँ.

अनेकवचनाचे प्रत्यय लागतांना अंगाचा अंत्य स्वर अनुनासिक होतो.

१७६ आतां स्पष्ट करण्याकरितां या विभक्ति एका नामास लावून खालीं दाखवितों.

पुरुषशब्द.

विभक्ति.	**एकव०**
प्र०	**पुरुष.**
द्वि०	पुरुषाला. पुरुषास. पुरुषातें.
तृ०	पुरुषानें. पुरुषें. पुरुषाशीं.
च०	पुरुषाला. पुरुषास. पुरुषातें.
पं०	पुरुषाहून. पुरुषांतून.
ष०	पुरुषाचा.
स०	पुरुषांत. पुरुषीं.
सं०	पुरुषा.

अनुक्रमणिका

विभक्ति. अनेकव०.

प्र० पुरुष.
द्वि० पुरुषांना. पुरुषांला. पुरुषांस. पुरुषांतें.
तृ० पुरुषांनीं. पुरुषांहीं. पुरुषीं. पुरुषांशीं.
च० पुरुषांना. पुरुषांला. पुरुषांस. पुरुषांतें.
पं० पुरुषांहून. पुरुषांतून.
ष० पुरुषांचा.
स० पुरुषांत. पुरुषीं.
सं० पुरुषांनों. पुरुषांहो.

या भाषेंत विभक्ती विषयीं फार गोंधळ आहे. जर प्रत्यया वरून विभक्ती मानाव्या, तर चतुर्थीस आणि पंचमीस प्रत्यय नाहींत; जर अर्था वरून विभक्ती मानाव्या, तर एका विभक्तीचे अनेक अर्थ होतात; ह्मणूनच, या व्याकरणाच्या प्रथमावृत्तींत कोठे अर्थास, आणि कोठे प्रत्ययास, अनुसरून विभक्ती मानिल्या होत्या; परंतु अलीकडेस एका विद्वान मित्राचें असें मत पडलें कीं, अशांत एक नियम राहत नाहीं. यास्तव संस्कृत भाषेच्या नियमा प्रमाणें प्रत्यया वरूनच विभक्ति मानाव्या हें नीट. परंतु असें केल्यानें ही जी पूर्वोक्त अडचण आहे तिचें निवारण होत नाहीं. तेव्हां जेथें विभक्तिप्रत्यय नाहींत तेथें शब्दयोगी अव्ययांची योजना करून निर्वाह करणें प्राप्त होतें. परंतु हीं अव्ययें पुष्कळ आहेत यांतून कोणतीं या विभक्तींच्या स्थानीं योजावीं ही एक आशंका उत्पन्न होती; जर **साठीं**, **करितां** यांस चतुर्थी, आणि **पासून**, **कडून**, **पेक्षां** यांस पंचमी मानावी, तर मग **स्तव**, **अर्थी**, **कारणें**, यांस चतुर्थी, **वरून**, **खालून**, **आंतून** यांस पंचमी, **योगें**, **करवीं**, **करून** यांस तृतीया, आणि **प्रत**, **लागीं**, यांस द्वितीया, कां मानूं नये? अशी सहज आशंका उत्पन्न होती, आणि तिचें यथास्थित समाधान होत नाहीं.

तथापि सूक्ष्म विचार करून पाहिलें असतां हा पक्ष कांहींसा सयुक्तिक दिसतो; कारण, जर केवळ अर्थासच अनुसरून विभक्ति

अनुक्रमणिका

मानिल्या तर एका विभक्तिचे अनेक अर्थ होतात, असें कारकप्रकरणीं सविस्तर सांगितलें आहे, तेव्हां हा नियम अगदीं चालणार नाहीं. विभक्ति ह्मणजे कारकसंबंधाद्यर्थसूचक जे प्रत्यय ते लागून जें रूप सिद्ध होतें त्या रूपाची संज्ञा होय; तदंतर्गत जे अर्थ आहेत त्यांची संज्ञा नव्हे. अर्था वरून विभक्ति मानिल्या असतां कदाचित् एका रूपाच्या ठायीं कर्ताकर्मकरणसंप्रदानादि चार पांचही विभक्त्यर्थांची संभावना होती, तेव्हां त्या रूपास तो तो अर्थ विवक्षित असतां ती ती विभक्ति ह्मटली पाहिजे. ही आणखी मोठी अडचण आहे, तेव्हां आतां या दोन्ही अडचणींचें निवारण कसें होतें? त्यास, मला असें वाटतें कीं द्वितीया आणि चतुर्थी यांचीं रूपें सारखींच मानिलीं असतांही अडचण दूर होईल. मग या अव्ययांचीं योजना करायास नको; एका कर्माच्या अर्था शिवाय जेथें द्वितीयेचें रूप आढळेल ती चतुर्थी मानावी. आणि वाक्यांत कर्म जाणायास विशेष कठीण पडत नाहीं. 'राजा दुष्टांस मारितो,' या वाक्यांत **दुष्टांस** ही द्वितीया मानावी आणि 'राजा ब्राह्मणास गाई देतो,' एथें **ब्राह्मणास** ही चतुर्थी मानावी; कां कीं एथें **गाई** हें प्रत्यक्ष कर्म आहे. आणखी असें मानायास आपल्यास संस्कृत व्याकरणाचाही आधार आहे, त्यांत चतुर्थी आणि पंचमी यांचीं बहुवचनीं, तृतीया व चतुर्थी आणि पंचमी या विभक्तींचीं द्विवचनीं, आणि कित्येक नामांचीं पंचमी आणि षष्ठी याचीं एकवचनीं, आणि षष्ठी आणि सप्तमी यांचीं द्विवचनीं सारखींच रूपें होतात. तेथेंही त्या त्या स्थळीं अर्था वरूनच विभक्तीचा निश्चय केला पाहिजे; तद्वत् एथेंही द्वितीया आणि चतुर्थी असतां अर्था वरून विभक्तीचें विवेचन करावें, आणि तें करायास कांहीं कठीण नाहीं, कांकीं वाक्यांत कर्म सहज ओळखतां येतें. या अर्था शिवाय अर्थांतरीं सर्वत्र जेथें हें रूप आढळेल तेथें ती चतुर्थी मानावी.

जर संस्कृत आणि प्राकृत व्याकरणांशीं मुलशाखासंबंध नसतां, आणि तो संबंध ठेवणें इष्ट नसतें, तर चतुर्थीस केव्हांच काढून टाकून संबोधना सुद्धां सातच विभक्ति मानिल्या असत्या:

अनुक्रमणिका

परंतु तसें करणें प्रशस्त दिसत नाहीं, कारण त्यांत लाभा पेक्षां हानि फार आहे.

आतां पंचमी विषयीं तर विशेष शंका आहे अशी गोष्ट नाहीं. **घरून, गांवून, हातून,** ही केवळ उघडी पंचमी दिसती; **हून** हें बहुतेकांस अव्यय वाटतें, परंतु हें अव्यय नव्हे; हा केवळ प्रत्यय दिसतो; ह्मणून घराहून, दाराहून, इत्यादि शुद्ध पंचमी विभक्ति जाणावी;—इतकेंच कीं **स. ला. ना.** इत्यादि. विभक्तिप्रत्यया सारिखा हा एकाक्षरी प्रत्यय नव्हे.

द्वितीया आणि चतुर्थी.

१७७ द्वितीया आणि चतुर्थी विभक्ति असतां मूळ प्रकृतीस **स, ला, तें,** हे प्रत्यय लागतात.

स— या प्रत्ययाचा उपयोग बोलण्यांत बहुधा कोंकणांत फार करितात; व इतर ठिकाणीं करणें झालाच तर लिहिण्यांत करितात.

ला— या प्रत्ययाचा प्रयोग देशस्थ लोकांत आढळतो; व **स** पेक्षां याचा प्रचार फार आहे.

तें— हा प्रत्यय भाषणांत येत नाहीं. बहुतकरून प्राकृत ग्रंथांत याचा प्रयोग आढळतो.

अर्थ— संस्कृत शब्दां वरूनच चतुर्थ्यर्थी हा प्रत्यय होत असतो; पूर्व वर्णांशीं यांतील **अ**चा संधि होतो; जसें— द्रव्यार्थ, मोक्षार्थ, उदरभरणार्थ, प्रीत्यर्थ, इ०.

कोठें कोठें विभक्तीच्या योगानें जें अंग सिद्ध होतें, तेंच द्वितीयेचें रूप होतें. परंतु अशां रूपांचा प्रयोग प्राकृत ग्रंथांत व प्राकृत काव्यांत मात्र होतो; जसें—

"नक्रबोलिलातुजलागोन ॥ तुझेंनामपतितपावन ॥
आणिमाझाअव्हेरकरून ॥ जासीघेवोन**गजेंद्रा**."भक्तिविजय
"अगाप्रणतवत्सलाह्मणतित्या**जनां**पावलां,
ह्मणोनितुमच्याचमीस्मरतसें सदां**पावलां**." केकावलि.

अनुक्रमणिका

"जीजीह्मणोनिआउनि,घेउनिआलासभेंत**भावजये**॥पतिजवळिकलत्रनयें,कांहोसिद्धाश्रमांतसावजये॥१॥सांगेनयथामतिपरि,कोठेंतोनृप ह्मणेबहा**भ्रात्या** ॥ आणीसभेंतपुनरपि, वळवुनिविदुरवातसा**महाभ्रात्या**" मोरोपंत.

तृतीया.

१७८ **नें**— या प्रत्ययाचा प्रयोग इतर प्रत्ययां पेक्षां विशेष होतो.

एँ—ईं— हे प्रत्यय विशेषेंकरून अकारान्त संस्कृत नामास कवितेंत लागतात, त्या काळीं अंत्य अकाराचा लोप होतो. उदाह०.

"तुझ्याबहुतशोधिलेअघनिधीपदाचा**रजें**,
नतेंअनृतवर्णितीबुधजनींसदाचारजें" केकावलि.

"**श्रोतीं**व्हावेंसावधान."

"**हस्तीं**करीवलयउंचअशाउ**पायीं**.
नृपेंहळूचधरिलाकलहंस**पायीं**." वामन.

शीं— हा प्रत्यय बहुधा सन्निधान दर्शवितो; कधीं कारणही दर्शवितो.

याचा विचार कारकप्रकरणीं केला आहे.

मराठी भाषेंत तृतीया विभक्तीचें आणखी एका प्रकारचें रूप होतें, तें असें कीं, नामास आणि सर्वनामास षष्ठ्यन्तसामान्यरूप होऊन त्यांस हे तृतीया विभक्तीचे प्रत्यय लागून तृतीयेचीं रूपें साधतात; जसें— रामाच्यानें, माझ्यानें, तुझ्यानें, त्यांच्यांनीं, आमच्यांनीं. इ०. या प्रकारच्या तृतीयेस **सविकरणतृतीया**, आणि या रूपांस **सविकरणतृतीयेचीं रूपें** ह्मणावें.

अनुक्रमणिका

हीं सविकरणतृतीया बहुधा शक्यार्थ असतां सर्वनामा वरून होत्ये, जसें— माझ्यानें लिहवेल, तुझ्यानें चालवतें, इ०.

नें, नीं या प्रत्ययां शिवाय इतर तृतीयेचे प्रत्यय बहुधा षष्ठ्यंतसामान्यरूपा वरून होत नाहींत ;— **आमच्यांशीं, तुमच्यांशीं**, अशीं, सर्वनामाचीं रूपें कोठें कोठें आढळतात, परंतु यां पेक्षां **आह्मांशीं, तुह्मांशीं**, हीं रूपें शुद्ध.

पंचमी.

१७९ **ऊन**— स्थलाचे अथवा अधिकरणाचे वाचक जितके पुल्लिंग व नपुंसकलिंग द्व्यक्षरी प्राकृत शब्द आहेत, त्यां वरून पंचम्यर्थी हा प्रत्यय होत असतो, सर्वत्र होत नाहीं; जसें— गांवून, घरून, देशून, हातून, तोंडून, इ०. हा प्रत्यय होत असतां नामाचें सामान्यरूप होत नाहीं.

हून -- याचा प्रयोग बहुधा सर्वत्र होतो. हा प्रत्यय होत असतां नामाचें सामान्यरूप होतें.

***तून**— हें मूळचें **आंतून** होय. परंतु जसा **त** हा सप्तमीचा प्रत्यय मानावा तसा **तून** हा साधिकरण अपादानार्थ याचा वाचक पंचमीचा प्रत्यय मानिल्यास व्याकरण करिते समयीं पुष्कळ अडचणी दूर होतील. हा प्रत्यय होत असतां पूर्ववर्ण अनुनासिक होतो. जसें— गावांतून, शेंगेंतून, इ०. असें न केलें तर व्याकरण पदच्छेद करायास मोठी अडचण पडेल.

षष्ठी.

१८० **चा. ची. चें**— षष्ठीचा अर्थ संबंध आहे, यास्तव ही विभक्ती ज्याशीं संबंध ठेवित्ये त्याच्या लिंगवचना प्रमाणें या प्रत्ययाचीं रूपें फिरतात.

अनुक्रमणिका

	पु०	स्त्री०	न०
एकव०	चा	ची	चें
अनेक०	चे	च्या	चीं

सप्तमी.

१८१ त. ई. आँ— यांत मराठी शब्दांस त हा प्रत्यय फार लागत असतो; व हा लाविते समयीं शब्दांतींचा अंत्य स्वर जर ऱ्हस्व असला, तर दीर्घ होऊन अनुनासिक होतो. दीर्घ असल्यास अनुनासिकमात्र होतो.

कित्येकांचें असें मत आहे कीं त हा प्रत्यय नव्हे, हें आंत शब्दयोगी अव्यय होय. घरांत ह्मणजे 'घराच्या आंत' असा विग्रह करून घरांत, दारांत, अशा ठिकाणीं ते अव्ययीभाव समास मानितात. परंतु मला केवळ तसें वाटत नाहीं, त हें मूळचें आंत या अव्ययाचें संक्षिप्त रूप खरें; परंतु व्याकरणपदच्छेद करिते समयीं आतां यास अव्यय मानणें प्रशस्त नाहीं;- कारण, आकारान्त पुल्लिंग व नपुंसकलिंग शब्दांच्या ठायीं असा आभास व्हावयास अवकाश आहे; परंतु यास अव्यय मानून इकारादंत शब्दां पुढें यांतील आचा लोप करावा, त्या पेक्षां त हा सप्तमीविभक्तिप्रत्ययच मानावा, हें मला बरें दिसतें.

[अ] ई— अकारान्त जीं संस्कृत नामें आहेत, त्यांस अंत्यस्वरांचा लोप करून हा प्रत्यय लावितात; जसे— वनीं, करीं, मुखीं, इ०. देशकालवाचक शब्दांचीं, व इतर कित्येक मराठी शब्दांचींही त्याच प्रमाणें या प्रत्ययाच्या योगानें सप्तमीचीं रूपें होतात; जसें— घरीं, गांवीं, देशीं, समयीं, हातीं, पायीं, तोंडीं, इ०.

[आ] **आं**— कित्येक मराठी शब्दांस अंत्यस्वरांचा लोप करून हा प्रत्यय लावितात; जसें– माथां, पायां, इ०. 'वेदाचा तो अर्थ आह्मांसीच ठावा, इतरांनीं वाहावा भार माथां'. तुकाराम.

१८२ कोणत्याही नामास वर सांगितले विभक्तिप्रत्यय लाविले असतां, त्या नामाच्या अंत्यस्वराच्या स्थानीं जो विकार होतो, त्यास **विभक्तिकार्य** ह्मणतात; जसें– **पुरुष** या शब्दास विभक्ति लाविली असतां मध्यें जो (पुरुषास, पुरुषानें, पुरुषाचा, इ०.) आकाररूप विकार उत्पन्न होतो तें विभक्तिकार्य जाणावें.

हीं विभक्तिकार्यें नामाच्या लिंगा वरून आणि अंत्य स्वरा वरून भिन्न भिन्न होतात.

१८३ हें विभक्तिकार्य होण्याच्या पूर्वीं जें शुद्ध मूळचें रूप, ज्या वरून पुढें विभक्तिप्रत्यय व्हावयाचे, त्या रूपास त्या विभक्तीच्या संबंधानें **अंग** अशी संज्ञा आहे; जसें **पुरुष** या शब्दास विभक्ति लावावयाची असतां तिच्या योगानें **पुरुष** यास अंग ही संज्ञा होय.

१८४ हें विभक्तिकार्य होऊन जें नामाचें रूप विभक्तिप्रत्ययाच्या योगानें सिद्ध होतें, त्यास **सामान्यरूप** ह्मणतात; जसें **देव** या शब्दाचें सामान्यरूप **देवा**, **गंगा** या शब्दाचें सामान्यरूप **गंगे**, **तारूं** शब्दाचें सामान्यरूप **तार्वा**.

१८५ सामान्यरूपाचा अंत्य स्वर अनेकवचनीं अनुनासिक होतो; जसें– **देवां**, **हत्तीं**, **काठयां**, **सास्वां**, **स्त्रियां**, इ०.

१८६ ज्यांचीं अनेकवचनीं दोन प्रकारचीं रूपें होतात, त्यांचीं सामान्यरूपेंही त्या त्या प्रमाणें दोन दोन प्र-

अनुक्रमणिका

कारचीं होतात ; जसें– **गाईं, गायां ; बाईं, बायां ; परातीं, परातां ;** इ०.

१८७ या सामान्यरूपांत दोन भेद आहेत, एक **विभक्तिसामान्यरूप** जसें वर सांगितलें; आणि एक **विशेषणसामान्यरूप**, ह्मणजे जें विशेषणाचें अथवा विशेषणासारिख्या शब्दाचें सामान्यरूप पुढील सविभक्तिक अथवा सशब्दयोगिक विशेष्याच्या संबंधानें मागें असतें तें; जसें– 'हलक्या मनुष्याच्या तोंडीं लागूं नये', या वाक्यांत **हलक्या** हें विशेषणसामान्यरूप होय ; तसेंच '**ज्या** भगवंतानें आपल्यास निर्माण केलें, **त्या** भगवंतास अनन्यभावें शरण असावें'; '**मज** रावणा सारिखे हटतात, तेथें **तुझा** गरीबांचा काय पाड'; एथें **ज्या, त्या, मज,** आणि **तुझा**, हीं सामान्यरूपें खरीं, परंतु विशेषणसामान्यरूपें जाणावीं.

१८८ विभक्तिसामान्यरूप जें असतें तेंच बहुधा विशेषणसामन्यरूप होतें.

या नियमांस कोठें कोठें बाधकें आहेत, ह्मणोनच हा पृथक् संज्ञानिर्देश करण्याची आवश्यकता; ती पुढें सर्वनाम, विशेषण, आणि वाक्यरचना या प्रकरणांत समजेल.

१८९ विशेषणसामान्यरूपा पुढें विशेष्य असतां अनेकवचनीं त्या सामान्यरूपाचा अंत्य स्वर अनुनासिक करून लिहिण्याचा परिपाठ आढळत नाहीं;– जसें– 'या मनुष्यांस' 'चांगल्या मुलांची' इ०.

१९० विशेषनामांस आणि कित्येक संस्कृत नामांस विभक्तिकार्य होत नाहीं; जसें– राघोबास, गंगानें, खंडूचा, हरीपासून, इ०.

१९१ तीं विशेषनामें किंवा संस्कृत नामें जर ह्रस्वस्वरान्त

असलीं तर विभक्तीनें अंत्य स्वर दीर्घ होतो; जसें– भानूचा, कवीपासून, इ०.

१९२ जीं संस्कृत नामें बोलण्याच्या रूढींत फार असतात, त्यांस इतर प्राकृत नामां प्रमाणें विभक्तिकार्यें होतात; जसें– आत्म्याचा, पुस्तकानें, इ०.

१९३ जर नामाचा उपांत्य दीर्घ ई किंवा ऊ असला, तर पुढल्या विभक्तिकार्यानें तो उपांत्य ऱ्हस्व होतो; जसें– रीत, रितीस; कूड, कुडापासून; इ०.

१९४ षष्ठी विभक्ति अंतीं असून पुढें कित्येक विभक्तिप्रत्ययांचा व शब्दयोगी अव्ययांचा योग होतो, त्या रूपास **षष्ठ्यंतसामान्यरूप** अथवा **सविकरणसामान्यरूप** ह्मणावें; व पुढें तृतीयादिविभक्ति असतील त्यांस **षष्ठ्यंतसामान्यरूपी** अथवा **सविकरणसामान्यरूपी** तृतीया असें ह्मणावें; जसें– **त्याच्यानें** एथें **त्याच्या** हें षष्ठ्यंतसामान्यरूप किंवा सविकरणसामान्यरूप, आणि **त्याच्यानें** ही षष्ठ्यंतसामान्यरूपी किंवा सविकरणसामान्यरूपी तृतीया होय. तसेंच **माझ्याहून** ही षष्ठ्यंतसामान्यरूपी किंवा सविकरणसामान्यरूपी पंचमी. अशींच 'मनुष्याच्या ठायीं,' 'तिच्या करितां' इत्यादि स्थळीं शब्दयोगी अव्ययांच्या योगानें जीं षष्ठ्यंतसामान्यरूपें होतात त्यांचीं उदाहरणें जाणावीं.

यांत विभक्ति लावायाची असतां **च्या** या प्रत्ययाचा योग करितात, व शब्दयोगी अव्यय असतां **च्या** किंवा **चे** या दोहींतून कोणत्याही प्रत्ययाचा योग करितात. परंतु मला वाटतें उभयपक्षीं **च्या** याचेंच ग्रहण योग्य होय.

संबोधन.

१९५ दुसऱ्यास हाक मारावयाची असतां, अथवा

अनुक्रमणिका

त्याचें लक्ष आपणाकडेस ओढून घ्यावयाचें मनांत असतां, जें नामास विभक्ती सारिखें कार्य होऊन रूप सिद्ध होतें, त्यास संबोधन ह्मणतात; जसें– रामा, देवा, आई, वये, मुलांनों, स्त्रियांनों, इत्यादि. विवक्षा असल्यास संबोधनार्थ-बोधक जीं अव्ययें, त्यांची ही योजना या रूपां मागें करितात; जसें– अरे रामा, अगे वये, अहो बाबा, इ०.

१९६ याचा नियम असा आहे कीं, ज्या नामाचें जें एकवचनीं सामान्यरूप तेंच बहुधा त्याचें एकवचनीं संबोधनाचें रूप होतें; परंतु अनेकवचनीं मात्र त्यास अनुनासिक करून पुढें **नों** हा प्रत्यय लावितात; जसें–रामा, वये, देवांनों, बाबांनों, माणसांनों, इ०.

"गड्यांनोंकृष्णगडीआपुलाराजामथुरेचाझाला".

विभक्ती विषयीं सामान्य नियम.

१९७ महाराष्ट्र भाषेत नामांस विभक्ति लागल्या असतां नामांच्या जातिभेदानें सात प्रकारचीं सामान्यरूपें होतात.

पहिला प्रकार –– यांत सामान्यरूप अंगा प्रमाणेंच असतें.

दुसरा प्रकार — यांत सामान्यरूपीं अंगाच्या अंत्यास दीर्घ आदेश होतो.

तिसरा प्रकार — यांत अंगाच्या अंत्यास सामान्यरूपीं **या** आदेश होतो.

चवथा प्रकार — यांत अंगाच्या अंत्यास सामान्यरूपीं ए आदेश होतो.

पांचवा प्रकार — यांत अंगाच्या अंत्यास सामान्यरूपीं ई आदेश होतो.

अनुक्रमणिका

साहवा प्रकार — यांत अंगाच्या अंत्यास सामान्यरूपीं **आ** आदेश होतो.

सातवा प्रकार — यांत अंगाच्या अंत्य स्वरास संप्रसारण होऊन पुढें इतर नियमां प्रमाणें सामान्यरूप होतें.

याचा विस्तार करून खालीं दाखवितों.

पहिला विभक्तिप्रकार.

१९८ आकारान्त प्रतिष्ठितनामें, अथवा अधिकारवाचक कित्येक नामें, व शरीरसंबंधवाचक नामें, व दीर्घस्वरान्त विशेषनामें, व एकारान्त आणि ओकारान्त नामें, व अनेकाक्षरी ईकारान्त व कित्येक ऊकारान्त स्त्रिलिंग शब्द, आणि एकाक्षरी शब्द, यांचीं सामान्यरूपें पहिल्या प्रकारा प्रमाणें होतात; जसें– दादा, नाना, राघोबा, बये, बायको, लाहो, मशालजी, देवजी, ताई, भाऊ, खंडू, देवी, कुमारी, तंबाखू, व, मा, श्री, इ०.

दुसरा विभक्तिप्रकार.

१९९ यांत अकारान्त इकारान्त आणि उकारान्त पुल्लिंग, कितीएक इकारान्त आणि उकारान्त स्त्रीलिंग, आणि अकारान्त नपुंसकलिंग, यांच्या अंगाच्या अंत्यास सामान्यरूपीं दीर्घ आदेश होतो; जसें–खांब–खांबा, कवि–कवी, साधु–साधू, व्यक्ति–व्यक्ती, धेनु–धनू, बोर बोरा, इत्यादि.

तिसरा विभक्तिप्रकार.

२०० यांत आकारान्त पुंलिंग, आणि एकारान्त नपुंसकलिंग, यांच्या अंगाच्या अंत्यास **या** आदेश होऊन सामान्यरूप होतें; जसें– वांटा– वांट्या, तळें– तळ्या, इ०.

चौथा विभक्तिप्रकार.

२०१ आकारान्त व कित्येक अकारान्त स्त्रीलिंग शब्दांच्या अंगास, ए आदेश होऊन सामान्यरूप होतें; जसें– पागा–पागे, आत–आते, इ०.

पांचवा विभक्तिप्रकार.

२०२ यांत कितीएक अकारान्त स्त्रीलिंग शब्दांच्या अंगास सामान्यरूपीं ई आदेश होतो; जसें–भिंत–भिंती, चूल–चुली, इ०.

सहावा विभक्तिप्रकार.

२०३ यांत कितीएक उकारान्त पुल्लिंग व नपुंसकलिंग नामांच्या अंगास, व एकारान्त संख्यावाचक पुल्लिंग विशेषणांस, सामान्यरूपीं आ आदेश होतो; जसें–तट्टू–तट्टा, वासरूं–वासरा, दोघे–दोघां, इ०.

सातवा विभक्तिप्रकार.

२०४ यांत कितीएक इकारान्त व उकारान्त नामांच्या अंगाच्या अंत्य स्वरास संप्रसारण होऊन ते शब्द अकारान्त होतात, नंतर त्यांच्या लिंगांच्या नियमा प्रमाणें त्यांचीं सामान्यरूपें होतात; जसें–मोतीं–मोत्या, न्हावी–न्हाव्या, लाडू–लाड्वा, सासू–सास्वे, तारूं– तार्वा, इ०.

प्रकरण ९.

पुल्लिंग नामें.

अकारान्त.

२०५ अकारान्त पुल्लिंग नामाचें सामान्यरूप दुसऱ्या प्रकारा प्रमाणें होतें; जसें–

विभक्ति.	एकवचन.	अनेकवचन.
प्र०	वाघ.	वाघ.
द्वि०	वाघाला–स–तें.	वाघांना–स–तें.
तृ०	वाघानें–शीं.	वाघांनीं–शीं.
सं०	वाघा.	वाघांनों.
इ०.	इ०.	इ०.

२०६ जर ते अकारान्त शब्द केवळ एकाक्षरी असले तर त्यांचीं सामान्यरूपें पहिल्या प्रकारा प्रमाणें होतात. जसें–'मुला तूं या कला काना द्यावयास विसरलास,' 'या ढला तुह्मीं कितीही पढविलें तऱ्हीं हा ढचा ढच,' इ०.

आकारान्त.

२०७ आकारान्त पुल्लिंग नामांचें सामान्यरूप तिसऱ्या प्रकारा प्रमाणें होतें; जसें–

आकारान्त पुल्लिंग आंबा शब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	आंबा.	आंबे.
द्वि०	आंब्याला–स–तें	आंब्यांना–स–तें.
तृ०	आंब्यानें–शीं.	आंब्यांनीं–शीं.
सं०	आंब्या.	आंब्यांनों.
इ०.	इ०.	इ०.

याचप्रमाणें–धोंडा, खांबा वांसा, डोळा, कांसोटा, बरेपणा, देवपणा, इ०. नामांचीं रूपें जाणावीं.

२०८ तीं आकारान्त नामें जर प्रतिष्ठा अथवा शरीरसंबंध यांचीं वाचक असलीं, अथवा एकाक्षरी असलीं, तर त्यांचीं सामान्यरूपें पहिल्या प्रकारा प्रमाणें होतात; जसें–

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	बाबा.	बाबा.
द्वि०	बाबाला–स.	बाबांनां–स.
तृ०	बाबानें–शीं.	बाबांहीं–नीं–शीं.
सं०	बाबा.	बाबांनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें–तात्या, अण्णा, दादा, काका, मामा, नाना, दाजीबा, खंडोबा, जनोबा, नाखोदा, नाखवा, मुलना, मुल्ला, इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

२०९ जे **आकारान्त** संस्कृत शब्द फारसे रूढींत नाहींत त्यांचीं सामान्यरूपें पहिल्या प्रकारा प्रमाणें होतात; जसें–आज्यपा, आज्यपास, आज्यपातें, चंद्रमाचें, इ०.

२१० तेंच शब्द रूढींतले असल्यास तिसऱ्या प्रकारा प्रमाणें त्यांचीं सामान्यरूपें होतात; जसें–आत्म्यांत, आत्म्याचें, इ०.

२११ जे शब्द संस्कृतांत मूळचे **ऋकारान्त** असून प्राकृतांत आकारान्त होतात, त्यांचीं सामान्यरूपें तिसऱ्या प्रकारा प्रमाणें होतात; जसें–

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	पिता.	पिते.
द्वि०	पित्याला–स.	पित्यांनां–स.
तृ०	पित्यानें–शीं.	पित्यांहीं–नीं–शीं.
सं०	पित्या.	पित्यांनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—भ्राता, भर्त्ता, धाता, कर्त्ता, दाता, योद्धा, त्वष्टा, इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

२१२ याप्रत्ययान्त जीं साधितनामें त्यांचीं सामान्यरूपें पहिल्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात ; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	पाग्या.	पाग्ये.
द्वि०	पाग्याला—स.	पाग्यांना—ला—स.
तृ०	पाग्यानें—शीं.	पाग्यांहीं—नीं—शीं.
सं०	पाग्या.	पाग्यांनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— वाघ्या, धाम्या, देशपांड्या, लांकुडफोड्या, आगलाव्या, इ० नामांचीं रूपें जाणावीं.

इकारान्त.

२१३ (ऱ्हस्व) इकारान्त शब्द बहुधा सर्व संस्कृत असतात ; त्यांचीं सामान्यरूपें दुसऱ्या प्रकारा प्रमाणें होतात ; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	कवि.	कवि.
द्वि०	कवीला—स.	कवींना—स.
तृ०	कवीनें—शीं.	कवींहीं—नीं—शीं.
सं०	कवी.	कवींनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—अग्नि, पति, अलि, हरि, मरीचि, वैधृति, अरि, गिरि, रवि, कलि, मुरारि, शकुनि, परिधि, शूल-

पाणि, चंद्रमौलि, प्रजापति, इ० नामांचीं रूपें जाणावीं.

२१४ (दीर्घ) ईकारान्त शब्दांचीं सामान्यरूपें सातव्या प्रकारा प्रमाणें होतात; जसें–

ईकारान्त पुल्लिंग **न्हावी** शब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	न्हावी.	न्हावी.
द्वि०	न्हाव्याला–स.	न्हाव्यांना–स.
तृ०	न्हाव्यानें–शीं.	न्हाव्यांहीं–नीं–शीं.
सं०	न्हाव्या.	न्हाव्यांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें–तेली, तांबोळी, धोबी, गोंधळी, वाणी, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

याच प्रमाणें ईकारान्त जीं प्राकृत अथवा संस्कृत साधितनामें, त्यांचीं रूपें जाणावीं; जसें–शास्त्री, पापी, दोषी, गोसांवी, संन्यासी, शेतकरी, गांवकरी, पुजारी, कोंकणी, इत्यादि. परंतु यांचीं संबोधनें मात्र पहिल्या प्रकारा प्रमाणें होतात. निंदा अथवा धिक्कार कर्तव्य असतां सातव्या प्रकारा प्रमाणें संबोधन होतें; जसें– शास्त्र्या, अरे कोंकण्या, हे पुजाऱ्या, इ०. हा **सन्यास्याचा** गण जाणावा.

२१५ परंतु **हत्ती** आदिकरून कित्तेएक नामांचीं पहिल्या प्रकारा प्रमाणें सामान्यरूपें होतात; जसें–

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	हत्ती.	हत्ती.
द्वि०	हत्तीला–स.	हत्तींना–ला–स.
तृ०	हत्तीनें–शीं.	हत्तींनीं–शीं.
सं०	हत्ती.	हत्तींनो.
इ०.	इ०.	इ०.

अनुक्रमणिका

याच प्रमाणें—हस्ती, करी, दंडी, दंती, यती, जती, वादी, प्रतिवादी, आततायी, केसरी, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं. हा **हस्तीचा** गण जाणावा.

२१६ जीकारान्त जीं प्रतिष्टितनामें, आणि गुणवाचक अथवा अधिकारवाचक जीं ईकारान्त यवनी नामें, त्यांचीं ही सामान्यरूपें पहिल्या प्रकारा प्रमाणें होतात; जसें—

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०**
प्र०	पंतोजी.	पंतोजी.
द्वि०	पंतोजीला—स.	पंतोजींनां—स.
तृ०	पंतोजीनें—शीं.	पंतोजींहीं—नीं—शीं.
सं०	पंतोजी.	पंतोजींनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—बाजी, दाजी, बाबाजी, दादाजी, रामजी, मशालजी, काजी, मौलवी, दादी, फिर्यादी, इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

उकारान्त शब्द.

२१७ (ऱ्हस्व) उकारान्त शब्द बहुधा संस्कृत असतात, त्यांचीं सामान्यरूपें दुसऱ्या प्रकारा प्रमाणें होतात; जसें—

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	गुरु.	गुरु.
द्वि०	गुरूला—स.	गुरूंनां—ला—स.
तृ०	गुरूनें—शीं.	गुरूंहीं—नीं—शीं.
सं०	गुरु.	गुरूंनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—भानु, शत्रु, ऋतु, वायु, मृत्यु, अगरू, देवदारू, अणुरेणु, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

२१८ (दीर्घ) ऊकारान्त पुंलिंग शब्दांचीं सामान्य-रूपें तीन प्रकारचीं होतात, त्यांत पहिल्या प्रकारा प्रमाणें फार होतात.

यांत ज्यांचीं सामान्यरूपें सातव्या आणि सहाव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात त्यांस अनुक्रमें **मेरूचा, गव्हांचा**, आणि **तट्टाचा**, गण ह्मटलें आहे.

पहिला प्रकार—मेरूचा गण.

ऊकारान्त पुंलिंग **मेरू** शब्द.

विभ०.	एकव०.	**अनेक०.**
प्र०	मेरू.	मेरू.
द्वि०	मेरूला—स.	मेरूंनां—स.
तृ०	मेरूनें—शीं.	मेरूंनीं—शीं.
सं०	मेरू.	मेरूंनों.
इ०	इ०.	इ०.

याच प्रमाणें—काजू, नारू, पेरू, चाकू, खडू, गडू, काऊ, खाऊ, डहू, वेळू, बांबू, दांडू, साडू, अळू, घरू, वळू, सांकू, वसू, बोरू, कोद्रू, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

२१९ संस्कृत (दीर्घ) ऊकारान्त जे—खलपू, वर्षाभू, स्वयंभू, प्रतिभू, इ० धातुसाधित शब्द, तसेंच प्राकृत—वाटसरू, पोटभरू, चटणीखाऊ, झोंपाळू, लाजाळू, इ० धातुसाधित शब्द, यांचींही सामान्यरूपें याच प्रमाणें जाणावीं.

२२० परंतु **परभू** स बहुधा तट्टाच्या गणांत लेखितात ; जसें–

विभ०.	एकव०.	अनेकव०
प्र०	परभू.	परभू.
द्वि०	परभाला–स.	परभांना–ला–स.
तृ०	परभानें–शीं.	परभांहीं–नीं–शीं.
सं०	परभू.	परभांनो.
इ०.	इ०.	इ०.

क्वचित् जेथें ही ज्ञाति फारशी प्रसिद्ध नाहीं त्या प्रांतीं या शब्दास मेरूच्या गणांत लेखितात ; उदाह० 'या गांवांत परभूंचीं घरें नाहींत,' 'एथें पूर्वीं कांहीं दिवस कायस्थ परभूंनीं अंमल चालविला होता,' इ०.

दुसरा प्रकार—गव्हांचा गण.

२२१ **लाडू** आदिकरून जे थोडे शब्द ऊकारान्त आहेत त्यांचीं सामान्यरूपें बहुधा सातव्या प्रकारा प्रमाणें होतात ; जसें–

विभ०.	एकव०	अनेकव०.
प्र०	लाडू.	लाडू.
द्वि०	लाड्वाला–स.	लाड्वांना–ला–स.
तृ०	लाड्वानें–शीं.	लाड्वांनीं–शीं.
सं०	लाड्वा.	लाड्वांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—गहूं, नातू, विंचू, चाटू, नारू, काडू, इ० शब्दांचीं सामान्यरूपें होतात.

अनुक्रमणिका

२२२ क्वचित् पहिल्या विभक्तिप्रकारा प्रमाणेंही यांचीं सामान्य रूपें होतात. उ० 'दोन लाडूंनीं माझें पोट भरलें,' 'विंचूची नांगी मोठी कठीण', इ० असेही प्रयोग होतात. यांत शिकणारांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं देशांत मेरूच्या गणाची, आणि कोंकणांत गव्हांच्या गणाची प्रवृत्ति विशेषेंकरून आढळते.

आतां **लाडू** आदिकरून शब्द, ज्यांचीं सामान्यरूपें सातव्या प्रकारा प्रमाणें होतात, त्यांचीं तीं रूपें लिहिण्याचे दोन प्रकार आढळतात—**लाडवानें**, आणि **लाडवानें**, परंतु यांत व्याकरणशुद्ध ह्मटलें ह्मणजे पहिलें रूप, याचें कारण या विभक्तिप्रकरणाच्या शेवटीं स्पष्ट केलें आहे.
[पा० पृ० ५६, ले० १६४.]

तिसरा प्रकार—तट्टाचा गण.

२२३ कितीएक ऊकारान्त शब्दांचीं सामान्यरूपें बहुधा सहाव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात ; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	तट्टू.	तट्टू.
द्वि०	तट्टाला—स.	तट्टांना—ला—स.
तृ०	तट्टानें—शीं.	तट्टांनीं—शीं.
सं०	तट्टा.	तट्टांनो.
इ०.	इ०.	इ०

याच प्रमाणें—भट्टू, वाटसरू, यात्रेकरू, इ०.

२२४ यांचीं विकल्पें प्रथम प्रकारा प्रमाणेंही सामान्यरूपें होतात.

२२५ **भाऊ** शब्द शरीरसंबंधवाचक असतां त्याचें

सातव्या प्रकारा प्रमाणें, आणि प्रतिष्ठितनाम असतां प्रथम प्रकारा प्रमाणें सामान्यरूप होतें; जसें—'माझ्या भावानें', 'हा भाऊंचा मुलगा.'

२२६ एकाक्षरी जे (दीर्घ) ऊकारान्त शब्द, त्यांचीं सामान्यरूपें सातव्या प्रकारा प्रमाणेंच होतात. परंतु त्यांच्या अंगास संप्रसारणरूप आदेश होत असतां अंत्यस्वराचा लोप न होतां त्यास ऱ्हस्व आदेश होतो; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	पू.	पू.
द्वि०	पुवाला—स.	पुवांना—ला—स.
तृ०	पुवानें—शीं.	पुवांनीं—शीं.
सं०	पुवा.	पुवांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—**गू**, **रू**, शब्दांचीं रूपें जाणावीं.

ऋकारान्त शब्द.

२२७ महाराष्ट्र भाषेंत **ऋ**कारान्त शब्द नाहींत. संस्कृतांत जे **ऋ**कारान्त शब्द आहेत, त्यांचें प्रथमेच्या एकवचनाचें जें त्या भाषेंत रूप होतें त्यास अंग मानून या भाषेंत त्यांचीं सामान्यरूपें होतात.(पा० पृ० ४३, लें० १३७.)

ओकारान्त शब्द.

२२८ **ओ**कारान्त नामांचीं सामान्यरूपें पहिल्या प्रकारा प्रमाणें होतात; जसें—

ओकारान्त पुल्लिंग **लाहो** शब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	लाहो.	लाहो.
द्वि०	लाहोला–स.	लाहोनां–ला–स.
तृ०	लाहोनें–शीं.	लाहोंनीं–शीं.
सं०	लाहो.	लाहोंनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें–टाहो, डोहो, खो, छापो, इ०. शब्दांचीं रूपें जाणावीं.

प्रकरण २.

स्त्रीलिंगनामें.

अकारान्त.

२२९ वचनप्रकरणीं अकारान्त स्त्रीलिंगनामांचे तीन गण दाखविले आहेत, त्यांज वर लक्ष दिलें असतां या प्रकरणीं त्या शब्दांच्या सामान्यरूपांच्या नियमा विषयीं कांहीं अडचण पडायाची नाहीं. ते नियम या प्रमाणें.–

भिंतीचा गण.

२३० भिंतीच्या गणाचीं, अथवा ज्यांच्या अनेकवचनीं ई आदेश होतो अशा अकारान्त स्त्रीलिंग नामांचीं सामान्यरूपें पांचव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात.

अकारान्त स्त्रीलिंग **भिंत** शब्द.

विभ०.	एकव०	अनेकव०.
प्र०	भिंत.	भिंती.
द्वि०	भिंतीला–स.	भिंतींनां–ला–स.
तृ०	भिंतीनें–शीं.	भिंतींनीं–शीं.
सं०	भिंती.	भिंतींनों.
इ०.	इ०.	इ०.

अनुक्रमणिका

याच प्रमाणें—केळ, वांक, पोफळ, कावड, भेट, म्हण, ओळख, कोरड, चाळण, उकड, थापट, भाकर, धावळ, चकमक, बसकट, बोर, तगर, रीत, गत, जात, शिंपीण, रजपूतीण, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

आतेचा गण.

२३१ आतेच्या गणाचीं, अथवा ज्यांच्या अनेकवचनीं **आ** आदेश होतो अशा अकारान्त स्त्रीलिंग नामांचीं सामान्यरूपें चौथ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; आणि अनेकवचनाचें सामान्यरूप अनेकवचना प्रमाणें होतें; जसें--

विभ०	**एकव०**	**अनेकव०.**
प्र०	आत.	आता.
द्वि०	आतेला—स.	आतांना—ला—स.
तृ०	आतेनें—शीं.	आतांहीं—नीं—शीं.
सं०	आते.	आतांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—जीभ, हांक, कांख, सून, धार, नणंद, समिध, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

झेंपेचा गण.

२३२ झेंपेच्या गणाचीं, अथवा ज्या अकारान्त स्त्रीलिंग नामांचीं अनेकवचनीं वैकल्पिक रूपें होतात, त्यांचीं सामान्यरूपेंही त्या त्या प्रमाणें वैकल्पिक होतात; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	झेंप.	झेंपी, झेंपा.
द्वि०	झेंपीला, झेंपेला; झेंपीस, झेंपेस.	झेंपींनां, झेंपांनां; झेंपींस, झेंपांस.
तृ०	झेंपीनें, झेंपेनें; झेंपीशीं, झेंपेशीं.	झेंपींनीं, झेंपांनीं; झेंपींशीं, झेंपांशीं.
सं०	झेंपी, झेंपे.	झेंपींनो, झेंपांनो.
इ०	इ०.	इ०.

याच प्रमाणें—नथ, फीत, हद्द, अक्कल, परात, वरात, थाप, वखर, पिंजर, वखार, इजार, कटार, तरवार, इत्यादि शब्दांचीं रूपें वैकल्पिक जाणावीं.

२३३ ब (आई) या शब्दाचें सामान्यरूप पहिल्या प्रकारा प्रमाणें बच होतें; उ०—माझ्या बनें मला हा खाऊ दिला; माझी ब कोणीकडे गेली ? इ०.

आकारान्त.

२३४ आकारान्त स्त्रीलिंग नामाचें सामान्यरूप चौथ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतें; आणि अनेकवचनाचें सामान्यरूप अनेकवचना प्रमाणें होतें; जसें—

आकारान्त स्त्रीलिंग पागा शब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	पागा.	पागा.
द्वि०	पागेला—स.	पागांनां—ला—स.
तृ०	पागेनें—शीं.	पागांनीं—शीं.
सं०	पागे.	पागांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—जागा, माळा, मैना, रजा, गुहा, माता, भाषा, विद्या, मृत्तिका, अवस्था, रक्तता, शुभ्रता, गंगा, यमुना, मथुरा, द्वारका, इत्यादि नामांचीं सामान्यरूपें जाणावीं.

[अ] परंतु तींच जर स्त्रियांचीं ठेविलेलीं नामें असलीं, तर प्रतिष्ठेनें बोलायाचें असतां पहिल्या प्रकारा प्रमाणें सामान्यरूपें होतात; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	रमा.	रमा.
द्वि०	रमाला—स.	रमांना—ला—स.
तृ०	रमानें—शीं.	रमांहीं—नीं—शीं.
सं०	रमा.	रमांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—गंगा, यमुना, भीमा, द्वारका, इत्यादि स्त्रियांच्या नामांचीं सामान्यरूपें जाणावीं.

[आ] प्रतिष्ठेनें बोलायाचें नसल्यास—रमेला, रमेनें, रमे, अशीं रूपें होतात.

इकारान्त.

२३५ (ऱ्हस्व) इकारान्त शब्द बहुधा संस्कृत असतात, त्यांचीं सामान्यरूपें दुसऱ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	रुचि.	रुचि.
द्वि०	रुचीला—स.	रुचींना—ला—स.
तृ०	रुचीनें—शीं.	रुचींनीं—शीं.
सं०	रुची.	रुचींनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—शांति, भक्ति, जाति, ज्ञाति, आहुति, व्यक्ति, प्रकृति, इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

'ज्यासाध्वीनेंकेलीनसतीबातिळहिहानिरीतीची'. मोरोपंत.

२३६ (दीर्घ) ईकारान्त स्त्रीलिंग नामांचींही सामान्यरूपें दुसऱ्या विभक्तिप्रकारा प्रमाणेंच होतात; जसें—

ईकारान्त स्त्रीलिंग काठी शब्द.

विभ०.	एकव०	अनेकव०.
प्र०	काठी.	काठ्या.
द्वि०	काठीला—स.	काठ्यांना—ला—स.
तृ०	काठीनें—शीं.	काठ्यांनीं—शीं.
सं०	काठी, काठ्ये.	काठ्यांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—बगी, माडी, साडी, घोडी, चौकी, नदी, धोंकटी, पासोडी, शालजोडी इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

[अ] आई, काकी, मामी, इत्यादि शब्द जर शरीरसंबंधवाचक असले तर अनेकवचनीं त्यांचीं याच प्रमाणें रूपें होतात; परंतु जर तीं प्रतिष्ठितनामें असलीं तर अनेकवचनीं त्यांचीं सामान्यरूपें प्रथम विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; जसें—आईंनां, काकींहीं, मामींस, इ०.

२३७ (दीर्घ) ईकारान्त जे संस्कृत शब्द आहेत त्यांचींही सामान्यरूपें याच प्रमाणें होतात; परंतु त्यांतून ज्यांच्या उभयवचनांचीं रूपें समान होतात, त्यांच्या अनेकवचनाच्या सामान्यरूपांत मात्र त्या प्रमाणें बिकार होतो; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	नारी.	नारी.
द्वि०	नारीला–स.	नारींना–ला–स.
तृ०	नारीनें–शीं.	नारींहीं–नीं–शीं.
सं०	नारी.	नारींनो.
इ०	इ०.	इ०.

याच प्रमाणें–देवी, सती, साध्वी, कुमारी, अटवी, श्रीमती, गर्भवती, सौभाग्यवती, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

२३८ स्त्रीशब्दाचें सामान्यरूप एकवचनीं विकल्पें सातव्या प्रकारा प्रमाणें होतें, तेव्हां यांत अंत्य स्वरास ऱ्हस्व होऊन पुढें संप्रसारण होतें; जसें–

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	स्त्री.	स्त्रिया.
द्वि०	स्त्रीला–स; स्त्रियेला–स.	स्त्रियांना–ला–स.
तृ०	स्त्रीनें–शीं; स्त्रियेनें–शीं.	स्त्रियांहीं–नीं–शीं.
सं०	स्त्रिये.	स्त्रियांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें–बी शब्दाचीं बियेला, बियेनें, बियांचा, इ० रूपें होतात. क्वचित्–बीला, बीनें, बींत, इ० अशींही रूपें आढळतात.

उकारान्त.

२३९ (ऱ्हस्व) उकारान्त शब्द बहुधा संस्कृत असतात, त्यांचीं सामान्यरूपें दुसऱ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; जसें–

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	धेनु.	धेनु.
द्वि०	धेनूला–स.	धेनूंनां–ला–स.
तृ०	धेनूनें–शीं.	धेनूंनीं–शीं.
सं०	धेनू.	धेनूंनों.
इ०	इ०.	इ०.

याच प्रमाणें–धातु, रज्जु, रेणु, तनु, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

ऊकारान्त.

२४० (दीर्घ) ऊकारान्त स्त्रीलिंग नामांचीं सामान्यरूपें दोन प्रकारचीं होतात; त्यांत **वधूच्या** गणाचीं, ह्मणजे ज्यांचीं उभयवचनांची रूपें समान होतात त्यांचीं, सामान्यरूपें पहिल्या प्रकारा प्रमाणें होतात. (या वर्गांत कितीएक प्राकृत शब्द, व सर्व ऊकारान्त संस्कृत शब्द येतात,) आणि **अळवेच्या** गणाचीं, ह्मणजे ज्यांच्या अनेकवचनीं संप्रसारण होतें त्यांचीं, सातव्या प्रकारा प्रमाणें सामान्यरूपें होतात; जसें–

पहिला प्रकार.—वधूचा गण.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	गेरू.	गेरू.
द्वि०	गेरूला–स.	गेरूंनां–ला–स.
तृ०	गेरूनें–शीं.	गेरूंनीं–शीं.
सं०	गेरू.	गेरूंनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—गुडाखू, बाजू, अफू, आबरू, काकू, तंबाखू, खडू, आऊ, माऊ, इत्यादि प्राकृत शब्दांचीं, व– चमू, वधू, भू, सुभ्रू, श्वश्रू, इ० संस्कृत शब्दांचीं रूपें जाणावीं.

दुसरा प्रकार.—जळवेचा गण.

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	जळू.	जळवा.
द्वि०	जळवेला–स.	जळवांनां–ला–स.
तृ०	जळवेनें–शीं.	जळवांनीं–शीं.
सं०	जळवे.	जळवांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—सासू, जाऊ, पाऊ, वाळू, पिसू, दारू, पेळू, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

बहुधा सासू आदिकरून शब्दांचीं **सासवेला, सासवेस, सासवेनें, वाळवेचे, पिसवांनीं**, अशीं रूपें लिहिण्याचा प्रघात पडला आहे, परंतु व्याकरणदृष्टीनें पाहिलें असतां हा प्रघात शुद्ध नव्हे; **सास्वेला, सास्वेनें, वाळ्वेचें, पिस्वांनीं** इ० हीं रूपें शुद्ध होत. (पा० पृ० ५६, ले० १६४.)

यांत विकल्पें देशपरत्वें **वधूच्या** गणांतील शब्द **जळवेच्या** गणांत, आणि **जळवेच्या** गणांतील शब्द **वधूच्या** गणांत मानून सामान्यरूपें होतात; जसें कोंकणांत **सास्वेनें, सास्वेला**, इ०; आणि देशांत **सासूनें, सासूचा, जाऊनें, पिसूला, दारूचा**, इ० असें बोलतात.

यांत बहुधा असा नियम जाणावा कीं वधूच्या गणाची प्रवृत्ति देशा वर, आणि जळवेच्या गणाची प्रवृत्ति कोंकणांत, विशेषेंकरून असत्ये.

अनुक्रमणिका

२४१ ऊशब्दाचें सामान्यरूप ऊ अ० उवे असें होतें; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	ऊ.	उवा.
द्वि०	ऊला—स; उवेला—स.	उवांना—ला—स.
तृ०	ऊनें—शीं; उवेनें—शीं.	उवांनीं—शीं.
सं०	ऊ, उवे.	उवांनो.
इ०.	इ०.	इ०.

२४२ धूशब्दाचीं सातव्या विभक्तिप्रकारा प्रमाणेंच रूपें होतात. एथें विकल्प नाहीं.

२४३ दयाळु, कृपाळु, इ० विशेषणें स्त्रीलिंग असतां संबोधनीं बहुधा—दयाळे, कृपाळे, अशीं रूपें होतात.

ऋकारान्त.

२४४ (पाहा पृ०. ४०, ले० १३०)

ए—ऐ—औकारान्त.

२४५ आतेशब्दाचीं विभक्तिरूपें आतशब्दाच्या प्रमाणें जाणावीं.

२४६ संवेशब्दाचीं रूपें एकवचनीं विकल्पें आतशब्दाच्या प्रमाणें होतात; परंतु अनेकवचनीं तर मूळशब्द जो संवई त्याच्या अनेकवचनाच्या सामान्यरूपा प्रमाणें होतात.

२४७ ऐकारान्त आणि औकारान्त शब्दांचीं रूपें तीन प्रकारचीं असतात, (पा० पृ० ४४, ले० १३९.),

ह्मणोन त्यांचीं विभक्तीचीं रूपेंही त्या त्या प्रमाणें तीन तीन प्रकारचीं होतात; जसें—

विभ०	एकव०.	अनेकव०.
प्र०	तिवै.	तिवया.
द्वि०	तिवईला, तिवयेला, तिवैला.	तिवईंनां, तिवयांनां, तिवैंना.
तृ०	तिवईनें, तिवयेनें, तिवैनें.	तिवईंनीं, तिवयांनीं, तिवैंनीं.
सं०	तिवई, तिवये, तिवै.	तिवईंनों, तिवयांनों, तिवैंनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—खै, गै, जिल्है, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

ओकारान्त.

२४८ ओकारान्त स्त्रीलिंग शब्दांचीं सामान्यरूपें पहिल्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात. अनेकवचनाचीं सामान्यरूपें अनेकवचनाच्या नियमा प्रमाणें होतात; जसें—

ओकारान्त स्त्रीलिंग बायकोशब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	बायको.	बायका.
द्वि०	बायकोला—स.	बायकांनां—ला—स.
तृ०	बायकोनें—शीं.	बायकांनीं—हीं—शीं.
सं०	बायको.	बायकांनों.
इ०.	इ०.	इ०.

अनुक्रमणिका

याच प्रमाणें—बायो, ढंबो, ताटको, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

प्रकरण ३.

नपुंसकलिंग नामें.

अकारान्त.

२४९ अकारान्त नपुंसकलिंग नामाचें सामान्यरूप दुसऱ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतें; असें—

अकारान्त नपुंसकलिंग **बोर** शब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	बोर.	बोरें.
द्वि०	बोराला—स.	बोरांना—ला—स.
तृ०	बोरानें—शीं.	बोरांनीं—शीं.
सं०	बोरा.	बोरांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—ढोर, पोर, फूल, अन्न, वस्त्र, लांकूड, रेशीम, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

आकारान्त.

२५० (पाहा पृ० ५४, लें० १६०).

इकारान्त.

२५१ (ऱ्हस्व) इकारान्त नपुंसकलिंग शब्द संस्कृत असतात, त्यांचीं सामान्यरूपें दुसऱ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; असें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	वारि.	वारि.
द्वि०	वारीला—स.	वारींनां—ला—स.
तृ०	वारीनें—शीं.	वारींनीं—शीं.
सं०	वारी.	वारींनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—अस्थि, अक्षि, दधि, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

२५२ (दीर्घ) ईकारान्त शब्दाचें सामान्यरूप सातव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतें; जसें—

ईकारान्त नपुंसकलिंग **मोतीं** शब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मोतीं.	मोत्यें.
द्वि०	मोत्याला—स.	मोत्यांनां—ला—स.
तृ०	मोत्यानें—शीं.	मोत्यांनीं—शीं.
सं०	मोत्या.	मोत्यांनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—मिरीं, गुळीं, आंशीं, कुणीं, केंवरीं, पाणीं, लोणीं, दहीं, चिंचवणीं, ताकवणीं, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

२५३ **वीं** शब्दाच्या अंत्य स्वरास ऱ्हस्व होऊन पुढें संप्रसारण होतें; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	बीं.	बियें.
द्वि०	बियाला—स.	बियांना—ला—स.
तृ०	बियानें—शीं.	बियांनीं—शीं.
सं०	बिया.	बियांनों.
इ०.	इ०.	इ०.

उकारान्त.

२५४ (र्‍हस्व) उकारान्त नपुंसकलिंग नामाचें सामान्यरूप दुसर्‍या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतें; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मधु.	मधु.
द्वि०	मधूला—स.	मधूंना—स.
तृ०	मधूनें—शीं.	मधूंनीं—शीं.
सं०	मधू.	मधूंनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—वस्तु, जानु, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं. [हे शब्द संस्कृतांत नपुंसकलिंग होत, ह्मणोन त्या आधारा वरून कोणी मराठींतही नपुंसक मानितात].

२५५ (दीर्घ) ऊकारान्त नपुंसकलिंग नामांचीं सामान्यरूपें दोन प्रकारचीं होतात, त्यांत **लेंकराचा** गण ह्मणजे ज्यांच्या अनेकवचनीं केवळ ए आदेश होतो, त्यांचीं सामान्यरूपें सहाव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; आणि **तावांचा** गण ह्मणजे ज्यांच्या अनेकवचनीं संप्रसारण होऊन ए आदेश होतो, त्यांचीं सामान्यरूपें सातव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; जसें—

अनुक्रमणिका

पहिला प्रकार–लेंकराचा गण.

ऊकारान्त नपुंसकलिंग वांसरूं शब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	वांसरूं.	वांसरें.
द्वि०	वांसराला–स.	वांसरांना–स.
तृ०	वांसरानें–शीं.	वांसरांनीं–शीं.
सं०	वांसरा.	वांसरांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें–गुरूं, तट्टूं, निंबूं, पिलूं, पाखरूं, वकरूं, करडूं, अगरूं, परसूं, मेंढरूं, फाळेटूं, रेडकूं, टिपरूं, शेरडूं, शिंगरूं, सुकाणूं, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

दुसरा प्रकार–तावांचा गण.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	तारूं.	तावें.
द्वि०.	तावाला–स.	तावांना–ला–स.
तृ०.	तावानें–शीं.	तावांनीं–शीं.
सं०	तावा.	तावांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें–असूं, अळूं, गळूं, कुंकूं, कुसूं, थरूं, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

[अ] **सुकाणूं** आणि **जिवाणूं** यांचीं दोन प्रकारचीं रूपें होतात.

२५६ एकारान्त नपुंसकलिंग नामाचें सामान्यरूप तिसऱ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतें; जसें–

अनुक्रमणिका

एकारान्त नपुंसक **भांडें**शब्द.

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	भांडें.	भांडीं.
द्वि०	भांड्याला—स.	भांड्यांना—स.
तृ०	भांड्यानें—शीं.	भांड्यांनीं—शीं.
सं०	भांड्या.	भांड्यांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—तळें, कुत्रें, केळें, घोसाळें, बोलणें, चालणें, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

प्रकरण ४.

जे विभक्तिजन्य विकार उपांत्य वर्णाच्या ठायीं होतात त्यांच्या प्रकरणीं नियम.

२५७ ज्या नामाचा उपांत्य ई अथवा ऊ आहे, त्याचे हे उपांत्य स्वर विभक्तीच्या योगानें ऱ्हस्व होऊन पूर्वोक्त नियमां प्रमाणें रूपें सिद्ध होतात; जसें—

ईकारोपान्त्य.

विभक्ति.	**एकवचन.**	**अनेकवचन.**
प्र०	चीक.	चीक.
द्वि०	चिकाला—स.	चिकांना—ला—स.
तृ०	चिकानें—शीं.	चिकांनीं—शीं.
सं०	चिका.	चिकांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— ईट, डीक, ढीग, जीभ, टीक, पीक, इ० द्व्यक्षरी ईकारोपान्त्य शब्दांचीं रूपें जाणावीं.

ऊकारोपांत्य.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	खूण.	खुणा.
द्वि०	खुणेला—स.	खुणांनां—स.
तृ०	खुणेनें—शीं.	खुणांनीं—शीं.
सं०	खुणे.	खुणांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— चूक, भूक, सूज, कूड, सूड, चूल, कूस, मूस, इ० द्व्यक्षरी ऊकारोपांत्य शब्दाचीं रूपें जाणावीं.

२५८ जर दोहों पेक्षां अधिक अक्षरांच्या शब्दांचा उपांत्य स्वर ई अथवा ऊ असला, आणि उपांत्य स्वराच्या पूर्वील अक्षर ऱ्हस्व असलें, तर १७० व्या नियमा प्रमाणें त्या उपांत्य स्वरास कार्यें होऊन विभक्तीनें रूपें सिद्ध होतात; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	बटीक.	बटिकी, बटकी.
द्वि०	बटिकीला—स. बटकीला—स.	बटिकींनां—ला—स. बटकींनां—ला—स.
तृ०	बटिकीनें—शीं. बटकीनें—शीं.	बटिकींनीं—हीं—शीं. बटकींनीं—हीं—शीं.
सं०	बटिकी, बटकी.	बटिकींनो, बटकींनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—तिडीक, भटीण, हरीक, उदीम, जिलीब, भरीत, कथील, कणीस; इ० ऱ्हस्वस्वरपूर्वेकेकारोपांत्य* शब्दांचीं रूपें जाणावीं.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	कुलूप.	कुलपें, कुलुपें.
द्वि०	कुलुपाला–स. कुलपाला–स.	कुलुपांना–ला–स. कुलपांना–ला–स.
तृ०	कुलुपानें–शीं. कुलपानें–शीं.	कुलुपांनीं–शीं. कुलपांनीं–शीं.
सं०	कुलुपा, कुलपा.	कुलुपांनो, कुलपांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—इसूप, कुसूर, खजूर, खरूज, वुरूड, चिभूड, चुणूक, जुगूत, इ० ऱ्हस्वस्वरपूर्वकोकारोपांत्य† शब्दांचीं रूपें जाणावीं.

२५९ **फकीर** इत्यादि जे कित्येक तत्तद्व्यापारकर्तृत्ववाचक अथवा अधिकारकर्तृत्ववाचक यवनी शब्द, त्यांचा उपांत्य दीर्घच राहतो; पक्षीं ऱ्हस्व होतो.

एथें मागल्या नियमा वरून उपान्त्याच्या स्थानीं जो अ आदेश होतो त्याचा निषेध जाणावा.

---

* ह्मणजे ऱ्हस्वस्वर ज्याच्या पूर्वी आहे असा जो इकार तो आहे उपान्त्य ज्यांचा असे शब्द.

† ह्मणजे ऱ्हस्वस्वर ज्याच्या पूर्वी आहे असा जो ऊकार तो आहे उपान्त्य ज्यांचा असे शब्द.

अनुक्रमणिका

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	फकीर.	फकीर.
द्वि०	फकीराला—स. फकिराला—स.	फकीरांना—ला—स. फकिरांना—ला—स.
तृ०	फकीरानें—शीं. फकिरानें—शीं.	फकीरांनीं—हीं—शीं. फकिरांनीं—हीं—शीं.
स०	फकीरा, फकिरा.	फकीरांनो, फकिरांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें——अमीर, खलीपा, वकील, मुनीम, हकीम, जामीन, दबीर, फडनीस, चिटनीस, वांकनीस; इ० शब्दांचीं रूपें जाणावीं. हा **फकीराचा** गण जाणावा.

२६० हकारपूर्वक उपांत्य ई अथवा ऊ असला तर त्यास विभक्तीनें ऱ्हस्वच होतो.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	बहीण.	बहिणी.
द्वि०	बहिणीला—स.	बहिणींना—ला—स.
तृ०	बहिणीनें—शीं.	बहिणींनीं—हीं—शीं.
सं०	बहिणी.	बहिणींनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें——अहीर, मोहीम, विहीर, काहील, चाहूर, चाहूल, लाहूर, काहूर, माहूत, जवाहीर, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

२६१ जर उपांत्य अक्षराच्या पूर्वील अक्षर दीर्घ अथ-

वा द्विमात्रक असलें, तर उपांत्य ई अथवा ऊ याच्या स्थानीं अ आदेश होतो; पक्षीं क्वचित् ऱ्हस्व होतो; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	काळीज.	काळजें, काळिजें.
द्वि०	काळजाला–स. काळिजाला–स.	काळजांनां–ला–स. काळिजांनां–ला–स.
तृ०	काळजानें–शीं. काळिजानें–शीं.	काळजांनीं–शीं. काळिजांनीं–शीं.
सं०	काळजा, काळिजा.	काळजांनो, काळिजांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— आंबील, कांबीट, उंदीर, उंडीण, कांतीण, कांटील, तालीम, तारीख, तेरीज, लेजीम, रेजीम, भोरीप, गोचीड, इ० दीर्घस्वरपूर्वकेकारोपांत्य शब्दांचीं रूपें जाणावीं.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	बाभूळ.	बाभळी, बाभुळी.
द्वि०	बाभळीला–स. बाभुळीला–स.	बाभळींनां–ला–स. बाभुळींनां–ला–स.
तृ०	बाभळीनें–शीं. बाभुळीनें–शीं.	बाभळींनीं–शीं. बाभुळींनीं–शीं.
सं०	बाभळी, बाभुळी.	बाभळींनो, बाभुळींनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— लांकूड, काडूक, कापूस, आंसूड, खां-

डूक, माणूस, गांडूळ, घारूड, तांदूळ, ढेकूण, मुंगूस, ढेंकूळ, इत्यादि दीर्घस्वरपूर्वकोकारोपांत्य शब्दांचीं रूपें जाणावीं.

यांत जीं दुसरीं वैकल्पिक रूपें लिहिलीं आहेत तीं विशेषेंकरून प्राकृत काव्यांत आढळतात.

" वदेहिभलतेंचितेतिसचिकोपटाकापुसा
असेंमृदुह्मणोनिबामजनधोपटाकापुसा" केकावलि.

२६२ परंतु यांत जमीन आदिकरून कितीएक यवनी भाषेंतील शब्दांस विभक्तीनें ऱ्हस्वच होतो; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	जमीन.	जमिनी.
द्वि०	जमिनीला—स.	जमिनींना—ला—स.
तृ०	जमिनीनें—शीं.	जमिनींनीं—शीं.
सं०	जमिनी.	जमिनींनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— अफीण, तक्षीम, जंजीर, खंजीर, अंजीर, बंदुक, संदूक, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं. हा **जमिनीचा** गण जाणावा.

हा जरीं **फकीराच्या** गणांत मोडिला तरीं चालेल.

२६३ कितीएक स्त्रीलिंग ईणप्रत्ययान्तां शिवाय जितके तिहींपेक्षां अधिक अक्षरांचे शब्द आहेत, त्यांच्या उपांत्य स्वरास विभक्तीनें ऱ्हस्वच होतो; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	रजपूत.	रजपूत.
द्वि०	रजपुताला-स.	रजपुतांना-ला-स.
तृ०	रजपुतानें-शीं.	रजपुतांहीं-नीं-शीं.
सं०	रजपुता.	रजपुतांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—समजूत, वर्तणूक, जाचणूक, तसबीर, कोथिंबीर, कोशिंबीर, मुरकूट, घुंगरूट, उघडीक, सोयरीक, पावधूक, तजवीज, खरबूज, अटापीट, अठ्ठावीस, अड्दागीर, अठ्ठेचाळीस, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

२६४ कितीएक स्त्रीलिंग ईणप्रत्ययान्तां शिवाय ह्मटलें, या वरून कितीएक स्त्रीलिंग ईणप्रत्ययान्त जे शब्द त्यांचीं रूपें पूर्वोक्त नियमां प्रमाणें होतात; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	कुंभारीण.	कुंभारणी, कुंभारिणी.
द्वि०	कुंभारणीला-स. कुंभारिणीला-स.	कुंभारणींना-ला-स. कुंभारिणींना-ला-स.
तृ०	कुंभारणीनें-शीं. कुंभारिणीनें-शीं.	कुंभारणींनीं-हीं-शीं. कुंभारिणींनीं-हीं-शीं.
सं०	कुंभारणी, कुंभारिणी,	कुंभारणींनो, कुंभारिणींनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—सुतारीण, सोनारीण, बुरूडीण, भडभुंजीण, कलालीण, कळवंतीण, मराठीण, मुसलमानीण,

परटीण, चांभारीण, पुणेंकरीण, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं. हा **कुंभारणीचा** गण जाणावा.

२६५ कितीएक ईणप्रत्ययान्त ह्मटलें या वरून **कुंभारणीच्या** गणा शिवाय इतर ईणप्रत्ययान्तांच्या उपांत्य स्वरास २६३ व्या नियमा प्रमाणें ऱ्हस्वच होतो; जसें—

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	परभीण.	परभिणी.
द्वि०	परभिणीला—स.	परभिणींनां—ला—स.
तृ०	परभिणीनें—शीं.	परभिणींनीं—शीं.
सं०	परभिणी.	परभिणींनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— पापीण, कुळंबीण, ब्राह्मणीण, शेगवीण, वाण्णीण, भक्तीण, खत्रीण, इत्यादि शब्दाचीं रूपें जाणावीं. हा **पापिणीचा** गण जाणावा.

यांत अकारादेशाचा निषेध जाणावा.

२६६ जर उपांत्य वर्ण शुद्ध ई अथवा ऊ आहे तर त्यास विकल्पें संप्रसारण होऊन विभक्तीनें रूपें सिद्ध होतात; जसें—

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	बाईल.	बाइली, बायली.
द्वि०	बाइलीला—स. बायलीला—स.	बाइलींनां—ला—स. बायलींनां—ला—स.
तृ०	बाइलीनें—शीं. बायलीनें—शीं.	बाइलींनीं—हीं—शीं. बायलींनीं—हीं—शीं.
सं०	बाइली, बायली.	बाइलींनो, बायलींनो.
इ०.	इ०.	इ०.

अनुक्रमणिका

याच प्रमाणें— काईल, अईन, सुईण, कुईट, कवाईत, पंचाईत, इत्यादि ईकारोपांत्य शब्दांचीं रूपें जाणावीं.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	देऊळ.	देउळें, देवळें.
द्वि०	देउळाला—स. देवळाला—स.	देउळांना—ला—स. देवळांना—ला—स.
तृ०	देउळानें—शीं. देवळानें—शीं.	देउळांनीं—शीं. देवळांनीं—शीं.
सं०	देउळा, देवळा.	देउळांनो, देवळांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—कऊल, पाऊल, बाऊल, राऊळ, पाऊस, शेऊर, शाऊळ, गाऊळ, इत्यादि ऊकारोपांत्य शब्दांचीं रूपें जाणावीं.

“ अगाभणतवत्सलाह्मणतिद्याजनांपावलां,
ह्मणोनितुमच्याचमींस्मरतसेंसदांपावलां.” केकावलि.

२६७ शुद्ध संस्कृत शब्दांच्या उपांत्यास विभक्तीनें कांहीं विकार होत नाहीं; जसें—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	सूत्र.	सूत्रें.
द्वि०	सूत्राला—स.	सूत्रांना—ला—स.
तृ०	सूत्रानें—शीं.	सूत्रांनीं—शीं.
सं०	सूत्रा.	सूत्रांनो.
इ०.	इ०.	इ०.

अनुक्रमणिका

याच प्रमाणें— रूप, भूत, कीट, गीत, कील, कूट, कूर्म, भूप, जीव, गीता, टीका, कीर्ति, गीति, नीति, भीति, जंबीर, किरीट, शरीर, गोधूम, मयूख, केयूर, मयूर, कर, वीर, चिरंजीवी, मांसोपजीवी, इत्यादि संस्कृत शब्दांचीं रूपें आणावीं.

"दयामृतघनाअहोहरिवळा**मयूरा**कडे
रडेशिशुतयासिघेकळवळोनिमाताकडे." केकावलि.

प्रकरण ५.

च ज झ आणि स हीं अक्षरें ज्यांच्या अंतीं आहेत असे शब्द. यां विषयीं पहिला नियम.

२६८ **च** ज झ आणि **स** हे वर्ण ज्यांच्या अंतीं आहेत, अशा शब्दांच्या अंत्य वर्णांस विभक्तीनें जो विकार होतो तो असा;—जर तिसऱ्या आणि सातव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें यकार आदेश होऊन सामान्यरूप सिद्ध होत असलें, तर या यकारादेशाच्या योगानें केवळ त्याचा मूळचा जो तालव्योच्चार तोच राहतो.

२६९ जर चौथ्या आणि पांचव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें ए अथवा ई आदेश होऊं लागला तर, ए आदेश होत असतां विकल्पें तालव्योच्चार होतो, आणि ई होत असतां तालव्योच्चारच होतो.

विभ०.	एकव०.	अनेकव०
प्र०	चमचा.	चमचे, चमचे.
द्वि०	चमचाला–स. चमच्याला–स.	चमचांनां–ला–स. चमच्यांनां–ला–स.
तृ०	चमचानें–शीं. चमच्यानें–शीं.	चमचांनीं–शीं. चमच्यांनीं–शीं.
सं०	चमचा, चमच्या.	चमचांनो, चमच्यांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— भाचा, माचा, सांचा, कुंचा, ठेंचा, ओंचा, मोचा, लोंचा, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	राजा.	राजे, राजे.
द्वि०	राजाला–स.	राजांनां–ला–स.
तृ०	राजानें–शीं.	राजांनीं–हीं–शीं.
सं०	राजा.	राजांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— आजा, सांजा, कोंजा, गमजा, पुंजा, सरजा, मिरजा, इजा, मजा, रजा, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

२७० सकार शेवटीं असतां सच्या स्थानीं श होतो.—

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मासा.	मासे, माशे.
द्वि०	माशाला-स.	माशांना-ला-स.
तृ०	माशानें-शीं.	माशांनीं-शीं.
सं०	माशा.	माशांनो.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— आरसा, फांसा, खिसा, कसा, रसा, ठसा, पैसा, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

आणखी उदाहरणें.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	चोंच.	चोंचा, चोंची.
द्वि०	चोंचेला-स. चोंचीला-स. चोंचीला-स.	चोंचांना-ला-स. चोंचींना-ला-स.
तृ०	चोंचेनें-शीं. चोंचेनें-शीं. चोंचीनें-शीं.	चोंचांनीं-शीं. चोंचींनीं-शीं.
सं०	चोंचे, चोंचे, चोंची.	चोंचांनो, चोंचींनो.
इ०	इ०.	इ०.

याच प्रमाणें— खांच, लांच, सांज, तेरीज, बेरीज, तजवीज, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

२७१ स्यांत सकारा पुढें ई आदेश होत असतां विकल्पें स होतो.

अनुक्रमणिका

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	खसखस.	खसखशी, खसखसी.
द्वि०	खसखशीला-स. खसखसीला-स.	खसखशींनां-ला-स. खसखसींनां-ला-स.
तृ०	खसखशीनें-शीं. खसखसीनें-शीं.	खसखशींनीं-शीं. खसखसींनीं-शीं.
सं०	खसखशी, खसखसी.	खसखशींनों, खसखसीनों.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— घूस, तसनस, झरस, अंबस, किळस, चिळस, खिसमोस, पुरशीस, इ० शब्दांचीं रूपें जाणावीं.

२७२ परंतु एथें शिकणारांनीं लक्षांत ठेवावें कीं जर ते मूळचे शब्द च ज झ आणि श एतदंत असले, तर त्यांस इतर शब्दां प्रमाणेंच विभक्तीनें कार्यें होतात; जसें— कांचा, कांच्याची; भाचा, भाच्यांहीं; भाजी, भाज्यांनीं; आरशी, आरश्यांचीं; माशी, माश्यांचा; मोची, मोच्यांची; इ०.

आजीशब्द.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	आजी.	आज्या.
द्वि०	आजीला-स.	आज्यांनां-ला-स.
तृ०	आजीनें-शीं.	आज्यांनीं-हीं-शीं.
सं०	आजी, आजे.	आज्यांनो.
इ०.	इ०.	इ०.

२७३ च ज प्रमाणेंच झकारान्त शब्दांचा नियम जाणावा.

विभ०.	एकव०.	अनेकव.
प्र०	ओझें.	ओझीं.
द्वि०	ओझाला–स. ओझ्याला–स.	ओझांनां–ला–स. ओझ्यांनां–ला–स.
तृ०	ओझानें–शीं. ओझ्यानें–शीं.	ओझांनीं–शीं. ओझ्यांनीं–शीं.
सं०	ओझा, ओझ्या.	ओझांनों, ओझ्यांनों.
इ०.	इ०.	इ०.

एथें अंमळ वादाचें स्थळ आहे. कितीएक विद्वानांचें असें मत आहे कीं, च, छ, ज, झ, या वर्णांचा दंततालव्योच्चार दाखविण्या करितां त्यांच्या वरल्या ओळींच्या डाव्या कडेस जो बिंदु देतात त्याची कांहीं अवश्यकता नाहीं; कारण, ६ व्या पृष्ठीं २० व्या नियमांत या वर्णांच्या दंततालव्योच्चारा विषयीं नियम सांगितला आहे कीं जितके संस्कृत व यवनी शब्द आहेत तितक्यांत यांचा जो मूळचा तालव्योच्चार तोच राहतो. शुद्ध महाराष्ट्र शब्दांत मात्र इ आणि ए या स्वरां शिवाय इतर स्वर पुढें असतां यांचा दंततालव्योच्चार होतो. परंतु सर्वत्र असा नियम असता तरीं एका अर्थी त्यांच्या मता प्रमाणें ही बिंदु देण्याची अपेक्षा ठेविली नसती, परंतु तसें नाहीं; कितीएक शुद्ध महाराष्ट्र शब्द असतां त्यांत या वर्णांचा दोन प्रकारचा उच्चार आढळतो; जसें–चार, चप्पी, चमचम, चंबू, चमेली, चाळीस; आणखी, पुष्कळ मूळच्या संस्कृत व यवनी शब्दांसही महाराष्ट्र शब्दां प्रमाणें दंततालव्योच्चारानें उच्चारितात; जसें–जात, राजा, जोशी, जागा, जंगम, चांद, जासूद, जमीन, जमाबंदी, जोखीम, इ०. तेव्हां अशा ठिकाणीं बिंदु देऊन त्या त्या वर्णांचा दंततालव्योच्चार दाखविणें अवश्य आहे. त्यांत आणखी सर्व लोकांस हा शब्द मूळचा संस्कृत, व हा यवनी, हें शोधून काढणें कठीण आहे; ह्मणोन या वर्णांचा दंततालव्यो-

च्चार दाखविणें अवश्य आहे. ही बिंदु देण्याची आवश्यकता दाखविली. आतां ज्या शब्दांच्या अंतीं हे दंततालव्य **च ज झ** वर्ण असतात, त्यांस विभक्तिप्रकारानुरूप **य**काराचा योग केला असतां त्यांचा हा आगंतुक दंततालव्योच्चार जाऊन मूळचा जो तालव्योच्चार तोच राहतो, असें मानण्यासही कारण आहे. नाहींतर अशा **च**काराद्यंत शब्दांच्या ठायीं **य**ला दोन कार्यें करावीं लागतील,—एकतर त्यांचा हा आगंतुक उच्चार दूर करणें, आणि दुसरें जसा इतर वर्णांशीं तसा त्यांशीं योग पावणें; अतएव **भाचा, राजा, तुमचा, तुझा, माझा,** इ० शब्दांचीं तिसऱ्या विभक्तिप्रकारानुरूप सामान्यरूपें लिहिणें झाल्यास **भाचा, तुमचा, राजा, माझा, तुझा,** अशीं लिहावीं हा चांगला पक्ष आहे असें मला वाटतें. **भाच्या, तुमच्या, राज्या, माझ्या, तुझ्या,** अशीं रूपें लिहिणें हा तसा चांगला पक्ष नव्हे. **च, ज,** इ० वर्णांच्या ठायीं तिसऱ्या विभक्तिप्रकारानें अंत्य वर्णास जो **या**आदेश होतो, तो या वर्णांचा आगंतुक उच्चार काढून मूळ उच्चारावर हे वर्ण आणितो हेंच त्याचें कार्य जाणावें. आणखी पाहा;–**राज्या, माझ्या, तुझ्या,** इ० अशीं रूपें लिहिलीं असतां जेथें चकाराद्यंत मूळचे संस्कृत अथवा यवनी अथवा महाराष्ट्र शब्द असतील त्यांचीं, आणि चकाराद्यंत शब्दांचीं सारखींच रूपें होऊं लागतील; जसें— **भाचा** आणि **कांचा** या दोन्ही शब्दांचीं **भाच्या** आणि **कांच्या** अशीं सामान्यरूपें होतील; तेव्हां या वरून मूळ अंगाचें ज्ञान होणें कठीण; परंतु या वरील नियमा प्रमाणें **भाचा** आणि **कांच्या** अशीं निराळीं सामान्यरूपें लिहिलीं असतां लागलेंच लक्षांत येईल कीं यांत पहिल्याचें **भाचा,** आणि दुसऱ्याचें **कांचा,** असें मूळचें अंग होय. आणखी दुसरी अडचण; **राज्यास, आज्यास,** इ० अशीं सामान्यरूपें लिहिलीं असतां **राजा, आजा,** इ०, आणि **राज्य, आज्य,** इ० शब्दांचीं सारखींच रूपें होऊं लागतील; तेव्हां ही सारी अडचण वरील नियमास अनुसरलें असतां निवारण होती; ह्मणोन **राज्यास,**

आज्यास, **भाच्यास**, **ओझ्यास**, **तुमच्यानें**, **माझ्यानें**, **तिच्यानें**, इ० अशीं रूपें लिहिणें, त्या पेक्षां **राजास**, **आजास**, **भाचास**, **ओझास**, **तुमचानें**, **माझानें**, **तिचानें** इ० अशीं रूपें लिहिणें हा पक्ष विशेष ग्राह्य होय.

दुसरा नियम.

२७४ हा जो वर नियम सांगितला त्यास न अनुसरितां बहुतेक विद्वान लोकांचें असें मत पडतें कीं, **च ज झ** यांचा दंततालव्य उच्चार असतां बिंदु देण्याची मोठी खटपट आहे, कांकीं हे वर्ण मराठींत निरंतर येणार, तेव्हां वारंवार बिंदु कोठवर देत बसावें, व अशी बिंदु देण्याची रीति पडली असतांही लिहिण्यांत व छापण्यांत प्रमादानें बहुत स्थळीं हा बिंदु देणें राहात जाईल; हीं एका पक्षीं त्यांची आशंका खरी आहे; अणखी हा बिंदु दिला अथवा न दिला तथापि मराठी लोकांत या दंततालव्योच्चारा विषयीं चुक्या होणार नाहींत; ही बिंदु देण्याची रीति विशेषेंकरून परमुलखी लोकांसच हितावह आहे; तस्मात् मला असें वाटतें कीं मधला मार्ग धरावा हें फार चांगलें; ह्मणजे, तिसऱ्या विभक्तिप्रकारानें जेथें **या** जोडावा लागतो तेथें **या** जोडावा. परंतु जेथें अशा प्रकारचीं रूपें लिहिलीं असतां अर्थांतराची आशंका होण्याचा संभव दिसेल, तेथें हा **या** जोडूं नये. जसें **राज्याला**, **आज्याला** हीं रूपें लिहिलीं असतां, हीं, **राजा**, **आजा**, या शब्दांचीं रूपें, किंवा **राज्य**, **आज्य**, या शब्दांचीं, असा समयविशेषीं संशय उत्पन्न होण्याचा चांगला संभव आहे, तेव्हां अशा संदिग्ध स्थळींमात्र **राजा**, **आजा**, यांचीं **राजाला**, **आजाला**, अशीं रूपें लिहावीं; आणि **राज्य**,

आज्य, यांचीं **राज्याला**, **आज्याला**, अशीं रूपें लिहावीं; अर्थात् जेथें असा संशय येण्याचा संभव दिसत नसेल, तेथें इतर शब्दांच्या नियमा प्रमाणें **च ज झ** यांस **यकार** जोडणें झाल्यास निःसंशय जोडावा. आणखी जेथें मराठी शब्द असून त्यांतील चकारादिकांचे दंततालव्य आणि तालव्य असे दोन उच्चार होऊन त्या मुळें अर्थभेद होऊं लागेल तेथें तर हा बिंदु अवश्य लिहावा; जसें— **चार** आणि **चार** या शब्दांत अर्थभेद आहे तो स्पष्ट दाखविण्या करितां ज्याचा दंततालव्योच्चार असेल त्या वर्णास बिंदु द्यावा. हा दुसरा नियम चांगला लक्षांत ठेविला ह्मणजे मग मराठी लोकांस बिंदु देण्याची तादृश आवश्यकता नाहीं.

या व्याकरणांत हे दोन्ही नियम ठेविले आहेत, ह्मणजे जेथें दंततालव्योच्चार होतो तेथें चकारादिवर्णांस बिंदु दिला आहे, आणि जेथें संदिग्ध स्थळ नाहीं तेथें नियमा प्रमाणें यकारही जोडिला आहे.

प्रकरण ६.

विभक्ती विषयीं स्फुट विचार.

२७५ वर्णानुक्रमांतलीं जीं अक्षरें, अथवा एकाक्षरी शब्द, यांस विभक्ति लावणें झाल्यास त्यांचीं प्रथमप्रकारा प्रमाणें सामान्यरूपें होतात; जसें—'मुला तूं या बला काना द्यावयास विसरलास', 'या उच्या माथ्यावर अनुस्वार नाहीं', 'या ढला तुह्मीं हावें तितकें पढविलें तरीं हा ढच्चा ढच'. इ०.

२७६ खालीं लिहिलेल्या नामां वरून अंगांगीभावसं-

बंधी षष्ठी नसतां जर हे षष्ठीविभक्तीचे प्रत्यय झाले तर पुर्वोक्त नियमा प्रमाणें सामान्यरूपें न होतां तीं विशेषणें होतात.

हात, तोंड, घर, मूळ, कड, घांट, वाट, वेळ, काळ, पाठ, पोट, पदर, इ० शब्दांस जर अंगांगीभावसंबंधी षष्ठी नसली तर पुर्वोक्त नियमा प्रमाणें सामान्यरूपें न होतां तीं विशेषणें होतात. उदाह०—'हें माझ्या **हातचें** खत नाहीं', ह्मणजे माझ्या हातानें लिहिलेलें खत नाहीं, '**तोंड-च्या** निरोप', '**घरचा** चाकर', '**मूळचें** रूप', **पदरचा** खर्च', '**पोटचें** पोर', इ० आणखी उदाहरणें. परंतु तींच अंगांगीभावसंबंधी षष्ठी असली तर दुसऱ्या विभक्ति-प्रकारा प्रमाणेंच या अंगास सामान्यरूपें होतात; उ०–'माझ्या **हाताचें** हाड मोडलें', 'याच्या **तोंडाच्या** रंगापेक्षां **हाताचा** रंग गोरा आहे', 'वाघाच्या **पोटाचें** कातडें मऊ असतें', 'या **पदराचा** कांठ लाल आहे', इ०; एथें **हा-ताचें, तोंडाचा**, इ० ही षष्ठी होय.

२७७ अकारान्त जीं देशग्रामवाचक नामें त्यांचेंही षष्ठीच्या योगानें विकल्पें प्रथमप्रकारा प्रमाणें सामान्यरूप होतें; जसें-पंढरपुरचा, धनवडचें, नागपुरचें, पैठणचीं, अमदाबादचें, गुजराथची, कर्णाटकची; पक्षीं,–नागपुरा-चा, पंढरपुराचें, पैठणाचीं, अमदाबादेचें अशींही रूपें होतात. यांत पहिल्या प्रकारच्या रूपांस विशेषणें मानि-लीं असतां बरें.

२७८ क्वचित्—सरकार इ० शब्दांस द्वितीयाविभक्ति अथवा चतुर्थीविभक्ति यांच्या संबंधी **ला** प्रत्यय लागत अ-सतां सामान्यरूपास दीर्घ आदेश विकल्पें होतो; जसें–

अनुक्रमणिका

'सरकारला रयते वर जुलूम करणें मुनासिब नाहीं'. हा **सरकारचा** गण आणावा.

२७९ संस्कृत शब्दांच्या संबोधनाचीं रूपें कचित् प्रौढ काव्यांत व भाषणांत संस्कृत नियमा प्रमाणें होतात; असें–हे हरे, हे मुरारे, हे गुरो, हे साधो, इ०.

'वरअसा**विभो**देकींवत्सागामह्लीला'

'वद**विष्णो**मजवांचुनिजरिमेळविलेंअसेलयशकांहीं'. मोरोपंत.

२८० आतां वर जे विभक्तिप्रत्यय सांगितले तदर्थीं कितीएक अव्ययें आहेत तीं सांगतों.

विभक्ति.	अव्यय.
द्वि०—	प्रत, लागीं, लागोनी, लागोनियां; हीं शेवटलीं तीन अव्ययें प्राकृत पद्यांत योजितात.
तृ०—	द्वारें, करून, मुळें, करवीं, कडून, जवळून.
च०—	कारणें, करितां, साठीं, अर्थ, अर्थीं, स्तव.
पं०—	कडून, पेक्षां, वरून, स्तव, पासून.
ष०—	संबंधी.
स०—	ठायीं, ठायां, कडे, मध्यें, विषयीं, आंत.
सं०—	**एकव० पु०**–अरे, रे, अगा, गा, हे, अजि; **स्त्री०**–अगे, गे, अगो, गो. **अनेक० पु० स्त्री०**–अहो, अजी.

विभाग २.

सर्वनामविचार.

२८१ सर्वनाम ह्मणजे नामांचा उच्चार वारंवार न व्हावा ह्मणोन त्यांच्या स्थानीं जे शब्द येतात ते प्रत्येकीं; असें–मीं, तूं, तो, हा, जो, तो, तें, इ०.

हें स्पष्ट करून दाखवितों;—'रामा एथें आला, पण त्याणें रावसाहेबां करितां घोडा आणिला नाहीं, तर तुह्मी त्यास सांगा कीं तूं लौकर जाऊन त्यांज करितां तो घेऊन ये'; एथें **रामा**, **रावसाहेब**, आणि **घोडा**, या नामांची उक्ति वारंवार न व्हावी ह्मणोन **त्याणें**, **तूं**, आणि **तो**, या शब्दांचा प्रयोग केला आहे; ह्मणोन हीं सर्वनामें जाणावीं.

२८२ सर्वनामाचे पांच वर्ग आहेत; **पुरुषवाचक**, **दर्शक**, **संबंधी**, **प्रश्नार्थक**, आणि **सामान्य**.

२८३ मराठी भाषेंत सर्वनामास पुरुष, लिंग, वचन, आणि विभक्ति, हीं असतात.

वर्ग १.

पुरुषवाचक सर्वनाम.

२८४ पुरुषवाचक सर्वनामें तीन आहेत.

एकव०.	**अनेकव०.**	**पुरुष.**
मीं.	आह्मीं	प्रथम पुरुष.
तूं.	तुह्मीं.	द्वितीय पुरुष.
तो, ती, तें.	ते, त्या, तीं.	तृतीय पुरुष.

संस्कृतांत या पुरुषांस उत्तम, मध्यम, आणि प्रथम, अशा संज्ञा आहेत.

२८५ भाषणांत तिहीं पेक्षां अधिक पुरुष येत नाहींत; एक जो बोलतो तो, एक ज्या पाशीं बोलतो तो, व एक ज्या विषयीं बोलतो तो.

२८६ सर्वनामांस नामां प्रमाणें वचनें दोन आहेत;— मीं, तूं, तो, ती, तें, एकवचन; आह्मीं, तुह्मीं, ते, त्या, तीं, अनेकवचन.

२८७ यांस नामां प्रमाणें लिंगें तीन आहेत;—तो, ते,

पुल्लिग; ती, त्या, स्त्रीलिंग; आणि तें, तीं, नपुंसकलिंग.

२८८ तो, ती, तें, हीं कधीं पुरुषवाचक सर्वनामें, व कधीं दर्शक सर्वनामें होतात. यांचा जेव्हां नुसता प्रयोग करितात तेव्हां हीं पुरुषवाचक सर्वनामें ह्मणावीं; जसें– 'तो धांवतो', 'ती लिहित्ये', 'त्या वाचतात', इ०. आणि ज्या काळीं नामाच्या पूर्वीं विशेषणा सारिखा यांचा प्रयोग होतो त्या काळीं हीं दर्शक सर्वनामें ह्मणावीं; जसें– 'तो मनुष्य जेवतो', 'ती मुलगी धांवत्ये', इ०. अशा ठिकाणीं नाम आणि सर्वनाम यांचा विशेष्यविशेषणभावसंबंध असतो.

२८९ सर्वनामांत एक नियम असा आहे कीं **अ**कारान्त किंवा **ओ**कारान्त सर्वनामाचें रूप स्त्रीलिंगीं ईकारान्त, आणि नपुंसकीं एँकारान्त होतें; तसेंच पुल्लिगीं अनेकवचनीं नामां प्रमाणें अंत्यस्वराच्या स्थानीं ए, स्त्रीलिंगीं **या**, आणि नपुंसकीं ईं, असे आदेश होतात. अकारान्त सर्वनामांस लिंगवचनें करून कांहीं विशेष होत नाहीं; उदाहरण.

	पुल्लिंग.	**स्त्रीलिंग.**	**नपुंसकलिंग.**
एकव०.	तो, जो, हा.	ती, जी, ही.	तें, जें, हें.
अनेकव०.	ते, जे, हे.	त्या, ज्या, ह्या अ० या.	तीं, जीं, हीं.

२९० पुरुषवाचक सर्वनामांस विभक्ति लावून दाखवितों. त्यांस संबोधन नसतें.

मीं.

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	मीं.	आह्मीं.
द्वि०	मला, मजला, मातें, मज.	आह्मांला–स–तें.
तृ०	मीं, म्यां, मशीं, मजशीं.	आह्मीं, आह्मांशीं.

अनुक्रमणिका

च०	मला, मजला, मातें, मज.	आह्मांला–स–तें.
पं०	मजहून, माझ्याहून.	आह्मांहून, आमच्याहून.
ष०	माझा–झीं–झें.	आमचा–ची–चें.
स०	माझ्यांत.	आह्मांत, आमच्यांत,
वि०सा०	मज.	आह्मां.

तूं.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	तूं	तुह्मीं.
द्वि०	तुला, तुजला, तुतें, तुज.	तुह्मांला–स–तें.
तृ०	तूं, त्वां, तुशीं, तुजशीं.	तुह्मीं, तुह्मांशीं.
च०	(द्वितीये प्रमाणें)	
पं०	तुजहून, तुझ्याहून.	तुह्मांहून, तुमच्याहून.
ष०	तुझा–झी–झें.	तुमचा–चीं–चें.
स०	तुझ्यांत.	तुह्मांत, तुमच्यांत.
वि०सा०	तूज.	तुह्मां.

२९१ **मीं**, **तूं**, **आह्मीं**, **तुह्मीं**, या सर्वनामांचीं, विशेषणसामान्यरूपें पुढल्या विशेष्याच्या विभक्तीच्या अनुरोधानें होतात. विशेष्याची द्वितीया, तृतीया, चतुर्थी, आणि षष्ठी, असतां यांचीं त्या त्या विभक्तींचीं जीं रूपें तींच विशेषणसामान्यरूपें होतात; उ०—'अरे **मला** धोंडभटाला तूं इतकें तोडून बोललास'? '**तुला** कुळंब्याला सोंवळें कसचें'? 'तेथें या जनकाचा पण मानावा कैसा **म्या** रावणानें', **तूं** अ० **त्वां** देवीदासानें गावें, आणि **मीं** अ० **म्यां** रामरावानें ऐकावें', '**माझें** हरिपंताचें बोलणें सिद्धीस न गेलें तर मग काय', '**तुझी** सोनाराची अबरू या लोहारानें

घ्यावी', '**आह्मांला** ब्राह्मणानां तुह्मीं शूद्रांहीं हे असे अपशब्द बोलावे'? '**आमची** शूरांची गोष्ट आणि **तुमची** भ्याडांची गोष्ट बरोबर होईल काय'? **आमच्या** श्रीमंतांच्या योग्यतेचें आणि **तुमच्या** दरिद्र्यांच्या योग्यतेचें साम्य होईल काय'?

२९२ **मीं**, **तूं**, यांचीं बहुतकरून तृतीया वर्ज्य करून सार्वविभक्तिक विशेषणसामान्यरूपें **मज**, **तूज** ; आणि **आह्मीं**, **तुह्मीं**, यांचीं सार्वविभक्तिक विशेषणसामान्यरूपें **आह्मां**, **तुह्मां** अशीं होतात ; जसें--'**मज** पापिणीचें इतकें भाग्य कोठून', '**मज** गरीबाला दिलें असतां तुह्मांस फार पुण्य लागेल', 'तुजला **मज** राजा वांचून आणखी कोण त्राता आहे', '**मज** अनाथ स्त्रीयेचा जर तुह्मीं परामर्ष न घ्याल तर मला आणखी कोण आहे', '**मज** धोंडभटांत जर शहाणपण नाहीं ह्मणतां तर मग या पृथ्वीवर शहाणपण आहे तरीं कोठें'? '**आह्मां** गरीबांनां छळून **तुह्मां** श्रीमंतांच्या हातीं काय यावयाचें आहे', '**आह्मीं** भिक्षुकांहीं तुमच्या घरीं यावें आणि **तुह्मां** गृहस्थांत लीनताही असूं नये, तस्मात् आमचें प्रारब्ध'.

बहुतकरून तृतीया वर्ज्य करून ह्मटलें आहे या वरून क्वचित् '**तुह्मां** शूद्रांनीं **आह्मां** ब्राह्मणाची सेवा करावी' असें कोठें कोठें वाक्य आढळतें; परंतु **मज** रामानें, **तूज** कृष्णानें, असा प्रयोग एकवचनांत होत नाहीं. **मीं** अ० **म्यां** रामानें, **त्वां** कृष्णानें, असा प्रयोग होतो.

मज आणि **तूज** हीं सामान्यरूपें विशेषेंकरून कोंकणांत वर्ततात.

२९३ क्वचित् **आह्मीं**, **तुह्मीं**, यांचीं सार्वविभक्तिक विशेषणसामान्यरूपें **आमच्या**, **तुमच्या**, अशींही होतात;

अनुक्रमणिका

जसें—'**आमच्या** ब्राह्मणाहीं अलिकडेस सोंवळें सोडिलें आणि **तुमच्या** शूद्रांनीं घेतलें', '**आमच्या** बायकांचे नवरे द्वाड असले ह्मणजे **आह्मां** बायकांनां फार दुःख होतें',

परंतु अशा ठिकाणीं जेथें विशेषणसामान्यरूप करायाचें असेल तेथें **आह्मां, तुह्मां**, हीं रूपें लिहावीं हा उत्तम पक्ष; परंतु जेथें विशेषणभाव नसेल, आणि केवळ संबंधरूपभाव असेल, तेथें **आमच्या, तुमच्या**, अशीं षष्ठीचीं रूपें लिहावीं; जसें—'जर ब्राह्मण शिंवूं लागले तर आमच्या शिंप्यांहीं काय करावें'? एथें जर **आमच्या** आणि **शिंपी** यांचा विशेष्यविशेषणभावसंबंध असला, ह्मणजे,—'आह्मीं जे शिंपी त्यांहीं काय करावें' असा अर्थ असला, तर '**आह्मां** शिंप्यांहीं काय करावें' असें लिहिणें हा उत्तम पक्ष; परंतु या उभयतांचा स्वस्वामिभावसंबंध असला, ह्मणजे,—'आमचे जे शिंपी चाकर त्यांहीं काय करावें' असा अर्थ असला तर **आमच्या** हेंच रूप लिहिलें पाहिजे; असें केलें असतां गोंधळ पडणार नाहीं.

वर जो नियम सांगितला त्यांतील उदाहरणांत विशेष्यविशेषणभाव न मानून स्वस्वामिभावसंबंध मानिला तथापि चालेल; परंतु मला वाटतें 'आमच्या बायकांचे नवरे द्वाड असले ह्मणजे आह्मां बायकांनां दुःख फार होतें', इत्यादि स्थळीं केवळ विशेष्यविशेषणभाव दिसून येतो, 'आमच्या ज्या बायका त्यांचे नवरे' असा अर्थ नाहीं, 'आह्मीं ज्या बायका त्या आमचे नवरे' असा अर्थ आहे. परंतु अशा स्थळीं 'आह्मां बायकांचे नवरे' असें ह्मणणेंच शुद्ध होय.

२९४ **तो, ती, तें**, या सर्वनामांचीं विभक्तिरूपें चालवून दाखवितों.

अनुक्रमणिका

तो.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	तो.	ते.
द्वि०	त्याला, त्याजला, त्यास, त्यातें.	त्यांना, त्यांला, त्यांजला, त्यांस, त्यांतें.
तृ०	त्याणें, त्यानें, त्याशीं, त्याजशीं.	त्यांहीं, त्यांनीं, त्यांशीं, त्यांजशीं.
च०	(द्वितीये प्रमाणें)	
पं०	त्याहून, त्याजहून, त्याच्याहून.	त्यांहून, त्यांजहून, त्यांच्याहून.
ष०	त्याचा–ची–चें.	त्यांचा–ची–चें.
स०	त्यांत–त्याच्यांत.	त्यांत, त्यांच्यांत.
वि०सा०	त्या.	त्या, त्यां.

ती.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	ती.	त्या.
द्वि०	तिला, तीस, तिजला, तितें.	त्यांना, त्यांला, त्यांजला. त्यांस, त्यांतें.
तृ०	तिणें, तिनें, तिशीं, तिजशीं, तिच्याशीं.	त्यांहीं, त्यांनीं, त्यांशीं, त्यांजशीं, त्यांच्याशीं.
च०	(द्वितीये प्रमाणें)	
पं०	तिहून, तिजहून, तिच्याहून.	त्यांहून, त्यांजहून, त्यांच्याहून.
ष०	तिचा–ची–चें.	त्यांचा–ची–चें.
स०	तींत, तिच्यांत.	त्यांत, त्यांच्यांत.
वि०सा०	त्या.	त्या, त्यां.

अनुक्रमणिका

२९५ **तें** या पुरुषवाचक सर्वनामांचीं विभक्तीचीं रूपें प्रथमे शिवाय पुल्लिंगा प्रमाणें होतात.

२९६ **तो**, **हा**, आणि **जो** या सर्वनामां पुढें तृतीया संबंधी **नें** आणि **नीं** यांस विकल्पें **णें** आणि **णीं** आदेश होतात. जसें—**त्याणें**, **तिणें**, **याणें**, **इणें**, **ज्याणें**, **जिणें**, **त्याणीं**, **यांणीं**, इ०.

बहुतेकांचें असें मत आहे कीं या तीन शब्दां पुढेंच हा तृतीयेच्या अपवाद कांहीं इष्ट नाहीं; **त्यानें**, **यानें**, **इनें**, **ज्यांनीं**, इ० अशीं रूपें लिहावीं; व या प्रमाणें बोलण्याची प्रवृतिही देशस्थ लोकां मध्यें आहे. त्यास मलाही हें मत पहिल्या दृष्टीस ग्राह्य दिसतें, कांकीं लोकव्यवहारा वरून, व्याकरणा वरून, आणि प्राचीन ग्रंथां वरून, पाहिलें असतां **नें** आणि **नीं** यांच्या स्थानीं जो **णें** आणि **णीं** आदेश होतो हा व्यभिचार होय. तथापि अलिकडेस या वैकल्पिक रूपांची पुणेप्रांतीं व साऱ्या कोंकणांत प्रवृत्ति विशेष झाली आहे, आणि हीं जीं मूळचीं रूपें तीं बहुधा अक्षरशत्रु अशा गंगथड्यांच्याच मुखांतून येतात, ह्मणोन त्यांवर अलिकडेस निंद्यपणाची छाया आली आहे. त्यांत आणखी जर कुलीन व प्रतिष्ठित अशा नागरिक लोकांचा वाग्व्यवहार सोडून केवळ व्याकरणनियमासच अनुसरलें, तर जसें **नें**च्या स्थानीं **णें** आदेश करणें हा व्यभिचार त्याज्य, तसाच **हा**, **ही**, यांच्या स्थानीं **या**, **ई**, हा आदेशही त्याज्य होय. (कोंकणांत ह्यास, ह्याणें, इ० रीतीनें बोलण्याची प्रवृत्ति आहे.) अतएव **ह्यानें**, **हिनें**, **ह्यांनीं**, अशीं रूपें लिहिणें प्राप्त होईल. ह्मणोन मला वाटतें एथें लोकव्यवहारास अनुसरून **याणें**, **इणें**, इ० रूपांचें ग्रहण करणें प्रशस्त दिसतें. कित्येक प्रसंगीं सर्वमान्य अशा लोकव्यवहारासच अनुसरलें पाहिजे; नाहींतर राजापुरप्रांतीं **मस**, **तूस**, तसें मुंबईत कित्येक जातीच्या लोकांच्या बोलण्यांत **मिनें**, **तुनें**, इ० रूपें आढळतात, हीं व्याकरणदृष्ट्या शुद्ध होत; मग यांचें ग्रहण कां करूं नये? तेव्हां ज्या कारणा-

अनुक्रमणिका

स्तव यांचें ग्रहण प्रशस्त दिसत नाहीं त्याच कारणास्तव **त्यानें, हिनें, त्यांनीं** यांचेंही ग्रहण प्रशस्त दिसत नाहीं.

तो, हा, जो; तें, हें, जें; यांचीं काव्यांत, आणि प्रौढ लिहिण्यांत व भाषणांत एकवचनीं— **तेणेंकरून, येणेंकरून, जेणेंकरून**; आणि अनेकवचनीं— **त्यांहींकरून**, अ० **तिहींकरून, यांहींकरून**, अ० **इहींकरून; जांहींकरून**, अ० **जिहींकरून**; अशीं रूपेंही बहुत आढळतात.

२९७ **म्यां, त्वां**, हीं जीं **मीं** आणि **तूं** या शब्दांचीं तृतीयेचीं रूपें, त्यांचा प्रयोग देशस्थां मध्यें फार आढळतो. व्याकरणरीतीनें पाहिलें असतां जसें **तो** या सर्वनामाचें **त्याणें** हें तृतीयेचें रूप होतें, तशीं **मीं, तूं** या सर्वनामांचींहि तृतीयेचीं निराळीं रूपें असावीं, व या प्रमाणें सर्वांच्या बोलण्यांत आलें असतां फार बरें आहे; परंतु महाराष्ट्रदेशरूप वर्तुलाचा मध्यबिंदु जें पुणें, त्यांत व सारा कोंकणप्रांत यांत **मीं, तूं**, या सर्वनामांचीं तृतीयेचीं रूपें फिरत नाहींत, ह्मणोन मीं या व्याकरणांत त्याच रीतीस अनुसरून **मीं, तूं**, या तृतीयेच्या रूपांस पहिलें स्थान दिलें आहे.

वरकड **म्यां, त्वां** या रूपांचा प्रचार या प्रांतीं बोलण्यांत तर एव्हां पडायाचा नाहीं परंतु लिहिण्यांत तरी पडावा अशी माझी इच्छा आहे.

राजापूरप्रांतीं कित्येक कोंकणस्थ **मस, मज, तूस, तूज, मांत, तूंत**, इ०; व घाटी लोक **मजपासून, तुजपासून**, यांचा अपभ्रंश करून **मपासून, मपून; तुपासून, तुपून**; असें बोलतात. तसेंच मुंबईत कित्येक जातीचे लोक **माला, मिनीं, मिजून, तुनीं, तुजून, त्याजून, तिजून**, असें बोलतात. परंतु आतां आपणास भरंवसा आहे कीं जीं मुलें व्याकरण शिकतात व पुढें शिकूं लागतील, त्यांस असल्या शंभर तऱ्हा टाकून सर्वत्र प्रसिद्ध, व कुलीन आणि विद्वान ज्या रीतीनें भाषण करितात, अशी एक रीत सर्वांहीं घ्यावी हें चांगलें दिसेल.

अनुक्रमणिका

वर्ग २.

दर्शक सर्वनाम.

२९८ **तो** आणि **हा** हीं दर्शक सर्वनामें होत; जसें– '**तो** मनुष्य चालतो आहे त्याला बलावा', '**हा** घोडा चांगला आहे', अशा स्थळीं ज्या नामांच्या मागें हीं सर्वनामें लागतात तीं या सर्वनामांनीं दर्शविलीं जातात, ह्मणोन यांस **दर्शक** सर्वनामें ह्मणतात.

२९९ यांचीं वचनें आणि लिंगें पूर्वीं पुरुषवाचक सर्वनामप्रकरणीं दाखविलीं आहेत.

३०० **हा** याचा प्रयोग जवळचे पदार्थ दाखवायाचे असतां करितात; व **तो** याचा प्रयोग दूरचे पदार्थ दाखवायाचे असतां करितात.

तो या सर्वनामास मागें पुरुषसर्वनामप्रकरणीं विभक्ति लावून दाखविल्या आहेत.

३०१ **हा, हें,** आणि **ही,** या दर्शक सर्वनामांस प्रथमे शिवाय इतर विभक्ति असतां **या** आणि **इ** हे आदेश होतात; यांस विभक्ति लावून दाखवितों.

हा.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	हा.	हे.
द्वि०	याला, याजला, यास, यातें.	यांनां, यांला, यांजला, यांस, यांतें.
तृ०	याणें, यानें, याशीं, याजशीं, याच्याशीं.	यांहीं, यांणीं, यांनीं, यांशीं, यांजशीं, यांच्याशीं.
च०	(द्वितीये प्रमाणें).	

पं०	याहून, याजहून, याच्याहून.	यांहून, यांजहून, यांच्याहून.
ष०	याचा–ची–चें.	यांचा–ची–चें.
स०	यांत, याच्यांत.	यांत, यांच्यांत.
वि०सा०	या.	या, यां.

स्त्रीलिंगीं अनेकवचनाचीं रूपें पुल्लिंगाच्या अनेकवचनांच्या प्रमाणें जाणावीं.

हीं.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	हीं.	या, ह्या.
द्वि०	ईस, इला, इजला, इतें.	———
तृ०	इणें, इशीं, इजशीं, इच्याशीं.	———
च०	(द्वितीये प्रमाणें).	———
पं०	इहून, इजहून, इच्याहून.	———
ष०	इचा–ची–चें.	———
स०	ईत, इच्यांत.	———
वि०सा०	या.	———

नपुंसकाचीं रूपें प्रथमा रहित करून पुल्लिंगा प्रमाणें होतात.

२०२ **हा, हें,** आणि **ही,** यांच्या स्थानीं **या,** आणि इ, हे आदेश विकल्पें होतात; **ह्याणें, हिणें, हिचा, ह्याला,** इ० अशींही रूपें आढळतात; परंतु अशा रूपांची प्रवृत्ति केवळ कोंकणांतच आहे, ह्मणोन हीं एकदेशीय रूपें विशेष ग्राह्य नाहींत.

२०३ **आह्मीं, तुह्मीं,** यांचीं रूपें वर्ज करून पुरुष-

वाचक सर्वनामें, आणि **हा** व **तो** हीं दर्शक सर्वनामें, यांचें सामान्यरूप आणि विभक्तिप्रत्यय यांच्यामध्यें **अ** हें विकरण उत्पन्न होतें; अथवा षष्ठीच्या सामान्यरूपांस पुढें विभक्तिप्रत्यय लावितात; हें जेथें अवश्य पडेल तेथें करावें; या पेक्षां सर्वनामां पुढें जर नुसता विभक्तिप्रत्यय लागत असला तर त्या रूपाचें माझ्या बुद्धीनें सर्वांहीं ग्रहण करणें अधिक योग्य आहे. **मजहून, माझ्याहून, तुजहून**, अशा ठिकाणीं त्या विकरणा वांचून निर्वाह होत नाहीं; परंतु **त्याजला** या पेक्षां **त्याला** हें रूप ग्रहण करणें अधिक योग्य आहे. तथापि या अशा रूपांचा पृथक् संज्ञानिर्देश कर्तव्य असतां हीं त्या त्या विभक्तींचीं **सविकरण** रूपें ह्मणावीं; जसें **मजला** हें सविकरण द्वितीयेचें रूप; तसें **मज, तूज** इ० हीं सविकरण सामान्यरूपें ह्मणावीं.

२०४ आतां वर सांगितल्या दर्शक सर्वनामां शिवाय— **इतका, इतकाला, तितका, तितकाला, एवढा, एवढाला, तेवढा, तेवढाला, असा, असला, असलाला, तसा, तसला, तसलाला**, व यांचीं लिंगवचनें करून जीं रूपें होतात तींही दर्शक सर्वनामें होत. हीं सर्वनामें पुल्लिंगीं **आंबा** शब्दा सारिखीं चालतात, व स्त्रीलिंगीं **काठी** शब्दा प्रमाणें, व नपुंसकीं प्रथमा वर्ज करून पुल्लिंगा प्रमाणें चालतात.

२०५ हीं जीं वर दर्शक सर्वनामें सांगितलीं त्यांत सर्वनामांचें लक्षण असून आणखी विशेषणांचेंही लक्षण असतें, अतएव व्याकरणपदच्छेद करिते वेळेस कांहीं अडचण पडूं नये ह्मणोन पुढें विशेष्याचा योग असतां हीं विशेषणें मानावीं, आणि तो योग नसतां सर्वनामें मानावीं ह्मणजे बरें.

अनुक्रमणिका

२०६ **असा** या दर्शक सर्वनामाचीं विभक्तींचीं रूपें चालवून दाखवितों.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	असा.	असे.
द्वि०	अशाला–स.	अशांनां–ला–स.
तृ०	अशानें–शीं.	अशांहीं–नीं–शीं.
वि०सा०	अशा.	अशां.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें— तसा, कसा, जसा, तसतसा, जसजसा, इ०, या सर्वनामांचीं रूपें जाणावीं.

२०७ **कसा** याचें षष्ठीच्या योगानें विकल्पें पहिल्या प्रकारा प्रमाणें रूप होतें; जसें— कशाचा, कसचा; कशाची, कसची; कशाचें, कसचें.

स्त्रीलिंग.

अशी.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	अशी.	अश्या.
द्वि०	अशीला–स.	अश्यांनां–ला–स.
तृ०	अशीनें–शीं.	अश्यांहीं–नीं–शीं.
वि०सा०	अशा.	अश्यां.
इ०.	इ०.	इ०.

याच प्रमाणें—तशी, कशी, जशी, तसतशी, जसजशी, इ० यांचीं रूपें जाणावीं.

असें, तसें, कसें, जसें, यांचीं प्रथमे शिवाय पुल्लिंगा प्रमाणें रूपें जाणावीं.

अनुक्रमणिका

असला, असलाला, तसला, तसलाला, यांत बारीक अर्थभेद आहे तो असा कीं, **असला, तसला,** हीं सर्वनामें एका वस्तूस लागतात; व **असलाला, तसलाला,** हीं समुदायांतून एकए-कास **असला, तसला,** याचा प्रयोग कर्तव्य असतां लागतात; असें— 'असलाला आंबा', 'तसलाल्या डब्या', इत्यादि स्थळीं तो तो पदार्थ एकएक दाखविला जातो असा अर्थ होतो.

२०८ **इतका, तितका,** इ० आकारान्त सर्वनामांचीं विशेषणसामान्यरूपें आणखी **इतके, तितके,** अ० **इतक्ये, तितक्ये,** अशींही आढळतात; परंतु यांत ग्राह्य कोणतीं याचा निश्चय विशेषणप्रकरणीं केला आहे तो पाहावा.

वर्ग ३.

संबंधी सर्वनाम.

२०९ **जो, जितका, जितकाला, जेवढा, जेवढाला, जसा, जसला, जसलाला,** हीं संबंधी सर्वनामें होत; कारण, हीं जेव्हां वाक्यांत असतात, तेव्हां निरंतर तज्जातीय दर्शक सर्वनामांशीं लिंगवचनविभक्तीच्या अनुरोधानें जोडलींच असतात; ह्मणोन यांस कित्येक वैय्याकरण परस्परनित्यसंबंधार्थी सर्वनामें ह्मणतात. ज्या नामाशीं या सर्वनामांचा संबंध असतो तें त्यांचें **संबंधी** ह्मणावें; यांचीं उदाहरणें सांगतों. '**जो** चोरी करितो **तो** दंड पावतो', '**जिला**, काल बलाविलेंस **तिला** आज स्वयंपाकास बलाव', '**जें** पाहावें **तें** लबाड,' '**जितकें** शिकवावें **तितकें** निष्फळ', 'या गांवांत **जेवढें ज्यास** द्यावें **तेवढें त्यास** थोडेंच वाटतें', इ०; 'जो मनुष्य लबाडी बोलतो तो फसतो', या वाक्यांत **मनुष्य** हें **जो** याचें संबंधी जाणावें.

३१० जो, जी, जें, यांस विभक्ति लावून दाखवितों.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	जो.	जे, जे.
द्वि०	ज्याला–स–तें.	ज्यांना–ला–स–तें.
तृ०	ज्याणें, ज्यानें, ज्याशीं, ज्याजशीं, ज्याच्याशीं, जेणें.	ज्यांणीं, ज्यांनीं, ज्यांहीं, ज्यांशीं, ज्यांजशीं, ज्यांच्याशीं, जिहीं.
च०	(द्वितीये प्रमाणें).	
पं०	ज्याहून, ज्याजहून, ज्याच्याहून.	ज्यांहून, ज्यांजहून, ज्यांच्याहून.
ष०	ज्याचा–ची–चें.	ज्यांचा, ज्यांची, ज्यांचें.
स०	ज्यांत, ज्याच्यांत.	ज्यांत, ज्यांच्यांत.
वि०सा०	ज्या.	ज्या, ज्यां.

विकल्पें—**जाला, जाणें, जाहून, जाचा, जांत; जांना, जांहीं, जांहून, जांचा, जांत**; इ० अशींही रूपें होतात; व या रूपांचें उपपादन, ले० २७२, एथें केलें आहे, त्यावरून तर हींच रूपें विशेष ग्राह्य होत.

स्त्रीलिंग.

जी.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	जी.	ज्या.
द्वि०	जिला, जिजला, जीस, जितें.	——
तृ०	जिणें, जिनें, जिशीं, जिजशीं, जिच्याशीं.	—— ——
च०	(द्वितीये प्रमाणें).	——

अनुक्रमणिका

पं०	जिहून, जिजहून, जिच्याहून.	—— ——
ष०	जिचा—ची—चें	——
स०	जींत, जिच्यांत.	——
वि०सा०	ज्या.	ज्या, ज्यां.

अनेकवचनाचीं रूपें पुल्लिंगाच्या अनेकवचनाच्या प्रमाणें जाणावीं.

जें याचीं रूपें पुल्लिंग जो याच्या सारिखीं जाणावीं.

वर्ग ४.

प्रश्नार्थक सर्वनाम.

३११ **प्रश्नार्थक** सर्वनामें ह्मणजे प्रश्न कर्तव्य असतां ज्या सर्वनामांचा प्रयोग करितात तीं; जसें— कोण, कोणता, कोणचा, काय, कसा, केवढा, कितका, किती, कितीक, इ०.

३१२ **कितीक** हें प्रश्नार्थक, आणि **कित्येक** हें सामान्य सर्वनाम असा भेद जाणावा.

कितीक, **कित्येक**, आणि **कितीएक**, अशा तीन प्रकारें हा शब्द लिहितात. हा शब्द **किती** आणि **एक** हे दोन शब्द मिळून झाला आहे. या शब्दावर स्वरस ठेवून बोलावयाचें असतां निराळे शब्द करून **कितीएक** असें लिहावें; नाहींतर **कित्येक** असें लिहावें.

३१३ **कोण** हें सर्वनाम मनुष्यास लागतें, व **काय** हें वस्तूस लागतें.

कोण याच्या प्रयोगा विषयीं हा वर नियम सांगितला खरा,

परंतु कधीं कधीं तो नियम राहत नाहीं; जसें—'ही कोण वस्तु आहे'; परंतु, या पेक्षां 'ही गाय वस्तु आहे', हें शुद्ध. क्वचित् प्रकार दाखवायाचा असतां **कोण, काय,** यांच्या जागीं **काय, कोण** यांचा प्रयोग करितात. 'काय हो मनुष्य हा!', 'कोण हो तांदूळ हे!', एथें कोणत्या प्रकारचा हा मनुष्य किंवा हे तांदूळ असा अर्थ.

कोण या सर्वनामास विभक्ति लावून दाखवितों.

कोण.

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	कोण.	कोण.
द्वि०	कोणाला–स.	कोणांस–ला–तें.
तृ०	कोणीं, कोणें, कोणाशीं.	कोणीं, कोणांशीं.
च०	(द्वितीये प्रमाणें).	
पं०	कोणाहून.	कोणांहून.
ष०	कोणाचा–ची–चें.	कोणांचा–ची–चें.
स०	कोणांत, कोणाच्यांत.	कोणांत, कोणांच्यांत.
वि०सा०	कोणा, कोणे, कोण्या.	

२१४ **कोण** आणि **कोणता** यांत अर्थभेद इतकाच कीं एकजातीय अशीं अनेक मनुष्यें अथवा वस्तू असल्या, आणि त्यांतून एकास **कोण** अथवा **काय** हें सर्वनाम लावून प्रश्न कर्तव्य असला, तर **कोणता, कोणती, कोणतें,** हीं सर्वनामें, जसें लिंग, वचन, असेल त्या प्रमाणें लागतात; जसें–'यांतून तुला **कोणता** आंबा पाहिजे', परंतु जर ती मंडळी, किंवा तो समुदाय, अनेक प्रकारच्या मनुष्यांनीं अ-

अनुक्रमणिका

थवा अनेक जातीच्या पदार्थांनीं मिश्रित असला, तर मनुष्यवाचकांस **कोण** अ० **कोणतें** हें, इतर प्राण्यांस **कोणतें**, आणि वस्तुमात्रांस **काय**, हीं सर्वनामें लागतात; जसें–'या मंडळींत **कोण** सुंदर आहे'? या घोड्यांमध्यें **कोणता** चांगला आहे'? 'यांतून तुला **काय** पाहिजे'? इ०.

वस्तुमात्रांसही **काय** आणि **कोणतें** हे दोन्ही शब्द लागतात, परंतु यांत सूक्ष्मभेद असा आहे कीं **काय** हें सामान्यतः कोणत्याही वस्तूस लागतें, आणि **कोणतें** हें ज्या निवडून ठेविलेल्या अनेक वस्तु त्यांतून एकीस लागतें.

३१५ **कोणता, कोणचा,** यांचीं विशेषणसामान्यरूपें **कोणत्या, कोणच्या,** अशीं जाणावीं; जसें– '**कोणत्या** घोड्यानें तुला लात मारिली', '**कोणच्या** माणसापासून हें असें क्रूर कर्म घडलें', 'हें **कोणत्या** म्हशीचें रेडूं', '**कोणच्या** देवाला मी भजूं'? इ०.

३१६ **काय** या सर्वनामाचीं विभक्तीचीं रूपें **कसा** या सर्वनामाच्या विभक्तीच्या रूपां प्रमाणें होतात तीं दाखवितों.

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	काय.	काय.
द्वि०	कशाला–स–तें.	कशांनां–ला–स.
तृ०	कशानें–शीं.	कशांनीं–हीं–शीं.
च०	कशास–ला.	कशांस–नां–ला.
पं०	कशाहून.	कशांहून.
ष०	कशाचा–ची–चें.	कशांचा–ची–चें.
स०	कशांत.	कशांत.
वि०सा०	कशा.	कशां.

विचारपूर्वक पाहिलें असतां हीं **काय** या सर्वनामाचीं रूपें होत, आणि **कसा** या सर्वनामाचींही रूपें होत; जेव्हां **काय** यास विभक्ति लावण्याचें अगत्य पडतें तेव्हां **कसा** याच्या रूपांचा प्रयोग करण्यांत येतो; जसें—'अहो पंतोजी तुह्मीं या मुलाला **कशानें** मारिलें' ह्मणजे काय वस्तुनें मारिलें, कोणत्या पदार्थानें मारिलें असा अर्थ; 'त्याची कीर्ति **कशानें** झाली' ह्मणजे कोणत्या कर्मानें झाली, अथवा कशा प्रकारें झाली; 'हें लांकूड **कशाचें**', ह्मणजे कोणत्या झाडाचें असा अर्थ.

३१७ केव्हां केव्हां **काय** याचा शुद्ध अव्यया प्रमाणें प्रयोग होतो; जसें–'तूं ही पोथी लिहिलीस **काय**?', 'तो **काय** मनुष्य आहे, पशु तसा पशु' या वाक्यांत हें अव्यय जाणावें.

३१८ **केवढा, कितका,** यांहींकरून पदार्थांचें महत्व अथवा मान दाखविलें जातें; यांचीं आकारान्त नामां प्रमाणें विभक्तीचीं रूपें होतात.

३१९ **किती, कितीक,** यांहींकरून संख्या दर्शविली जाती. **किती** या सर्वनामास विभक्ति लागत नाहींत; **कितीक** यास लागतात; जसें– '**कितिकांनीं** हें काम केलें', अथवा, 'किती जणांनीं हें काम केलें'. यांचीं सामान्यरूपें **किती** आणि **कितीक** जाणावीं. जसें 'हें काम **किती** माणसांनीं अ० **कितीक** माणसांनीं मिळून केलें'.

किती यास विभक्तिप्रत्यय लावायाचे असतां **जण** (जन याचा अपभ्रंश) हा शब्द पुढें जोडून मग त्या संयुक्तशब्दास ते प्रत्यय लावावे.

अनुक्रमणिका

वर्ग ५.

सामान्य सर्वनाम.

३२० सामान्य सर्वनामें ह्मणजे ज्या सर्वनामांचा अर्थ सामान्यें करून वर्ततो तीं; जसें—कोणी, काय, अमुक, अमका, फलाणा, आपण, सर्व, अवघा, सगळा, भलता, भलतसा, कांहीं, कसा, स्वतां, हरएक, वरकड, परस्पर, अन्योन्य, इ०.

३२१ **कोणी** या सर्वनामाचें विशेषणसामान्यरूप '**कोण्या** असें जाणावें. उ०– '**कोण्या** पशूचा स्वभाव कसा असतो, आणि **कोण्या** पशूचा कसा असतो', '**कोण्या** पाखराचा रंग काळा असतो, आणि **कोण्या** पाखाराचा शुभ्र', '**कोण्या** गाईला दूध फार असतें, आणि **कोण्या** गाईला थोडें'.

कोण आणि **कोणी** या शब्दांच्या विशेषणसामान्यरूपां विषयीं या भाषेंत फार गोंधळ झाला आहे. प्रथम तर मला असें दिसतें कीं **कोण** हेंच मुख्य सामान्य सर्वनाम होय, आणि त्याचा सामान्य अर्थ असतां **कोणी** हें प्रथमेचें रूप होतें; कारण, **कोणी** हें जर पृथक् सामान्य सर्वनाम मानिलें, तर यास विभक्तिच लागत नाहींत. **कोण** या सर्वनामाचीं जीं विभक्तीचीं रूपें तींच **कोणी** याचीं विभक्तीचीं रूपें मानणें प्राप्त होतें. त्यापक्षीं **कोणी** हें मुख्य सर्वनाम नव्हे; अथवा **कोणी** हें पृथक् सर्वनाम मानून त्याचीं **कोण** शब्दा सारिखीं विभक्तीचीं रूपें मानिलीं तथापि कांहीं मोठा दोष येतो असें नाहीं. आतां **कोण** आणि **कोणी** याचें विशेषणसामान्यरूप अनेक प्रकारचें आढळतें— **कोणा**, **कोणे**, **कोण्या**, अशीं तीन विशेषणसामान्यरूपें आढळतात; जसें— '**कोणा** पशूंचा स्वभाव कसा असतो, **कोणे** पशूंचा स्वभाव कसा असतो, आणि **कोण्या** पशूंचा स्वभाव

कसा असतो' 'यांत पृ० ६९, ले० १८८, या नियमा प्रमाणें पहिलें असतां **कोणा** हेंच विशेषणसामान्यरूप प्रशस्त होय. तथापि स्त्रीलिंगीं व बहुधा पुल्लिंगींही याचा प्रचार फारसा नाहीं; '**कोणा** बायकोला तोरा फार असतो आणि **कोणा** बायकोचा स्वभाव भोळा असतो', असें फारसें कोणी बोलत नाहींत. '**कोण्या** बायकोला इ०' असें बोलण्याचा प्रघात फार आहे; ह्मणून एकदेशीय रूढि आणि व्याकरण हीं दोन्हीं ज्यास अनुकूळ असें **कोणा**, आणि ज्याची रूढि फार आहे असें **कोण्या**, हीं दोन **कोण** याचीं विशेषणसामान्यरूपें ठरविलीं आहेत.

३२२ **कोण** याज वर नेट ठेवून बोलायाचें असतां विकल्पें–कोण्ही, कोण्हास, कोण्हाहून, अशीं रूपें होतात; जसें– 'तेथें कोण्ही नाहीं', ह्मणजे कोणीही अ० कोणी एक नाहीं असा अर्थ. अशा ठिकाणीं **कोण्ही** हें सामान्य सर्वनाम मानावें.

३२३ **अमुक** याचें सामान्यरूप **अमुका** होतें; जसें– अमुकास, अमुकांनां, अमुकांहीं, इ०. याचें विशेषणसामान्यरूप **अमुक** असेंच होतें; जसें– **अमुक** गृहस्थानें मला सांगितलें, इ०.

३२४ **अमका** याचें सामान्यरूप **अमक्या** होतें; जसें– **अमक्यानें**, **अमक्याचा**, इ०; '**अमक्या** ब्राह्मणानें **अमक्या** क्षेत्रीं यज्ञ केला'.

३२५ याच प्रमाणें **अमुक**, **अमका**, यांचीं अनुगामी **तमुक**, आणि **तमका**, हीं सर्वनामें होत; जसें– 'या रामाची रात्रदिवस घिससीस, **अमुक** मला असें बोलतो आणि **तमुक** तसें करितो', '**अमक्यानें** रांधिलें आणि **तमक्यानें** खाल्लें', इ०. **तमुक**, **तमका**, यांचा नुस्ता प्रयोग होत नाहीं.

अनुक्रमणिका

३२६ **अमुकतमूक, अमकातमका,** हीं संयुक्तसामान्य सर्वनामें होत; जसें– 'घरांत अमुकतमूक जिन्नस लागेल तो कोण आणील'? परंतु यास विभक्ति लागल्या असतां उभय पदांसही विशेषणसामान्यरूप होतें; जसें–'अमक्यातमक्यानें येऊन घरांत काम केलें मग चाकर ठेवण्याची काय गरज'.

३२७ **आपण** या सामान्य सर्वनामास विभक्ति लावून दाखवितों; यास एकवचन नाहीं.

आपण.

विभक्ति.		**अनेकवचन.**
प्र०	आपण.	
द्वि०	आपणांला–स.	आपल्याला*–स–नां.
तृ०	आपण, आपणांहीं–शीं.	आपल्यानें, आपल्याच्यानें–शीं.
च०	आपणांला–स.	आपल्यानां–स.
पं०	आपणांहून.	आपल्याहून.
ष०	आपला–ली–लें.	
स०	आपणांत.	आपल्यांत.
वि० सा०	आपण, आपणा.	आपल्या.

आपण हें सामान्य सर्वनाम प्रथम द्वितीय आणि तृतीय पुरुष यांचें वाचक होय. आपणास प्रतिष्ठितपणानें बोलायाचें

---

* **आपल्याला, आपल्यांनीं,** इ० रूपें कोणी **आपला** या विशेषणाचीं समजेल तर तसें नाहीं; विशेषणाचीं हीं अशींच रूपें होतात; परंतु त्याचा अर्थ निराळा असतो. '**आपल्याला** सांगूं नका', '**आपल्याहून** तो चांगला आहे', ह्मणजे एथें शुद्ध आपणाला, आपणांहून हाच अर्थ.

अनुक्रमणिका

असतां **मीं** आणि **तूं** यांच्या स्थानीं **आपण** याचा प्रयोग करितात; जसें—'**आपण** तेथें गेलों असतों परंतु अलिकडेस त्या मंडळींत जाण्याची **आपली** शोभा नाहीं', '**आपण** जर इतकें माझें कार्य कराल तर **आपणास** मोठें यश मिळेल','मग **आपण** निघून गेले'.

असा प्रयोग केला असतां कचित एकवचनाचेहि विभक्तिप्रत्यय लागतात.

आह्मीं आणि **आपण** यां मध्यें केव्हां असा अर्थभेद असतो,—तुह्मीं आह्मीं मिळून असा अर्थ असतां **आपण** याचा प्रयोग करितात; जसें—'आह्मीं कारकून पण आपण सर्व सरकारचे चाकर तर खरे', इ०. **आपण** याचा अर्थ स्वतः असाहि होतो जसें;–मीं आपण त्यास बोलवायास गेलों होतों.' 'त्यांस सांगा कीं तुह्मीं आपला मुलगा तेथें पाठवा' इ०.

आपला हें केव्हां वाक्यपूरक अव्ययहि होतें; जसें– 'मीं **आपला** एथेंच बसेन त्यांत तुझें काय जातें', 'तो **आपला** गरीब' 'ती **आपली** कांहींतरीं बोलत्ये' इ०.

३२८ **स्वतः**, आणि याचा अपभ्रंश **स्वतां**, हीं केव्हां केव्हां सर्वनामें असतात आणि केव्हां केव्हां अव्ययें; जेव्हां सर्वनामें असतात तेव्हां यांस विभक्ति लागतात. जसें–'हें मला स्वतांला पाहिजे', 'ही माझी स्वतांची दौलत', इ०.

सर्वनाम असतां **स्वतां**, आणि अव्यय असतां **स्वतः** लिहावें हें मला बरें दिसतें.

३२९ **किती**, **कोण**, या सर्वनामांशीं, आणि **दर**, **हर**, या अव्ययांशीं, **एक** हा शब्द जोडिला असतां **कित्येक**, **कोणेक**, **दरेक**, **हरेक**, अशीं सामान्य सर्वनामें होतात. याचीं विशेषणसामान्यरूपें **कित्येका**, **कोणेका**, **दरेका**, **हरेका**, अशीं होतात.

अनुक्रमणिका

परंतु वक्त्याच्या मनांत जर अंमळ नेट देऊन बोलायाचें असलें तर या शब्दाचें पृथक् उच्चारण करून पृथक् लिहिण्याच्याहि संप्रदाय आहे, जसें–**कितीएक, कोणीएक, हरएक,** आणि **दरएक**; आणि तसें नेट देऊन बोलायाचें असतां समयविशेषीं विभक्तींनीं पूर्व शब्दांस विशेषणसामान्यरूप होतें; जसें–'**कोणाएकानें** मला येऊन सांगितलें कीं आतां मज जवळ पैका नाहीं ह्मणोन मला कोणीएक पुसत नाहीं', 'इतकें गोपाळरावांचें कर्ज फिटलें ह्मणजे मग मला **कोण्याएकाचें** भय राहिलें नाहीं', इ०.

विभाग ३.

विशेषणविचार.

३३० विशेषण ह्मणजे नामाच्या गुणाचा दर्शक जो शब्द तें. जसें–काळा, बरा, लंगडा, शहाणा, मूर्ख, इ०.

३३१ विशेषणांत मुख्य भेद दोन आहेत;–एक **गुणविशेषण** आणि दुसरें **संख्याविशेषण.** वर सांगितलीं तीं गुणविशेषणें, आणि संख्यारूपगुणवाचक जे **शब्द** जसें–एक, दोन, इ० तीं संख्याविशेषणें होत.

३३२ ज्या नामाचा गुण विशेषण दाखवितें, तें नाम त्या विशेषणाचें **विशेष्य** असें ह्मणतात. या वरून असें स्पष्ट होतें कीं विशेषण आणि विशेष्य यांचा नित्यसंबंध असतो, ह्मणजे जें विशेषण असतें त्याला विशेष्य असतेंच असतें. 'शाहाणा मुलगा', एथें **शहाणा** हें विशेषण मुलग्याचा गुण दाखवितें, ह्मणून **मुलगा** हें त्याचें **विशेष्य** होय.

३३३ नामास जशीं लिंगवचनादिकेंकरून कार्यें होतात, तशीं विशेषणासही होतात.

३३४ या भाषेंत विशेष्याच्या लिंगवचनाच्या अनुरोधानें विशेषणाचें रूप फिरतें.

अनुक्रमणिका

वर्ग ९.

गुणविशेषण.

३३५ अकारान्त विशेषणास लिंगाचीं कार्यें होत नाहींत, त्यांचीं तिहीं लिंगीं समान रूपें होतात. उदाहरण–तो पुरूष नष्ट, ती बायको नष्ट, तें पोर नष्ट, इ०.

३३६ आकारान्त विशेषणांचा भरणा फार आहे, आणि त्याच्या स्त्रीलिंगीं आकाराच्या ठिकाणीं ई, आणि नपुंसकलिंगीं एँ, असे आदेश होतात; उदाहरण–**लंगडा** पुरूष, **लंगडी** गाय, **लंगडें** कुत्रें.

३३७ आकारान्त विशेषणां शिवाय दुसऱ्या विशेषणांस लिंगत्रयीं कांहीं विशेष होत नाहीं; जसें–कडू भोंपळा, कडू भाजी, कडू मेथकूट.

३३८ यांचीं वचनें नामा प्रमाणें शब्दांच्या अंत्यस्वरांवरून होतात. जसें–तो तांबडा, ते तांबडे; ती आंधळी, त्या आंधळ्या; तें लंगडें, तीं लंगडीं; इ०.

३३९ महाराष्ट्र भाषेंत विशेषणाचा तारतम्यभाव असतां इतर भाषां प्रमाणें विशेषणास कांहीं विशेष होत नाहीं; ह्मणजे, अमुक अमक्या गुणानें दुसऱ्या पेक्षां अथवा सर्वांपेक्षां अधिक असा अर्थ असतां विशेषणास कांहीं विशेष कार्य होत नाहीं. परंतु क्वचित् संस्कृत शब्दांस त्या भाषेच्या नियमा प्रमाणें **तर** आणि **तम** हे प्रत्यय होऊन प्राकृतांत आढळतात; जसें–पुण्य, पुण्यतर, पुण्यतम; विद्वान्, विद्वत्तर, विद्वत्तम; लघु, लघुतर, लघुतम; इ०.

३४० आकारान्त विशेषणाचें विशेष्य जर सविभक्तिक अथवा सशब्दयोगिक असलें, तर त्या विशेषणाचें जें सा-

मान्यरूप तें योजिलें पाहिजे; जसें—'**आंधळ्या** माणसानें **बहिऱ्या** माणसास हांसूं नये'. '**चांगल्या** प्रतिष्ठत गृहस्थानें **हलक्या** लोकां वर इतकें प्रेम ठेवूं नये'.

३४१ विकल्पें हें विशेषणाचें सामान्यरूप त्या विशेषणाच्या अंत्यास **ए** अथवा **ये** आदेश केल्यानेंहि सिद्ध होतें. '**आंधळे** मनुष्यानें **बाहिरे** मनुष्यांस हासूं नये', '**तांबड्ये** चंद्रकळे वर **हिरव्ये** चोळीची शोभा विशेष' इ०. परंतु यांत वरल्या नियमांत जें रूप सांगितलें आहे तें विशेष ग्राह्य होय. या विषयीं खालीं उपपादन केलें आहे.

पहिल्या आवृत्तींत असा नियम केला होता कीं विशेषण जर पुंल्लिंग असलें तर आकारान्त विशेषणाचें जें विभक्तिसामान्यरूप तें विशेषणसामान्यरूपाच्या स्थानीं योजावें; आणि विशेषण जर स्त्रीलिंग असलें, तर त्याच्या अंत्य स्वरास ए अ० ये आदेश करून तें विशेषणसामान्यरूप योजावें. परंतु अलिकडेस या नियमा वर फार विचार करितां माझ्या बुद्धीस असें वागूं लागलें आहे कीं हा नियम केवळ स्वेच्छानुरूप होय, यास आधार ह्मणोन नाहीं. कारण, विचारपूर्वक पाहिलें असतां असें ध्यानांत येतें कीं या भाषेंत आकारान्त विशेषणाचें जें विशेषणसामान्यरूप होतें तें कांहीं पुढल्या विशेष्याच्या लिंगाच्या अनुरोधानें होतें असें नाहीं; तसें जर असतें तर 'बऱ्ये मनुष्यानें', 'हलक्ये पुरुषानें', 'भल्या बायकोनें', 'काळ्या गाई वर', इ० असा प्रयोग न होतां 'भल्या पुरुषानें', आणि 'भल्ये स्त्रियेनें' असाच विशेष्याच्या लिंगानुसंधानेंकरून प्रयोग होता. तेव्हां मुळीं ही जी आशंका होती कीं विशेषणसामान्यरूप पुढल्या विशेष्याच्या लिंगा वरून होतें ती दूर झाली; आतां **भल्या**, **भले**, आणि **भल्ये**, अशीं जीं तीन रूपें होतात त्यांतून विशेष ग्राह्य कोणतें ही आशंका राहिली; त्यास, पृ० ६९, लें० १८८ वा, या नियमा प्रमाणें विशेषणाचें जें विभक्तिसामान्यरूप तेंच विशेषणसामान्यरूप होतें असा बहुधा नियम आहे; तेव्हां आकारान्त पुंल्लिंग व नपुंसकलिंग

विशेषणांचीं सामान्यरूपें जीं **ब-या, भल्या, तांबड्या,** इ० तींच त्यांचीं विशेषणसामान्यरूपें जाणावीं; **बरे** अ० **ब-ये, भले** अ० **भल्ये, तांबडे** अ० **तांबडये,** हीं कांहीं पुल्लिंगाचीं नपुंसकाचीं अथवा स्त्रीलिंगाचीं सामान्यरूपें नव्हत. **बरी, भली,** इ० स्त्रीलिंगाचीं विभक्तिसामान्यरूपें एकवचनीं **बरी, भली,** आणि अनेकवचनीं **ब-यां, भल्यां,** अशीं होतात. परंतु बरे अ० **ब-ये, भले,** अ० **भल्ये,** अशीं होत नाहींत. संबोधनीं मात्र विकल्पें **बरे** अ० **ब-ये, भले** अ० **भल्ये,** अशीं रूपें होतात. परंतु सर्वव्यापक अशीं विभक्तिसामान्यरूपें टाकून केवळ एकदेशीय आणि वैकल्पिक अशा नुसत्या संबोधनाचें रूप ग्रहण करावें यास कांहीं आधार दिसत नाहीं. **बरी, भली,** हीं जीं विभक्तिसामान्यरूपें तींतर विशेषणसामान्यरूपें होत नाहींत; परंतु पुल्लिंगाचीं आणि नपुंसकाचीं विभक्तिसामान्यरूपें, आणि स्त्रीलिंगीं अनेकवचनाचीं विभक्तिसामान्यरूपें, एकच होत, आणि तीं सर्वत्र लागतात; तेव्हां त्यांचेंच ग्रहण केलें असतां १८८ व्या नियमास बाध नयेतां मात्क्यानें सर्वव्यापक अशा रूपाचें ग्रहण होईल; अतएव, विशेष्याच्या लिंगा वर दृष्टि नदेऊन **बरे** अ० **ब-ये, भले** अ० **भल्ये,** अशा रूपाचें ग्रहण नकरितां सर्वत्र आकारान्त पुल्लिंग विशेषणाचें विभक्तिसामान्यरूप जें **ब-या, भल्या,** त्याचेंच ग्रहण करावें हें माझ्या बुद्धीस प्रशस्त दिसतें.

३४२ इतकी खटपट आकारान्त विशेषणा विषयीं; वरकड विशेषणांस सविभक्तिक अथवा सशब्दयोगिक विशेष्याच्या योगानें कांहीं विशेष कार्य होत नाहीं ; जसें— 'आईबापें **अशक्त** मुलांची अधिक चिंता घेतात', '**कडू** औषधांचें उगीच सेवन करणें कोणास आवडत नाहीं', '**पैठणी** पागोट्याचा कलाबूत मात्र पाहून घ्यावा', 'या **लाजाळू** पोराच्यानें काय व्हावयाचें आहे', इ०.

३४३ विशेषणांचें जर सामान्येंकरून विधान कर्तव्य असलें तर नामां प्रमाणें त्यांस विभक्त्यादि कार्यें होतात;

उदाह०—'**ब-यांच्या** मंडळींत बसावें,' '**चांगल्यांची** संगति धरावी', '**आंधळ्यांस पांगळ्यांस** सहाय होत असावें', **विद्वानांची** संगत केली असतां दोन अक्षरें येतील', इ० स्थळीं ज्या विशेषणाचा प्रयोग विशेष्याची अपेक्षा नठेवितां बहुधा होतो, अथवा ज्याच्या विशेष्याचा बोलण्याचा प्रघात नाहीं, अशा विशेषणांस नामें मानिलीं असतां चिंता नाहीं; जसें—आंधळा, विद्वान्, पांगळा, इ० या विशेषणां पुढें मनुष्यादि विशेष्यांचा प्रयोग नकरितां शुद्ध नामा प्रमाणें यांचा प्रयोग करितात ह्मणोन हीं नामें ह्मणावीं. परंतु बरा, चांगला, इ० शब्दां पुढें कचित् विशेष्याचा अध्यहार होतो ह्मणोन यांस विशेषणें मानून पुढल्या विशेष्याचा अध्याहार मानावा हें मला नीट दिसतें.

वर्ग २.

संख्याविशेषणें.

३४४ संख्याविशेषण ह्मणोन जो विशेषणाचा भेद वर सांगितला, त्याचे **संख्यावाचक, संख्यापूरक, संख्यावृत्तिवाचक**, आणि **संख्यांशवाचक**, हे चार विभाग आहेत.

प्रकरण १.

संख्यावाचकें.

३४५ **एक** याचीं पुल्लिंगीं आणि नपुंसकीं अकारान्त नामा प्रमाणें विभक्तींचीं रूपें होतात. याचें विशेषणसामान्यरूप **एका** असें जाणावें; हा शब्द नित्य एकवचनांत असतो.

एक्या, एके, हीं विशेषणसामान्यरूपें व्याकरण रीतीवरून प्रशस्त नाहींत.

३४६ **एक** याचीं स्त्रीलिंगीं भिंतीच्या गणा प्रमाणें विभक्तीनीं रूपें होतात.

३४७ **दोन, तीन, चार,** यांस विभक्तींच्या योगानें **दोहों, तिहीं, च्योहों,** असे आदेश होतात; नंतर प्रथम विभक्तिप्रकारा प्रमाणें याचें लिंगत्रयीं सामान्यरूप होतें. हे शब्द निरंतर अनेकवचनांत असतात. **चार** यास **चौहों** हा विकल्पें आदेश होतो.

विभ०.	**अनेकव०.**	**अनेकव०.**
प्र०	दोन.	तीन.
द्वि०	दोहोंनां–ला–स.	तिहींनां–ला–स.
तृ०	दोहोंनीं–शीं.	तिहींनीं शीं.
वि०सा०	दोहों, दोन.	तिहीं, तीन.

विभ०	**अनेकव०.**
प्र०	चार.
द्वि०	च्योहोंनां–ला–स. चारांनां–ला–स.
तृ०	च्योहोंनीं–शीं. चारांनीं–हीं–शीं.
वि०सा०	च्योहों, चार.

कोणी **दोंहला, चोंहला,** अशीं रूपें लिहितात, परंतु तीं व्याकरणदृष्टीनें अशुद्ध होत; कारण, **दोन, चार,** यांस **दोंह, चोंह,** असे जर आदेश केले तर यांस पृ० ७२, ले० १९९वा, या नियमा प्रमाणें सामान्यरूपीं दीर्घादेश केला पाहिजे; तेव्हां– **दोंहांला, चोंहांनीं,** अशीं रूपें होऊं लागतील. ह्मणोन **दोहों, च्योहों,** हेच आदेश मानून पहिल्या विभक्तिप्रकारा प्रमाणें यांचीं **दोहोंला, च्योहोंशीं,** अशींच रूपें लिहिलीं पाहिजेत.

३४८ पांचा पासून पुढें अकारान्त संख्याविशेषणांचीं

अनुक्रमणिका

दुसऱ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें रूपें जाणावीं.

३४९ **सहा, दहा, अकरा,** इ० आकारान्त संख्याविशेषणांचीं विभक्तिसामान्यरूपें पहिल्या विभक्तिप्रकारा प्रमाणें जाणावीं.

३५० **दोन, तीन, चार,** हे शब्द जर मनुष्यवाचक नामाचीं विशेषणें असलीं तर समुच्चय अर्थ असतां, अथवा ज्यां विषयीं कांहीं सांगितलें आहे तितके सारे, असा अर्थ असतां, यांच्या स्थानीं लिंगानुक्रमें **दोघे, तिघे, चौघे; दोघी, तिघी, चौघी;** आणि **दोघें, तिघें, चौघें;** हे आदेश होतात.

३५१ **दोघे, तिघे, चौघे,** यांचीं सहाव्या विभक्तिप्रकारा प्रमाणें सामान्यरूपें होतात; जसें—

विभ०.	**अनेकव०.**
प्र०	दोघे.
द्वि०	दोघांनां—ला—स.
तृ०	दोघांनीं—हीं—शीं.
वि० सा०	दोघां.

याच प्रमाणें—**तिघे, चौघे,** यांचीं रूपें जाणावीं.

३५२ **दोघी** याचें पहिल्या विभक्तिप्रकारा प्रमाणें सामान्यरूप जाणावें.

विभ०.	**अनेकव०.**
प्र०	दोघी.
द्वि०	दोघींनां—स.
तृ०	दोघींनीं—हीं—शीं.
वि० सा०	दोहों, दोघीं.

अनुक्रमणिका

याच प्रमाणें—**तिघी**, **चौघी**, यांचीं रूपें जाणावीं.

हा जो आदेश होतो त्याचा प्रयोग बहुधा मनुष्यवाचक विशेष्य असतां फार, इतर प्राणिवाचक असतां क्वचित् जाणावा; जसें—'या **दोघां** पुरुषांहीं मिळून यास मारिलें', आणि 'हें दळण **दोघीं** बायांनीं दळिलें', 'या **दोहों** घोड्यांनीं हे चार मण हरबरे खाल्ले', 'हें इतकें दूध या **तिहीं** गाईचें'; यांत बहुधा जेथें समुच्चयार्थ असतो तेथें **दोघे**, **तिघे**, इत्यादि शब्दांचा प्रयोग विशेषेंकरून होतो; 'आमच्या घरीं **तीन** गाई व्याल्या', ह्मणजे सामान्यतः पुष्कळ गाई होत्या त्यांतून तीन व्याल्या, परंतु 'आमच्या **तिघी** गाई व्याल्या', ह्मणजे तिहीं गाईंचा समुच्चय अथवा ज्या तीन ह्मणोन सर्वांस माहित आहेत त्या तीन गाई व्याल्या इतका सूक्ष्म अर्थ निघतो; 'कृष्णंभटास दोन मुलगे झाले, मग ते महायात्रेस गेले, पुढें तेथें ते दोघे मुलगे मोठ्या लौकिकास चढले'.

३५३ **जण**, हा शब्द पुढें असतां **दोन**, **तीन**, **चार**, यांच्या स्थानीं ३५० व्या लेखा प्रमाणें आदेश होतात; जसें—चौघेजण, दोघींजणीं, तिघीजणीं, चौघीजणीं, दोघेंजणें, 'हें पांच जणाचें काम या तिघांजणांनीं आटोपिलें' इ०.

प्रकरण २.

संख्यापूरकें अ० क्रमवाचकें.

३५४ **संख्यापूरक** विशेषण ह्मणजे संख्येचें पूरण करणारा जो अर्थ तद्वाचक जो शब्द तें; जसें—**पहिला**, **दुसरा**, **तिसरा**, **पांचवा**, **दहावा**, इ०.

एथें **पहिला** ह्मटलें ह्मणजे एक जी संख्या तिचें पूरण करणारा जो पदार्थविशेष तद्बोधक शब्द होय; तसेंच—**दुसरा**,

तिसरा, **हजारावा**, हीं **दोन**, **तीन**, **हजार**, या संख्याचीं पूरकें होत.

३५५ **एक** हा मुख्य शब्द असतां याचें संख्यापूरक **पहिला** होतें, **दोन** याचें **दुसरा**, **तीन चार** यांचीं **तिसरा**, **चौथा**, अशीं संख्यापूरकें होतात.

३५६ पांचा पासून पुढें सर्व संख्यावाचकांस **वा**, **वी**, **वें**, इ० लिंगवचनांच्या नियमा प्रमाणें प्रत्यय लाविले ह्मणजे संख्यापूरकें सिद्ध होतात.

३५७ दहां पासून पुढें जितकीं संख्यावाचकें त्यांच्या अंत्यस्वरास दीर्घ करून संख्यापूरक **वा**, **वी**, **वें** हे लिंगवचनां प्रमाणें प्रत्यय लागतात; जसें—**विसावा**, **शंभरावा**, **हजारावी**, **लक्षावें**, इ०.

३५८ पुल्लिंग आणि नपुंसकलिंग असतां यांचीं विभक्तिसामान्यरूपें तिसऱ्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; आणि स्त्रीलिंग संख्यापूरकांचीं पहिल्या विभक्तिप्रकारा प्रमाणें होतात; जसें—

पुल्लिंग.

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	पहिला.	पहिले.
द्वि०	पहिल्याला—स.	पहिल्यांना—ला—स.
तृ०	पहिल्यानें—शीं.	पहिल्यांहीं—नीं—शीं.
वि० सा०	पहिल्या.	पहिल्यां.

याच प्रमाणें—दुसरा, तिसरा, चौथा, पांचवा, हजारावा, इ० संख्यापूरकांचीं विभक्तींचीं रूपें जाणावीं.

प्रथमा वर्ज करून नपुंसक संख्यापूरकें जीं दुसरें, तिसरें, चौथें, इ० याचींही विभक्तींचीं रूपें याच प्रमाणें जाणावीं.

अनुक्रमणिका

स्त्रीलिंग.

विभ०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	पहिली.	पहिल्या.
द्वि०	पहिलीला–स.	पहिल्यांना–ला–स.
तृ०	पहिलीनें–शीं.	पहिल्यांहीं–नीं–शीं.
वि० सा०	पहिल्या.	पहिल्यां.

याच प्रमाणें–दुसरी, तिसरी, चौथी, पांचवी, इ० स्त्रीलिंग संख्यापूरकांचीं विभक्तींचीं रूपें जाणावीं.

प्रकरण ३.

आवृत्तिवाचकें.

३५९ संख्यावाचकांचा आवृत्यर्थ असतां त्यांस **पट** हा प्रत्यय लागतो; जसें–**एकपट**, **पांचपट**, **सातपट**, इ०.

३६० **दोन**, **तीन**, **चार**, यांस या प्रत्ययाच्या योगानें **दु**, **ति**, **चौ**, हे अनुक्रमें आदेश होतात; आणि **दोन**, **तीन**, हीं उपपदें असतां विकल्पें **पट** यांतील **प**स द्वित्व होतें; जसें–**दुपट**, **दुप्पट**; **तिपट**, **तिप्पट**. **दहा** यास या प्रत्ययाच्या योगानें विकल्पें **दस** आदेश होतो; जसें–दहापट, दसपट.

३६१ क्वचित् संस्कृत रीती प्रमाणें **गुणित** हा शब्द लागून संस्कृत संख्यावाचकां वरून हीं आवृत्तिवाचकें सिद्ध होतात; जसें–द्विगुणित, त्रिगुणित, चतुर्गुणित, शतगुणित, सहस्रगुणित, इ०.

प्रकरण ४.

संख्यांशवाचकें.

३६२ संख्येच्या अंशाचीं दर्शक जीं विशेषणें तीं सं-

ख्यांशवाचकें ह्मणावीं; जसें—पाव, अर्धा, पाऊण, सवा अ० सव्वा, दीड, अडीच, इ०.

३६३ कित्येक संख्यांशवाचकें तर सिद्ध शब्दच होत; जसें—पाव, दीड, अडीच, इ०.

३६४ परंतु सर्वत्र नियम असा आहे कीं, पाव अथवा एकचतुर्थांशानें अधिक अशा संख्येचें विधान कर्तव्य असतां त्या संख्येस मागें **सवा** अ० **सव्वा** हा आगम होतो; जसें—सवादोन, सव्वादोन; सवातीन, सव्वातीन; सवाचार, सव्वाचार; इ०.

कोणी **सवा**च्या ठिकाणीं **सव्वा** असें लिहितात. परंतु सर्वत्र एक रीत ठेवून **सवा** लिहावें हें बरें. नेट देऊन बोलायाचें असतां **व**स द्वित्व केल्यास चिंता नाहीं; जसें—'मी त्यास सव्वा पांच रुपये कींहो द्यावायास केले'.

३६५ अर्धा अथवा एकद्वितीयांशानें अधिक असें विधान असतां त्या त्या संख्येस **साडे**, आणि पाऊण अथवा तीनचतुर्थांशानें अधिक असें विधान असतां एकाधिक संख्येस **पाउणें**, असे मागें आगम होतात; जसें—साडेतीन, साडेचार, साडेसात; पाउणेआठ, पाउणेपन्नास, इ०.

पावणे पेक्षां **पाउणे** हें शुद्ध होय. पा+उणे=**पाउणे**.

विभाग ४.

क्रियापदविचार.

३६६ क्रियापद ह्मणजे ज्या शब्दें करून कोणत्याही व्यापाराचा अथवा स्थितीचा बोध होतो तें; जसें—करितो, बोलतोस, चालतों, असतात, राहतात, पाहिलें, जाईल, इ०.

३६७ क्रियापदाचें जें मूळ, ह्मणजे प्रत्ययादिक वर्ज

करून जें मूळचें रूप त्यास **धातु** ह्मणतात; जसें—ह्मण, बस, अस, हो, कर, राह, पाह, इ०.

हे धातु जाणवयाचे असतां बहुधा त्यां पुढें **णें** हा स्वार्थी प्रत्यय लावून त्यांचीं रूपें लिहिण्याचा प्रघात पडला आहे; जसें—ह्मणणें, बसणें, असणें, होणें, करणें, राहणें, पाहणें, इ०.

३६८ कित्येक धातु अव्युत्पन्न ह्मणजे सिद्ध असतात; जसें— होणें, असणें, निजणें, भिणें, पाहणें, खाणें, ऐकणें, इ०.

३६९ कित्येक धातु व्युत्पन्न ह्मणजे साधित असतात; जसें—विझवणें, भिवडावणें, देविवणें, अंगीकारणें, अनुवादणें, अभिलाषणें, माणसाळणें, भोळसावणें, खुळावणें, इ०.

३७० कित्येक धातु अनुकरणवाचक असतात; जसें—चकचकणें, फटफटणें, धगधगणें, हडबडणें, खदखदणें, गुणगुणणें, वचवचणें, टकमकणें, इ०.

३७१ क्रियापदाचे मुख्य भेद दोन प्रकारचे आहेत, त्यांत अर्थावरून पांच, आणि रूपा वरून तीन; ते असे—**सकर्मक**, **अकर्मक**, **उभयविध**, **भावकर्तृक**, आणि **सहाय**,* हे पांच शुद्ध अर्था वरून; आणि **शक्य**, **प्रयोज्य**, **गौण**, अथवा **सिद्ध**, हे तीन रूपा वरून.

३७२ क्रियापदास **रूप**, **भेद**, **अर्थ**, **प्रयोग**, **काळ**, **पुरुष**, **लिंग**, **वचन**, हीं असतात.

वर्ग १.

सकर्मक क्रियापदें.

३७३ सकर्मक क्रियापद ह्मणजे कोणतीही क्रिया

---

* हा निराळा भेद नमानिला तथापि चालेल, कारण याचा अंतर्भाव सकर्मक आणि अकर्मक यांत केला असतां होईल.

अनुक्रमणिका

अथवा व्यापार कर्त्या पासून निघून ज्याचें व्यापारफल-भोक्तृत्व अन्य विषया कडेस असतें तें; जसें—'कृष्णानें कंस मारिला', या वाक्यांत **मारिला** या क्रियेचा कर्त्ता कृष्ण, या पासून मारणें हा व्यापार उत्पन्न होऊन त्याचें जें फल त्याचें भोक्तृत्व कंस जो अन्य विषय त्याज कडेस आलें; ह्मणोन **मारिला** हें सकर्मक क्रियापद; याच प्रमाणें—देतो, घेतो, पाहतो, करील, भरील, इ० सकर्मक क्रियापदें जाणावीं.

वर्ग २.

अकर्मक क्रियापदें.

३७४ ज्या क्रियापदास कर्म नाहीं, ह्मणजे जेथें कर्त्या पासून व्यापार उत्पन्न होऊन त्याचें फलभोक्तृत्वही त्याज कडेसच असतें त्यास **अकर्मक** ह्मणावें; जसें—'हरि निजतो' या वाक्यांत हरि हा कर्त्ता, या पासून निजण्याचा व्यापार उत्पन्न होतो, आणि त्याचा फलभोक्ताही तोच आहे, ह्मणोन **निजतो** हें अकर्मक क्रियापद; याच प्रमाणें—बसतो, उठतो, फिरतो, जातो, येतो, हंसतो, थकतो, इ०.

प्रकरण १.

सकर्मक आणि **अकर्मक** क्रियापदांचें विवेचन.

३७५ सकर्मक किंवा अकर्मक क्रियापद ओळखून काढण्याची मुख्य खूण अशी आहे कीं, ज्या क्रियापदास 'काय' हें प्रश्नार्थक सर्वनाम लावून प्रश्न केला असतां ज्या पासून उत्तर निघण्याचा संभव असतो तें सकर्मक क्रियापद

अनुक्रमणिका

जाणावें; जसें– 'तो लिहितो, जेवतो, मारील, पुजील'; एथें–काय लिहितो? काय जेवतो? काय मारील? काय पुजील? असे प्रश्न केले असतां–पोथी, भात, वाघ, देव, इत्यादि उत्तरें निघतात; ह्मणून,–लिहितो, जेवतो, मारील, पुजील, इ० हीं सकर्मक क्रियापदें जाणावीं.

परंतु ज्या क्रियापदांस 'काय' हें प्रश्नार्थक सर्वनाम लागत नाहीं, व बळानें लाविलें असतां ज्यां पासून कांहीं उत्तर निघत नाहीं, तीं अकर्मक क्रियापदें जाणावीं; जसें– तो बसतो, उठतो, निजेल; एथें–काय बसतो? काय उठतो? काय निजेल? असा प्रश्न होत नाहीं, आणि केला असतां उत्तर येत नाहीं, ह्मणून–बसतो, उठतो, निजेल, हीं अकर्मक क्रियापदें जाणावीं.

३७६ सकर्मक आणि अकर्मक क्रियापदें ओळखायाची बहुधा सुगम रीति अशी आहे कीं, ज्या क्रियापदास भविष्यकाळीं एकवचनीं तृतीय पुरुषीं **ईल**, आणि प्रथम पुरुषीं **ईन**, असे प्रत्यय लागतात तें सकर्मक; आणि **एल** व **एन** लागतात तें अकर्मक; जसें–तो करील, मारील, लिहील, वाचील; मीं करीन, मारीन, लिहीन, वाचीन, इ० सकर्मक; आणि तो अडकेल, फुटेल, बसेल; मीं अडकेन, फुटेन, बसेन, इ० अकर्मक क्रियापदें जाणावीं.

यांत **ह्मणणें**, **बोलणें**, **सांगणें**, इ० कितीएक क्रियापदें सकर्मक असतां **ह्मणेल**, **बोलेल**, **सांगेल**, इ० अशीं रूपें होतात.

तसेंच अकर्मक धातु एकाक्षरी असले तर हा नियम लागत नाहीं; त्यांस भविष्यकाळीं **ईल** आणि **ईन** हेच प्रत्यय लागतात; जसें–होईल, जाईल, येईन, न्हाईन, इ०.

३७७ दुसरा सकर्मक आणि अकर्मक क्रियापदां वि-

षयीं असा नियम आहे कीं, जर क्रियापद सकर्मक आहे, तर स्वार्थीं भूतकाळीं त्याचा कर्मणिप्रयोग होत असतो; जसें –'त्याणें वाडा बांधिला', 'तिणें शालजोडी पांघरिली', 'गोपाळ्यानें माझें अंगवस्त्र धुतलें', इ० हीं सकर्मक क्रियापदांचीं उदाहरणें; आणि, 'तो गेला', 'त्याची घोडी पळाली', 'तें पोर त्या चिखलांत फसलें', इ० अकर्मक क्रियापदांचीं उदाहरणें जाणावीं.

या नियमास बाधक अशीं कितीएक क्रियापदें आहेत, तीं प्रयोगप्रकरणीं सांगेन.

२७८ तिसरा आणखी असा नियम आहे कीं जे धातु अकारान्त आहेत, त्यांचा सकर्मक अर्थ असतां, वर्त्तमानकालवाचक धातुसाधित अव्ययांस, व त्यां वरून साधलेल्या क्रियापदांस, विकल्पें **इत** प्रत्यय लागतो; आणि अकर्मक अर्थ असतां **अत** प्रत्यय लागतो; उदाहरण–'तो जसजसा त्या दगडास **लोटितो**, तसतसा तो दगड **लोटत** चालला आहे', 'तो जसजसें तें लांकूड **कापितो**, तसतसें तें **कापत** आहे', 'वारा दार **उघडितो**, हें दार आपेआप **उघडतें**', 'राजा पंडितांस **मानितो**', 'त्याच्या प्रकृतीस उष्णोपचार **मानत** नाहीं'.*

विकल्पें ह्मटलें या वरून या नियमाचा भंगही होतो; परंतु मला वाटतें हा नियम फार प्रशस्त आणि उपयोगी आहे, ह्मणोन साधेल तितकें यासच अनुसरलें असतां बरें आहे.

---

* हा तिसरा नियम स्वर्गवासी राजश्री बाळ गंगाधर शास्त्री यांनीं सुचविला, याज वर आणखी विस्तार पुढें धातुसाधित अव्ययाच्या प्रकरणीं केला आहे.

अनुक्रमणिका

वर्ग ३.

उभयविध क्रियापदें.

३७९ जीं क्रियापदें सकर्मक आणि अकर्मक या दोन्हीं अर्थीं असतात त्यांस **उभयविध** ह्मणतात; जसें—**मोडणें**; याचें सकर्मक उदाहरण—'त्याणें आपलें घर मोडिलें,' यांत तो हा कर्त्ता, घर हें कर्म, आणि मोडिलें हें सकर्मक क्रियापद; अकर्मक उदाहरण—'त्याचें घर मोडलें', एथें घर हा कर्त्ता, आणि मोडलें हें अकर्मक क्रियापद. याच प्रमाणें—फळणें, उघडणें, इ० उभयविध क्रियापदें जाणावीं.

याचा नियम असा आहे कीं क्रियापदाचें मूळचें जें रूप तेंच रूप त्यांचा सकर्मक आणि अकर्मक अर्थ असतांही जर एकाच व्यापाराचें दर्शक असलें तर तें उभयविध क्रियापद जाणावें; जसें—मोडणें, उघडणें, फळणें, इ०.

वर्ग ४.

भावकर्तृक क्रियापदें.

३८० अकर्मक क्रियापदें असून, अथवा सकर्मकांचा अकर्मका प्रमाणें प्रयोग होऊन, ज्या ठिकाणीं स्पष्ट क्रियेचा जो भाव तोच कर्त्ता आहे असें भासतें, व ज्यांचा प्रयोग तृतीय पुरुषीं एकवचनीं मात्र होतो, अशीं जीं क्रियापदें तीं **भावकर्तृक** जाणावीं; जसें—उजाडतें, कळमळतें, सांजावलें, फावेल, इ०.

वाटणें हा अकर्मक धातु होय, जसें—'मला ही मसलत चांगली वाटत्ये', 'मला या मुलाचा स्वभाव गोड वाटतो', 'त्याला हें तुझें भाषण कठोर वाटलें' इ०. कोठें कोठें याचा भावकर्तृक

धातू प्रमाणेंही प्रयोग होतो; जसें–'मला वाटतें त्याणें हें कृत्य केलें असावें.'

वर्ग ५.

सहाय क्रियापदें.

३८१ आणखी एक **सहाय** ह्मणोन क्रियापदांचा भेद आहे, तीं इतर धातूंच्या रूपांशीं योजिलीं असतां त्यांचा काळ व अर्थ फिरवितात; तीं सहाय क्रियापदें— **अस**, **नस**, **हो**, **जा**, **ये**, **दे**, **लाग**, **बस**, **पाहिजे**, **नको**, **नये**, **नलगे**, हीं आहेत.

३८२ यांत काळ फिरवायास करणरूपीं **अस**, अकरणरूपीं **नस**, आणि **हो**, या धातूंचें साहाय्य लागतें.

३८३ कोणा एका नियमित धातुसाधिता पुढें **जा**, **ये**, **दे**, **लाग**, **बस**, **पाहिजे**, **नको**, **नये**, आणि **नलगे**; हे सहायधातु बहुधा सर्व काळीं योजिले असतां त्या त्या धातूंचा अर्थ फिरवितात.

याचा विस्तार या विभागांत शेवटीं 'अवशिष्ट सहायधातूं विषयीं विचार' या वर्गांत करीन.

वर्ग ६.

प्रयोजक क्रियापदें.

३८४ जेथें क्रियेच्या मुख्य कर्त्यास अन्याच्या प्रेरणेनें गौणत्व येऊन अन्यच्च मुख्य कर्त्ता असतो, तेथें त्या क्रियापदास प्रयोजक क्रियापद ह्मणतात; जसें–करवितो, बोलवितो, नेसवितो, कापवील, भरवीन, काढविलें, इ०.

वस्तुतः सूक्ष्मदृष्टीनें विचार केला असतां **प्रयोजक** हें विशे-

अनुक्रमणिका

षण क्रियापदास लागूं नयें, कर्त्यास लागावें; क्रियापद जें आहे तें प्रयोज्यप्रयोजकभावसूचक होय; अथापि त्या अर्थाचा एथें अतिदेश मानून कर्तृविशेषण क्रियापदाच्या ठायीं आरोपित करून, **प्रयोजक** अथवा कोठें **प्रयोज्य** क्रियापद ह्मणण्याचा परिपाठ पडला आहे, व यांत शब्दलाघवहि आहे, ह्मणून त्यासच एथें अनुसरून प्रयोजक ह्मटलें आहे.

३८५ यांत सकर्मक धातू वरून प्रयोजक प्रत्यय झाले असतां मूळकर्त्याचें प्राधान्य राहून व्यापार दुसऱ्या करवीं केला जातो असा अर्थ होतो; आणि अकर्मक धातू वरून झाले असतांहि अर्थ तसाच, परंतु ज्या करवीं मूळ-धातुबोधित व्यापार केला जातो तो मूळकर्त्याचें कर्म होतो; उदाहरण—'मीं पुराण वाचवितों', एथें मूळकर्त्ता **मीं** याचें प्राधान्य असून वाचण्याचा जो व्यापार तो पुराणिकादि अन्य कर्त्यां करवीं केला जातो. तसेंच 'तो निजवितो', या वाक्यांतहि अर्थ तसाच, ह्मणजे तो हा मुख्य कर्त्ता असून निजण्याचा व्यापार ज्या बालादि अन्य कर्त्यां करवीं केला जातो तीं आतां **तो** या मूळकर्त्याचीं कर्में होतात.

एथें मोठें विचार करायाचें व वादाचें स्थळ आहे. हें प्रयोजक क्रियापद लिहिण्याचीं चार प्रकारचीं रूपें आढळतात;— **करवणें**, **करिवणें**, **करीवणें**, **करविणें**; तशींच वर्त्तमानादि काळांचींही चार चार प्रकारचीं रूपें आढळतात; जसें—**करवतो**, **करिवतो**, **करीवतो**, **करवितो**; **करवलें**, **करिवलें**, **करीवलें**, **करविलें**; आतां या चार रूपांत ग्राह्य रूप कोणतें हा मोठा प्रश्न आहे, या विषयीं कांहींशी युक्ति योजून समाधान करण्याचा प्रयत्न करणें एथें अवश्य आहे. त्यास, प्रथमतर **करवणें** यास प्रयोजक भेदाचें रूप मानणें हें युक्तीच्या दृष्टीस प्रशस्त दिसत नाहीं; कारण, असें मानिलें असतां प्रत्येक भेदाचें जें निराळें व असाधारण रूप असावें, व ज्या रूपां वरून हा

अनुक्रमणिका

भेदांचा निराळेपणा आहे, त्या नियमास बाध येतो; ह्मणजे, प्रयोजक भेदाच्या वांटणीस दोन प्रकारचीं रूपें येऊन शक्य भेदास एकही असाधारण रूप राहत नाहीं; त्यांत आणखी शक्य भेद असतां ज्या पक्षीं प्रयोजक भेदाच्या असाधारण रूपाचा प्रयोग होत नाहीं, ह्मणजे, 'माझ्यानें तें काम **करिवत, करोवत** अ०-**करवित** नाहीं', असें होत नाहीं, '**करवत** नाहीं', असेंच रूप होतें, त्या पक्षीं हेंच शक्य भेदाचें असाधारण रूप खरें. आतां समयविशेषीं प्रेरणेचा अर्थ असतां कोणी मूळधातूस **वणें** प्रत्यय लावून **करवतो, बोलवतो,** इ० रूपांचा प्रयोग करितात, ह्मणजे 'तो तें काम त्या जवळून **करवतो**, 'तो त्यास **मारवतो**', इत्यादि रीतीनें बोलतात, परंतु पूर्वोक्त नियमा वर दृष्टि ठेविली असतां मला असें वाटतें कीं या रूपांची जी प्रेरणार्थ असतां लिहिण्याची व बोलण्याची प्रवृत्ति पडून गेली आहे ती शुद्ध प्रमादानें; कारण, असें केल्यानें एका शक्य भेदास त्याचें असाधारण रूप असून तें त्यास अनन्यग्राह्यत्वानें न देतां, प्रयोजक भेदास तद्व्यतिरिक्त अनेक रूपें असून यांतहि त्यास अंशहारी करणें हें युक्तीस प्रशस्त दिसत नाहीं; अतएव, **करवणें, बोलवणें, मारवतो, नेसवतो**, इ० हीं शक्यभेदांचींच रूपें होत, प्रयोजकभेदाचीं रूपें नव्हत; तेव्हां या रूपां विषयीं तर वाद राहिला नाहीं असें मला वाटतें. अथापि ही युक्ति जर कोणास नरुचली तर या भाषेंत लिहिण्याची पद्धति सर्वत्र एकसारखी असावी असें ज्यांस वाटत असेल त्यांहीं तरी शक्य भेदमात्र असतां या रूपांचा प्रयोग करावा, ह्मणजे बरें.

आतां **करिवणें, करविणें,** आणि **करोवणें**, या तिहीं रूपां मध्यें विशेषें करून ग्राह्य रूप कोणतें हा प्रश्न राहिला. त्यास **करिवणें** हें मूळधातूचें प्रयोजक रूप विशेषें करून ग्राह्य जाणावें; आणि याचीं वर्त्तमान काळीं **करवितो**, आणि भूतकाळीं **करविलें**, हीं ग्राह्य रूपें जाणावीं. कारण, सर्व धातूं वरून जो **णें** प्रत्यय असतो तो काढून टाकिला ह्मणजे त्या धातूचें आज्ञार्थी द्वितीय पुरुषाचें एकवचनीं रूप होतें, असा या भाषेंत

सर्वत्र नियम आहे; जसें–**कर, बोल, हंस,** इ० जर उपांत्य ऱ्हस्व **इ** अथवा **उ** असला तर आज्ञार्थी द्वितीय पुरुषाच्या एकवचनीं दीर्घ होतो, या नियमा वरून **करीव, बोलीव, हंशीव,** अशीं आज्ञार्थी रूपें होतात इतकेंच; वरकड मूळचीं **करिवणें, बोलिवणें,** इ० रूपें खरीं; **करविणें, बोलविणें,** हीं प्रयोजक धातुचीं रूपें नव्हत; जर हीं रूपें असतीं तर पूर्वोक्त नियमा प्रमाणें आज्ञार्थी द्वितीय पुरुषाच्या एकवचनीं **करवि, बोलवि, हंसवि,** अशीं रूपें होतीं. परंतु ज्या पक्षीं अशीं रूपें होत नाहींत, त्या पक्षीं प्रयोजक धातूचीं **करिवणें, बोलिवणें,** हींच रूपें खरीं; आतां हे प्रयोजक धातू निरंतर सकर्मक असतात, तेव्हां सकर्मक धातूच्या नियमां प्रमाणें यांच्या वर्त्तमानकाळाच्या धातुसाधितास **इ** आगम होऊन त्या वरून वर्त्तमानकाळीं **करिविते, बोलिविते,** अशीं रूपें होऊं लागतील; परंतु अशीं रूपें तर होत नाहींत, यांतून कोणताही इकार ठेविला असतां चालतो; ह्मणजे **करिवतो,** अथवा **करवितो,** अशीं दोन्हीं रूपें होतात; तेव्हां यांत कोणता इकार बलवत्तर ह्मणजे आवश्यक होय हा एक विचार आतां अवशिष्ट राहिला; त्यास, स्वार्थी वर्त्तमानकाळाचीं जीं रूपें होतात तीं वर्त्तमानकाळाच्या धातुसाधिता वरून होतात, असा सर्वत्र नियम आहे; अतएव, **करवितो, बोलवितो,** अशींच रूपें लिहिलीं पाहिजेत, कारण या प्रयोजक धातूच्या वर्त्तमान काळाचीं धातुसाधितें **करवित, बोलवित,** अशीं होतात; **करिवत, बोलिवत,** अशीं होत नाहींत; ह्मणोन **करवितो, बोलवितो, करविलें, बोलविलें,** हींच रूपें व्याकरणरीतीनें शुद्ध होत.

३८६ जर मूळधातु हकारान्त, अथवा एकाक्षरी असला, तर त्या वरून **विवणें** प्रत्यय होतो; जसें–साहविवणें, लिहविवणें, खाविवणें, गाविवणें, देविवणें, घेविवणें, इ०.

एथें पूर्वोक्त प्रत्ययान्तराच्या संभवांचा निषेध जाणावा.

३८७ कित्येक धातूं वरून **आवणें** प्रत्यय होऊन प्रयोजक क्रियापदें साधतात; जसें–फितावणें, बहकावणें, नि·

भावणें, इ०. परंतु हे शुद्ध सकर्मक धातु होत असे मानल्यासहि कांहीं चिंता नाहीं.

३८८ तसेंच अनुकरणवाचक जे अकर्मक धातु ते प्रयोजक अथवा सकर्मक कर्तव्य असतां बहुधा **आवणें** प्रत्यय लागतो; जसें– फडफडावणें, फटफटावणें, खळखळावणें, इत्यादि.

३८९ दुसरा आणखी असा एक चमत्कारिक संस्कृत भाषे प्रमाणें नियम या भाषेंत आढळतो; तो असा कीं बहुधा ज्यांचें पहिलें अक्षर **अ**, **आ**, **इ**, अथवा **उ**, एतदंत आहे, असे जे कित्येक व्यक्षरी अकर्मक धातु त्यांस प्रयोजक अथवा सकर्मक कर्तव्य असतां पहिल्या अक्षराचा **अ** किंवा **आ** यास वृद्धि होत्ये, आणि पुढें **ट**कार असतां **इ** अ० **उ** यास गुण होतो; आणि **ट**च्या स्थानीं **ड** आदेश होतो. जसें–

अकर्मक धातु.	**प्रयोजक अ० सकर्मक धातु.**
पडणें	पाडणें
दवणें	दावणें
सरणें	सारणें
टळणें	टाळणें
चरणें	चारणें
मरणें	मारणें
तरणें	तारणें
फाटणें	फाडणें
फिटणें	फेडणें
तुटणें	तोडणें
फुटणें	फोडणें
सुटणें	सोडणें
इ०.	इ०.

३९० कित्येक धातूं वरून प्रयोजक प्रत्यय लागत नाहींत, कारण तदर्थी दुसरे धातु सिद्ध आहेत; आणि, यद्यपि त्यांत प्रेरणेचा अर्थ गम्यमान होतो खरा, तथापि त्यांस शुद्ध सकर्मक ह्मटलें असतां कांहीं बाध नाहीं; जसें—

धातु०	प्र० अ० स० धातु०
येणें	आणणें
लागणें	लावणें
जाणें	नेणें
इ०.	इ०.

३९१ हे प्रयोजक धातु निरंतर सकर्मक असतात. आणि **इवणें अ० आवणें** प्रत्यय न लागतां जे प्रयोजक-स्वार्थबोधक धातु या भाषेंत सिद्ध असतात, ह्मणजे ज्या सकर्मक धातूंत प्रेरणारूप अर्थ गम्यमान असतो, त्या वरून इतर सकर्मक धातूं प्रमाणें हे प्रयोजक प्रत्यय लागून आणखी प्रयोजक क्रियापदें साधतात; जसें—सोडिवणें, तोडिवणें, आणिवणें, मारिवणें, पाडिवणें, इ०.

आणखी या भाषेंत एक चमत्कार आहे, तो असा कीं, एकदां मूळ धातू वरून प्रत्यय लावून प्रयोजक धातु साधिला असतां वक्त्याच्या मनांत त्या प्रयोजक धातू वरूनाहि आणखी प्रेरणारूप अर्थ दर्शवायाचा असल्यास आणखी प्रयोजक धातु साधतात. जसें **करणें, करिवणें, कराविवणें**; ह्मणजे, आपण **करणें**, दुसऱ्या कडून **करिवणें**, आणि दुसऱ्या कडून तिसऱ्या करवीं **कराविवणें**; उदाहरण—'रामा तें काम करितो', 'रामा, विठूकडून तें काम करवितो', आणि 'रामा विठूकडून गोविंदाच्या हातून तें काम करववितो'; परंतु असे धातु साधून त्याचा प्रयोग करणें हें फार विरळा वक्त्याच्या इच्छे वर आहे.

अनुक्रमणिका

३९२ आणखी शिकणारांनीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, कित्येक धातूंचीं रूपें प्रयोजक धातूंच्या प्रमाणें दिसतात, परंतु ते प्रयोजक धातु नव्हत, मूळचे सिद्ध धातु होत; जसें– पाठिवणें, बडिवणें, कालिवणें, इ०.

वर्ग ७.

शक्य क्रियापदें.

३९३ मूळ धातूस **वणें** अथवा **ववणें** प्रत्यय लागून जें नवें क्रियापद सिद्ध होतें त्यास **शक्य** क्रियापद ह्मणावें; जसें–करवणें, चालवणें, जाववणें, घेववणें, देववणें, इ० यांत शक्तीचा बोध होतो; जसें–'माझ्यानें अ० मला हें काम **करवतें**,' 'त्याच्यानें अ० त्याला पैका **देववत** नाहीं' इ०; ह्मणजे हें काम करायास मला शक्ति आहे, पैका द्यावयास त्यास शक्ति नाहीं, असा अर्थ.

३९४ यांत असा नियम आहे कीं जर मूळचा एकाक्षरी धातु असला तर त्यास **ववणें**, आणि अनेकाक्षरी धातु असला तर त्यास **वणें** अ० **ववणें**, असे प्रत्यय लागतात, जसें–देववतें, घेववतें, जाववतें; आणि करवतें, नेसवतें, हांसवतें; अ०. करववतें, हांसववतें; इ०.

३९५ परंतु जर ते अनेकाक्षरी मूळचे हकारान्त धातु असले तर त्यां वरून **ववणें** हाच प्रत्यय होतो; जसें– 'मला लिहववतें,' 'माझ्यानें पाहववतें,' इ०.

लिह धातूस हा प्रत्यय विकल्पें होतो; जसें–'माझ्यानें लिहवतें,' 'माझ्यानें लिहववतें.'

३९६ हा प्रत्यय सकर्मक आणि अकर्मक या उभय धातूं वरून होतो. परंतु जेव्हां अकर्मका वरून हा प्रत्यय होऊन रूपें साधतात, तेव्हां याचा निरंतर भावकर्तरिप्रयोग

होतो; जसें—माझ्यानें अ० मला **चालवतें**,' 'त्याच्यानें अ० त्याला **निजवत** नाहीं', इ०.

प्रकरण १.

भेदविचार.

३९७ कोणा एका अर्थास उद्देशून मूळ धातूंच्या रूपांत विकार होऊन तदर्थी जो नवा क्रियारूप शब्द सिद्ध होतो तो **भेद** जाणावा. भेद तीन प्रकारचे आहेत. **मूळरूपभेद, प्रयोजकभेद,** आणि **शक्यभेद**; जसें—'मीं करितों' हा कर धातूचा **मूळभेद**; 'मीं करवितों' हा **प्रयोजकभेद**, 'माझ्यानें अ० मला करवतें' हा **शक्यभेद.**

प्रकरण २.

रूपविचार.

३९८ कोणत्याही धातूस विधिरूपानें अथवा निषेधरूपानें, ह्मणजे होय अथवा नाहीं या अर्थानें चालविलें असतां जें त्याचें रूपांतर होतें त्यास **रूप** असें ह्मणावें. हीं **रूपें** दोन प्रकारचीं आहेत;—एक **करणरूप**, आणि एक **अकरणरूप**; उदाहरण-मीं आहें, मीं होतों, म्या केलें, तो होईल, तो करील; हीं अस, हो, आणि कर, या धातूंचीं **करणरूपें.** आणि—मीं नाहीं, मीं नव्हतों, म्यां केलें नाहीं, तो होणार नाहीं, तो करणार नाहीं; हीं अस, हो, आणि कर, या धातूंचीं **अकरणरूपें.**

प्रकरण ३.

प्रयोगविचार-

३९९ वाक्यां मध्यें कर्तृप्रधान, कर्मप्रधान, आणि भाव-

अनुक्रमणिका

प्रधान, या भेदांहींकरून क्रियापदाच्या ठायीं कर्ता, कर्म, आणि भाव, यांच्या अनुरोधानें विकार होऊन जो वाक्यरचनेचा प्रकार होतो त्यास, अथवा या प्रमाणें विकार पावलेलें जें क्रियापद त्यास, **प्रयोग** अशी संज्ञा आहे. हे प्रयोग चार आहेत– **कर्तरि, कर्मणि, भावी**, आणि **भावकर्तरि**.*

४०० जेथें कर्त्या वरून क्रियापद फिरतें, ह्मणजे कर्त्याच्या लिंगवचनांस अनुसरून क्रियापदाचें रूप असतें, तेथें **कर्तरिप्रयोग** जाणावा; जसें– 'रामा निजतो', 'सावित्री पुस्तक वाचिये', 'पाखरूं उडालें', इ०.

४०१ जेथें कर्मा वरून क्रियापद फिरतें, ह्मणजे कर्माच्या लिंगवचनांस अनुसरून क्रियापदाचें रूप असतें, तेथें **कर्मणिप्रयोग** जाणावा; जसें– 'त्याणें घोडा जुंपला', 'कृष्णानें मुरली वाजविली', 'वेणूनें सुंदर चित्र काढिलें', 'त्याणें गप्प उडविली', 'तिणें काल शृंगार केला होता', इ०.

४०२ जेथें कर्त्या वरून अथवा कर्मा वरून क्रियापद फिरत नाहीं, केवळ सामान्यें करून त्याचें रूप नपुंसकलिंगीं एकवचनीं असतें, तेथें **भावीप्रयोग** जाणावा; जसें– 'म्यां त्यास मारिलें', 'तिणें तिला धरावें', इ०.

---

* **कर्तरि** आणि **कर्मणि** हे शब्द मूळचे संस्कृतांत **कर्तृ** आणि **कर्मन्** या शब्दांचीं सप्तमीचीं रूपें होत; यांचा यद्यपि विशेषणा सारिखा प्रयोग करणें प्रशस्त नाहीं, तथापि तशाच प्रयोगाची रूढि फार आहे, ह्मणोन यांच रूपांचें एथें ग्रहण केलें आहे. **भाव** शब्दाचें मात्र महाराष्ट्र नियमा प्रमाणें **भावी** असें विशेषण करून योजिलें आहे. **कर्तरि** आणि **कर्मणि** यांचा अंत्यस्वर दीर्घ करून विशेषणें करावीं परंतु तसें करण्यास काहीं योग्य आधार दिसत नाहीं; ह्मणोन हीं मूळचीं सप्तमीचीं रूपें तशींच ठेविलीं आहेत.

४०३ जेथें क्रियेचा जो केवल भाव तोच कर्ता दिसतो, आणि क्रियापद निरंतर नपुंसकलिंगीं एकवचनीं असतें, तेथें **भावकर्तरिप्रयोग** जाणावा; जसें– 'मला कळमळतें', 'त्यास नदी पलीकडे सांजावलें', 'त्यास चालवतें', 'तिच्यानें बोलवलें नाहीं', इ०.

४०४ हे प्रयोग वर्तमानकालवाचक व भूतकालवाचक धातुसाधिता वरून, अथवा त्यां वरून साधलेलीं जीं क्रियापदें त्यां वरून, अथवा विध्यर्थाच्या रूपां वरून होतात. त्यांत वर्तमान काळीं कर्तरिप्रयोग होतो; जसें– 'लक्ष्मी चित्र काढिते', 'तें पोर रडून आपल्या आईस फार त्रास देतें', 'त्या काळीं तो तेथें असावा', 'ह्मटलें असतां दोन वर्षांत ही मुलगी चालूं लागावी', 'अशा हालांत तें केव्हांच मरावें', इ०.

४०५ भूतकाळ असतां अकर्मक धातूं वरून कर्तरिप्रयोग होतो; जसें– 'विठू गेला', 'ठकी धांवली', 'वांसरूं हंबरलें,' इ०.

४०६ भूतकाळ असतां– पढणें, जेवणें, पिणें, बोलणें, ह्मणणें, विणें, भिणें, शिकणें, इ० पढधातूंचा गण वर्ज करून सकर्मक धातूं वरून कर्मणिप्रयोग होतो; जसें– 'त्याणें तें अक्षर लिहिलें', 'तिणें तो चमत्कार दाखविला', 'त्या पाखरानें ती चिमणी मारिली', 'त्याणें ही गोष्ट त्यास सांगितली असावी', 'म्यां अनेक दुःखें सोसिलीं', इ०.

पढधातूंचा गण वर्ज करून ह्मटलें या वरून त्या गणांतील सकर्मक क्रियापदां वरून भूतकाळीं कर्तरिप्रयोग होतो; जसें– 'तो शास्त्र पढला', 'तो तेथें भाजीभाकर जेव-

ला', 'तीं हा सारा ग्रंथ शिकली', 'मीं दूध प्यालों', 'तें गंगा न्हालें', इ०.

४०७ भूतकाळ असतां जर कर्म द्वितीयान्त असलें, तर भावीप्रयोग होतो; आणि विध्यर्थी भूतकाळीं अकर्मक धातूं वरूनही भावीप्रयोग होतो; जसें– 'वाघानें गाईस मारिलें', 'तिणें त्यास सांगितलें', 'ग्यां तेथें उभें राहावें', 'तिणें नित्य तेथें गावें', इ०.

४०८ भावकर्तृक धातू वरून आणि शक्यभेद असतां अकर्मक धातू वरून नित्य भावकर्तरिप्रयोग होतो; जसें– 'मला कळमळतें', 'त्यांस सांजावलें', 'तिला तेथें करमलें नाहीं', 'माझ्यानें चालवतें', 'आतां मला धांववत नाहीं', इ०.

४०९ कर्तरिप्रयोगांत **सकर्मकर्तरि** आणि **अकर्मकर्तरि** असे दोन भेद आहेत.

४१० जेथें सकर्मक क्रियापदांचा योग असून कर्त्याच्या अनुरोधानें क्रियापद असतें, तेथें सकर्मकर्तरिप्रयोग जाणावा; जसें– 'रामा काम करितो', 'गंगा भाजी चिरिते', इ०.

४११ जेथें अकर्मक क्रियापदांचा योग असून कर्त्याच्या अनुरोधानें क्रियापद असतें, तेथें अकर्मकर्तरिप्रयोग जाणावा; जसें– 'तें मुलगें निजतें', 'गाय हंबरते', 'वाघ गर्जतो', इ०.

प्रकरण ४.

अर्थविचार.

४१२ अर्थ ह्मणजे एकादी क्रिया अथवा व्यापार करण्या विषयींचा जो बोलणाराच्या मनांत भाव असतो तो जेणेंकरून कळतो असें जें क्रियापदाचें रूप तो. हे अर्थ

पांच आहेत;– **स्वार्थ**, **आज्ञार्थ**, **विध्यर्थ**, **संकेतार्थ**, आणि **संशयार्थ**.

४१३ **स्वार्थ** ह्मणजे बोलणारा एकाद्या गोष्टीचें विधान करितो, ह्मणजे एकादी गोष्ट आहे किंवा नाहीं इतकेंच सांगतो, असा जो बोध क्रियापदाच्या रूपा पासून होतो तो. अथवा तेथें तें क्रियापद **स्वार्थी** आहे असें ह्मणावें. उदाह०– मी करितों, त्याणें सांगितलें नाहीं, इ०.

४१४ **आज्ञार्थ** ह्मणजे बोलणारा आज्ञा, उपदेश, किंवा प्रार्थना करितो, असा जो बोध क्रियापदाच्या रूपा पासून होतो तो. अथवा त्या वाक्यांत तें क्रियापद **आज्ञार्थी** आहे असें ह्मणावें. उदाह०– तूं कर, तुह्मीं सांगूं नका, तो जाऊ, ते नकरोत, इ०.

आपणा पेक्षां कमी योग्यतेच्या मनुष्यास कांहीं करावयास सांगितलें, आणि तो आपल्या ताबेदारींत असला, तर त्या सांगण्यास आज्ञा ह्मणतात. आपणा पेक्षां अधिक योग्यतेच्या मनुष्यास कांहीं करायास सांगितलें असतां त्या सांगण्यास प्रार्थना ह्मणतात. हे दोन्ही अर्थ विवक्षित असतां क्रियापदाचीं रूपें कोठें सारखींच असतात; परंतु बोलण्याची शैली भिन्न असत्ये;– 'हे राजा, माझें संकट निवारण कर', आणि 'सख्या पाय धुवायास पाणी आण', या दोन वाक्यांत पहिल्यांत प्रार्थना आणि दुसऱ्यांत आज्ञा समजावी.

४१५ **विध्यर्थ**– आज्ञेचा अर्थ असून धर्म, शक्यता, योग्यता, सातत्य, इ० अर्थाचा जो बोध क्रियापदाच्या रूपा पासून होतो त्यास विध्यर्थ ह्मणावें; जसें– 'म्यां करावें', 'तिणें जावें' इ०; एथें आज्ञार्थाची उपलब्धि असून शक्यताही गम्यमान होत्ये.– 'तिणें जावें', ह्मणजे तिला जावयास शक्ति आहे, मोकळीक आहे, दुसऱ्या कडून आडकाठी नाहीं, असा अर्थ होतो.

या विध्यर्थापासून पुष्कळ अर्थ निष्पन्न होतात;– 'आपण आतां जावें', 'आपण कृपा करून माझा पैका द्यावा', 'आपणास सुपुत्र व्हावा', या वाक्यांत आज्ञा, प्रार्थना, मनोरथ, हे अर्थ निष्पन्न होतात. 'मीं काशींत नित्य मनकर्णिकेच्या घांटा वर जावें', 'तूं लहानपणीं नित्य रडावेंस', एथें रीति अथवा सातत्य अथवा गतकथास्मरण; 'आईबापांनीं मुलांस शिकवावें', एथें धर्म; 'ह्मटलें असतां आज पाऊस पडावा', एथें संभावना; असे अनेक अर्थ होतात. परंतु या सर्वांत ते ते अर्थ असून आज्ञा आणि धर्म हे अर्थ मुख्य दिसतात, ह्मणोन हीं रूपें एका विध्यर्था खालीं लिहिलीं आहेत. असें न केलें, आणि एकच रूप भिन्न भिन्न अर्था खालीं लिहिलें, तर गोंधळ मात्र पडेल; ह्मणोन तसें केलें नाहीं. शिकणारांनीं या रूपांचा प्रयोग भिन्न भिन्न अर्थीं होतो, इतकें मात्र जाणावें; परंतु व्याकरणपदच्छेद करिते समयीं गोंधळ न व्हावा ह्मणोन या रूपास **विध्यर्थी** ह्मणावें.

४१६ **संशयार्थ** ह्मणजे क्रियापदांच्या रूपां वरून जो संशयरूप अथवा संदेहरूप बोध निष्पन्न होतो तो. आणि असा बोध उत्पन्न करणारीं जीं रूपें तीं संशयार्थी आहेत असें ह्मणावें; जसें– 'तो गेला असेल', 'ती जाणार असली', इ०.

४१७ **संकेतार्थ** ह्मणजे एका क्रियेची सिद्धि दुसऱ्या क्रिये वर आहे अशा अर्थाचा जो बोध क्रियापदाच्या रूपविशेषा वरून होतो तो; जसें– 'तो राहिला असता', 'तो तसें करिता तर मीं असें करितों'. हा संकेतार्थ असतां जर, तर, ह्मणजे, इत्यादि कित्येक अव्ययांचा प्रयोग होतो, अथवा त्यांचा अध्याहार असतो.

अनुक्रमणिका

प्रकरण ५.

काळ.

४१८ **काळ** ह्मणजे क्रियापदाच्या रूपविशेषा वरून ती क्रिया अमक्या काळीं घडली असा जो बोध होतो तो.

४१९ क्रियेस मुख्य काळ तीन आहेत– **वर्तमान**, **भूत**, आणि **भविष्य**; परंतु या प्रत्येका मध्यें आणखी भेद आहेत.

४२० **वर्तमान** काळ ह्मणजे विद्यमानीं जो चालत आहे तो; जसें– 'मीं पूजा करितों' यांत **करितों** या क्रियापदा पासून विद्यमान काळाचा बोध होतो; ह्मणजे ज्या काळीं कोणी एकादी क्रिया करितो त्याच काळीं सांगणारा तिचें विधान करितो असा अर्थ ज्या क्रियापदाच्या रूपा पासून उत्पन्न होतो, त्याचा वर्तमान काळ जाणावा; अथवा तें क्रियापद वर्तमान काळीं आहे असें जाणावें.

४२१ वर्तमान काळाचे प्रकार तीन आहेत– एक **वर्तमान**, दुसरा **अपूर्णवर्तमान**, आणि तिसरा **रीतिवर्तमान**; यांचीं उदाहरणें सांगतों;–

मीं करितों·	वर्तमान.
मीं करित आहें, मीं करितों आहें, मीं करितों हें.	. . अपूर्ण वर्तमान.
मीं करित असतों·	रीतिवर्तमान.

वर्तमान काळाच्या रूपांत आणखीहि अर्थभेद असतात; कोठें निश्चयपूर्वक एकादी गोष्ट सांगायाची असतां वर्तमान काळाच्या रूपाचा प्रयोग करितात: जसें— 'मीं उद्यां खचित येतों', 'मीं तुह्मांस खचित सांगतों पुढल्या वर्षी दुष्काळ पडतो', इ०.

अनुक्रमणिका

अपूर्णवर्तमान.– या काळाच्या ठायीं अर्थभेद इतका आहे कीं याचा प्रयोग असतां कर्त्याची त्या त्या क्रियेच्या ठायीं तात्कालिक जी निमग्नता तिचा बोध होतो. उदाह०–मी जेवित आहें, ह्मणजे जेवण्याचा व्यापार करित आहें.

रीतिवर्तमान.– या काळीं कर्ता जो आहे त्याची ती ती क्रिया करण्याची रीति अथवा संवई असती असा अर्थ होतो; जसें– 'मीं करित असतों' 'तो तेथें खेळत असतो' ह्मणजे माझी करण्याची आणि त्याची खेळण्याची रीति आहे अथवा संवई आहे असा अर्थ होतो.

४२२ **भूत** काळ ह्मणजे वर्तमान क्षणा पूर्वीं गेलेला जो काळ तो;. जसें– 'गोपाळानें पोथी वाचिली', एथें **वाचिली** या क्रियापदानें मागला काळ सुचविला; ह्मणोन हा भूतकाळ ह्मणावा.

४२३ भूतकाळाचे प्रकार सात आहेत;– **भूत**, **अपूर्णभूत**, **रीतिभूत**, **पूर्णभूत**, **भूतभूत**, **वर्तमानभूत**, आणि **भविष्यभूत**; हे आतां उदाहरणांनीं सांगतों.—

मीं अ० म्यां केलें. . . . . . . भूत.
मीं करित होतों. . . . . अपूर्णभूत.
मीं करीं, अ० करित असें. . रीतिभूत.
मीं करिता झालों. . . . . . . पूर्णभूत.
मीं अ० म्यां केलें होतें. . . . भूतभूत.
मीं अ० म्यां केलें आहे. . . वर्तमानभूत.
मीं करणार होतों. . . . . . . भविष्यभूत.

४२४ **अपूर्णभूत**– या काळाच्या ठायीं क्रियेची अपूर्णता दर्शविली जात्ये; जसें– 'मीं करित होतों' ह्मणजे ती

क्रिया करण्याच्या उद्योगांत होतों, परंतु ती त्या काळीं संमाप्तीस नेली नव्हती, इतका अर्थ हा काळ सूचवितो.

४२५ **रीतिभूत**— या काळाच्या अर्था पासून कांहीं कालमर्याद क्रियेच्या सतत चलनाचा अथवा रीतीचा बोध होतो; जसें— 'मीं करीं, अथवा करित असें', यांत करण्याचा व्यापार कांहीं कालमर्याद अविच्छिन्न चालत होता असा अर्थ निष्पन्न होतो.

प्राकृत ग्रंथांत या रीतिभूत काळाचा प्रयोग शुद्ध भूतकाळीं अथवा पूर्णभूत काळींहि होतो;—

'पृथू पाहतां हर्षला तो सुदामा ॥ ह्मणे जाणिजे लाभ हा थोर आह्मां'
'रुक्मिणी पुढें मुख्य नायिका ॥ आरती करी द्विजवर्यका'

'मीं करिते समयीं', 'जेविते वेळीं', इत्यादि स्थळींहि हींच रूपें जाणावीं.— 'मीं करिते समयीं' ह्मणजे मीं करीं त्या समयीं, 'तो जेविते वेळीं' ह्मणजे तो जेवी त्या वेळीं, असा अर्थ. व्याकरण करते समयींहि असाच पदच्छेद करून निर्वाह करावा दुसरा उपाय नाहीं.

४२६ **पूर्णभूत**— या काळीं क्रियेची केवळ पूर्णता ह्मणजे परिसमाप्ति दर्शविली जात्ये; जसें— 'मीं करिता झालों', ह्मणजे ती क्रिया करून राहिलों असा अर्थ.

४२७ **भूतभूत**— भूत काळीं व्यापार होऊन संपला असा ज्या क्रियापदाच्या रूपा पासून बोध होतो त्याचा भूतभूत काळ जाणावा; जसें—'रामा गेला होता', यांत रामाचें जाणें भूतकाळीं संपलें असा अर्थ होतो.

४२८ **वर्तमानभूत**— भूतकाळीं आरंभलेली क्रिया वर्तमान काळा पर्यंत चालत आहे, किंवा भूतकाळीं केलेल्या क्रियेचें फळ वर्तमानकाळीं सिद्ध असावें, असा अर्थ या काळा

अनुक्रमणिका

पासून उत्पन्न होतो; जसें– 'मी चाललों आहें', एथें मागील काळा पासून चलनव्यापारास आरंभ होऊन सांप्रत काळीं तो व्यापार नुकताच संपला आहे, अथवा त्या व्यापाराचें सिद्ध जें फळ तें सांप्रत उपलब्ध आहे, असा अर्थ होतो.

मागील झालेली कथा आतां सांगायाची असतां कधीं कवीं या वर्तमानभूत काळाच्या रूपाचा प्रयोग करितात; जसें— 'भोजराजा सभेंत बसला आहे, व तेथें एक ब्राह्मण त्यास आशीर्वाद देत आहे, इतक्यांत असें झालें'.

४२९ **भविष्यभूत**– कांहीं एक व्यापार भूतकाळीं करायाचा होता, परंतु तो कांहीं व्यत्यया मुळें सिद्धीस गेला नाहीं, असा अर्थ भविष्यभूत काळाच्या ठायीं उद्बोधित होतो; जसें– 'मीं करणार होतों', ह्मणजे माझा करायाचा बेत होता; परंतु त्या क्रियेस आरंभ झाला नाहीं.

कोठें हें भविष्यभूत काळाचें रूप असतां केवळ भविष्यकाळा प्रमाणें अर्थ होतो; जसें 'इतक्यानें तुझें काय होणार होतें', 'यांत त्याचें काय पोट भरणार होतें', 'दोन आण्यांनीं काय मीं श्रीमंत होणार होतों', इत्यादि. कोठें शुद्ध भूत काळाचाहि अर्थ निष्पन्न होतो; जसें– 'तुह्मीं काल त्यास सामान दिलें, परंतु तितक्यानें तो काय करणार होता'?

४३० **भविष्य** काळ ह्मणजे वर्तमान क्षणा पुढें येणारा जो काळ तो, यांत क्रियापदाच्या ठायीं पुढल्या काळाचा बोध होतो; जसें– 'मीं लिहीन', 'तो जाईल', एथें **लिहीन, जाईल**, या क्रियापदांहींकरून पुढला काळ सुचविला जातो.

४३१ भविष्य काळाचे प्रकार पांच आहेत;– **भविष्य, अपूर्णभविष्य, वर्तमानभविष्य, भूतभविष्य**, आणि **भविष्यभविष्य.**

मीं करीन.......... भविष्य.
मीं करित असेन...... अपूर्णभविष्य.
मीं करणार आहें. .... वर्तमानभविष्य.
म्यां केलें असेल...... भूतभविष्य.
मीं करणार असेन..... भविष्यभविष्य.

४३२ **अपूर्णभविष्य**– एकाद्या क्रियेस आरंभ होऊन तिचा व्यापार त्या काळीं चालत असेल, असा बोध ज्या क्रियापदा पासून होतो त्याचा अपूर्णभविष्य काळ जाणावा. जसें– 'मीं करित असेन', 'तूं जात असशील', इ० 'तूं उद्यां येशील ह्मणजे त्या वेळेस मीं तें काम करित असेन', 'तो शेत कापित असेल त्या वेळीं तूं त्याज जवळ जा'.

४३३ **वर्तमानभविष्य**– कर्त्याच्या मनांत व्यापार करायाचा आहे, परंतु त्याणें अद्यापि त्या क्रियेस आरंभ केला नाहीं, असा बोध ज्या क्रियापदा पासून होतो त्याचा वर्तमानभविष्य काळ जाणावा; जसें– 'मीं जाणार आहें', 'ती येणार आहे'.

४३४ **भूतभविष्य**–– भविष्यकाळीं एकाद्या क्रियेचा व्यापार होऊन राहिला असा अर्थ ज्या क्रियापदाच्या रूपा पासून निष्पन्न होतो त्याचा भूतभविष्य काळ जाणावा; जसें 'ज्या वेळेस मीं **जेवलों असेन** त्या वेळेस तुह्मीं तें काम मज जवळ घेऊन या', 'मीं तुज कडे येईन तेव्हां त्वां किती पत्रें **लिहिलीं असतील**'?

४३५ **भविष्यभविष्य**—– विवक्षित भविष्य काळाच्या पुढल्या काळीं एकाद्या क्रियेचा व्यापार व्हावयाचा आहे, असा अर्थ ज्या क्रियापदांच्या रूपां पासून निष्पन्न होतो, त्यांचा भविष्यभविष्य काळ जाणावा; जसें– 'तूं जर उद्यां

अनुक्रमणिका

नऊ वाजतां आलास तर मीं **जेवणार असेन**, परंतु बारा वाजतां आलास तर जेवलों असेन.'

४३६ क्रियापदांच्या रूपांस पुरुष, वचनें, आणि लिंगें, लागतात.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं सोडितों.	आह्मीं सोडितों.
द्वि०	तूं सोडितोस.	तुह्मीं सोडितां.
तृ०	तो सोडितो.	ते सोडितात.

स्त्रीलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं सोडित्यें.	आह्मीं सोडितों.
द्वि०	तूं सोडित्येस–तीस.	तुह्मीं सोडितां.
तृ०	ती सोडित्ये–ती.	त्या सोडितात.

नपुंसकलिंग.

प्र०	मीं सोडितें–तों.	आह्मीं सोडितों.
द्वि०	तूं सोडितेंस.	तुह्मीं सोडितां.
तृ०	तें सोडितें.	तीं सोडितात.

यांत तिन्हीं लिंगीं अनेकवचनाचीं रूपें सारखीं.

४३७– ३८१ व्या नियमांत सांगितलें आहे कीं ज्या धातूंच्या योगानें क्रियापदाचीं रूपें, काळ, आणि अर्थ, फिरतात त्यांस **सहायधातु** ह्मणतात. ते सहायधातु– **अस, नस, हो, जा, ये, दे, लाग, बस, पाहिजे, नको, नये, नलगे.**

४३८ यांत काळ फिरवायास **अस**, **नस**, आणि **हो**, या धातूंचें साहाय्य लागतें.

४३९ नियमित धातुसाधितां पुढें **जा**, **ये**, **दे**, **लाग**, **बस**, **पाहिजे**, **नको**, **नये**, आणि **नलगे**, हे सहायधातु बहुधा सर्व काळीं लागतात.

याचा विस्तार या विभागांत शेवटीं 'अवशिष्ट सहायधातूं विषयीं विचार' या वर्गांत केला आहे.

वर्ग ८.

धातुसाधितशब्दविचार.

४४० धातू वरून साधलेले जे शब्द त्यांस **धातुसाधित शब्द** ह्मणतात. यांत नाम, विशेषण, आणि अव्यय, असे भेद आहेत.

धातुसाधित अव्यय हा चांगला प्रशस्त शब्द नाहीं, कारण अव्यय या शब्दानें केवळ विभक्तीचा मात्र निषेध सुचविला जातो; परंतु ज्या शब्दाचा कर्तृकर्मरूप शब्दां वर अधिकार असतो त्यास अव्यय मानणें हें योग्य दिसत नाहीं; अशा शब्दांस संस्कृत व्याकरणांत **कृदंत** ह्मटलें आहे. परंतु तेथें **कृत्** ह्मणोन अधिकार ह्मणजे प्रत्ययांचा समुच्चय आहे तो ज्यांच्या अंतीं आहे त्यांस कृदंत ह्मटलें आहे. परंतु तसा कांहीं एथें अधिकार नसतां तो शब्द मराठी शब्दसाधितांस देणें हेंहि योग्य दिसत नाहीं. तथापि **कृदंत** हा केवळ सांकेतिक शब्द मानून या प्रसंगीं योजिला असतां विशेष बाध येईल असें मला वाटत नाहीं. परंतु ज्या पेक्षां आज पावेतों मराठी व्याकरणांत धातुसाधित अव्यय ह्मणायाचा परिपाठ पडला आहे, आणि **अव्यय** हा शब्द एथें धातुसाधित या विशेषणानें विशिष्ट आहे, त्या पेक्षां अर्थात् या शब्दाचा पूर्वोक्त अर्थ राहून धातूचा जो वाक्यांत

अनुक्रमणिका

कर्तृकर्मवाचक शब्दां वर अधिकार त्याच्याहि व्याप्तीचा संग्रह होतो. ह्मणोन **करित, करितां, करितांनां, करून,** इत्यादि शब्दांस धातुसाधित अव्ययें ह्मणायाची जी रूढि पडली आहे तीस एथें अनुसरलें असतां विशेष दोष येईल असें मला वाटत नाहीं.

धातुसाधित नामें आणि विशेषणें.

४४१ धातुसाधित शब्दांमध्यें ज्यांच्या ठायीं नामाचे धर्म असतात, ह्मणजे ज्यांस लिंगवचनविभक्त्यादि कार्यें होतात, तीं धातुसाधित नामें; व ज्यांचीं रूपें विशेष्याच्या अनुरोधें फिरतात, तीं विशेषणें. यांत जें नाम असतें तें प्रयोगानुसंधानानें विशेषणहि होतें.

करणें. . . . . क्रियावाचक.
करता, करणारा, करणार. . कर्तृवाचक.
केला, केलेला. . . . . . . कर्मवाचक.

४४२ यांत **कर्ता, भर्ता, हर्ता, शास्ता,** इ० जीं धातुसाधिताचीं रूपें आढळतात तीं मूळचीं संस्कृत धातू वरून साधलेलीं धातुसाधितें जाणावीं. शुद्ध प्राकृत नियमास अनुसरून कर, भर, हर, इ० धातूं वरून साधलीं असतां **करता, भरता, हरता, शासता,** अशीं रूपें लिहिलीं पाहिजेत.

४४३ यांत कर्तृवाचक आणि कर्मवाचक या धातुसाधितांचा विशेषणा सारिखा प्रयोग होतो तो सांगतों,—'हंसतें लेंकरूं', 'रडती मुलगी', 'धांवणारा घोडा', 'बांधली गाय', 'केलेली क्रिया', इ० परंतु 'मारत्याचा हात धरवतो पण बोलत्या

अनुक्रमणिका

चें तोंड धरवत नाहीं', 'धर्म करणारास आड येऊं नये', मेलेल्यास मारून फळ काय', इ० वाक्यांत त्या त्या धातु-साधिताचे नामा प्रमाणें प्रयोग जाणावे.

४४४ **णार**प्रत्ययान्त कर्तृवाचक धातुसाधिताचा प्रयोग बहुधा विशेषणीं होत नाहीं, त्याचा प्रायः नामा सारिखाच प्रयोग होतो; जसें–'देणार थोडे आणि मागणार फार झाले', 'करणार मनुष्य थोडे हंसणार मनुष्य फार', अशा ठिकाणीं 'करणारे मनुष्य थोडे हंसणारे मनुष्य फार', हें व्याकरणरीतीनें अधिक शुद्ध होय.

४४५ परंतु या भाषेंत अकर्मक धातू वरून **लेला**प्रत्यय झाला असतां त्याच्या ठायीं कर्माचा अर्थ राहत नाहीं, कर्त्याचाच अर्थ असतो.

४४६ **ता**प्रत्ययान्त कर्तृवाचकांत अर्थविशेष इतकाच कीं **ता**प्रत्ययान्त कर्तृवाचकाच्या ठायीं वर्तमान काळाचा बोध होतो, ह्मणजे ती क्रिया चालत आहे, संपली नाहीं, असा अर्थ होतो; जसें–'जळतें लांकूड' ह्मटलें ह्मणजे तें लांकूड जळत आहे, जळण्याचा व्यापार संपला नाहीं, असा अर्थ होतो.

ला किंवा **लेला** एतंत् प्रत्ययान्त कर्तृवाचकाच्या ठायीं भूतकाळाचा बोध होतो; ह्मणजे ती क्रिया संपली परंतु तिचें कार्य राहिलें आहे असा अर्थ होतो; जसें–'जळालें किंवा जळालेलें लांकूड' ह्मटलें ह्मणजे तें लांकूड जळून त्याज वर त्या क्रियेचें जें कार्य तें दृष्टिगोचर आहे, आणखी त्या कार्या वरूनच त्या क्रियेचें अनुमान झालें, असा अर्थ होतो.

आतां **ला** आणि **लेला** या दोन प्रत्ययांत भेद मिळून इत-काच कीं, **ला** प्रत्ययान्त जीं धातुसाधितें असतात, त्यांच्याच पुढें

अनुक्रमणिका

इतर सहाय धातूंचा प्रयोग होऊन भूतवर्तमान, भूतभूत, इत्यादि काळ घडतात. **लेला**प्रत्ययान्त धातुसाधिता पुढें त्या सहाय धातूंचा प्रयोग केला असतां प्रशस्त होत नाहीं.

आतां जेथें कर्ता अथवा करण नाहीं, अशा ठिकाणीं कधीं कधीं **लेला** प्रत्ययान्त धातुसाधित कर्मवाचक विशेषणा पुढें सहाय धातूंचा प्रयोग करितात; जसें—'तें घोडें तेथें बांधलेलें होतें', 'ही गाडी रंगलेली आहे', इ०. परंतु एथें 'बांधलेलें', 'रंगलेली', यांस धातुसाधित विशेषणें करून 'होतें', 'आहे', या केवळ क्रिया मानाव्या हें बरें.

यांत **लेला**प्रत्ययान्त कर्मवाचक धातुसाधित विशेषणाच्या ठायीं नुसत्या कर्माचाच बोध होतो असें नाहीं, परंतु पंचमी आणि षष्ठी शिवाय (असें मला वाटतें) इतर सर्व विभक्तींचे अर्थ याच्या ठायीं संभवतात.

४४७ अकर्मक धातू वरून हें विशेषण झालें असतां तेथें कर्त्याचा उद्बोध होतो.—'बसलेला मनुष्य', 'निजलेली मांजर', 'मेलेलें कुत्रें', इ०.

४४८ सकर्मक धातू वरून हें विशेषण झालें असतां कर्म, करण, संप्रदान; आणि अकर्मक धातु वरून अधिकरण, असे अर्थ निष्पन्न होतात.

कर्ता . . . जळालेलें लांकूड, हरवलेला घोडा.

कर्म . . . पाजविलेला चाकू, बांधलेली गाय.

करण . . . लिहिलेली लेखणी, बांधलेली दोरी. यांत पहिल्या उदाहरणांत 'लिहिलेली लेखणी' ह्मणजे ज्या लेखणीनें लिहिलें गेलें ती, असा करणी तृतीयेचा अर्थ होतो.

संप्रदान . . 'दिलेला ब्राह्मण', ह्मणजे ज्या ब्राह्मणास दिलें तो.

अनुक्रमणिका

अधिकरण . 'राहिलेलें घर', ह्मणजे ज्या घरांत लोक राहिले तें घर. 'चाललेला रस्ता', ह्मणजे ज्या रस्त्या वरून लोक चालले तो.

४४९ या धातुसाधित नामांस आणि विशेषणांस नामां प्रमाणें लिंगवचनविभक्त्यादि कार्यें होतात; तीं सांगतों.

करणें.

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	करणें.	करणीं.
द्वि०	करण्यास–ला.	करण्यांस–ला.
तृ०	करण्यानें–शीं.	करण्यांनीं.–शीं
इ०.	इ०.	इ०.

रडता.

विभ०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	रडता.	रडते.
द्वि०	रडत्यास–ला.	रडत्यांस–नां–ला.
तृ०	रडत्यानें–शीं.	रडत्यांनीं–हीं–शीं.
इ०.	इ०.	इ०.

करणारा आणि **करणार** या दोहोंचीं रूपें अनुक्रमें **आंबा** आणि **वाघ** या शब्दां सारिखीं चालतात; जसें– करणाऱ्यास, करणाऱ्यानें; करणारास, करणारानें; इ०.

गेलें.

विभ०.	**एकव०.**
प्र०	गेलें.
द्वि०	गेल्यास–ला.
तृ०	गेल्यानें–शीं.
इ०.	इ०.

अनुक्रमणिका

४५० आतां धातुसाधित अव्ययें सांगतों.

धातुसाधित अव्ययें.

करित, करितां, करितांनां, करित असतां, करित असतांनां.	वर्तमानकालवाचक.
करून.	पूर्वकालवाचक.
करूं.	निमित्तवाचक.
करावें.	विधिवाचक.

४५१ आतां हीं धातुसाधितें मूळ धातू वरून कशीं साधतात, या विषयीं नियम सांगतों; कांकीं या धातुसाधितां वरून पुढें क्रियापदांचीं रूपें सिद्ध होतात, ह्मणोन हे नियम लक्षांत ठेवणें फार आवश्यक आहे.

४५२ मूळ धातू वरून **णें** प्रत्यय लागून क्रियावाचक धातुसाधित नामें होतात; जसें—करणें, उठणें, चालणें, इ०.

४५३ मूळ धातू वरून **ता** प्रत्यय लाविला असतां वर्तमानकालबोधक कर्तृवाचक धातुसाधित नामें सिद्ध होतात; उदाह०—नेता, देता, घेता, खाता, करता, पाहता, रांगता, चालता, इ०.

४५४ जर **हो** धातूच्या भूतकाळाच्या रूपाचा प्रयोग कर्तव्य असला, तर अकारान्त सकर्मक धातूस इ आगम होऊन हा **ता** प्रत्यय लागतो; जसें—करिता झाला, पूजिता झाला; इ०.

परंतु असा प्रयोग प्राकृत ग्रंथांत येतो तेव्हां कोठें कोठें वर सांगितला सकर्मकाकर्मकाचा भेद राहत नाहीं.

४५५ परंतु यांत पढ, शिक, सांग, बोल, भज, भाज, वांच, इ० आणि हकारान्त धातु यांस हा इ आगम होत नाहीं. हा **पढ**धातूचा गण जाणावा.

अनुक्रमणिका

४५६ प्रयोजक धातू वरून **ता** प्रत्यय होत असतां **इ** आगम केला पाहिजे ; जसें—'करविता—चालविता—बोलविता—झाला', 'हंसविता झाला'.

४५७ **णार** आणि **णारा** एतत्प्रत्ययान्त जीं कर्तृवाचक धातुसाधितें तीं मूळ धातूस हे प्रत्यय लाविल्यानें होतात ; जसें—करणार, हंसणार, घेणार, देणार ; बोलणारा, करणारा, जाणारा, येणारा, इ०.

४५८ मूळ धातूंस **ला** आणि **लेला** हे प्रत्यय लाविले असतां कर्मवाचक धातुसाधितें होतात ; परंतु त्यांत **पढ** धातूचा गण वर्ज करून हे प्रत्यय लाविते समयीं सकर्मकधातूस इ आगम होतो ; जसें—ठेविला, ठेविलेला ; अर्पिला, अर्पिलेला ; आकर्षिला, आकर्षिलेला ; इ०.

अर्थात् अकर्मक धातूस हा **इ** आगम होत नाहीं ; जसें—उठला, उठलेला ; बसला, बसलेला ; निजला, निजलेला ; इ०.

हकारान्त धातूस हा आगम अवश्य केला पाहिजे. जसे—लिहिलें, लिहिलेलें ; पाहिलेलां, साहिलेलें, इ०.

४५९ मूळ धातूस **आवें** प्रत्यय लाविला असतां विधिवाचक धातुसाधितें होतात. हा प्रत्यय प्रयोगविशेषीं कर्ता कर्म यांच्या लिंगवचनां प्रमाणें फिरतो ; जसें—करावें, धरावा, फिरवावी, चाराव्या, मारावे, आठवावीं, पाहावीं, इ०.

४६० मूळ धातूस **त**, **तां**, **तांनां**, हे प्रत्यय लाविले असतां वर्तमानकाळवाचक धातुसाधित अव्ययें होतात. परंतु पढधातूचा गण वर्जून अकारान्त सकर्मक धातूंस हा प्रत्यय लावायाच्या पूर्वीं **इ** आगम केला पाहिजे ; जसें—करित, धरित, ठेवित, बोलवित ; शिंपितां, ठेवितांना, इ०.

४६१ मूळ धातूस **ऊन** प्रत्यय लाविला असतां पूर्वकालवाचक अव्यय सिद्ध होतें; जसें—करून, बोलून, जाऊन, ठेवून, इ०.

एथें शिकणारानें लक्षांत ठेवावें कीं कोणीं—**नेवून, आवून, घेवून,** अशीं जीं रूपें लिहितात तीं अशुद्ध; **नेऊन, जाऊन, घेऊन** अशीं रूपें लिहिलीं पाहिजेत.

४६२ मूळ धातूस **ऊं** लाविला असतां निमित्तवाचक धातुसाधित अव्यय सिद्ध होतें; जसें—बोलूं, घेऊं, नेऊं, खाऊं, इ०.

नेवूं, खावूं, घेवूं, इ० रूपें अशुद्ध.

४६३ मूळ धातूस **आवा** प्रत्यय लागून विधिवाचक धातुसाधितें होतात; प्रयोगभेदेंकरून लिंगवचनानुरूप एतत्प्रत्ययान्त रूपें फिरतात.

कोणीं **करावें, जावें,** इ० विधिवाचक धातुसाधितें यांस नामें करून त्या वरून चतुर्थी आणि षष्ठी या दोन विभक्ति मात्र मानितात; जसें—**करावयास, करावयाला**; अ० **करायास, करायाला**; **करावयाचें,** अ० **करायाचें**; अशीं चतुर्थी आणि षष्ठीचीं रूपें मानितात, परंतु मला असें वाटतें कीं **करायास** अ० **करावयास, करायाचें** अ० **करावयाचें**; हीं **करावें** या विधिवाचक धातुसाधिताचीं विभक्तिरूपें नव्हत. हीं मुळीं **करा** आणि **करावें** या शब्दां पुढें **यास** आणि **याचें** हे दोन शब्द लागून **करायास, करायाचें; करावयास, करावयाचें**; अशीं रूपें बोलण्यांत संक्षेप होऊन झालीं असावीं असें अनुमान होतें.

प्राकृत ग्रंथांत बहुधा अशीच लिहिण्याची रीति आढळती. 'तो करावयास गेला', ह्मणजे करावें यास गेला, 'तें नेसावयाचें वस्त्र'; ह्मणजे नेसावें याचें वस्त्र'; 'बसायाचें घोडें', ह्मणजे बसा याचें घोडें, असा मूळचा अर्थ.

अनुक्रमणिका

आतां—'मला जावें लागेल', 'त्याला तें काम करावें लागलें', इत्यादि वाक्यांत **लागेल**, **लागलें**, हीं भावकर्तृक क्रियापदें मानिलीं पाहिजेत,—'मला जावें लागतें' ह्मणजे म्यां जावें हें अवश्य आहे असा अर्थ; 'त्यास आपल्या कामावर लौकर हाजर व्हावें लागतें', या ठिकाणीं **लागतें** या क्रियापदाचा,—'आपल्या कामावर लौकर हाजर व्हावें'—हा सर्व वाक्यांश कर्ता मानावा, या शिवाय मला दुसरी युक्ति आढळत नाहीं.

४६४ **अशां रूपां वरून** जेथें भावकर्तरिप्रयोग होतो त्या वाक्यांत सकर्मकाकर्मकानुसंधानानें यांस धातुसाधित विशेषणें अ० नामें मानणें आवश्यक आहे असें मला वाटतें; जसें—'मला जायाचें आहे', एथें **जायाचें** हें धातुसाधित नाम; आणि 'त्यास तें काम करायाचें आहे', या वाक्यांत **करायाचें** हें धातुसाधित विशेषण मानावें.

असें नमानिलें तर 'मला जायाचें आहे', या वाक्यांत **आहे** याचा कर्ता **जायाचें** या शिवाय दुसरा कोणी दिसत नाहीं. हीं जीं वर वाक्यें सांगितलीं आहेत यांचा व्याकरणपपच्छेद अन्य रीतीनें कोण कसा करितो हें समजल्या वांचून मला या शिवाय दुसरी युक्ति आढळत नाहीं.

परंतु 'नेसायाचा पंचा', 'पांघरावयाची पासोडी', 'राहायाचें घर', आशा स्थळीं मात्र **नेसायाचा**, **पांघरावयाची**, **राहायाचें**, हीं स्पष्ट धातुसाधित विशेषणें होत असें दिसतें.

तसेंच 'त्याणें केल्या शिवाय माझें काम होणार नाहीं', 'तो गेल्या वर मीं जाईन', इ० वाक्यांत **त्याणें**, **तो**, यांस त्या त्या धातुसाधित नामांच्या धात्वर्थास अनुलक्षून कर्ते मानिलें पाहिजे. अथवा वर सांगितल्या प्रमाणें कित्येक विद्वानांचें असें मत आहे कीं, **केलें**, **गेलें**, इ० भूतकालवाचक सातुसाधित नामें न मानितां **केल्यास**, **गेल्यानें**, इ० 'केलें यास', 'गेलें यानें' या पदांचीं

संक्षिप्त रूपें मानावीं:–'तो गेल्या वर', ह्मणजे 'तो गेला या वर', 'त्याणें केल्या शिवाय', ह्मणजे 'त्याणें केलें या शिवाय'. ही कल्पना चांगली आहे, आणि मूळचीं पदें अशींच खरीं यांत संशय नाहीं, परंतु व्याकरणपदच्छेद करिते समयीं अशीं निरनिराळीं पदें करून व्याकरण करावें, किंवा–**'केल्यास, गेल्यानें,** हीं एक पदें मानून व्याकरण करावें, या विषयीं मी अंमळ साशंक आहें. हे दोन पक्ष आहेत यांतून जो ज्यास बरा दिसेल तो त्यानें घ्यावा.

कर्मवाचक सातुसाधित नामां वरून द्वितीया झाली असतां कार्यकारणभाव, आणि क्रियेची वर्तमान काळीं असिद्धता, असे अर्थ गम्यमान होतात. उदाह०–'विद्या शिकल्यास प्रतिष्ठा मिळत्ये', यांत विद्या शिकणें- हें कारण, आणि प्रतिष्ठा मिळणें हें कार्य.

क्रियेची अवधी मानून काळगणना कर्तव्य असतां वर सांगितल्या रूपाचा प्रयोग होतो. उदाह०–'मला शास्त्र पढल्यास पांच वर्षें झालीं,' इ०. ह्मणजे शास्त्र पढत होतों तेव्हां पासून पांच वर्षें झालीं.

वर्ग ९.

सहाय धातूंचें चालिवणें.

४६५ धातूंचें **चालिवणें** ह्मणजे प्रयोग, अर्थ, काळ, वचन, पुरुष, लिंग, यांहींकरून त्यांचीं सर्व रूपें एका क्रमानें दाखिवणें.

४६६ सहाय धातूं मध्यें ज्यांस प्रयोग, अर्थ, काळ, हीं सर्व असत नाहींत, त्यांस गौण क्रियापद ह्मणावें.—**पाहिजे, नको, नये, नलगे,** हीं या प्रकारचीं क्रियापदें होत.

४६७ कित्येक सहाय धातूंचीं रूपें नियमा प्रमाणें होत नाहींत, ह्मणोन ते धातू चालवून दाखविले पाहिजेत.

अनुक्रमणिका

असधातूचें चालिवणें.

असधातूचीं वर्तमान काळीं तीन प्रकारचीं आणि भूत काळीं दोन प्रकारचीं रूपें होतात.

अस* धातु.

करणरूप.

मूलरूपभेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

वर्तमानकाळ.

प्रकार १.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं आहें	आह्मीं आहों.
द्वि०	तूं आहेस.	तुह्मीं आहांत–आहां.
तृ०	तो–ती–तें आहे.	ते–त्या–तीं आहेत.

---

* या असधातूचीं पहिल्या प्रकारचीं वर्तमान काळाचीं आणि भूत काळाचीं रूपें इतर धातूंच्या रूपां पुढें स्वार्थ असतां लाविलीं जातात. परंतु दुसऱ्या प्रकारचीं जीं रूपें आहेत तीं इतर धातूंच्या रूपां पुढें लाविलीं असतां संशयार्थ उत्पन्न होतो. असधातूचें दुसऱ्या प्रकारचें जें भूतकाळाचें रूप होतें त्याचा नुसता प्रयोग होत नाहीं, गोमंतक प्रांतीं मात्र शेवटील अक्षरास द्वित्त करून त्याचा नुसता प्रयोग करितात, जसें–'हीं थैं असल्लों', तूं थैं असल्लीस'. या धातूचीं दुसऱ्या प्रकारचीं भूत काळाचीं रूपें, भविष्य काळाचीं रूपें, आणि विध्यर्थाचीं रूपें, इतर धातूंच्या रूपां पुढें लाविलीं असतां संशयार्थ उत्पन्न होतो; आणि वर्तमान काळाचीं रूपें लाविलीं असतां संकेतार्थ उत्पन्न होतो; जसें–'मी गेलों असलों', 'तूं गेला असशील', एथें संशयार्थ; आणि 'मी गेलों असतों'–'जर अमुक गोष्ट झाली असती तर मीं गेलों असतों', एथें संकेतार्थ. कित्येक विद्वान् असें ह्मणतात कीं **आहे** हा स्वतंत्र धातू आहे, आणि **होतें** हा त्याचा भूत काळ.

अनुक्रमणिका

यांत **अहांत**, **अहां**, अशीं द्वितीय अशीं द्वितीय पुरुषाच्या अनेकवचनीं सर्वत्र दोन प्रकारचीं रूपें होतात त्यांत-- **आहां**, **होतां**, **असतां**, **गेलां**, **गेलां होता**, इ० प्रकारचीं जीं रूपें तीं बहुधा **तुह्मीं** या सर्वनामाच्या स्थानीं बहुमानार्थीं जेव्हां **आपण** या सर्वनामांचा प्रयोग करावा लागतो तेव्हां उपयोगांत आणावीं, हा नियम बरा आहे. 'आपण गेलां', आणि 'तुह्मीं गेलेत', असा भेद ठेवावा. **आहां** आणि **आहांत** यांचीं विकल्पें **अहां** आणि **अहांत** अशींहि रूपें आढळतात, परंतु तीं प्रशस्त नाहींत.

प्रकार २.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं होंय.	आह्मीं हों.
द्वि०	तूं होस.	तुह्मीं व्हा.
तृ०	तो–ती–तें होय.	ते–त्या–तीं होत.

हीं **अस**धातूचीं वर्तमान काळीं जीं दोन दोन प्रकारचीं रूपें होतात त्यांचा प्रयोग बहुतकरून कांहीं व्याख्या कर्तव्य असतां अथवा कांहीं विशेष प्रकार निश्चय पूर्वक सांगायाचा असतां करितात; जसें–'प्रापंचिक व्यवहारास जसें द्रव्य हें मुख्य साधन होय, तसे वाग्व्यवहारास शब्द होत'; मीं जर राघोपंताचा पुत्र होंय, तर तुला ती जागा मिळूं देणार नाहीं'.

४६८ खालीं जीं वर्तमान काळाचीं रूपें दाखविलीं. आहेत तीं, व सर्व जीं **त**कारान्त क्रियापदें साधतात तीं, हीं वर्तमानकाळवाचक धातुसाधित अव्यया वरून साधतात, हा एक नियम जाणावा. **करित**, **असत**, हीं जीं वर्तमानकाळवाचक धातुसाधित अव्ययें यां वरून–करितों,

असतों, करित्यें, असत्यें, करितो, असता, करितात, अस-तात, करितास, असतीस, इ० क्रियापदें साधतात.

प्रकार ३.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असतों.	आह्मीं असतों.
द्वि०	तूं असतोस.	तुह्मीं असता.
तृ०	तो असतो.	ते असतात.

स्त्रीलिंग.

प्र०	मीं असत्यें.
द्वि०	तूं असत्येस, अ० असतीस.
तृ०	ती असत्ये, अ० असती.

नपुंसकलिंग.

प्र०	मीं असतें.
द्वि०	तूं असतेंस.
तृ०	तें असतें.

अनेकवचनीं लिंगत्रयीं रूपें सारिखीं जाणावीं.

देशा वर व कोंकणांतहि स्त्रीलिंगीं प्रथम पुरुषीं-**असत्यें, करित्यें, जात्यें, येत असत्यें**, अशी बोलायाची रीत आहे. परंतु वाडीमांतीं कऱ्हाड्या ब्राह्मणांमध्यें, व साष्टी प्रांतांत-**असतों, करितों, जातों, येतों**, अशीं स्त्रीलिंगीं रूपें होतात. परंतु ही रीत नीट दिसत नाहीं; कारण एक तर ही रीत केवळ एकदेशीय, त्यांत आणखी अशा प्रकारच्या रूढींत कांहीं मार्दव नाहीं; स्त्रियांच्या भाषणांत जितका नाजुकपणा आणि मार्दव तितका तो त्यांस अलंकार होय. **तों** या पेक्षां **त्यें** यांत कांहीं मार्दवविशेष आहे, ह्मणोन सर्वांहीं 'मीं **असत्यें, करित्यें**', हींच रूपें स्त्रीलिंगीं घेतलीं असतां चांगलें आहे.

अनुक्रमणिका

नपुंसकलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं गेलें असावें.	आह्मीं गेलीं असावीं.
द्वि०	तूं गेलें असावेंस.	तुह्मीं गेलीं असावींत.
तृ०	तें गेलें असावें.	तीं गेलीं असावीं.

विध्यर्थी भविष्यभूत काळ नाहीं.

भविष्य काळ.

कर्तरिप्रयोग.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असणार असावा.	आह्मीं असणार असावे.
द्वि०	तूं असणार असावास.	तुह्मीं असणार असावेत.
तृ०	तो असणार असावा.	ते असणार असावे.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

विध्यर्थी भविष्य काळाचे दुसरे प्रकार नाहींत. हीं जीं रूपें सांगितलीं यांचा भविष्य काळ मानावा, अथवा वर्तमानभविष्य मानिला असतांहि चिंता नाहीं.

संशयार्थ.

वर्तमान काळ.

कर्तरिप्रयोग.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत असलों.	आह्मीं असत असलों.
द्वि०.	तूं असत असलास.	तुह्मीं असत असलेत.
तृ०.	तो असत असला.	ते असत असले.

साष्टी प्रांतांतील रहिवासी लोका मध्यें कांहीं जातींत पुल्लिंगीं द्वितीय आणि तृतीय पुरुषीं—**तूं असत्येस**, तूं **करत्येस**, तो **करत्ये**, तो **बोलत्ये**, अशीं स्त्रीलिंगा सारखीं रूपें करून बोलण्याची चाल आहे. तसेंच अनेकवचनीं—**करतान**, **असतान**, असें बोलितात. परंतु ही बोलण्याची रीत फार वाईट, ईत कांहीं मर्दानी डौल दिसत नाहीं, यास्तव अशी घाणेरडी रीत सर्वांहीं टाकून वर सांगितली जी सर्वप्रसिद्ध व सर्वमान्य ती घ्यावी ह्मणजे नीट दिसतें. तसेंच अस्सल देशस्थां मध्यें—त्या **करित्यात**, **बोलित्यात**, आणि कोंकणस्थां मध्यें—**केलेन**, **घेतलेन**, **सांगितलेन**, अशीं विलक्षण रूपें साधून बोलितात, हेंहि तसेंच वाईट.

अपूर्णवर्तमान काळ.

पुरु०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	मीं असत आहें.	आह्मीं असत आहों.
द्वि०	तूं असत आहेस.	तुह्मीं असत आहां.
तृ०	तो–ती–तें असत आहे.	ते–त्या–तीं असत आहेत, अ० असताहेत.

यांत पुल्लिंगीं रूपें लिहिलीं आहेत, या वरून लिंगांतरांचीं रूपें जाणावीं.

अंमळ नेट देऊन बोलायाचें असतां या काळीं वर्तमानकाळवाचक धातुसाधिता पुढें सहाय धातु नलावितां शुद्ध वर्तमान काळांच्या रूपां पुढें लावितात; जसें—

पुरु०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	मीं असतों आहें.	आह्मीं असतों आहों.
द्वि०	तूं असतोस आहेस, अ० असतो आहेस.	तुह्मीं असतां आहां.
तृ०	तो असतो आहे.	ते असतात आहेत.

या ठिकाणीं–'तूं असतो आहेस', 'तूं करितो आहेस', असेंहि लिहिण्याचा पाठ आ~ परंतु केवळ व्याकरणदृष्टीनेंच पाहिलें तर– **असतोस आहेस, करितोस आहेस**, हें शुद्ध होय; परंतु असें ह्मणण्याचा प्रघात कोंकणांत आहे; तसेंच देशा वर **आहे** यांतील **आ**चा लोप करून पुढलीं अक्षरें मात्र धातुसाधिता पुढें कित्येक पुरुषीं योजितात; जसें– मीं **करितोंहें**, तूं **करितोहेस**, तो **करितोहे**, ते **करिताहेत**, इ०. या शेवटल्या प्रकारची बोलण्याची व लिहिण्याची रूढि विशेष आहे.

रीतिवर्तमान काळ.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत असतों.	आह्मीं असत असतों.
द्वि०	तूं असत असतोस.	तुह्मीं असत असता.
तृ०	तो असत असतो.	ते असत असतात.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें आणावीं.

भूत काळ.

प्रकार १.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं होतों.	आह्मीं होतों.
द्वि०	तूं होतास.	तुह्मीं होतेत–होतां.
तृ०	तो होता.	ते होते.

अनुक्रमणिका

स्त्रीलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं होत्यें.	आह्मीं होतों.
द्वि०	तूं होतीस.	तुह्मीं होत्यात—होतां—होतीत.
तृ०	ती होती.	त्या होत्या.

नपुंसकलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं होतें	आह्मीं होतों.
द्वि०	तूं होतेंस.	तुह्मीं होतींत—होतां.
तृ०	तें होतें.	तीं होतीं.

अपूर्णभूत काळ.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत होतों.	आह्मीं असत होतों.
द्वि०	तूं असत होतास.	तुह्मीं असत होतेत—होतां.
तृ०	तो असत होता.	ते असत होते.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

रीतिभूत काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असें, अ० असत असें.	आह्मीं असों, अ० असत असों.
द्वि०	तूं असेस, अ० असत असेस.	तुह्मीं असा, अ० असत असा.
तृ०	तो असे, अ० असत असे.	ते—त्या—तीं असत, अ० असत असत.

अनुक्रमणिका

स्त्रीलिंगीं—मीं **अस्यें, असत अस्यें**; तूं **अस्येस**; ती **अस्ये**; इ० रूपें व्याकरशुद्ध जाणावीं. परंतु अशा रीतीनें लिहिण्याचा प्रघात नाहीं; ह्मणोन तिन्ही लिंगीं सारखींच रूपें लिहावीं.

यांतून पहिल्या प्रकारच्या रूपांचा वर्तमान काळींहि प्रयोग करितात; परंतु विशेषेंकरून ग्रंथांत.

पूर्णभूत काळ.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असता झालों.	आह्मीं असते झालों.
द्वि०	तूं असता झालास.	तुह्मी असते झालेत.
तृ०	तो असता झाला.	ते असते झाले.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

असधातूस भूतभूत आणि वर्तमानभूत हे काळ नाहींत.

भविष्यभूत काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असणार होतों.	आह्मीं असणार होतों.
द्वि०	तूं असणार होतास.	तुह्मीं असणार होतेत—होतां.
तृ०	तो असणार होता.	ते असणार होते.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

भविष्य काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असेन.	आह्मीं असूं.
द्वि०	तूं असशील.	तुह्मीं असाल.
तृ०	तो—ती—तें असेल.	ते—त्या—तीं असतील.

अनुक्रमणिका

अपूर्णभविष्य काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत असेन.	आह्मीं असत असूं.
द्वि०	तूं असत असशील.	तुह्मीं असत असाल.
तृ०	तो असत असेल.	ते असत असतील.

वर्तमानभविष्य काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असणार आहें.	आह्मीं असणार आहों.
द्वि०	तूं असणार आहेस.	तुह्मीं असणार आहां.
तृ०	तो—ती—तें असणार आहे.	ते—त्या—तीं असणार आहेत.

असधातूचा भूतभविष्य आणि भविष्यभविष्य या काळीं प्रशस्त प्रयोग होत नाहीं.

आज्ञार्थ.

वर्तमानकाळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असूं.	आह्मीं असूं.
द्वि०	तूं अस—ऐस.	तुह्मीं असा.
तृ०	तो—ती—तें असो.	ते—त्या—तीं असोत.

४७० यांत तृतीय पुरुषीं बहुतकरून दोन प्रकारचीं रूपें आढळतात; एक ऊकारान्त आणि एक ओकारान्त, ह्मणजे कोठें— **करो**, **करोत**; आणि कोठें— **करू**, **करूत**; अशीं रूपें होतात. हा भेद बहुधा देशपरत्वें व कोंकणपरत्वें होतो. कोंकणांत पहिल्या आणि देशीं दुसऱ्या प्रकारच्या रूपांची विशेषेंकरून प्रवृत्ति आहे. त्यांत आणखी

असा नियम आढळतो कीं अकर्मक धातु असतां बहुधा **ओ**-काराची आणखी दुसरा एक असा नियम आढळतो कीं एकाक्षरी धातु असल्यास त्यास ऊकार, आणि अनेकाक्षरी असल्यास **ओ**कार होतो. आणि सकर्मक असतां ऊकाराची प्रवृति असत्ये. हे नियम सर्वत्र चालतात असें नाहीं, परंतु जेथें संशय उत्पन्न होईल तेथें या नियमा वर लक्ष देणें फार उपयोगी आहे.

विध्यर्थ.

वर्तमान काळ.

कर्तरिप्रयोग.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असावा.	आह्मीं असावे.
द्वि०	तूं असावास.	तुह्मीं असावेत.
तृ०	तो असावा.	ते असावे.

स्त्रीलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असावी.	आह्मीं असाव्या.
द्वि०	तूं असावीस.	तुह्मीं असाव्यात.
तृ०	ती असावी.	त्या असाव्या.

नपुंसकलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेक०.
प्र०	मीं असावें.	आह्मीं असावीं.
द्वि०	तूं असावेंस.	तुह्मीं असावींत.
तृ०	तें असावें.	तीं असावीं.

अनुक्रमणिका

भावीप्रयोग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं अ० म्यां असावें.	आह्मीं असावें.
द्वि०	तूं अ० त्वां असावें.	तुह्मीं असावें.
तृ०	त्याणें–तिणें असावें.	त्यांहीं असावें.

४७१ या विध्यर्थाच्या वर्तमानकाळाच्या रूपांचा भूतकाळींहि प्रयोग होतो; जसें– ‘काल मीं तेथें जावें’ (ह्म० जावें होतें, अ० जायाचें होतें), ‘ह्मटलें असतां गेल्या वर्षींच त्याचें लग्न व्हावें’.

अपूर्णवर्तमान काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं अ० म्यां असत असावें.	आह्मीं असत असावें.
द्वि०	तूं अ० त्वां असत असावें.	तुह्मीं असत असावें.
तृ०	त्याणें–तिणें असत असावें.	त्यांहीं असत असावें.

या काळीं कर्मणिप्रयोगहि होतो.

रीतिवर्तमान काळ.

कर्तरिप्रयोग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत असावा.	आह्मीं असत असावे.
द्वि०	तूं असत असावास.	तुह्मीं असत असावेत.
तृ०	तो असत असावा.	ते असत असावे.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

या काळीं भावीप्रयोग प्रशस्त.

अनुक्रमणिका

भूत काळ.

कर्तरिप्रयोग.

पुंलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असावा होतों, अ० असायाचा होतों.	आह्मीं असावे होतों, अ० असायाचे होतों.
द्वि०	तूं असावा होतास, अ० असायाचा होतास.	तुह्मीं असावे होतेत, अ० असायाचे होतेत.
तृ०	तो असावा होता, अ० असायाचा होता.	ते असावे होते, अ० असायाचे होते.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

भावीप्रयोग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं अ० म्यां असावें होतें, अ० असायाचें होतें.	आह्मीं असावें होतें, अ० असायाचें होतें.
द्वि०	तूं अ० त्वां असावें होतें, अ० असा-याचें होतें.	तुह्मीं असावें होतें, अ० असायाचें होतें.
तृ०	त्याणें—तिणें असावें होतें, अ० असायाचें होतें.	त्यांहीं असावें होतें, अ० असायाचें होतें.

४७२ विध्यर्थी अपूर्णभूत काळाचा प्रयोग बहुधा होत नाहीं; परंतु— 'मीं असत असावें होतें', 'त्याणें त्या काळीं

लिहित असावें अ० असायाचें होतें' असा प्रयोग केला तर हा विध्यर्थी अपूर्णभूत काळ जाणावा.

४७३ विध्यर्थी रीतिभूत, पूर्णभूत, भूतभूत, हे काळ नाहींत.

४७४ या **अस** धातूस वर्तमानभूत काळ नाहीं, ह्मणोन याच्या स्थानीं इतर धातु उदाहरणा करितां त्या काळीं चालवून दाखवितों.

वर्तमानभूत काळ.

कर्तरिप्रयोग.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं गेला अ० गेलों असावा.	आह्मीं गेले अ० गेलों असावे.
द्वि०	तूं गेलों असावास.	तुह्मीं गेले असावेत.
तृ०	तो गेला असावा.	ते गेले असावे.

स्त्रीलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं गेली अ० गेल्यें असावी.	आह्मीं गेल्या अ० गेलों असाव्या.
द्वि०	तूं गेली असावीस.	तुह्मीं गेल्या असाव्यात.
तृ०	ती गेली असावी.	त्या गेल्या असाव्या.

नपुंसकलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं गेलें असावें.	आह्मीं गेलीं असावीं.
द्वि०	तूं गेलें असावेंस.	तुह्मीं गेलीं असावींत.
तृ०	तें गेलें असावें.	तीं गेलीं असावीं.

विध्यर्थी भविष्यभूत काळ नाहीं.

भविष्य काळ.

कर्तरिप्रयोग.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असणार असावा.	आह्मीं असणार असावे.
द्वि०	तूं असणार असावास.	तुह्मीं असणार असावेत.
तृ०	तो असणार असावा.	ते असणार असावे.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

विध्यर्थी भविष्य काळाचे दुसरे प्रकार नाहींत. हीं जीं रूपें सांगितलीं यांचा भविष्य काळ मानावा, अथवा वर्तमानभविष्य मानिला असतांहि चिंता नाहीं.

संशयार्थ.

वर्तमान काळ.

कर्तरिप्रयोग.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत असलों.	आह्मीं असत असलों.
द्वि०.	तूं असत असलास.	तुह्मीं असत असलेत.
तृ०.	तो असत असला.	ते असत असले.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

अस धातूस संशयार्थी भूतकाळ नाहीं, यास्तव त्याच्या स्थानीं दुसरा धातु उदाहरणा करितां त्या काळीं चालवून दाखवितों.

भूत काळ.

कर्तरिप्रयोग.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं गेलों असलों, अ० गेला असलों.	आह्मीं गेलों असलों, अ० गेले असलों.
द्वि०	तूं गेला असलास, अ० गेलास असलास.	तुह्मीं गेले असलेत, अ० गेलेत असलेत, अ० गेलां असलां.
तृ०	तो गेला असला.	ते गेले असले.

स्त्रीलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं गेल्यें असल्यें, अ० गेली असल्यें.	आह्मीं गेलों असलों, अ० गेल्या असलों.
द्वि०	तूं गेली असलीस, अ० गेलीस असलीस.	तुह्मीं गेल्या असल्यात, अ० गेल्यात असल्यात, अ० गेलां असलां.
तृ०	ती गेली असली.	त्या गेल्या असल्या.

नपुंसकलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं गेलें असलें.	आह्मीं गेलीं असलों.
द्वि०	तूं गेलें असलेंस, अ० गेलेंस असलेंस.	तुह्मीं गेलीं असलींत, अ० गेलींत असलींत, अ० गेलां असलां.
तृ०	तें गेलें असलें.	तीं गेलीं असलीं.

भविष्य काळ.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असणार असलों.	आह्मीं असणार असलों.
द्वि०	तूं असणार असलास.	तुह्मीं असणार असलेत.
तृ०	तो असणार असला.	ते असणार असले.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें आणावीं.

वर्तमानभविष्य काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत असेन.	आह्मीं असत असूं.
द्वि०	तूं असत असशील.	तुह्मीं असत असाल.
तृ०	तो—ती—तें असत असेल.	ते—त्या—तीं असत असतील.

भूतभविष्य काळ.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असलों असेन, अ० असला असेन.	आह्मीं असलों अ० असले असूं.
द्वि०	तूं असला असशील.	तुह्मीं असले असाल.
तृ०	तो असला असेल.	ते असले असतील.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें आणावीं.

अनुक्रमणिका

भविष्यभविष्य काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असणार असेन.	आह्मीं असणार असूं.
द्वि०	तूं असणार असशील.	आह्मीं असणार असाल.
तृ०	तो–ती–तें असणार असेल.	ते–त्या–तीं असणार असतील.

संकेतार्थ.

भूतकाळ.

कर्तरिप्रयोग.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असतों.	आह्मीं असतों.
द्वि०	तूं असतास.	तुह्मीं असतेत अ० असतां.
तृ०	तो असता.	ते असते.

स्त्रीलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत्यें.	आह्मीं आसतों.
द्वि०	तूं असतीस.	तुह्मीं असत्यात, असतींत, अ० असतां.
तृ०	ती असती.	त्या असत्या.

अनुक्रमणिका

नपुंसकलिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असतें.	आह्मीं असतों.
द्वि०	तूं असतेंस.	तुह्मीं असतींत, असतां.
तृ०	तें असतें.	तीं असतीं.

अपूर्णभूत काळ.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असत असतों.	आह्मीं असत असतों.
द्वि०	तूं असत असतास.	तुह्मीं असत असतेत.
तृ०	तो असत असता.	ते असत असते.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

भूतभूत काळ.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं असलों असतों.	आह्मीं असलों असतों.
द्वि०	तूं असला असतास.	तुह्मीं असले असतेत, अ० असलां असतां.
तृ०	तो असला असता.	ते असले असते.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

धातुसाधितें.

नामें आणि विशेषणें.

असणें	क्रियावाचक.
असता, असणारा, असणार.	कर्तृवाचक.
असला, असलेला	कर्मवाचक.

अनुक्रमणिका

अव्ययें.

असत, असतां, असतांनां · असत असतां,असत असतांनां.	वर्तमानकालवाचक.
असलें असतां·	भूतकालवाचक.
असून	पूर्वकालवाचक.
असूं	निमित्तवाचक.
असावें	विधिवाचक.

या **अस** धातूस प्रयोजकभेद नाहीं.

शक्यभेद.

स्वार्थ.

वर्तमान काळ.

भावीप्रयोग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	माझ्यानें अ० मला असवतें.	आमच्यानें अ०आ-ह्माला असवतें.
द्वि०	तुझ्यानें अ० तुला असवतें.	तुमच्यानें अ० तु-ह्माला असवतें.
तृ०	त्याच्यानें अ० त्याला तिच्यानें अ० तिला असवतें.	त्यांच्यानें अ० त्यांनां असवतें.

याच प्रमाणें जर शक्यभेदीं सर्व पुरुषीं रूपें दाखविलीं तर उगीच ग्रंथविस्तार होईल ह्मणोन त्या त्या अर्थी, त्या त्या प्रयोगीं, त्या त्या काळीं, प्रथम पुरुषीं मात्र हीं रूपें चालवून दाखवितों. परंतु या **अस** धातूचीं शक्यभेदीं सर्वकाळीं रूपें साधतात असें नाहीं, ह्मणोन याच्या ठिकाणीं **चाल** धातु घेऊन त्याचीं रूपें खालीं दाखविलीं आहेत.

अनुक्रमणिका

शक्यभेद.

स्वार्थ.

भावीप्रयोग.

माझ्यानें अ० मला चालवतें . . . . . वर्तमान.
माझ्यानें अ० मला चालवत आहे . . अपूर्णवर्तमान.
माझ्यानें अ० मला चालवत असतें . . रीतिवर्तमान.
माझ्यानें अ० मला चालवलें . . . . . भूत.
माझ्यानें अ० मला चालवत होतें . . अपूर्णभूत.
माझ्यानें अ० मला चालवे अ० चालवत असे. रीतिभूत.
माझ्यानें अ० मला चालवतें झालें. . . पूर्णभूत.
माझ्यानें अ० मला चालवलें होतें. . . भूतभूत.
माझ्यानें अ० मला चालवलें आहे. . . वर्तमानभूत.
माझ्यानें अ० अला चालवणार होतें . . भविष्यभूत.
माझ्यानें अ० मला चालवेल . . . . . भविष्य.
माझ्यानें अ० मला चालवत असेल . . अपूर्णभविष्य.
माझ्यानें अ० मला चालवणार आहे . . वर्तमानभविष्य.
माझ्यानें अ० मला चालवलें असेल . . भूतभविष्य.
माझ्यानें अ० मला चालणार असेल. . भविष्यभविष्य.

आज्ञार्थ.

माझ्यानें अ० मला चालवो . . . . वर्तमान.

विध्यर्थ.

माझ्यानें अ० मला चालवावें . . . . . वर्तमान.
माझ्यानें अ० मला चालवत असावें . रीतिवर्तमान.
माझ्यानें अ० मला चालवावें होतें, चालवायाचें होतें . . . . } भूत.

यास भविष्य काळ नाहीं.

अनुक्रमणिका

संशयार्थ.

माझ्यानें अ० मला चालवत असलें . . वर्तमान.
माझ्यानें अ० मला चालवलें असलें. . भूत.
माझ्यानें अ० मला चालवणार असलें . भविष्य.
माझ्यानें अ० मला चालवत असेल . . वर्तमानभविष्य.
माझ्यानें अ० मला चालवलें असेल . . भूतभविष्य.
माझ्यानें अ० मला चालवणार असेल भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

माझ्यानें अ० मला चालवतें . . . . वर्तमान.
माझ्यानें अ० मला चालवत असतें . . रीतिवर्तमान.
माझ्यानें अ० मला चालवलें असतें. . . भूत.

शक्यभेदीं धातुसाधितें, व कित्येक अर्थीं कित्येक काळांचीं रूपें, हीं होत नाहींत; कारण, एथें धातूच्या ठायीं भावकर्तृत्वविशिष्ट अर्थ असतो, आणखी शक्य आणि प्रयोजक भेदीं धातूच्या रूपांचें उच्चारण बहुधा सारिखेंच होतें; ह्मणोन यद्यपि बलात्कारानें या शक्य भेदीं धातुसाधितें, व कित्येक अर्थीं कित्येक काळांचीं रूपें केलीं, तथापि त्यांच्या ठायीं प्रयोजक भेदाची भ्रांति होत्ये. जसें—**चालवतां, चालवून, चालवणार** इ० हीं शक्यभेदीं, आणि—**चालवितां, चालवून, चालविणार** इ० हीं प्रयोजक भेदीं, धातुसाधितें होत; यांच्या उच्चारणांत फारसा भेद नाहीं, आणि शक्यभेदीं धातुसाधितांचा प्रयोग व कित्येक अर्थीं कित्येक काळांच्या रूपांचा प्रयोग कधींही करण्यांत येत नाहीं, ह्मणोन त्यांचीं रूपें एथें लिहिलीं नाहींत.

आतां या प्रमाणें सर्व सहाय धातु चालवून दाखविले

तर ग्रंथ फार वाढेल. या **अस**धातू वरून इतर धातूंचीं प्रयोग, अर्थ, काळ, पुरुष, वचन, एतत्परत्वें कसकशीं रूपें होतात हें जाणावें.

४७५ **अस**धातूच्या मागें **न** या अव्ययाचा योग केला असतां **नसणें** असा तत्प्रतिपक्षी एक नवा धातु (अथवा क्रियापद ह्मणा) उत्पन्न होतो; त्याचीं रूपें **अस** धातूच्या सारखीं चालतात. वर्तमान काळीं असधातू प्रमाणें त्याचीं तीन प्रकारचीं रूपें, आणि भूतकाळीं दोन प्रकारचीं रूपें होतात, तीं दाखवितों.

***नसधातु.**

अकरणरूप.

मूलरूपभेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

वर्तमान काळ.

प्रकार १.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं नाहीं.	आह्मीं नाहीं.
द्वि०	तूं नाहींस.	तुह्मीं नाहींत.
तृ०	तो–ती–तें–नाहीं.	ते–त्या–तीं नाहींत.

* जसें कित्येक विद्वान **अस** या धातूचीं **आहे, होता,** हीं रूपें मानित नाहींत, **आहे** हा केवळ निराळा धातु मानितात; तसें ते **नाहीं नव्हे, नव्हता,** हीं **नस** धातूचीं रूपें मानित नाहींत; **नाहीं** हा निराळा धातु मानितात.

अनुक्रमणिका

प्रकार. २.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं नव्हें.	आह्मीं नव्हों.
द्वि०	तूं नव्हेस–नव्हस.	तुह्मीं नव्हां.
तृ०	तो–ती–तें–नव्हे.	ते–त्या–तीं–नव्हेत अ० नव्हत.

प्रकार ३.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं नसतों.	आह्मीं नसतों.
द्वि०	तूं नसतोस.	तुह्मीं नसतां.
तृ०	तो नसतो.	ते नसतात.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

भूत काळ.

प्रकार १.

पुल्लिंग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं नव्हतों.	आह्मीं नव्हतों.
द्वि०	तूं नव्हतास.	तुह्मीं नव्हतेत, नव्हता.
तृ०	तो नव्हता.	ते नव्हते.

या वरून अन्य लिंगांचीं रूपें जाणावीं.

अस धातू प्रमाणें या दुसऱ्या प्रकारच्या भूत काळाचा प्रयोग संशयार्थींमात्र होतो.

या प्रमाणें **नस** धातूंचीं वर्तमान आणि भूत काळीं जीं दोन तीन प्रकारचीं रूपें होतात तीं सांगितलीं; जेथें **अस** धातु साहाय्यकारक असतां प्रयोजिला जातो तेथें **नस** धातूंचीं

त्या त्या प्रकारचीं रूपें योजिलीं असतां अकरणरूपीं क्रियापदाचीं रूपें होतात.

४७६ एथें हो, दे, या धातूंचीं प्रथम पुरुषीं एकवचनाचीं सर्व रूपें लिहून दाखवितों, या वरून शिकणारांनीं इतर पुरुषांचीं रूपें जाणावीं. यांत ज्या काळाचीं रूपें कांहीं रीतिनिराळीं होतात, व जीं रूपें सांगणें अवश्य आहे, तीं संपूर्ण चालवून दाखविलीं आहेत. असें न केलें तर या धातु चालविण्यांतच हा ग्रंथ बहुधा आटोपेल.

हो धातु.

करणरूप.

मूलरूपभेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं होतों. . . . . वर्तमान.
मीं होत आहें. . . . . . अपूर्णवर्तमान.
मीं होत असतों. . . . . . रीतिवर्तमान.
मीं झालों. . . . . भूत.
मीं होत होतों. . . . . . अपूर्णभूत.

रीतिभूत.

पुरु०.	एकव०	अनेकव०.
प्र०	मी होईं, अ० होत असें.	आह्मीं होऊं, अ० होत असूं.
द्वि०	तूं होईस, अ० होत असेस.	तुह्मीं व्हा, अ० होत असा.

अनुक्रमणिका

तृ०	तो–ती–तें होई, अ० होत असे.	ते–त्या–तीं होत, अ० होत असत.

मीं होता झालों. . . . . पूर्णभूत.
मीं झालों होतों. . . . . भूतभूत.
मीं झालों आहें. . . . . वर्तमानभूत.
मीं होणार होतों. . . . . . भविष्यभूत.

भविष्य काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं होईन.	आह्मीं होऊं.
द्वि०	तूं होशील.	तुह्मीं व्हाल.
तृ०	तो–ती–तें होईल.	ते–त्या–तीं होतील.

मीं होत असेन. . . . . . . अपूर्णभविष्य.
मीं होणार आहें. . . . . वर्तमानभविष्य.
मीं झालों असेन. . . . . भूतभविष्य.
मीं होणार असेन. . . . . भविष्यभविष्य.

आज्ञार्थ.

वर्तमान काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं होऊं.	आह्मीं होऊं.
द्वि०	तूं हो.	तुह्मीं व्हा.
तृ०	तो–ती–तें होऊ.	ते–त्या–तीं होऊत.

विध्यर्थ.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां व्हावें. . . . . . वर्तमान.
मीं अ० म्यां होत असावें. . . रीतिवर्तमान.

अनुक्रमणिका

कर्तरिप्रयोग.

मीं व्हावा. . . . . वर्तमान.
मीं होत असावा. . . . . रीतिवर्तमान.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां व्हावें होतें, अ० व्हायाचें होतें. } भूत.

कर्तरिप्रयोग.

मीं व्हावा होतों, अ० व्हायाचा होतों. } . . . भूत.
मीं झालों असावा. . . . . . . वर्तमानभूत.
मीं होणार असावा. . . . . भविष्य.

संशयार्थ.

मीं होत असलों. . . . . . . वर्तमान.
मीं झाला असलों, अ० झालों असलों. } . . भूत.
मीं होणार असलों. . . . . भविष्य.
मीं होत असेन. . . . . . वर्तमानभविष्य.
मीं झालों असेन . . . . . भूतभविष्य.
मीं होणार असेन. . . . . भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं होतों. तूं होतास. . . . . भूत.
मीं होत असतों. तूं होत असतास. . अपूर्णभूत.
मीं झालों असतों. . . . . भूतभूत.

धातुसाधितें.

नामें आणि विशेषणें.

होणें. . . . . क्रियावाचक.
होता, होणारा, होणार. . . कर्तृवाचक.
झाला, झालेला. . . . . कर्मवाचक.

अव्ययें.

होत, होतां, होतांनां. होत असतां, होत असतांनां. } . वर्तमानकालवाचक.
झालें असतां, झालें असतांनां. भूतकालवाचक.
होऊन. . . . . पूर्वकालवाचक.
होऊं. . . . . निमित्तवाचक.

४७७ या **हो** धातूस **प्रयोजकभेद** नाहीं.

शक्यभेद.

स्वार्थ.

४७८ **हो** या धातूच्या अंगीं मूलरूपभेद असतां शक्यभेदाचा जो अर्थ त्याचीहि संभावना आहे, ह्मणोन मूलरूपभेदाचीं जीं रूपें त्यांचा प्रयोग बहुधा शक्यभेदींहि करितात.

माझ्यानें अ० मला होतें अ० होववतें. . वर्तमान.
माझ्यानें अ० मला होत आहे, अ० होववत आहे. } . अपूर्णवर्तमान.
माझ्यानें अ० मला होत असतें, अ० होववत असतें. } . रीतिवर्तमान.
माझ्यानें अ० मला झालें, अ० होववलें. . . भूत.
———————— होत होतें, अ० होववत होतें. } . . अपूर्णभूत.

———	होई,* अ० होववे. होत असे अ० होववत असे.	रीतिभूत.
———	होतें झालें, अ० होववतें झालें.*	पूर्णभूत.
———	झालें होतें, अ० होववलें होतें.*	भूतभूत.
———	झालें आहे.	वर्तमानभूत.
———	होणार होतें, अ० होववणार होतें.	भविष्यभूत.
———	होईल, अ० होववेल. . .	भविष्य.
———	होत असेल, अ० होववत असेल.	अपूर्णभविष्य.
———	होणार आहे अ० होववणार आहे. . .	वर्तमानभविष्य.
———	झालें असेल, अ० होववलें असेल. . .	भूतभविष्य.

आज्ञार्थ.

माझ्यानें अ० मला होऊं, अ० होववो. . . वर्तमान.

विध्यर्थ.

माझ्यानें अ० मला	व्हावें.*	वर्तमान.
———	होत असावें, अ० होववत असावें.	अपूर्णवर्तमान.

---

* रीतिभूत, पूर्णभूत, भूतभूत, विध्यर्थी वर्तमान इ० काळीं अशा प्रकारच्या कित्येक रूपांचा यद्यपि बोलण्यांत प्रचार नाहीं, तथापि वर जो काळाचा अनुक्रम सांगितला आहे त्यास अनुसरून एथें सारीं रूपें लिहिलीं आहेत.

अनुक्रमणिका

माझ्यानें अ० मला व्हावें होतें, अ० व्हायाचें होतें.	. . भूत.
———— झालें असावें, अ० होववलें असावें.	. . वर्तमानभूत.
———— होणार असावें, अ० होववणार असावें.	. . भविष्य.

संशयार्थ.

माझ्यानें अ० मला होत असलें, अ० होववत असलें.	. वर्तमान.
———— झालें असलें, अ० होववलें असलें.	. भूत.
———— होणार असलें, अ० होववणार असलें.	. भविष्य.
———— होत असेल, अ० होववत असेल.	. वर्तमानभविष्य.
———— झालें असेल, अ० होववलें असेल.	. भूतभविष्य.
———— होणार असेल, अ० होववणार असेल.	. भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

माझ्यानें अ० मला होतें, अ० होववतें.	. भूत.
———— होत असतें, अ० होववत असतें.	. अपूर्णभूत.
———— झालें असतें, अ० होववलें असतें.	. भूतभूत.

अनुक्रमणिका

वस्तुतः सर्व अकर्मक धातू वरून शक्यभेद असतां मूलरूपभेदाचा प्रयोग केव्हां केव्हां करण्यांत येतो; जसें–'माझ्यानें चालतें, बसतें, होतें, इ०. परंतु मूलरूपभेदाचीं रूपें, आणि शक्यभेदाचीं रूपें, यां दोहों मध्यें सूक्ष्म भेद असा आहे कीं मूलरूपभेद असतां शुद्ध अकर्मकत्वाचा बोध होतो, आणि शक्यभेद असतां शक्यार्थान्वित अकर्मकत्वाचा बोध होतो; जसें–'हा खिळा माझ्यानें अ० मला बसतो', आणि 'हा खिळा माझ्यानें बसवतो'; यां मध्यें पहिल्या उदाहरणांत–'मीं जो त्याणें हा खिळा बसतो', असा शुद्ध अकर्मकत्वार्थ दर्शित होतो; आणि दुसऱ्या उदाहरणांत–'मीं जो त्याणेंकरून अथवा त्याच्या द्वारें हा खिळा बसला जातो, बसायास शक्य अथवा योग्य होतो', असा शक्यार्थान्वित अकर्मकत्वार्थ दर्शित होतो. असा अर्थभेद आहे ह्मणोनच–'माझ्यानें ब्राह्मण होववेल तर मीं होईन', असा शक्यभेदीं प्रयोग होतो, परंतु–'माझ्यानें ब्राह्मण होईल अथवा होतें' असा प्रयोग होत नाहीं.

४७९ आतां क्रियापदांच्या कोणत्याहि रूपाचें व्याकरण करितां यावें ह्मणोन खालीं दे या सकर्मक धातूस सर्व रूपीं, सर्व भेदीं, सर्व अर्थीं, सर्व काळीं, प्रथम पुरुषीं, चालवून दाखविलें आहे.

दे धातु.

करणरूप.

मूलरूपभेद.

स्वार्थ.

मीं देतों. . . . . वर्तमान.
मीं देत आहें. . . . . . अपूर्णवर्तमान.
मीं देत असतों. . . . . . रीतिवर्तमान.
मीं अ० म्यां दिलें. . . . भूत.

मीं देत होतों. . . . . अपूर्णभूत.
मीं देईं, अ० देत असें. . रीतिभूत.

रीतिभूत.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं देईं.	आह्मीं देऊं.
द्वि०	तूं देईस.	तुह्मीं द्या.
तृ०	तो–ती–तें देई.	ते–त्या–तीं देत.

मीं देता झालों. . . . . पूर्णभूत.
मीं अ० म्यां दिलें होतें. . भूतभूत.
मीं अ० म्यां दिलें आहे. . वर्तमानभूत.
मीं देणार होतों. . . . . भविष्यभूत.

भविष्य काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं देईन.	आह्मीं देऊं.
द्वि०	तूं देशील.	तुह्मीं द्याल.
तृ०	तो–ती–तें–देईल.	ते–त्या–तीं देतील.

मीं देत असेन. . . . . . . अपूर्णभविष्य.
मीं देणार आहें. . . . . वर्तमानभविष्य.
मीं अ० म्यां दिलें असेल. भूतभविष्य.
मीं देणार असेन. . . . भविष्यभविष्य.

आज्ञार्थ.

मीं देऊं. . . . . वर्तमान.

विध्यर्थ.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां द्यावें. . . . वर्तमान.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां द्यावा–द्यावी–द्यावें इ०. वर्तमान.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देत असावें. . . अपूर्णवर्तमान.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देत असावा, देत असावी, देत असावें इ०.	अपूर्णवर्तमान.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां द्यावें होतें, अ० द्यायाचें होतें.	भूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां द्यावा होता, द्यावी होती, द्यावें होतें इ०. अ० म्यां द्यायाचा होता, द्यायाची होती, द्यायाचें होतें इ०.	भूत.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां दिलें असावें. . . वर्तमानभूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां दिला असावा, दिली असावी, दिलें असावें इ०.	वर्तमानभूत.

मीं देणार असावा. . . . . . भविष्य.

संशयार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं देत असलों. . . . . . वर्तमान.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां दिलें असलें. . . . भूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां दिला असला,
दिली असली, दिलें असलें. } . भूत.

कर्तरिप्रयोग.

मीं देणार असलों. . . . . . भविष्य.
मीं देत असेन. . . . . . . अपूर्णभविष्य.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां दिलें असेन. . . भूतभविष्य.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां दिला असेन,
दिली असेन, दिलें असेन. } . भूतभविष्य.
मीं देणार असेन. . . . . . भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

मीं देतों. तूं देतास. . . . . . भूत.
मीं देत असतों. तूं देत असतास. अपूर्णभूत.

४८० संकेतार्थी वर्तमान काळीं आणि अपूर्णवर्तमान काळीं केव्हां केव्हां रीतीचाही बोध होतो; जसें—'जर मीं औषध घेतों, तर माझी प्रकृति बिघडली नसती', 'जर तो त्यास पथ्य देत असता, तर त्यास आरोग्य झालें असतें'.

अनुक्रमणिका

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां दिलें असतें. . . . भूतभूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां दिला असता, दिली असती, दिलें असतें.	भूतभूत.

धातुसाधितें.

नामें आणि विशेषणें.

देणें. . . . . क्रियावाचक.
देता, देणार, देणारा. . . . . कर्तृवाचक.
दिला, दिलेला. . . . . . . कर्मवाचक.

अव्ययें.

देत, देतां, देतांनां, देत असतां, देत असतांनां.	वर्तमानकालवाचक.

दिलें असतां, दिलें असतांनां . भूतकालवाचक.
देऊन . . . . पूर्वकालवाचक.
देऊं . . . . निमित्तवाचक.
द्यावें . . . . विधिवाचक.

प्रयोजकभेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं देववितों. . . . . वर्तमानकाळ.
मीं देववित आहें. . . . . . . अपूर्णवर्तमान.
मीं देववित असतों. . . . . . रीतिवर्तमान.

अनुक्रमणिका

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देवविलें. . . . . भूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला-ली-लें इ०. भूत.

कर्तरिप्रयोग.

मीं देववित होतों. . . . . . . अपूर्णभूत.
मीं देववीं, अ० देववित असें . रीतिभूत.
मीं देवविता झालों. . . . . . पूर्णभूत.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देवविलें होतें. . भूतभूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला होता इ०. भूतभूत.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देवविलें आहे . . वर्तमानभूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला आहे, देवविलो आहे इ०. } . वर्तमानभूत.

कर्तरिप्रयोग.

मीं देवविणार होतों. . . . . भविष्यभूत.
मीं देववीन. . . . . भविष्य.
मीं देववित असेन . . . . . . अपूर्णभविष्य.

अनुक्रमणिका

कर्तरिप्रयोग.

मीं देवविणार आहें. . . . . वर्तमानभविष्य.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देवविलें असेल. . भूतभविष्य.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला-ली-लें असेल. } भूतभविष्य.

कर्तरिप्रयोग.

मीं देवविणार असेन . . . . भविष्यभविष्य.

आज्ञार्थ.

वर्तमानकाळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं देववूं.	आह्मीं देववूं.
द्वि०	तूं देवीव.	तुह्मीं देववा.
तृ०	तो-ती-तें देववो.	ते-त्या-तीं देववोत.

विध्यर्थ.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देववावें. . . . वर्तमान.

कर्मणिप्रयोग.

मीं अ०म्यां देववावा-वी-वें. इ०. वर्तमान.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देववित असावें. . अपूर्णवर्तमान.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देववित असावा-वी-वें इ०	अपूर्णवर्तमान.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देववावें होतें, अ० देववायाचें होतें.	भूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देववावा होता, अ० देववायाचा होता.	भूत.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देवविलें असावें . वर्तमानभूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला असावा. . वर्तमानभूत.

कर्तरिप्रयोग.

मीं देवविणार असावा . . . . भविष्य.

संशयार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं देववित असलों . . . . . वर्तमान.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देवविलें असलें. . भूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला असला, देवविली असली इ०	भूत.

कर्तरिप्रयोग.

मीं देववणार असलों . . . . भविष्य.
मीं देववित असेन . . . . . अपूर्णभविष्य.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देवविलें असेल. . भूतभविष्य.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला असेल, देवविली असेल इ०.	भूतभविष्य.

कर्तरिप्रयोग.

मीं देववणार असेन . . . . भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं देववितों. तूं देववितास. तो देववता.	. भूत.
मीं देववित असतों, तूं देववित असतास.	अपूर्णभूत.

भावीप्रयोग.

मीं अ० म्यां देवविलें असतें. तूं देवविलें असतेंस.	भूतभूत.

अनुक्रमणिका

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला असता, देवविली असती, देवविलें असतें.	भूतभूत.

धातुसाधितें.

नामें आणि विशेषणें.

देवविणें . . . . क्रियावाचक.
देवविता, देवविणारा, देवविणार. कर्तृवाचक.
देवविला, देवविलेला. . . . कर्मवाचक.

अव्ययें.

देववित, देववितां, देववितांनां. देववित असतां, देववित असतांनां.	वर्तमानकालवाचक.
देवविलें असतां, देवविलें असतांनां.	भूतकालवाचक.

देववून . . . . पूर्वकालवाचक.
देववूं . . . . निमित्तवाचक.
देववावें . . . . विधिवाचक.

शक्यभेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

माझ्यानें अ० मला देववतें . . . . वर्तमानकाळ.
———————— देववत आहे . . अपूर्णवर्तमान.
———————— देववत असतें . रीतिवर्तमान.

अनुक्रमणिका

——————— देववलें . . . . . भूत.
——————— देववत होतें . . अपूर्णभूत.
——————— देववे, अ० देववत असे. } रीतिभूत.
——————— देववतें झालें . . पूर्णभूत.
——————— देववलें होतें . . . भूतभूत.
——————— देववलें आहे. . . वर्तमानभूत.
——————— देववणार होतें . . भविष्यभूत.
——————— देववेल . . . . भविष्य.
——————— देववत असेल . . अपूर्णभविष्य.
——————— देववणार आहे. . वर्तमानभविष्य.
——————— देववलें असेल . . भूतभविष्य.

आज्ञार्थ.

माझ्यानें अ०मला देववो. . . . . . वर्तमान.

विध्यर्थ.

माझ्यानें अ०मला देववावें . . . . . वर्तमान.
——————— देववत असावें . . . अपूर्णवर्तमान.
——————— देववावें होतें, अ० देववायाचें होतें. } . भूत.
——————— देववलें असावें. . वर्तमानभूत.
——————— देववणार असावें. . . भविष्य.

संशयार्थ.

माझ्यानें अ०मला देववत असलें. . . . वर्तमान.
——————— देववलें असलें . . . भूत.
——————— देववणार असलें . . भविष्य.

——————— देववत असेल . . . वर्तमानभविष्य.
——————— देववलें असेल . . . भूतभविष्य.
——————— देववणार असेल . . भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

माझ्यानें अ० मला देववतें. . . . . . . भूत.
——————— देववत असतें. . . अपूर्णभूत.
——————— देववलें असतें. . . भूतभूत.

धातुसाधितें.

नामें आणि विशेषणें.

देववणें. . . . . क्रियावाचक.
देववलें, देववलेलें . . . . . कर्मवाचक.

अव्ययें.

देववत, देववतां, देववतांनां; देववत असतां, देववत असतांनां. } वर्तमानकालवाचक.
देववलें असतां, देववलें असतांनां. भूतकालवाचक.

अकरणरूप.

मूलरूपभेद.

स्वार्थ.

मीं देत नाहीं. . . . . . . वर्तमानकाळ.
मीं देत नसतों. . . . . . . रीतिवर्तमान.
मीं अ० म्यां दिलें नाहीं. . . भूत.
मीं देत नव्हतों. . . . . अपूर्णभूत.

रीतिभूत काळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं देईंना, अ० न देईं.	आह्मीं देऊंना, अ० न देऊं.
द्वि०	तूं देईसना, अ० देईनास; अ० न देईस.	तुह्मीं द्याना, अ० द्यानात; अ० नद्या.
तृ०	तो–ती–तें देईना. अ० न देई.	ते–त्या–तीं देतना, अ० देईनात; न देत.

या प्रकारच्या रूपांचे तीन चार अर्थ होतात; तेहि पुरुषपरत्वें भिन्न भिन्न. एक रीत्यर्थ, उदाह०– 'जेव्हां मीं त्यास देईंना (ह्म० देत नसें), तेव्हां तो रागावे'. दुसरा शुद्ध वर्तमानकालार्थ, उ०–'तूं जर त्यास देईनास (ह्म० देत नाहींस), तर मलाहि कांहीं अगत्य नाहीं'. तिसरा कोणताहि व्यापार करण्या विषयीं इच्छेचा अभाव दाखवायाचा असतां भूतकाळीं याचा प्रयोग करितात; जसें– 'त्यास पुष्कळ सांगितलें परंतु तो जाईना'. आणखी प्रश्न कर्तव्य असतांही या रूपांचा करणरूपींहि प्रयोग होतो. उ०– 'तितके त्याचे रुपये द्याना', ह्म० कां देत नाहीं? द्या परते. 'तूं तेथें जाईनास', ह्म० कां जात नाहींस? जा, जाऊन मोकळा हो असा अर्थ. आणखी कंटाळून आज्ञा द्यायाची असतांहि याच रूपांचा प्रयोग करितात; जसें–'तो इतकें सांगतो त्या पेक्षां तूं तें काम करिनास', ह्मणजे तें काम कर, करून मोकळा हो, करून पिडा काढ, असा अर्थ ध्वनित होतो. 'तुह्मी जाना' ह्म० जा.

मीं देईंना, अ० देत नसें. . . . रीतिभूत.
मीं अ० म्यां दिलें नव्हतें. . . . भूतभूत.
मीं देणार नव्हतों. . . . . भविष्यभूत.

मीं देणार नाहीं. . . . . . . भविष्य.

मीं देत नसेन. . . . . अपूर्णभविष्य.

मीं अ० म्यां दिलें नसेल . . . भूतभविष्य.

सकर्मक क्रियापद असतां स्वार्थीं व संशयार्थीं भूतभविष्य काळीं प्रथमपुरुषीं मीं अ० म्यां **दिलें असेल,—केलें असेल,** इ० रूपें शुद्ध होत; आणि अकर्मक क्रियापद असतां—**गेलों असेन, दिसलों असेन,** इ० रूपें शुद्ध होत; हाच नियम अकरणरूपींहि जाणावा.

मीं देणार नसेन . . . . भविष्यभविष्य.

आज्ञार्थ.

वर्तमानकाळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं देऊं नको.	आह्मीं देऊं नको.
द्वि०	तूं देऊं नको.	तुह्मीं देऊं नका.
तृ०	तो-ती-तें न देऊ.	ते त्या-तीं न देऊत.

विध्यर्थ.

वर्तमानकाळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं अ० म्या देऊं नये, अ० नये देऊं.	आह्मीं देऊं नये, अ० नये देऊं.
द्वि०	तूं अ० त्वां देऊं नयेस, अ० नयेस देऊं. अ० नये देऊं.	तुह्मीं देऊं नये, अ० नये देऊं.
तृ०	त्यानें-तिणें देऊं नये, अ० नये देऊं.	त्यांहीं देऊं नये, अ० नये देऊं.

अनुक्रमणिका

मीं अ० म्यां देत नसावें, अ० देत असूं नये.	अपूर्णवर्तमान.
मीं अ० म्यां द्यावें नव्हतें, अ० द्यायाचें नव्हतें.	भूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां द्यावा नव्हता, द्यावी नव्हती, द्यावें नव्हतें. अ० द्यायाचा नव्हता, द्यायाची नव्हती, द्यायाचें नव्हतें.	भूत.
मीं अ० म्यां दिलें नसावें. . . .	वर्तमानभूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां दिला नसावा, दिली नसावी इ०. . .	वर्तमानभूत.
मीं देणार नसावा.	भविष्य.

संशयार्थ.

मीं देत नसलों.	वर्तमान.
मीं अ० म्यां दिलें नसलें. . .	भूत.
मीं देणार नसलों.	भविष्य.
मीं देत नसेन.	अपूर्णभविष्य.
मीं अ० म्यां दिलें नसेल. . .	भूतभविष्य.
मीं देणार नसेन.	भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

भूतकाळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं नदेतों, अ० देतोंना.	आह्मीं नदेतों, अ० देतोंना.
द्वि०	तूं नदेतास, अ० देतासना.	तुह्मीं नदेतेत, अ० देतेतना, अ० देतांना, अ० नदेतां.
तृ०	तो नदेता, अ० देताना.	ते नदेते, अ० देतेना.

मीं देत नसतों, तूं देत नसतास, तो देत नसतो. } अपूर्णभूत.

मां अ० म्यां दिलें नसतें. . . भूतभूत.

धातुसाधितें.

नामें आणि विशेषणें.

नदेणें . . . . क्रियावाचक.

नदेता, नदेणारा, नदेणार. कर्तृवाचक.

नदिला, नदिलेला. . . कर्मवाचक.

अव्ययें.

नदेत, नदेतां, नदेतांनां, नदेत असतां, नदेत असतांनां. } वर्तमानकालवाचक.

नदिलें असतां, नदिलें असतांनां. } . . भूतकालवाचक.

नदेऊन . . . . पूर्वकालवाचक.

अनुक्रमणिका

नदेऊं . . . . निमित्तवाचक.
नद्यावें . . . . विधिवाचक.

प्रयोजकभेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

मीं देववित नाहीं . . . . वर्तमानकाळ.
मीं देववित नसतों . . . रीतिवर्तमान.
मीं अ० म्यां देवविलें नाहीं. भूतकाळ.
मीं देववित नव्हतों. . . अपूर्णभूत.
मीं देववींना, अ० देववित नसें; अ० नदेववीं. } रीतिभूत.
मीं अ० म्यां देवविलें नव्हतें. भूतभूत.
मीं देवविणार नव्हतों . . . भविष्यभूत.
मीं देवविणार नाहीं. . . . भविष्य.
मीं देववित नसेन . . . . अपूर्णभविष्य.
मीं अ० म्यां देवविलें नसेल. भूतभविष्य.
मीं देवविणार नसेन . . . भविष्यभविष्य.

आज्ञार्थ.

वर्तमानकाळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं देववूं नको.	आह्मीं देववूं नको.
द्वि०	तूं देववूं नको.	तुह्मीं देववूं नका.
तृ०	तो–ती–तें नदेववू.	ते–त्या–तीं नदेववूत.

विध्यर्थ.

वर्तमानकाळ.

पुरु०	एकव०	अनेकव०
प्र०	मीं अ० म्यां देववूं नये.	आह्मीं देववूं नये.
द्वि०	तूं अ० त्वां देववूं नयेस.	तुह्मीं देववूं नये.
तृ०	त्याणें–तिणें देववूं नये.	त्यांहीं देववूं नये.

मीं अ० म्यां देववित असूं नये. . अपूर्णवर्तमान.

मीं अ० म्यां देववावें नव्हतें, अ० देववायाचें नव्हतें. } . . भूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देववावा नव्हता, देववावी नव्हती, इ०. अ० देववायाचा नव्हता, देववायाची नव्हती इ०. } भूत.

मीं अ० म्यां देवविलें नसावें. . वर्तमानभूत.

कर्मणिप्रयोग.

मीं अ० म्यां देवविला नसावा, देवविली नसावी इ०. } . वर्तमानभूत.

मीं देवविणार नसावा . . . . . भविष्य.

संशयार्थ.

मीं देववित नसलों. वर्तमान काळ.

मीं अ० म्यां देवविलें नसलें. भूत.

मीं देवविणार नसलों. भविष्य.

मीं देववित नसेन. अपूर्णभविष्य.

मीं अ० म्यां देवविलें नसेन.	भूतभविष्य.
मीं देवविणार नसेन.	भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

भूतकाळ.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं नदेववितों, अ० देववितोंना.	आह्मीं नदेववितों, अ० देववितोंना.
द्वि०	तूं नदेववितास, अ० देववितासना.	तुह्मीं नदेववितेत, अ० देववितेतना, अ० देववितांना, अ० नदेववितां.
तृ०	तो नदेववविता, अ० देववविताना. ती नदेववविती, अ० देववितीना. तें नदेववितें, अ० देववितेंना.	ते न देववितें, अ० देववितेना. त्या नदेववित्या, अ० देववित्याना. तीं नदेववितीं, अ० देववितींना.

मीं देववित नसतों, तूं देववित नसतास.	अपूर्णभूत.
मीं अ० म्यां देवविलें नसतें. . . .	भूतभूत.

स्वार्थी कित्येकरूपांस मागें **न** हें अव्यय लाविलें असतां संकेतार्थ ध्वनित होतो; जसें–**नादिलें, नदेववविलें, नदेववलें**; हीं संकेतार्थी दुसऱ्या प्रकारचीं भूतकाळाचीं रूपें होतात, आणि यां पासून भविष्यकाळीं भूतार्थ ध्वनित होतो; उदाह० 'जर त्याणें न दिलें तर मीं देईन'. **नदेईन, नदेववीन, नदेववेल,** हा संकेतार्थी भविष्य काळ.

धातुसाधितें.

नामें आणि विशेषणें.

नदेविवणें.	क्रियावाचक.
नदेववविता, नदेवविणारा, नदेवविणार.	कर्तृवाचक.
नदेवविला, नदेववविलेला. . .	कर्मवाचक.

अव्ययें.

नदेववित, नदेववितां इ०. .	वर्तमानकालवाचक.
नदेववविलें असतां इ०. . .	भूतकालवाचक.
नदेववून	पूर्वकालवाचक.
नदेववूं	निमित्तवाचक.
नदेववावें.	विधिवाचक.

शक्यभेद.

स्वार्थ.

कर्तरिप्रयोग.

माझ्यानें अ०मला देववत नाहीं . . .	वर्तमान काळ.
———— देववत नसतें . . .	रीतिवर्तमान.
———— देववलें नाहीं. . .	भूत.
———— देववत नव्हतें . .	अपूर्णभूत.
———— देववेना, अ० देववत नसे, अ० नदेववे.	रीतिभूत.

अनुक्रमणिका

माझ्यानें अ० मला देववलें नव्हतें . . भूतभूत.
———— देववणार नव्हतें. . भविष्यभूत.
———— देववणार नाहीं . . भविष्य.
———— देववत नसेल. . . अपूर्णभविष्य.
———— देववलें नसेल. . . भूतभविष्य.

आज्ञार्थ.

माझ्यानें अ० मला नदेववो . . . . वर्तमान काळ.

विध्यर्थ.

माझ्यानें अ० मला देववूं नये. . . . वर्तमान काळ.
———— देववत नसावें, अ०
देववत असूं नये. } अपूर्णवर्तमान.
———— देववावें नव्हतें, अ०
देववायाचें नव्हतें } भूत.
———— देववलें नसावें . . वर्तमानभूत.
———— देववणार नसावें. . भविष्य.

संशयार्थ.

माझ्यानें अ० मला देववत नसलें . . वर्तमान काळ.
———— देववलें नसलें. . . भूत.
———— देववणार नसलें. . भविष्य.
———— देववत नसेल. . . वर्तमानभविष्य.
———— देववलें नसेल. . . भूतभविष्य.
———— देववणार नसेल. . भविष्यभविष्य.

संकेतार्थ.

माझ्यानें अ० मला नदेववतें, अ०
देववतांना. } . भूत काळ.

अनुक्रमणिका

माझ्यानें अ० मला देववत नसतें. . अपूर्णभूत.
———————— देववलें नसतें . . भूतभूत.

धातुसाधितें.

नामें आणि विशेषणें.

नदेववणें. . . . . . क्रियावाचक.
नदेववलें, नदेववलेलें. . . कर्मवाचक.

अव्ययें.

नदेववत, नदेववतां, नदेववतांनां; इ०. } वर्तमानकालवाचक.
नदेववलें असतां इ०. . . भूतकालवाचक.

वर्ग १०.

अवशिष्ट सहाय धातूं विषयीं विस्तार.

४८१ **जा, ये, दे, लाग, बस,** आणि **पाह,** हे सहाय धातु बहुधा सर्व अर्थीं सर्व काळीं चालतात. परंतु यांत दे धातूचीं प्रयोगविशेषेंकरून अधिक रूपें होतात; इतरांचीं तितकीं होत नाहींत.

प्रकरण १.

गौण अ० सिद्ध क्रियापदें.

४८२ या सहाय धातूंतून ज्यांचीं रूपें सर्वव्यापक नसतां केवळ नियमित अर्थीं, नियमित काळीं, नियमित

पुरुषीं मात्र साधतात, त्यांस **गौण** अथवा **सिद्ध** क्रियापदें ह्मणतात. तीं गौण क्रियापदें—**पाहिजे**, **नको**, **नये**, आणि **नलगे**, हीं होत.

या गौण क्रियापदांचीं रूपें ज्या अर्थीं, ज्या काळीं, ज्या पुरुषीं, होतात, त्या त्या अर्थीं, त्या त्या काळीं, त्या त्या पुरुषीं, सर्व सांगितलीं पाहिजेत.

४८३ **पाहिजे***—याचा अर्थ—'अपेक्षित आहे' असा होतो; उ०—'मला आंबा पाहिजे', ह्मणजे मला आंबा अपेक्षित आहे. या वाक्यांत **आंबा** हा कर्ता होय, आणि **मला** ही चतुर्थी. हें गौण क्रियापद वर्तमान काळीं चालवून दाखवितों.

कर्तरिप्रयोग.

पुरु०.	एकव०.	अनेकव०.
प्र०	मीं पाहिजे.	आह्मीं पाहिजे.
द्वि०	तूं पाहिजे, अ० पाहिजेस.	तुह्मीं पाहिजे, अ० पाहिजेत.
तृ०	तो--ती--तें पाहिजे.	ते--त्या--तीं पाहिजेत.

याचें भविष्य काळीं क्वचित् **पाहिजेल** असें रूप होतें. आणि याचें वर्तमानकालवाचक धातुसाधित **पाहिजत**

---

* असें अनुमान होतें कीं **पाहिजे** हें प्राचीन मराठी भाषेंतलें **पाह** धातूचें विध्यर्थी वर्तमान काळाचें रूप होय; जसें—**जाइजे**, **बोलिजे**, **करिजे**, तसें **पाहिजे**. **पाहिजे** ह्मणजे **पाहावें**, अथवा **पाहायास योग्य**, अर्थात् जें पाहायास योग्य तें इच्छायासहि योग्य असतें, ह्मणजे अपेक्षित असतें, असा अर्थ.

अनुक्रमणिका

असें होतें. आतां या धातुसाधिता पुढें **हो** आणि **अस** या सहाय धातूंचीं रूपें लाविलीं असतां त्या त्या अर्थी त्या त्या काळीं याचीं रूपें साधतात; जसें–**पाहिजत होतें**, **पाहिजत होतीं**, **पाहिजत असतें**, **पाहिजत असेल**, इ०. **पाहिजत होतें**, **पाहिजत असावें**, इ० स्थळीं–**पाहिजे होतें**, **पाहिजे असावें**, असाहि प्रयोग आढळतो.

हा धातु इतर धातूंच्या कर्मवाचक धातुसाधिता पुढें लाविला असतां त्या त्या क्रियेची आवश्यकता दर्शविली जात्ये; उ०–'मला गेलें पाहिजे', 'त्याला खेळविलें पाहिजे', 'त्यास लिहिलें पाहिजत होतें', 'तुला बसलें पाहिजेल', या ठिकाणीं **गेलें**, **खेळविलें**, **लिहिलें**, **बसलें**, हीं कर्मवाचक धातुसाधित नामें **पाहिजे** या क्रियापदाचे कर्त्ते होते.

४८४ **नको**–हें **पाहिजे** याचें प्रतिपक्षी होय, याचा अर्थ 'अपेक्षित नाहीं' असा होतो; जसें– 'मला द्रव्य नको', ह्मणजे मला द्रव्य अपेक्षित नाहीं. या वाक्यांत **द्रव्य** हा कर्त्ता, **नको** हें क्रियापद, आणि **मला** ही चतुर्थी जाणावी.

याचीं रूपें वर्तमान काळीं चालवून दाखवितों.

कर्तरिप्रयोग.

पुरु०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	मीं नको.	आह्मीं नको.
द्वि०	तूं नको.	तुह्मीं नको.
तृ०	तो–ती–तें नको.	ते–त्या–तीं नकोत.

हें सहाय क्रियापद असतां याचा प्रयोग आज्ञार्थी मात्र

होतो; तेव्हां हें निमित्तवाचक धातुसाधित अव्यया पुढें लाविलें जातें; आणि अनेकवचनीं याचें रूप **नका** असें होतें; उदाह०— 'तूं करूं नको', 'तुह्मीं करूं नका'.

४८५ **नये**—याचा प्रयोग अकरणरूपी विध्यर्थी होतो, तेव्हां हें मुख्य धातूच्या निमित्तवाचक धातुसाधित अव्यया पुढें योजितात; उदाह०—

पुरु०.	**एकव०.**	**अनेकव०.**
प्र०	मीं अ० म्यां करूं नये.	आह्मीं करूं नये.
द्वि०	तूं अ० त्वां करूं नये.	तुह्मीं करूं नये.
तृ०	त्याणें—तिणें करूं नये.	त्यांहीं करूं नये.

एकादा व्यापार करायास 'येत नाहीं', 'शक्य नाहीं', अथवा 'योग्य नाहीं', असा अर्थ असतां हें गौण क्रियापद केव्हां केव्हां **तां**प्रत्ययान्त धातुसाधितां पुढें योजितात; जसें— 'मला तेथें जातां नये', 'तुला हें काम करितां नये'.

असा अर्थ असतां व्याकरणपदच्छेद करितांनां जो **ये** या सहाय धातू विषयीं कर्तृकर्माचा नियम सांगितला तोच एथें जाणावा; ह्मणजे, अकर्मक धातुसाधिता पुढें **नये** हें सहाय क्रियापद असल्यास तेथें भावकर्तरिप्रयोग जाणावा, आणि सकर्मक धातुसाधिता पुढें हें क्रियापद असून त्या सकर्मक धातुसाधिताचें जें कर्म तें जर प्रथमान्त आहे तर त्यास **नये** या सहाय क्रियापदाचा कर्त्ता मानावें; जसें—'मला तेथें जातां नये', या वाक्यांत भावकर्तरिप्रयोग मानावा; आणि 'तुला तें काम करितां नये' यांत **काम** हें **नये** या क्रियापदाचा कर्ता मानावा. आणि 'तुला त्यास धरितां नये', हाहि भावकर्तरिप्रयोग जाणावा; कारण, एथें 'त्यास धरणें' हा जो क्रियेचा भाव तो कर्ता होय.

अनुक्रमणिका

४८६ **नलगे*** या गौण क्रियापदाचा अर्थ 'आवश्यकता नाहीं', 'गरज नाहीं', असा होतो; उ०– 'मला तुझी दक्षणा नलगे', 'तिला तुझें वस्त्र नलगे', एथें **दक्षणा, वस्त्र,** हीं **नलगे** या क्रियापदाचे कर्त्ते होत.

॥ नलगेव्याकरणाचीन्यायादिघटपटादिखटपटती ॥ मोरोपंत.

तो तो व्यापार करण्याची आवश्यकता नाहीं अशा अर्थाची विवक्षा असतां त्या त्या धातूंचीं जीं विधिवाचक आणि क्रियावाचक धातुसाधितें, त्यां पुढें याचा प्रयोग होतो; जसें– 'त्यास हिंडावें नलगे', 'मला जावें नलगे', 'तीस बोध करणें नलगे', 'त्यांस इतका आग्रह करणें नलगे', इ०.

अशा वाक्यांत **जावें, करणें,** इ० धातुसाधितें **नलगे** या क्रियापदाचे कर्ते मानिले पाहिजेत. 'त्यांस इतका आग्रह करावा नलगे', इ० वाक्यांत 'त्यांस इतका आग्रह करावा' हें वाक्य अथवा वाक्यांश **नलगे** याचा कर्ता मानिल्या शिवाय दुसरा उपाय नाहीं.

४८७ **जा**– जेव्हां कर्मासच कर्ता मानणें आहे, ह्मणजे पूर्वीं जें एकाद्या क्रियेचें कर्म होतें त्यासच तोच अर्थ ठेवून त्या वाक्यांत कर्त्ता करणें आहे, तेव्हां बहुधा **जा** या धातूचा योग्य कर्मवाचक धातुसाधित विशेषणा पुढें करितात; जसें– 'तो मारिला जातो', 'ती धरिली गेली', 'तें केलें जाईल', इ०.

[अ] हा **जा** धातूचा योग बहुधा मराठी भाषेंत दरबारी

---

*हें क्रियापद **न** आणि **लागणें** या शब्दां पासून व्युत्पन्न झालें असावें; प्रथम **नलागें** होऊन मग **नलगे** असा शब्द झाला असावा.

अनुक्रमणिका

बोलण्यांत व लेखांत आढळतो; प्रौढ भाषणांत याचा प्रयोग नीट दिसत नाहीं.

[आ] या जाधातूच्या योगानें इतकाच अर्थविशेष होतो कीं जें पूर्वीं एकाद्या सकर्मक क्रियापदाचें कर्म होतें तेंच याच्या योगानें त्याच क्रियेचा कर्त्ता होतें; उदाह०– 'तो वाघ मारितो', या वाक्यांत **वाघ** हें कर्म आहे. परंतु 'वाघ मारिला जातो', एथें अर्थ तसाच, ह्मणजे मारणें या क्रियेच्या फलाचा अनुभविता **वाघ**च आहे, परंतु या प्रयोगांत पूर्वींच्या वाक्यांतलें कर्म जो **वाघ**, तो एथें **मारिला जातो** या क्रियेचा कर्त्ता होतो.

[इ] मराठी भाषेंत सर्व सकर्मक धातू वरून हा **जा** धातु प्रयोजून कर्मकर्तरिप्रयोग होत नाहीं; आणि कित्येक स्थळीं बलात्कारानें केला असतां तो प्रशस्त दिसत नाहीं; जसें– 'हा रथ त्याज कडून हांकला जातो', 'ही पोळी तिज कडून भाजली जात्ये'; या प्रमाणें बोलण्याचा परिपाठ नाहीं. 'ही गोष्ट सरकारांत लिहिली गेली असल्यास फार कठीण', 'जिल्हाजडज्या कडून सदरेस अपील केलें जावें', 'या प्रमाणें हुकूम मंजूर नकेल्यास त्याचा हक्क काढिला जाईल', इ०.– असा दरबारी बोलण्यांत व लिहिण्यांत याचा परिपाठ पडला आहे, ह्मणोन त्याच प्रकारच्या लिहिण्यांत **जा** धातूच्या योगानें जो कर्मकर्तरिप्रयोग होतो तो शोभतो.

परंतु मराठि भाषेंत सकर्मक क्रियापदाचें कर्मकर्तरि ह्मणून एक स्वतंत्र सर्वव्यापी असें रूप होत नाहीं, यामुळें एकादे समयीं मोठी अडचण पडत्ये. या रूपाची भाषेंत फार आवश्यकता आहे, ह्मणोन, ज्या भाषेंत धातू वरून कर्मकर्तरि स्वतंत्र रूप होत नसतें, तींत कोठें कोठें **जा** आदिकरून सहाय धातूं-

च्या योगानें हें रूप साधितात; अथवा, कोठें क्रियापदांच्या रूपांतर्गत हा कर्मकर्तरि अर्थ असतो; असें— 'आंबा ह्मटला ह्मणजे सर्वांच्या जिभे वर पाणीं सुटतें', 'लेंकरूं पाहिलें ह्मणजे आईस हर्ष होतो', 'काम केलें तर पैसे मिळतात', इत्यादि स्थळीं **ह्मटला, पाहिलें, केलें,** यांहींकरून तसा कर्मकर्तरि अर्थ ध्वनित होतो. 'चंद्र पाहिला असतां सर्वांस हर्ष होतो', या वाक्याचा अर्थ असा आहे कीं— चंद्र पाहिला गेला असतां सर्वांस हर्ष होतो. या प्रमाणें माझा अभिप्राय आहे. परंतु अशा ठिकाणीं— **कोणीं, लोकांनीं,** या बाहेरच्या कर्त्यांचा अध्याहार मानणें कोणांस बरें दिसल्यास त्यांनीं असा अध्याहार मानून निर्वाह करावा.

[ई] अशा अर्थानें बोलायाची जेव्हां अपेक्षा असत्ये, तेव्हां शुद्ध सकर्मक क्रियापदाचा अकर्मक क्रियापदा सारिखा प्रयोग करितात; असें— 'या जांत्यानें हे हरबरे चांगले दळणार नाहींत, ह्मणजे— 'दळले जाणार नाहींत' असा अर्थ. 'या चाकूनें हें खर्बूज चांगलें कापत नाहीं', ह्मणजे कापिलें जात नाहीं असा अर्थ.

[उ] प्राकृत ग्रंथांत मूळ धातूस **इजेणे** प्रत्यय लागून कर्मकर्तरि क्रियापद होतें, मग त्याचीं अन्य धातु प्रमाणें काळ, वचन, लिंग, पुरुष, यांच्या परत्वें रूपें साधतात; असें— **करिजेतो, बोलिजेतो, करिजेल, खाइजेल,** इ०. परंतु हीं रूपें बहुधा तीन काळीं होतात असें दिसतें.*

---

* एथें मला अशी अटकळ होत्ये कीं,— **करिजेतो, कथिजेतो, खाइजेतो,** इ० हीं मूळचीं संस्कृतांत— **क्रियते, कथ्यते, खाद्यते,** इ० जीं कर्मकर्तरि अर्थ असतां रूपें होतात, त्यां वरूनच साधलीं असावीं.

४८८ रीति, किंवा त्या त्या व्यापाराचा अभ्यास, असा अर्थ विवक्षित असतां जा आणि कधीं ये या धातूंचा योग वर्तमानकालवाचक तप्रत्ययान्त धातुसाधित अव्यया पुढें करितात; उदाह०— 'मीं करित येतों', 'मीं लिहित जाईन', 'तूं बोलत जा', 'मुलांनीं विद्ये कडेस चित्त देत जावें', 'तूं हें काम पुष्कळ वर्षें करित आलास ह्मणून तूं आज त्यांत इतका कुशल झालास', इ०.

४८९ वर्तमानकालवाचक तांप्रत्ययान्त धातुसाधित अव्यया पुढें ये या धातूचा योग केला असतां त्या पासून शक्ति, ज्ञान, यांचा बोध होतो; उदाह०— 'मला चालतां येतें', 'तुला पाहतां येईल', 'मला वाचतां यावें', 'तिला मांडा करितां आला असता', इ०.

४९० **ये**— अकर्मक धातू वरून, अथवा कर्माची अपेक्षा नधरितां सकर्मक धातू वरून, या सहाय धातूचा प्रयोग केला असतां भावकर्तरिप्रयोग होतो; जसें— 'मला चालतां येतें', 'तुला धांवतां येईल', 'तिला लिहितां येतें तर बरें होतें', इ०. या वाक्यांत क्रियेचा जो भाव तोच कर्ता होय. 'मला चालतां येतें' ह्मणजे चालणें अथवा चलनरूप जो व्यापार तो मला अवगत आहे असा अर्थ.

४९१ करणरूप अथवा अकरणरूप असतां या सहाय धातू वरून सविकरणतृतीयान्त कर्त्ता होतो; जसें— '**मला** अथवा **माझ्यानें** तेथें जातां येतें', '**तुला** अ० **तुझ्यानें** तसें होतां येत नाहीं', इ०. असें बहुतांचें मत आहे, परंतु मला वाटतें अशा ठिकाणींहि भावकर्तरि प्रयोग मानावा हें बरें.

इतर ठिकाणीं कर्त्याचा अर्थ असतां कोठेहि सविकरण तृतीयान्त कर्ता असत नाहीं असा नियम असतां ज्या पेक्षां अशाच

अनुक्रमणिका

ठिकाणीं सविकरण तृतीयेच्या रूपांचा प्रयोग होतो. त्या पेक्षां तींच अपवादक रूपें ये या सहाय क्रियापदाचे कर्ते नव्हत या विधानास दृढ प्रमाणभूत होतात.

४९२ परंतु जर हा सहाय धातु विवक्षित कर्मी सहवर्तमान सकर्मक धातूं वरून प्रयोजिला, तर त्या कर्माच्या लिंगवचनानुरूप या सहाय क्रियेचें रूप फिरतें; जसें– 'मला **ग्रंथ** लिहितां **येतो**, **पुतळी** करितां **येत्ये**, आणि **चित्र** काढितां **येतें**'; या वाक्यांत **ग्रंथ**, **पुतळी**, आणि **चित्र**, यांस त्या त्या सकर्मक धातुसाधितांचीं कर्मे करून **येतो**, **येत्ये**, आणि **येतें** या क्रियापदांचे कर्त्ते मानावे.

कदाचित् एथें कोणीं पूर्वपक्ष केला कीं जर पूर्वोक्त वाक्यांत **ग्रंथ**, **पुतळी**, आणि **चित्र**, हे त्या त्या क्रियेचे कर्त्ते मानून, त्या त्या सकर्मक धातुसाधितांचीं कर्मे मानिलीं, तर एका क्रियेचें कर्तृत्व आणि दुसऱ्या क्रियेचें कर्मत्व एकच पदार्थावर येऊं लागतें, ह्मणजे जें एकदां कर्म होतें तेंच त्या वाक्यांत कर्ता होऊं लागतें; हा मोठा दोष येतो; त्यास ही आशंका खरी आहे, परंतु असें ह्मात्यास कांहीं विशेष बाध आहे असें मला वाटत नाहीं. एकदां तीं तीं नामें त्या त्या सकर्मक धातुसाधितांचीं कर्मे करून त्यांस **ये** या सहाय क्रियापदांचे कर्ते मानावें. असें नकरावें तर **ये** या क्रियेस भावकर्तरि मानून आणखी त्या त्या सकर्मक धातुसाधिताच्या कर्माची लिंगवचनानुरोधी मानलें पाहिजे, हें अधिक अप्रशस्त दिसतें; कारण, भावकर्तरि क्रियापद निरंतर तृतीय पुरुषीं नपुंसकलिंगीं एकवचनीं असतें, या नियमास मोठा दोष येतो; तेव्हां मला वाटतें कीं सकर्मक धातुसाधिता पुढें **ये** या सहाय धातूचा योग असतां जें त्या धातुसाधितांचें कर्म तेंच त्या वाक्यांत **ये** या क्रियेचा कर्ता असतें. धातुसाधितास निरंतर गौणत्व असतें ह्मणोन व्याकरणपदच्छेद करिते समयीं त्याचें कर्म सांगायाची कोणीं गरज ठेवित नाहींत. तथापि हें स्थळ कांहींसें वादास्पद आहे.

४९३ **दे**—कोणताहि व्यापार करायास मोकळीक देणें असा अर्थ विवक्षित असतां निमित्तवाचक धातुसाधित अव्यया पुढें दे या धातूचा योग करितात; जसें— 'मीं करूं देतों', 'त्याणें तिला जाऊं दिलें', 'तूं त्यांस बोलूं दे', 'रामानें गोपाळास तें पत्र वाचूं दिलें असतें तर बरें होतें'.

४९४ **लाग**— या धातूचा योग निमित्तवाचक धातुसाधित अव्यया पुढें केला असतां व्यापारारंभ बोधित होतो; जसें— 'तो बोलूं लागला', 'तीं करूं लागेल', 'तीं खाऊं लागतील', इ०.

४९५ **बस**— कोणताहि व्यापार कोणीं दीर्घकालपर्यंत सतत चालवितो, अथवा, तो व्यापार करित असतां अन्य व्यापारा कडेस लक्ष देत नाहीं, असा अर्थ विवक्षित असतां तप्रत्ययान्त वर्तमानकालवाचक धातुसाधिता पुढें **बस** या धातूचा प्रयोग करितात; जसें— 'मीं काल केढोळपर्यंत तुमची वाट पाहत बसलों परंतु तुह्मीं आलां नाहीं', 'तो सारा दिवस लिहित बसतो', 'मीं उद्यां सारा दिवस झोंप घेत बसेन', इ०.

[अ] परंतु एथें एक गोष्ट शिकणारांनीं पक्की लक्षांत ठेवावी कीं धातुसाधितें, आणि त्यां पुढें योजिलेले सहाय धातु, यांच्या अर्थाच्या सामानाधिकरण्याचा संभव असला पाहिजे तरच त्यांचा योग होतो, नाहींतर अर्थाचें सामानाधिकरण्य नसल्यास हा योग होत नाहीं; सांगावयास तात्पर्य सर्व धातुसाधितां पुढें सर्व सहाय धातूंचा योग होतो असें नाहीं; जसें— 'मीं लिहित बसतों' असें होतें, परंतु 'मीं निजत बसतों' असें होत नाहीं.

४९६ **पाह**— कोणताहि व्यापार करण्या विषयीं कर्ता

आपली इच्छा प्रकट करितो, अथवा त्या विषयीं प्रयत्न करितो, असा अर्थ विवक्षित असतां निमित्तवाचक धातुसाधिता पुढें **पाह**धातूंचीं (विशेषेंकरून) वर्तमान काळाचीं रूपें योजितात; जसें– 'तो लिहूं पाहतो', 'ते निघूं पाहतात', 'रामराव जर हें काम घेऊं पाहते तर त्यांस तें सहज मिळतें'.

४९७ अशा ठिकाणीं व्याकरणपदच्छेद करिते समयीं गोंधळ होऊं नये ह्मणोन या धातुसाधितांस निराळें करून पुढलें क्रियापद निराळें मानावें, हा मार्ग सुलभ व सरळ दिसतो.

वर्ग ११.

क्रियापदांचीं रूपें साधण्याचा प्रकार.

४९८ अकर्मक मूळधातूस **त** हा प्रत्यय लाविला असतां वर्तमानकालवाचक धातुसाधित अव्यय सिद्ध होतें; जसें– उठत, बसत, जात, येत, निजत, हंसत, रडत, करवत, खाववत, उठवत, दळत, कापत, इ०.

४९९ **पढ**धातूचा गण वर्जून सकर्मक मूळधातूस हा **त** प्रत्यय लागत असतां त्याच्या मागें **इ** आगम विकल्पें होतो; जसें– करित, बांधित, तोडित, जेवित, वेढित, ताडित, रोंवित, करवित, खाववित, उठवित, दळित, कापित, इ०.

[अ] **पढ**धातूचा गण वर्जून ह्मटलें ह्मणोन– पढत, शिकत, बोलत, ह्मणत, इ० अशींच रूपें होतात.

[आ] हा आगम विकल्पें होतो असें ह्मटलें या वरून करत, बांधत, तोडत, जेवत, वेढत, ताडत, रोंपत, करवत,

उठवत, इ०. अशींहि रूपें लिहण्याचा परिपाठ आहे असें समजावें.

परंतु यांत शिकणारांनीं लक्षांत ठेवावें कीं वर्तमानकालवाचक सकर्मक धातुसाधितास हा आगम करावा हा उत्तम पक्ष होय. या नियमास अनुसरलें असतां पुष्कळ अडचणी व संशय दूर होतील. एकादे समयीं कर्मकर्तरि अर्थ असतां सकर्मक क्रियापदाचा अकर्मक क्रियापदा प्रमाणें प्रयोग करितात तेव्हां हा तारतम्यभाव लक्षांत ठेवणें फार आवश्यक होतें. पहा पृ० १५२. ले० ३७८.

५०० **लिह** धातू वर्जून हकारान्त धातूस हा आगम होत नाहीं; जसें– पाहत, साहत, चाहत, नाहत, वाहत, पोहत, इ०.

लिह वर्जून ह्मटलें ह्मणोन **लिहित** असेंच बहुधा रूप होतें. देशस्थां मध्यें **लिहत** असें ह्मणण्याचा प्रकार आढळतो तो या नियमास अनुसरून आहे, इष्ट असल्यास या रूपाची प्रवृत्ति पाडावी.

५०१ एकाक्षरी धातू वरून हा आगम होत नाहीं; जसें– देत, घेत, नेत, भित, खात, गात, इ०.

५०२ **च**, **ज**, **झ**, **स**, या वर्णांस हा आगम होत असतां अनुक्रमें **च**, **ज**, **झ**, **श**, हे आदेश होतात; जसें– खोचित, रचित, गांजित, भाजित, सोशित, वाशित, इ०.

५०३ इकाराच्या स्थानीं कोणी ईकारही आगम करितात; जसें– करीत, बांधीत, ठेवीत, भरीत, इ०.

एकपक्षीं पाहिलें असतां हा दीर्घ ईकार आगम करण्यासहि कांहींसें निमित्त आहे; कांकीं मराठी भाषेंत शब्दाचे उपान्त्य वर्ण **इ उ** असल्यास ते निरंतर दीर्घ असतात; परंतु हा नियम बहुधा पूर्णार्थान्वित शब्दां विषयीं जाणावा; धातुसाधित अव्य-

यांस तो लाविता येत नाहीं. दुसरें, जेथें ऱ्हस्व इकाराचें सहन होत नाहीं, ह्मणोनच त्याचीहि अपेक्षा न ठेवितां कित्येक— **करवत, ठेवत, बांधत,** अशीं रूपें लिहितात, तेथें दीर्घ ईकाराचें सहन होणें दुर्घट. आणखी सूक्ष्म विचारानें पाहिलें असतां अशी एक अटकळ होत्ये कीं हा जो मराठींत **इ** आगम होतो तो संस्कृतांत जो धातुसाधितांस अथवा क्रियापदांच्या रूपांस मध्यें इडागम होतो, त्याचेंच अनुकरण होय. अशा कारणां वरून मला वाटतें ऱ्हस्व इकार आगम करणें अधिक प्रशस्त होय.

५०४ पूर्वोक्त नियमां प्रमाणें हें वर्तमानकालवाचक धातुसाधित अव्यय सिद्ध झालें ह्मणजे त्या वरून, अथवा त्याच नियमास अनुसरून,– **ता**प्रत्ययान्त– **तांना**प्रत्ययान्त वर्तमानकालवाचक धातुसाधित अव्ययें,–मूलरूप भेदीं, प्रयोजक भेदीं, स्वार्थीं, वर्तमान आणि पूर्णभूत काळीं, आणि संकेतार्थीं भूतकाळीं,– क्रियापदांचीं रूपें, सिद्ध होतात.

५०५ मूळधातूस पुढें **ला, ली, लें,** इ० हे प्रत्यय प्रयोगानुसंधानानें लाविले असतां **ला**प्रत्ययान्त धातुसाधित नाम अथवा विशेषण सिद्ध होतें; जसें– धांवला, उठली, वसलें, हंसलें, खेळल्या, जेवलीं, इ०.

५०६ **त**प्रत्ययान्त वर्तमानकालवाचक धातुसाधित अव्ययाच्या साधनांत **इ** आगमा विषयीं वर जे नियम सांगितले, तेच बहुधा **ला**प्रत्ययान्त धातुसाधित विशेषणाच्या साधनांत **इ** आगमा विषयीं जाणावे.

५०७ या **ला**प्रत्ययान्त धातुसाधित विशेषणा वरून मराठींत भूतकाळाचीं रूपें साधतात; जसें–निजलें, बांधिलें, शृंगारिली, करविला, घेवविले, नेशिल्या, रचिलीं, इ०.

५०८ जसा त्या धातुसाधितांच्या ठायीं तसा या धातुसाधिताच्या ठायींहि हा आगम हकारान्त धातु वर्जून वैकल्पिक आहे, ह्मणोन– निजलें, बांधलें, शृंगारली, करवला, घेववले, नेसल्या, रचलीं, पाहिलें, लिहिलें, इ० अशींहि रूपें लिहण्याचा प्रघात आहे. या विषयीं पहा पृ० २४३, ले० ४९९, [आ].

५०९ कित्येक धातूंच्या भूतकाळाचीं रूपें नियमा प्रमाणें होत नाहींत, ते धातु व त्यांचीं तीं रूपें खालीं लिहिलीं आहेत.

	धातु.	भूतकाळ.		धातु.	भूतकाळ.
२	उडणें	उडाला	२	निवणें	निवाला
३	उभणें	उभाला		पळणें	पळाला
३	खिजणें	खिजाला	३	बुजणें	बुजाला
३	गळणें	गळाला	३	बुझणें	बुझाला
३	जळणें	जळाला	२	बुडणें	बुडाला
१	जिरणें	जिराला	१	भिजणें	भिजाला
३	झिजणें	झिजाला	२	मिळणें	मिळाला

	धातु.	भूतकाळ.		धातु.	भूतकाळ.
१	टळणें	टळाला	१	मुरणें	मुराला
१	तडणें	तडाला		ह्मणणें	ह्मणाला
२	दडणें	दडाला		रिघणें	रिघाला
३	दबणें	दबाला	३	रिझणें	रिझाला
३	दिपणें	दिपाला	३	लपणें	लपाला
	निघणें	निघाला	३	विझणें	विझाला
१	निभणें	निभाला	२	विरणें	विराला
२	निमणें	निमाला		हिंवणें	हिंवाला

यांत ज्यांच्या मागें अंक मांडिला नाहीं, त्याचें भूतकाळाचें रूप एकप्रकारचें मात्र होतें; ज्यांच्या मागें १ हा अंक आहे, त्याचें रीतीनें जें रूप होतें त्याची प्रवृत्ति अधिक आहे. ज्यांच्या मागें २ हा अंक आहे, त्यांच्या वर लिहिलेल्या रूपांची प्रवृत्ति अधिक आहे. आणि ज्यांच्या मागें ३ हा अंक आहे, त्यांच्या दोन्ही रूपांची सारिखी प्रवृत्ति आहे असें जाणावें.

५१० खालीं लिहिलेल्या धातूंच्या भूत काळाचीं रूपें पूर्वोक्त नियमांत नाहींत.

धातु.	भूतकाळ.	धातु.	भूतकाळ.
करणें	केलें	बघणें	बघितलें
मरणें	मेलें	मागणें	मागितलें
जाणें	गेलें	सांगणें	सांगितलें
येणें	आलें	खणणें	खणलें, खंटलें
होणें	झालें	ह्मणणें	ह्मटलें
गाणें	गाइलें, (कों०गालें)	हणणें	हंटलें
ध्याणें	ध्याइलें,(कों०ध्यालें)	पिणें	प्यालें
माणें	माइलें, (कों०मालें)	भिणें	भ्यालें
घेणें	घेतलें	विणें	व्यालें
घालणें	घातलें	लेणें	ल्यालें
धुणें	धुतलें	देणें	दिलें

भाविप्रयोग असतां ह्मण याचें भूतकाळाचें रूप ह्मटलें असें होतें.

झालें हें रूप लिहिण्याचे दोन तीन प्रकार आढळतात- **झालें, झहालें, जाहलें, जाहालें,** असें—

कृष्णानुजासुभद्रालमालायोग्यजाहलीआहे ॥ मोरोपंत.

परंतु मला वाटतें **ह** आणि **झ** यांचें एका पक्षीं सावर्ण्य आहे, ह्मणोन **झालें** हेंच रूप लिहावें हा उत्तम पक्ष.

वर्ग १२.

क्रियापदां विषयीं आणखी स्फुट विचार.

५११ **ह**कारान्त जितके धातु आहेत, त्यांच्या आज्ञार्थीं, द्वितीय पुरुषीं, एकवचनीं, बहुधा शेवटीं **आ**कारादेश करायाचा परिपाट पडला आहे, व तो आकारादेश करित असतां विकल्पें पहिल्या **आ**कारास **अ** आदेश करितात; जसें- पाहा, पहा; साहा, सहा; राहा, रहा; चाहा, चहा; वाहा, वहा; इ०.

माझायाबाहूचेंस्मरणकरूनितूंमनींपहाशील
अथवारथवाजिद्विपभटकोटिप्रशमनींपहाशील. मोरोपंत.

परंतु विचारपूर्वक पाहिलें असतां असा नियम आढळतो कीं मराठी भाषे मध्यें द्व्यक्षरी धातु अकारान्ता शिवाय नाहींत. तेव्हां हे **ह**कारान्त धातुहि मूळचे **अ**कारान्त खरे यांत संशय नाहीं; परंतु शब्दाच्या शेवटीं व मध्यें **ह** असतां त्यांस दीर्घ केल्यानें त्याच शब्दांच्या उच्चारणांत फारसें अंतर समजण्यांत येत नाहीं, ह्मणोन यांस प्रमादानें पूर्वीपासून कोणी आकारान्त करून— **पहातो, रहातो, पहा, राहाशील, रहावेल,** अशीं रूपें लिहितात. परंतु मला वाटतें **पहा** असें रूप लिहणें व्याकरणदृष्ट्या प्रशस्त नाहीं. एकवचनीं—**पाह, साह, राह,** अशीं

रूपें, आणि अनेकवचनीं—**पाहा, साहा, राहा,** अशीं रूपें लि-हणें व्याकरणदृष्ट्या अधिक शुद्ध होय.

५१२ अथापि पूर्वीपासून पूर्वोक्त रीत्या लिहिण्याचा प्रघात पडला आहे ह्मणोन या अकारान्त धातूंचीं विकल्पें आज्ञार्थीं एकवचनीं **पहा, रहा,** अशींहि रूपें लिहिलीं अ-सतां चिंता नाहीं.

पुढला हकार दीर्घ झाला असतां विकल्पें मागल्या **आ**-कारास **अकारादेश** होतो; जसें– पहातों, रहातों, लहान, सहान, तहान, पहाड, इ०.

५१३ कित्येक धातुसाधितांच्या योगानें अथवा इतर शब्दांच्या योगानें क्रियेचे अर्थ भिन्न होतात, अथवा ज्या क्रियेशीं त्या धातुसाधिताचा संबंध असतो, त्यां पासून तीं धा-तुसाधितें निराळीं काढिलीं असतां अर्थच बसत नाहीं, अथ-वा कित्येक स्थळीं अर्थांत वैषम्यहि येतें, असें असल्यास व्याकरण करिते समयीं त्या धातुसाधितांचा अथवा शब्दांचा निरनिराळा व्याकरणपदच्छेद नकरितां त्या त्या धातुसाधितां सहित तीं तीं **संयुक्त** क्रियापदें ह्मणावीं ह्मणजे बरें; जसें– **विकत घेणें, जेऊं घालणें, तोंडीं लावणें,** इ०. 'त्याणें घोडा विकत घेतला', 'तो ब्राह्मणास जेऊं घालील', 'तो भाताशीं पापड तोंडीं लाविल्ये', यांत– **'विकत घेतला', 'जेऊं घालील', 'तोंडीं लाविल्ये',** हीं **संयुक्त** क्रियापदें ह्मणावीं.

हा मार्ग उघडिल्यानें मला भरंवसा आहे कीं पुष्कळ संशय आणि वादविवाद दूर होतील.

५१४ कोणत्याहि क्रियेचा अथवा व्यापाराचा अतिश-

यार्थ अथवा पौनःपुन्यार्थ दाखविणें इष्ट असल्यास मूळ धातूस द्विवार अभ्यास करून एक नवें क्रियापद सिद्ध करितात, मग त्याचीं इतर धातूं प्रमाणें भेद, अर्थ, काळ, प्रयोग, यांच्या अनुरोधानें रूपें साधितात; जसें– **करकरकरणें, लिहलिहलिहिणें, वाचवाचवाचणें, निजनिजनिजणें, जाजाजाणें, चालचालचालणें**, इ०. उदाहरणें– 'त्यास एकदां कोणीं सांगितलें ह्मणजे तो करकरकरितो', 'त्यास लिह ह्मण ह्मणजे तो लिहलिहलिहील', 'त्याणें मुकाम सोडिला ह्मणजे चालचालचालावें', इ०.

५१५ आज्ञार्थी वर्तमान काळीं तृतीय पुरुषीं जो ऊकार आणि ओकार होतो त्यां विषयीं आणखी दुसरा नियम असा आढळण्यांत येतो कीं एकाक्षरी धातु असल्यास त्यास ऊकार, आणि अनेकाक्षरी असल्यास ओकार विशेषेंकरून होत असतो.

मराठी मध्यें हा क्रियापदविचार फार मोठा आणि अतिशय गुंतलेला आहे, त्याचें एथें संक्षेपेंकरून विवेचन केलें आहे; त्यांत मराठी क्रियापदांची जी ही गूत सोडवून कांहींशी उकलण्याच्या धोरणांत आणिली आहे, तें हें काम केवळ नूतन होय, ह्मणोन तें पूर्ण व पक्कें नसलें तरीं ग्रंथकर्त्यास क्षमा मागायास कांहींसा अवकाश आहे.

भाग २.

अविभक्तिक किं० अव्ययें यां विषयीं विचार.

५१६ अविभक्तिक शब्द किंवा अव्ययें ह्मणजे ज्यांस कांहीं कार्यविशेष होत नाहीं, व मूळचें जसें त्यांचें स्वरूप

अनुक्रमणिका

असते तसेंच निरंतर अविकृत राहतें, व ज्यांचा वाक्यरचनेत फार उपयोग पडतो, असे जे शब्द तीं; जसें– आणि, परंतु, किंवा, जर, तर, लौकर, तेव्हां, मग, नंतर, छिः, इ०. अव्ययांत **क्रियाविशेषण**, **उभयान्वयी**, **शब्दयोगी**, **उद्गारवाची**, अथवा **केवलप्रयोगी** हे भेद आहेत.

विभाग १.

क्रियाविशेषण अव्यय.

५१७ ज्या शब्दांहींकरून क्रियेच्या गुणाचा अथवा प्रकाराचा अथवा अमुक अवस्थेत ती क्रिया घडली अशा अर्थाचा बोध होतो, ते शब्द क्रियाविशेषणें होत; उदाह०– 'हळू चालतो', 'फार बोलतो', 'खेळत जातो'; या वाक्यांत **हळू**, **फार**, आणि **खेळत**, या शब्दांहींकरून त्या त्या क्रियेच्या प्रकाराचा किंवा गुणाचा बोध होतो.

५१८ मराठी भाषेंत क्रियाविशेषण अव्ययें चार प्रकारचीं होतात;

प्रथम– शुद्ध अव्ययें असून जीं निरंतर क्रियाविशेषणें असतात तीं; जसें– हळू, लौकर, पुनः वारंवार, इ०.

दुसरीं– धातुसाधितें असून ज्यांचा क्रियाविशेषणां प्रमाणें प्रयोग होतो तीं; जसें– खेळत, हंसत, खेळतां, हंसतां, खेळतांनां, हंसतांनां, खेळत असतां, हंसत असतांनां, इ०.

तिसरीं– शुद्ध विशेषणें असून ज्यांचा क्रिये कडेस संबंध असतो, ह्मणजे क्रियेच्या प्रकाराचीं अथवा गुणाचीं दर्शकें असतात, तीं. यांचा भरणा या भाषेंत फार आहे; किंबहुना जितकीं गुणविशेषणें तितकीं या भाषेंत क्रियाविशेषणें

होतात असें म्हटल्यासहि चिंता नाहीं; जसें– 'तो चांगलें लिहितो', 'ती गोड बोलत्ये', 'त्या मधुर गातात', इ०.

५१९ या भाषेंत गुणविशेषणांचीं क्रियाविशेषणें होत असतां त्यांस क्रियाविशेषणनिमित्तक कांहीं विशेष कार्य होत नाहीं, ह्मणून ज्या विशेषणांचीं रूपें विशेष्याच्या योगानें फिरत नाहींत तीं क्रियाविशेषणें असतांहि त्यांस कांहीं विकार होत नाहीं; परंतु, ज्यांचीं रूपें विशेष्याच्या लिंगवचनां वरून फिरतात, तीं क्रियाविशेषणें असतां त्यांचीं रूपें कचित् क्रियेच्या भावा वरून, कचित् कर्त्या वरून, आणि कचित् कर्मा वरून, फिरतात; जसें– 'तो चांगलें लिहितो', 'त्या उग्या राहिल्या', 'त्यांणीं आपलीं घरें तांबडीं रंगविलीं असतां तुह्मीं आपलीं हिरवीं रंगवा', इ०. तेव्हां या विषयीं कांहीं नियम करणें इष्ट आहे.

५२० अकर्मक क्रियापद असतां, अथवा सकर्मक क्रियापद असून कर्माचा उल्लेख नसतां, जेथें क्रियाविशेषण पक्षीं कर्त्याच्या अनुरोधानें चालतें, अशा स्थळीं जों साधेल तों तें क्रियाविशेषण नपुंसकलिंगी करून क्रियेच्या भावाचें अनुरोधी करावें ह्मणजे बरें; जसें– 'ती **चांगली** नाचत्ये', 'तो **बरा** बोलतो', 'तीं **वांकडीं** चालतात'; अशा ठिकाणीं– 'ती **चांगलें** नाचत्ये', 'तो **बरें** बोलतो', 'तीं **वांकडें** चालतात'; असें बोलण्याचा व लिहिण्याचा परिपाठ ठेविला असतां शुद्ध.

५२१ परंतु कित्येक क्रियाविशेषणें कर्त्याच्याच अनुरोधानें वागतात; जसें– 'ती **उगी** राहत्ये', 'ते **उभे** राहतात', 'त्या खणांत या पोथ्या **आडव्या** मावत्या', 'ही सळई त्या छिद्रांत **वांकडी** जात नाहीं, **उभी** जात्ये'; इ०.

अनुक्रमणिका

यांत असा नियम आहे कीं जीं शुद्ध क्रियाविशेषणें असून **आ**कारान्त असतात तीं कर्त्याच्याच अनुरोधानें वागतात.

५२२ सकर्मक क्रियापद असून जेथें क्रियाविशेषणें करून कर्मासहित क्रियेच्या प्रकाराचें विधान केलें असतें, तेथें तें क्रियाविशेषण कर्माच्या अनुरोधानें वागतें; जसें– 'त्याणें तो ग्रंथ **मोकळा** केला', 'तिणें आपली चोळी **उलटी** शिवली', 'त्याणें कालच्या आर्या **चांगल्या** लाविल्या', इ०. या उदाहरणांत– ग्रंथाचें मोकळें करणें, चोळीचें उलटें शिंवणें, आणि आर्यांचें चांगलें लावणें, यांचें विधान आहे असें जाणावें.

'तो चांगल्या आर्या लावितो', आणि 'तो आर्या चांगल्या लावितो', यांत अर्थभेद आहे; पहिल्या उदाहरणांत शुद्ध आर्यांचाच गुण प्रदर्शविला जातो, परंतु दुसऱ्या उदाहरणांत त्या आर्या लावण्याचा जो प्रकार त्याचें विधान केलें जातें.

५२३ हीं क्रियाविशेषणें **क्वचित्** दुसऱ्याहि क्रियाविशेषणाच्या अथवा विशेषणाच्या प्रकाराचा बोध करितात; जसें– 'तो फार त्वरित बोलतो', 'तो उत्कृष्ट ठक आहे', या वाक्यांत **फार** हें क्रियाविशेषण **त्वरित** या क्रियाविशेषणाचा प्रकार दर्शवितें, आणि **उत्कृष्ट** हें **ठक** या विशेषणाचा प्रकार दर्शवितें.

५२४ मराठी भाषे मध्यें व्यापारादिकांचें अनुकरण कर्त्तव्य असतां तो अनुकार्य जो व्यापारादि त्याच्या स्थानीं कांहींएक ध्वनितार्थवाचक शब्द कल्पून त्या पुढें–**कन**, **कर**, **दिनीं**, **दिशीं**, हे प्रत्यय लावून जे शब्द साधतात, अथवा द्विरुक्तीनें जे या प्रकारचे शब्द सिद्ध होतात, तीं सारीं

क्रियाविशेषणें होत; जसें– फटकन, फटकर, फटदिनीं, फटदिशीं; गटकन, गटकर, गटदिनीं, गटदिशीं; गपगप, धसधस, फटफटां, बदबदां; बदबद, झटझट; फटाफट, बदाबद, कडाकड, धडाधड; इ०.

या अशा अनुकरणरूप शब्दांचा या महाराष्ट्र भाषेंत जितका भरणा असेल तितका मला वाटतें आणखी कोणत्येहि भाषेंत नसेल; आणि तो या भाषेचा केवळ असाधारण जिव्हाळा होऊन राहिला आहे. गति, वेग, मांजुल्य, कार्कश्य, सौंदर्य, परिमिति इत्यादि क्रियेचे शतावधि प्रकार दाखवायाचे असतां त्या त्या अनुकरणरूप शब्दाचा प्रयोग होतो; जसें **झटझट** चालतो; **चमचम** लवत्ये, **टकमक** पाहत्ये; झणझण वाजतें; बदबद पडतें, टपटप झरतें; भडभड ओकतो; तडतड बोलतो; तोंडोतोंड भरतो; कांठोकांठ चालतो; छडी वाजे छमछम विद्या ये घमघम.

५२५ आणखी नामा पुढें **पूर्वक** हें अव्यय लागलें असतांहि तीं स्थलविशेषीं क्रियाविशेषण अव्ययें होतात; जसें– प्रीतिपूर्वक, स्नेहपूर्वक, लोभपूर्वक, इ०; 'कोणास प्रीतिपूर्वक दिलें असतां तें विशेष ग्राह्य होतें', 'मीं तुम्हांस स्नेहपूर्वक सांगतों', इ०.

परंतु—'प्रीतिपूर्वक जें दान तें अधिक ग्राह्य', 'स्नेहपूर्वक जो सत्कार', 'भावपूर्वक पूजा', इ० वाक्यांत— **प्रीतिपूर्वक, स्नेहपूर्वक**, इ० **दान**, **सत्कार**, यांचीं विशेषणें होत. परंतु माख्यान–'स्नेहपूर्वक केलेला सत्कार' इ० प्रकारच्या वाक्यांत पुनः हीं **केलाला**, इ० धातुसाधितांचीं क्रियाविशेषणेंहि होतात.

५२६ कित्येक शब्दांस विभक्ति असतां त्यांचा प्रयोग शुद्ध अव्यया प्रमाणें होतो; ह्मणून त्यांस अव्ययेंच मानिलें असतां चिंता नाहीं; जसें– इतक्यांत, सकाळला, दिवसास, रात्रीस, तशांत, वस्तुतः, वस्तुदृष्ट्या, इ०. उदाह०–'इतक्यांत

अनुक्रमणिका

तो नाहींसा झाला', 'तूं उद्यां सकाळला ये', 'तशांत मीं गेलों असतों', 'वस्तुदृष्ट्या पाहिलें असतां', इ०; याच प्रमाणें— **मोठ्यानें, अनशेपोटीं, अनवाणीं,** इ० आणखी उदाहरणें.

५२७ एकाद्या समयीं अनेक अव्ययें एकत्र होऊन, अथवा अव्ययां वरून विभक्ति अथवा शब्दयोगी अव्ययें लागूनहि क्रियाविशेषण अव्ययें सिद्ध होतात; परंतु असें होत असतां एकारान्त अव्ययास अंतीं अ आदेश होतो; जसें— **जेथपर्यंत, तेथपावेतों, एढोळपर्यंत, तेव्हांपासून, केव्हांचा, एथपासून,** इ०.

५२८ **प्रतिगांवास, प्रतिदेशास,** इ०.अशा अर्थीं त्या त्या शब्दाची द्विरुक्ति करून पहिल्या पदास **ओ**कारान्त केलें असतां एक जातीचीं स्थलवाचक क्रियाविशेषण अव्ययें होतात; जसें—**गांवोगांव, देशोदेश, रानोरान, वेळोवेळ,** इ०.

परंतु हीं नामें मूळचीं अकारान्त असलीं पाहिजेत.

५२९ कित्येक क्रियाविशेषण अव्ययें त्यांच्या अर्थां सहित सांगतों.

स्थलवाचक. . .	तेथें, एथें, जेथें, इकडे, तिकडे, इ०.
कालवाचक. . .	तेव्हां, एव्हां, जेव्हां, केव्हां, उद्यां, काल, परवां, एरवां, शेवटीं, वारंवार, दरसाल, यंदां, गतसालीं, इ०.
संख्यावाचक. . .	एकदां, दोनदां, तीनदां, शंभरदां, इ०
क्रमवाचक. . . .	पहिल्यानें, दुसऱ्यानें, तिसऱ्यानें, इ०.
निश्चयार्थक. . .	खचित, निःसंशय, निभ्रांत, इ०.
अनुकरणवाचक..	फटकन्, गपकन्, चटदिशीं, टपकन्; टपदिनीं, गटगटां, गपागप, भडाभड, झटझट, टपटप, झणझण, इ०.

अनुक्रमणिका

विभाग २.

उभयान्वयी अव्यय.

५३० ज्या अव्ययाचा संबंध दोन शब्दांच्या अथवा दोन वाक्यांच्या अन्वया कडेस असतो, त्यास उभयान्वयी अव्यय ह्मणावें; जसें— **आणि, जर, तर, परंतु, यद्यपि; तथापि, कांकीं, कांजर,** इ०. 'रामा आणि कृष्णा तेथें गेले आहेत', या वाक्यांत **आणि** या शब्दानें **रामा** आणि **कृष्णा** या उभयतांचा गमनक्रिये कडेस अन्वय करून दिला आहे, ह्मणजे रामा गेला, आणि कृष्णाहि गेला, असा अर्थ. तसेंच, 'त्याणें दहा हजार फौज घेतली, आणि दौलताबाद वेढिली.'

या उभयान्वयी अव्ययाचे कित्येक अर्थ सांगतों.

समुच्चयवाचक· · आणि, व, आणखी, इ०.

न्यूनत्वबोधक· · · कदाचित्, कचित्, प्रायः, प्रायशः, बहुतकरून, इ०.

पक्षांतर· · · · · परंतु, पण, अथवा, किंवा, नाहींतर, पक्षीं, किंबहुना, इ०.

कारणोभयान्वयी· कारण, कांकीं, कांजर, त्यास, इ०.

संकेतोभयान्वयी· · जर, तर, जरीं, तरीं, यद्यपि, तथापि, इ०.

विभाग ३.

शब्दयोगी अव्यय.

५३१ ज्या अव्यया पासून दिग्रूप अथवा कालरूप अधिकरणाचा उद्बोध होतो, आणि ज्या शब्दाशीं याचा

योग होतो त्याचें याच्या योगानें सामान्यरूप होतें असा जो शब्द तें शब्दयोगी अव्यय होय; जसें–**वर, खालीं, पुढें, मागें, नंतर, पूर्वीं, कडे, समोर, मध्यें, सभोंवतां**, इ०.

हीं अव्ययें ओळखायाची मुख्य खूण हीच आहे कीं ज्या नामांशीं यांचा योग होतो त्यांचीं यांच्या योगानें सामान्यरूपें होत असतात.

वर लिहिलेल्या शिवाय आणखी कित्येक शब्दयोगी अव्ययें सांगतों.

बाहेर, मध्यें, आंत, ठायीं, कडे, मुळें, करून, कडून, करवीं, पासून, प्रत, करितां, जवळ, पाशीं, अलिकडे, पलिकडे, पावेतों, पर्यंत, बद्दल, ऐवजीं, प्रमाणें, सन्निध, सन्निकृष्ट, साठीं, स्तव, सह, सहवर्तमान, इ०.

५३२ यांत **पावेतों, पर्यंत**, इ० कित्येक शब्दयोगी अव्ययांच्या योगानें ज्या शब्दांशीं यांचा योग असतो त्यांचीं सामान्य रूपें निरंतर होत नाहींत; जसें–'दोन महिने पावेतों', 'चार दिवसपर्यंत', 'सकाळ पर्यंत', इ०.

५३३ यांतून स्थलवाचकां वरून **ऊन** प्रत्यय लाविला ह्मणजे अपादानपूर्वक गत्यर्थवाचक शब्दयोगी अव्ययें होतात; जसें– **वरून, खालून, इकडून, तिकडून**, इ०.

५३४ या शब्दयोगी अव्ययां वरून **चा** आणि **ला** हे लिंगभेदेंकरून प्रत्यय लागले असतां 'तदधिकरणसंबंधी' अशा अर्थीं विशेषणें होतात; जसें–**वरचा, पुढला, पलिकडची, अलिकडली, मागचें, समोरलें**, इ०.

५३५ विकल्पें या शब्दयोगी अव्यया वरून **ईल** प्रत्यय होऊन ही अशा अर्थीं विशेषणें होतात; जसें– **पुढील** धो-

रण, **मागील** वहिवाट, **आंतील** वर्तणूक, **बाहेरील** डौल, इ०.

परंतु हा प्रत्यय प्राकृत शब्दां वरूनच होतो; **समीप, सन्निध, सन्मुख**, आदिकरून संस्कृत शब्दां वरून होत नाहीं.

५३६ या शब्दयोगी अव्ययांमध्यें **शुद्ध शब्दयोगी** अव्यय ह्मणून एक आणखी उपभेद आहे. या शुद्ध शब्दयोगी अव्ययांचा प्रयोग शब्दां वांचून नुसता कधींच होत नाहीं, व तीं नुसतीं उच्चारिलीं असतां केवळ निरर्थक होतात; परंतु कोणत्याहि शब्दा पुढें योजिलीं असतां त्यां पासून कोठें व्यावृत्ति, कोठें संग्रह, इत्यादि अर्थ गम्यमान होतात; आणखी या शुद्ध शब्दयोगी अव्ययांच्या योगानें ज्या शब्दांशीं यांचा योग होतो त्याचें सामान्यरूप होत नाहीं. हीं अव्ययें– **च, हि, ना, देखील, देखीत, पण, मात्र**, इ०. उदाह०– 'तूंच ये', अ० 'तूंमात्र ये', ह्मणजे तुझ्या बद्दल अ०. तुझ्या बरावर इतरांस आणूं नको, एथें इतरांची व्यावृत्ति होत्ये. 'तूंहि ये', ह्मणजे आणखी येतील त्यांत तूंपण ये, एथें संग्रह उपलब्ध होतो; यांत **च, मात्र**, यांचा प्रयोग सर्व जातींच्या शब्दां वर होतो; जसें– 'तूं जाच', 'ती हळूच चालत्ये', 'तो गोळा वाटोळाच आहे', 'तूं इतकें मात्र बोल', इ०. 'तूं जातोसना'? ह्म० तूं जातोस कीं नाहीं? असा प्रश्न; 'तूंना जातोस'? ह्म० तूं जातोस किंवा आणखी कोणी जातो?

यांत **च** वर्जून अर्थास अनुकूल पडल्यास इतरांस क्रियाविशेषणें मानिलें तरीं चिंता नाहीं असें मला वाटतें.

विभाग. ४.

केवलप्रयोगी अ० उद्गारवाची अव्यय.

५३७ जीं अव्ययें वाक्यांत असतां ज्यां वरून वक्तयाचे अथवा सांगणाराचे हर्षशोकादि जे मानसिक विकार अथवा उद्गार यांचा उद्‍बोध होतो, त्यांस **केवलप्रयोगी अ० उद्गारवाची** अव्ययें ह्मणतात.

यांत– धिकार, दुःख, हर्ष, उत्कर्ष, इत्यादि मानसिक विकार दाखविणारीं अव्ययें सांगतों.

उद्गारवाची अव्ययें.

धिकार. . . . . छिः, थू, उंः, अंः, इ०.
दुःख. . . . . उँः, अँः, आईआई, इ०.
हर्ष. . . . . आहा, वाः, कायमौज, इ०.
धन्यता. . . . . वाहवा, शाबास, भले, इ०.
आर्जव. . . . . जी.

संबोधनीं जीं उद्गारवाची अव्ययें तीं लिंगवचनानुसंधानानें असतात.

लिंग.	**एकव०.**	**अनेकव०.**
पुल्लिंग	अरे, रे, अगा, अजि.	अहो, हो, अगा, अजि.
स्त्रीलिंग	अगे, गे, अगो, गो, ग.	

एकादा समयीं सर्व वाक्याचेंवाक्य उद्गाराच्या अर्थी येतें, तेव्हां संक्षेपानें व्याकरण करणें झाल्यास त्या सर्व वाक्यास या अव्ययांत टाकिलें तरीं चिंता नाहीं; उ०— '**विष्णवेनमः** तुह्मीं त्याची गोष्ट मज जवळ बोलूं नका', '**तथास्तु** महाराज, आतां आपण यावें'.

५३८ कधीं कधीं या अव्ययाचा प्रयोग नामा सारिखाहि करितात; उदाह०– 'काल शाळेंत रामाची वाहवा झाली', 'गोपाळाची छीथू तुह्मीं ऐकिली असाल', इ०.

केव्हां केव्हां संबोधनीं नामाचीं रूपें असतां त्यांचा या केवलप्रयोगी अव्यया प्रमाणें प्रयोग करितात; जसें–हरहर! शिवशिव! नारायण!

५३९ या शिवाय आणखी कित्येक शब्दांचा प्रयोग शुद्ध वाक्यालंकारार्थ अथवा पादपूरणार्थ होतो, असे शब्द या भाषेंत बरेच आहेत; ते असे कीं– **आपला, बेटा, बेटें, परता, मग**, इ०. उदाह०– 'तो आपला कांहीं तरी बोलतो', 'मग बेटें असें झालें', 'तूं जाईसना परता'.

खंड ४.

साधितशब्दविचार.

५४० एथपर्यंत, मूळ प्रकृतीस अथवा साधितांस विभक्त्यादि प्रत्यय लागून जीं जीं शब्दसिद्धिरूप कार्यें होतात, तद्विषयक प्रकरणाचें वर्णन झालें. आतां मूळच्या सिद्धशब्दां वरून साधित जे इतर शब्द त्यांचा व्युत्पत्तिप्रकार एथें संक्षेपरूपानें वर्णन करितों.

५४१ साधितें दोन प्रकारचीं आहेत; एक धातूं वरून अथवा क्रियापदां वरून साधलेले जे शब्द तीं, यांस संस्कृतांत **कृदंत** ह्मटलें आहे, परंतु एथें **धातुसाधितें** म्हटलें आहे; आणि एक धातुव्यतिरिक्त शब्दां वरून साधलेले जे शब्द तीं; यांस संस्कृतांत **तद्धित**, परंतु एथें **शब्दसाधितें** म्हटलें आहे.

भाग १.

धातुसाधितें.

५४२ धातूं वरून अथवा क्रियापदां वरून साधलेले जे शब्द त्यांत मुख्य तीन भेद आहेत;– नामें, विशेषणें, आणि अव्ययें. हीं त्यांच्या त्यांच्या प्रत्ययांच्या अनुक्रमानें एथें सांगतों.

क्रियापदांचे जे मूलधातु तींच केव्हां केव्हां धातुसाधित नामें होतात; जसें– **मार**, **तोड**, **रड**, **धांव**, **आदळ**, **उकड**, **उघड**, **खुरखूर**, इत्यादि. उदाह०– 'त्याचा **मार** कठीण', 'त्या गोष्टीची कांहीं तरी **तोड** करायाची होती', 'ही **रड** माझ्यानें ऐकवत नाहीं'; इ०.

आ——— कित्येक धातूं वरून कर्मार्थी व भावार्थी हा **आ**प्रत्यय लागतो; ह्मणजे मूलधातुरूप जे शब्द त्यांस आकारान्त केल्यानें जीं धातुसाधित नामें होतात, त्यां पासून कर्म, भाव, हे अर्थ उत्पन्न होतात; जसें– **ठेवा**, **ठेंचा**, **भरडा**, **भरणा**, **लेखा**, **वेढा**, **झगडा**, **झिडकारा**, इ०.

आऊ——— ती ती क्रिया करायास योग्य अथवा शक्य, अशा अर्थी त्या त्या धातू वरून हा प्रत्यय होऊन विशेषणें होतात; जसें– **पाळाऊ**, **जळाऊ**, **टाकाऊ**, **विकाऊ**, **शिकाऊ**, इ०. **पाळाऊ** ह्म० पाळायास योग्य, **जळाऊ** ह्मणजे जळायास योग्य अथवा शक्य, इ०.

अनुक्रमणिका

ई—— – कोठें मूलधातुरूप जे शब्द त्यांस ईकारान्त केल्यानें धातुसाधित नामें होतात; जसें– **उडी, बुडी, खाई, थुंकी, थापी, थापटी,** इ०.

ईव—— ती ती क्रिया ज्यां वर घडली आहे ते पदार्थ विवक्षित असतां मूलधातू वरून हा प्रत्यय होतो; जसें– **सोलींव, कोरींव, घोटींव, कांतींव, पेरींव, भरडींव,** इ०.

ऊ—— **खा, गा,** इ० कित्येक आकारान्त धातूं वरून हा प्रत्यय होऊन धातुसाधित नामें होतात; जसें– **खाऊ, गाऊ,*** इ०.

मूळ धातू वरून कर्त्रर्थी हा प्रत्यय केला असतां धातुसाधित विशेषणें होतात; जसें– **भरू, काढू, मारू, खाऊ,** इ०; परंतु हीं धातुसाधित विशेषणें बहुधा निरंतर तत्तत्कर्मवाचक नामांशीं जोडलीं असतात; जसें– **पोटभरू, गरजकाढू, मनमारू, भाजीखाऊ,** इ०. कचित् या ऊकारान्त धातुसाधितांस पुढें आणखी विनोदार्थ **बा, जी,** हे शब्द लाऊन धातुसाधित नामें करितात; जसें– **देऊबा, घेऊबा, घेऊजी, देऊजी,** इ०.

ऊं—— भावार्थी हा प्रत्यय कित्येक धातूं वरून होऊन धातुसाधित नामें होतात; जसें– **हंसूं, रडूं,** इ०. उदाह०– 'त्यास हंसूं आटोपेना', 'या काळीं तिला रडूं आलें', इ०. परंतु या

* तान्ह्या मुलांस पाळणा हालवितांनां जें गाणें गातात तें.

धातुसाधितनामांस प्रथमे शिवाय इतर विभक्ति लागत नाहींत.

सर्व धातूं वरून निमित्तार्थी ऊं हा प्रत्यय होऊन धातुसाधित अव्ययें होतात; जसें– **करूं**, **बोलूं**, **सांचवूं**, **देववूं**, **हंसवूं**, इ०.

ऊन—— एक क्रिया घडून दुसऱ्या क्रियेची विवक्षा असतां ज्या क्रियेस अन्य क्रियेची अपेक्षा आहे तिच्या मूलधातू वरून हा प्रत्यय होऊन पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय होतें; जसें– **मारून**, **बोलून**, **चालून**, **ह्मणून**, इ०. उदाह०– 'तो मला मारून गेला', एथें मारणें ही क्रिया पहिली घडून तदनंतर जाणें ही क्रिया घडली असा अर्थ.

या धातुसाधितां पासून कार्यकारणभावाचाहि बोध होतो; जसें– 'तो खाऊन माजला', 'पिऊन मस्त झाला', इ०. एथें **खाऊन**, **पिऊन**, ह्मणजे खाण्या मुळें, पिण्या मुळें, असा अर्थ.

क्रियेस अवधि करून तेव्हां पासून काळगणना कर्तव्य असतांहि या **ऊन**प्रत्ययान्त धातुसाधितांचा प्रयोग करितात; उ०– 'मला ही पोथी लिहून दहा वर्षें झालीं', 'त्याला मरून एक युग गेलें', इ०.

ऍं——— रड, हंस, इ० कित्येक धातूं वरून भावार्थी हा प्रत्यय होऊन नामें होतात; जसें– **रडें**, **हंसें**, इ०.

अनुक्रमणिका

का --— मार, रड, फाट, इ० कित्येक धातूं वरून कर्त्रर्थीं अतिशयार्थीं हा प्रत्यय होऊन विशेषणें व नामें होतात; जसें– **मारका, रडका, फाटका**, इ०. उदाह०– 'ही मोठी मारकी पोरगी आहे', 'या मारक्याच्या वाटेस जाऊं नको', इ०. **फाटका, तुटका, मोडका**, ह्मणजे फाटलेला, तुटलेला, मोडलेला.

ण——— बहुतेक धातूं वरून भाव, कर्म, करण, अधिकरण, योग्यता, इत्याद्यर्थीं हा प्रत्यय होऊन धातुसाधित नामें सिद्ध होतात; जसें– **तारण, पोषण, भांडण**, इ० भावार्थ; **दळण, नेसण, चाटण**, इ० कर्मार्थ; **चाळण, झाडण, कालवण**, इ० करणार्थ; **दडण, लवण, चढण**, इ० अधिकरणार्थ. समयविशेषीं एका शब्दाच्या ठायीं हे अनेक अर्थ संभवतात; जसें–दळण, कांडण, घुसळण, इ०. उदाह०– 'सखूचें दळण, चांगलें', एथें दळण ह्मणजे दळण्याचा व्यापार; 'आज तुझें दळण जाड आलें', एथें दळण ह्मणजे दळलेलें जें तें; इतकें दळण आज कोण दळील', एथें दळण ह्मणजे दळायाचें अथवा दळायास योग्य जें तें.

णा——— कित्येक धातूं वरून भावार्थीं अथवा कर्मार्थीं अथवा करणार्थीं हा प्रत्यय होतो; जसें– **भरणा, नितळणा**; जसें– 'या गोसांव्यापाशीं आर्यांचा भरणा फार आहे', 'त्याणें सर-

कारांत ऐवजाचा भरणा केला', इ०. कित्येक मूळ संस्कृत धातूं वरून जो स्त्रीलिंग प्रत्यय लागून **ना** होतो त्याच्या ठिकाणीं मराठींत पूर्वोक्त अर्थी **णा** प्रत्यय होतो; जसें– **हेळणा, छळणा, तुळणा**, इ०.

णाऊ––– हा प्रत्यय बहुधा ती ती क्रिया करायास योग्य अथवा शक्य जो पदार्थ त्याच्या अर्थी होतो; जसें– **ठेवणाऊ, खाणाऊ**, इ०.

णार––– सर्व धातूं वरून भविष्यार्थी हा प्रत्यय होऊन कोठें क्रियापदें होतात, व कोठें नामें होतात; जसें– **जाणार, येणार, निजणार**, इ०. उदाह०– 'मीं उद्यां तेथें जाणार', 'तुह्मीं आलेत तर तोही तेथें येणार', इ० वाक्यांत **जाणार, येणार**, हीं भविष्य काळाचीं क्रियापदें जाणावीं. परंतु 'तुह्मीं पानें वाढिलीं परंतु जेवणार कोठें आहेत'? 'एक जोडणार आणि पन्नास खाणार', 'मारणाराचा हात धरवेल परंतु बोलणाराचें तोंड धरितां येत नाहीं', इत्यादि वाक्यांत हीं **णार**प्रत्ययान्त नामें जाणावीं.

णारा–––सर्व धातूं वरून कर्त्रर्थी हा प्रत्यय होऊन बहुधा धातुसाधित विशेषणें होतात; जसें– **बोलणारा, हंसणारा, खाणारा, घेणारा, देणारा**, इ० विशेषणें होत. उ०– 'मांस खाणारीं माणसें', 'फिरणाऱ्या गाई', 'या गलबता वर चढणारे उतारू कोठे आहेत', इत्यादि

अनुक्रमणिका

वाक्यांत **णारा**प्रत्ययान्त जे शब्द तीं विशेषणें जाणावीं.

णी----- बहुतेक धातूं वरून—भाव, कर्म, करण, इत्याद्यर्थी हा प्रत्यय होऊन धातुसाधित नामें होतात; जसें—**करणी, पाहणी, राखणी, पेरणी, पुरवणी, लाटणी, लेखणी, चाळणी, लावणी, तासणी,** इ०.

णूक---- कित्येक धातूं वरून—भाव, कर्म, इत्याद्यर्थी हा प्रत्यय होऊन धातुसाधित नामें होतात; जसें—**आचणूक, वर्तणूक, नांदणूक, ठेवणूक, नेमणूक,** इ०.

णें------ सर्व धातूं वरून धात्वर्थसूचक हा प्रत्यय होतो; जसें—**बोलणें, हंसणें, बसणें, उठणें,** इ०. तसेंच भाव, कर्म, करण, इत्याद्यर्थीहि हा प्रत्यय होतो; जसें—**नाचणें, बोलणें, लिहिणें, खेळणें, बाधणें,** इ०.

त----- सर्व धातूं वरून हा प्रत्यय होऊन वर्तमानकालवाचक धातुसाधित अव्ययें होतात; जसें—**जात, नाचत, ठेवित, करित,** इ०.

पढधातूचा गण वर्जून **अ**कारान्त सकर्मक धातूंस हा प्रत्यय लागतांनां मध्यें **इ** आगम होतो; जसें—**करित, मारित, ठेवित.** (पाहा पृ० २४३, ले० ४९९.)

ता------ सर्व धातूं वरून कर्त्रर्थी हा प्रत्यय होऊन विशेषणें होतात; जसें—**रडता, हंसता, जाता, येता;** 'रडती पोरगी', 'क-

रता मनुष्य', 'रांगतें मूल', 'अडपती नाहीं सासू दडपता नाहीं भावा', इ०.

प्रयोजक धातू वरून हा प्रत्यय होत असतां मध्यें इ आगम होतो; जसें—**करविता, ठेवविता** इ०.

शाळुंकी ते कैशी बोले मंजुळवाणी
शिकविता धणी वेगळाची. तुकाराम.

तां------ अन्यक्रियासापेक्ष असतां सर्व धातूं वरून हा प्रत्यय होऊन धातुसाधित अव्यय होतें; (एथेंहि तप्रत्ययान्त धातुसाधिता प्रमाणें इ आगमाचा नियम जाणावा.) जसें—**जातां, येतां, घेतां, अंगीकारितां, देववितां,** इ०.

तांनां---- सर्व धातूं वरून तांप्रत्ययार्थी हाहि त्याच नियमानें प्रत्यय होतो; जसें—**खातांनां, जातांनां, सांगतांनां, भरवितांनां,** इ०.

या शिवाय आणखी कित्येक धातूं वरून पूर्वोक्त व इतर अर्थी असाधारण असे अनेक प्रत्यय होऊन अनेक शब्द सिद्ध होतात, त्यांची गणना एथें कोठवर करावी; परंतु ही जी एक दिशा दाखविली इज वरून बुद्धिमानांनीं धातू वरून शब्द कसकसे व्युत्पन्न होतात हें जाणावें.

भाग २.

शब्दसाधितें.

५४३ धातु अथवा क्रियापद यां व्यतिरिक्त जे शब्दांचे प्रकार त्यांस **शब्द** असें एथें संज्ञार्थ ह्मटलें आहे.

अनुक्रमणिका

५४४ या शब्दां वरून व्युत्पन्न झालेले जे शब्द तीं **शब्दसाधितें** ह्मणावीं. आतां हीं शब्दसाधितें अगणित आहेत, तितक्यांचे प्रकृतिप्रत्यय साधूं गेलें असतां अटापेनासा ग्रंथ होऊन इतक्या खटाटोपा पासून तादृश उपयोगहि होणार नाहीं. ह्मणोन काय जे मुख्य व व्यापक प्रत्यय तेच वर्णानुक्रमानें एथें लिहून दाखवितों.

आ----- पदार्थाचें स्थूलत्व दाखवायाचें असतां तद्वाचक शब्दां वरून हा प्रत्यय होतो; जसें-**विळा, पोळा, पानगा, भाकरा**, इ०.

आई----- कित्येक प्राकृत शब्दां वरून भावार्थी हा प्रत्यय होतो; जसें-**मोठाई, धिट्टाई**, इ०.

आळू---- हा मूळचा **आलु** संस्कृत प्रत्यय होय; परंतु प्राकृत शब्दां वरून याचें **आळू** असें रूपांतर होतें; झोंप, लाज, इ० शब्दां वरून 'तें ज्यास आहे, अ० अतिशय आहे' या अर्थी हा प्रत्यय होतो; जसें-**झोंपाळू, लाजाळू, कृपाळू, दयाळू**, इ०.

परंतु केवळ संस्कृत शब्दां वरून हा प्रत्यय नसाधितां मूळचा जो **आलु** प्रत्यय तोच योजावा हा उत्तम पक्ष; जसें-**दयालु, कृपालु, मायालु निद्रालु**, इ०.

ई------ 'तेथें जें उत्पन्न', अथवा 'त्याशीं ज्याचा संबंध', अथवा 'त्याणें अ० त्याचें जें केलेलें', अथवा 'तें ज्या जवळ अ० ज्यास आहे', अथवा 'त्यांत ज्याचें परिज्ञान आहे', इत्याद्यर्थी त्या त्या शब्दा वरून **ई** होतो,

परंतु हे शब्द अकारान्त असावे; जसें–**पैठणी, काश्मिरी, शहागडी, दौलताबादी:** –**सरकारी**;–**गुलाबी, साखरी, कागदी**:–**सुगंधी, धनी, लोभी**;–**शास्त्री, ज्योतिषी, व्याकरणी**, इ०.

भावार्थींहि हा प्रत्यय होतो; जसें–**गरिबी, मातबरी, दलाली, गुलामी, चाकरी**, इ०.

इक——— 'तत्संबंधी', 'तद्विषयक', अशा अर्थी हा प्रत्यय कित्येक संस्कृत शब्दां वरून होतो, परंतु त्या शब्दाच्या पहिल्या अक्षराच्या अंत्य वर्णास वृद्धि होत्ये; जसें–**मायिक, व्यावहारिक, प्रापंचिक**, ऐहिक, **आमुष्मिक**, इ०.

इत——— 'तेणेंकरून जें युक्त', अथवा 'तें ज्यास आहे', अशा अर्थी हा प्रत्यय संस्कृत शब्दां वरून होतो; जसें–**आनंदित, हर्षित, संतोषित**, दुःखित, **मोहित**, इ०.

इष्ठ——— 'तें ज्यास आहे' अशा अर्थी कित्येक संस्कृत शब्दां वरून हा प्रत्यय होतो; जसें–**कोपिष्ठ, रागिष्ठ, व्याधिष्ठ, बलिष्ठ**, इ०.

ईक---- कित्येक प्राकृत शब्दां वरून 'तें फार करणारा' अशा अर्थी हा प्रत्यय होतो; जसें–**खर्चीक**, इ०.

ईय---- संस्कृत शब्दां वरून योग्यार्थी हा प्रत्यय

होतो ; जसें—**दर्शनीय, प्रेषणीय, रक्ष-णीय, भक्षणीय,** इ०.

हा मूळचा संस्कृतांतील भविष्यकालवाचक आणि कर्त्रर्थवाचक **अनीयर्** प्रत्यय जाणावा. या खेरीज आणखी—**महेंद्रीय, वत्सीय, पर्वतीय,** इ०. 'तत्संबंधी' अशा अर्थीं प्रत्यय लागून जीं रूपें होतात, तीं मूळचीं संस्कृतांत छप्रत्ययान्त जाणावीं.

ईल----- शब्दयोगी अव्ययां वरून 'तत्प्रदेशसंबंधी' या अर्थीं हा प्रत्यय होऊन विशेषणें होतात ; जसें—**वरील, पुढील, मागील, तेथील,** इ०.

क------ 'करितो तो' अशा अर्थीं संस्कृत शब्दां वरून हा प्रत्यय होतो; जसें—**गुणक, बाधक, रोचक, मोहक,** इ०.

कर—— 'करितो तो' या अर्थीं हा प्रत्यय होतो; जसें—**खोडकर, विणकर,** इ०. 'त्या त्या गांवचा राहणारा' अशा अर्थीं ग्रामवाचक नामां वरून हा प्रत्यय होतो ; जसें—**पंढरपूरकर, काशिकर, पुणेकर, बडोदेकर,** इ०.

करी——— 'तो तो व्यापार करणारा', अथवा 'त्या त्या स्थळीं राहणारा', अशा अर्थीं कित्येक शब्दां वरून हा प्रत्यय होतो; जसें—**मारेकरी, भाडेकरी, साठेकरी, गांवढेकरी,** इ०.

अकारान्ता व्यतिरिक्त इतर शब्दां पुढें हा प्रत्यय होत असतां अंत्यस्वरास ए आदेश होतो.

की------ कित्येक शब्दां वरून 'भाव' अथवा 'धं-

दा’ या अर्थी हा प्रत्यय होतो ; जसें—पा-
टीलकी, सोनारकी, झारकी, इ०.

खोर----‘ती ती खोड अ० व्यसन ज्यास आहे’ अशा अर्थी त्या त्या शब्दां वरून हा प्रत्यय होतो; जसें—**दारूखोर, भांडखोर, कज्याखोर**, इ०.

हा मूळचा फारशी **खुर्दन** (खाणें) या धातू वरून व्युत्पन्न झालेला प्रत्यय होय; याचा अर्थ **खाणारा**.

गिरी---कित्येक शब्दां वरून भावार्थी हा प्रत्यय होतो; जसें—**गुलामगिरी, लुचेगिरी**, इ०.

चा ची चें. शब्दयोगी अव्यया वरून, आणि स्थलवाचक व कालवाचक क्रियाविशेषण अव्यया वरून हे प्रत्यय ‘तत्प्रदेशसंबंधी’, अथवा ‘तत्कालभूत’ अशा अर्थी लिंगवचन परत्वें होतात; जसें—**वरचा, खालचा, तेथचा, एथचा, परवांचे, आजची, उद्यांचें**, इ०.

आतां एथें अंगांगीभावसंबंध नसतां नामां वरून हे प्रत्यय होऊन जीं रूपें साधतात तींहि याच प्रमाणें विशेषणें होतात; जसें—**हातचा, मूळची, पोटचें, दोन वर्षांचा, पांच हातांचा**, इ०. परंतु या प्रकारचीं विशेषणें आणि षष्ठयन्त नामें यांचा भेद कोठे कोठे अर्था वरून जाणावा लागतो.

आणखी जेथें षष्ठी विभक्ति होऊन तिज वरून इतर विभक्तिप्रत्यय होतात, तेथेंहि ते षष्ठयन्त शब्द शब्दसाधितें मानावीं ; जसें **त्याच्या** पासून, **तुमच्यांत**, ‘**घरच्यांनीं** उपाशीं मरावें आणि **दारच्यांनीं** मौजा माराव्या’, इ०

स्थळीं, **त्याचा**, **तुमचे**, **घरचीं**, **दारचीं**, हीं शब्दसाधितें जाणावीं.

परंतु एथें शिकणारांनीं एक गोष्ट पक्केपणीं लक्षांत ठेवावी कीं, सर्वनामां वरून जेथें स्वार्थी अशीं रूपें होतात, तेथें त्यांस शब्दसाधितें मानूं नये.—**माझ्याहून**, **तुझ्याशीं**, **त्यांच्यांत**, इ० रूपें जेव्हां **मजहून**, **तुजशीं**, **त्यांत**, अशा अर्थी असतात, तेव्हां हीं त्या त्या सर्वनामाचीं त्या त्या विभक्तीचीं रूपें मानावीं. परंतु जेथें **माझ्याहून**, **तुझ्याशीं**, **त्यांच्यांत**, यांचा 'मदीय जो कोणी त्या हून', 'त्वदीय जो कोणी त्याशीं', 'तदीय जे कोणी त्यांच्या ठायीं', अशा अर्थाची विवक्षा असल्ये तेव्हां यांस शब्दसाधितें मानून त्यां वरून ती ती विभक्ति मानावी.

ट——— कित्येक प्राकृत शब्दां वरून ईषदर्थी हा प्रत्यय होऊन विशेषणें होतात; परंतु हा प्रत्यय होत असतां अंत्यस्वरास **अ** आदेश होतो; जसें–**पिंवळट**, **हिरवट**, **कडवट**, **खारट**, **मळकट**, इ०.

डा——— धंदा अथवा व्यवहार करणारे जे त्यांचे वाचक जे शब्द त्यां वरून कुत्सितार्थी हा प्रत्यय होतो; जसें–**झारडा**, **न्हावडा**, **सुतारडा**, **सोनारडा**, इ०.

भट आणि **शिंपी** यांचे कुत्सितार्थी **भटोरा**, **भटुरडा**, **शिंपुरडा**, असे शब्द होतात.

त्व----- संस्कृत शब्दां वरून भावार्थी हा प्रत्यय होतो; जसें–**ब्राह्मणत्व**, **गुरुत्व**, **लघुत्व**, **द्विजत्व**, **मनुष्यत्व**, इ०.

ता----- पूर्वोक्त अर्थी संस्कृत शब्दां वरून हाहि

प्रत्यय होतो; जसें—**लघुता**, **मधुरता**, **आम्लता**, **कटुता**, इ०.

दां——— 'अमुक वेळां' असा अर्थ विवक्षित असतां तत्तत्संख्यावाचकां वरून हा प्रत्यय होतो; जसें—**एकदां**, **दोनदां**, **शंभरदां**, इ०.

दार——— 'तें राखतो तो' या अर्थी कित्येक प्राकृत व फारशी शब्दां वरून हा प्रत्यय होतो; जसें—**चोबदार**, **पोतदार**, **दुकानदार**, **हवालदार**, इ०.

हा मूळचा **दाश्तन्** (राखणें) या फारशी धातू वरून व्युत्पन्न झालेला प्रत्यय होय; याचा अर्थ **राखणारा**.

नीस,नवीस— 'तें लिहिणारा' अथवा 'तो अधिकार चालविणारा, या अर्थी कित्येक शब्दां वरून हा प्रत्यय होतो; जसें—**चिटनीस** अ० **चिटनवीस**, **फडनीस** अ० **फडनवीस**, **पोतनीस** अ० **पोतनवीस** **दफ्तरनीस** अ० **दफ्तरनवीस**, इ०.

हा मूळचा **निविश्तन्** (लिहिणें) या फारशी धातू वरून व्युत्पन्न झालेला प्रत्यय होय; याचा अर्थ **लिहिणारा**.

पट——— संख्यावाचकां वरून गुणत्वार्थी हा प्रत्यय होऊन विशेषणें होतात; जसें—**एकपट**, **दुप्पट**, **तिपट**, **चौपट**, इ०. (पाहा पृ० १४७. ले० ३५९.)

पण—पणा— 'भावार्थी सर्व प्राकृत शब्दां वरून हा प्रत्यय होतो'; जसें—**बरेपण-णा**, **खरेपण-णा**, **माणूसपण-णा**, **बायकोपण-णा**, इ०.

मंत-मान्— 'तें ज्यांस आहे' या अर्थी संस्कृत शब्दां वरून त्या भाषेच्या नियमा प्रमाणें हे प्रत्यय होऊन विशेषणें होतात; यांत **मान्** हा शुद्ध संस्कृत प्रत्यय आणि त्याचाच प्राकृत **मंत**, जसें—**श्रीमंत, बुद्धिमंत, श्रीमान्, बुद्धिमान्,** इ०. संस्कृतांत स्त्रीलिंगी **मती** हा प्रत्यय होतो; जसें—**बुद्धिमती, श्रीमती,** इ०. परंतु प्राकृतांत बुद्धिमान् स्त्री असेंच म्हणतात.

या—— 'तें ज्यास आहे' असा अर्थ असून कुत्सितार्थाची विवक्षा असतां, अथवा 'तो नाद अ० व्यसन ज्यास आहे', अशा अर्थाची विवक्षा असतां, नामा वरून हा प्रत्यय होतो; जसें—**दम्या, खोकल्या, धाप्या, बायक्या,** इ०.

भांग्या याच्या इतर लिंगांचीं रूपें आकारान्त विशेषणाच्या रूपा प्रमाणें ईकारान्त आणि एकारान्त होतात; जसें—**भांग्या, भांगी, भांगे;** याच प्रमाणें—**धांदल्या, धांदली, धांदलें,** इ० आणखी शब्द जाणावे.

रा—— **लाज, खाज,** इ० कित्येक शब्दां वरून 'तें ज्यास अतिशय आहे' अशा अर्थी हा प्रत्यय होऊन साधित नामें व विशेषणें होतात; जसें—**लाजरा, खाजरा,** इ०.

ला—— स्थलवाचक क्रियाविशेषण अव्ययें व शब्दयोगी अव्ययें यां वरून 'तत्प्रदेशसं-

बंधी' या अर्थीं लिंगवचनपरत्वें हा प्रत्यय होऊन विशेषणें होतात, परंतु अंत्यस्वरास अ आदेश होतो ; जसें–**तेथला, एथला, जेथला, वरली, खालली, पुढलें, मागले**, इ०.

वट—— 'तत्संबंधी' या अर्थीं, अथवा 'ईषदर्थीं' कित्येक शब्दां वरून हा प्रत्यय होतो; जसें–**रानवट, भोळवट, कडवट**, इ०.

वंत–वान्– अकारान्त संस्कृत शब्दां पुढें **मंत** आणि **मान्** प्रत्यय लागत असतां **म**च्या स्थानीं **व** आदेश होतो, असा बहुधा नियम आहे ; जसें–**यशवंत, जयवंत, द्रव्यवान्, धर्मवान्**, इ०. स्त्रीलिंगीं संस्कृतांत **वती** हा प्रत्यय होतो ; जसें–**पुत्रवती, सौभाग्यवती**, इ०. यांत **वान्** हा संस्कृत आणि **वंत** हा प्राकृत प्रत्यय जाणावा.

वार——— फारशी शब्दां वरून 'तें ज्यांत आहे', अशा अर्थीं हा प्रत्यय होतो ; जसें–**सरफेवार, किफायतवार, बयादवार, तपसीलवार**, इ०.

वाणा—— स्वार्थीं, सादृश्यार्थीं, आणि कोठे 'ईषदर्थीं', कित्येक शब्दां वरून हा प्रत्यय होतो; तेव्हां **लाजरा**, इ० कित्येक शब्दांच्या उपांत्यास **इ** आदेश होतो; जसें–**गरीबवाणा, बापुडवाणा, लाजिरवाणा, गोजिरवाणा**, इ०.

वाला—— 'तें ज्यास आहे', अथवा 'त्याचा जो धंदा करितो', अशा अर्थी हा प्रत्यय होऊन शब्दसाधित नामें होतात ; जसें—**दुकानवाला, घरवाला, लेंकुरवाला, आंबेवाला, तेलवाला, भाजीवाला**, इ०.

सर—— कित्येक शब्दां वरून ईषदर्थी हा प्रत्यय होतो ; जसें—**काळसर, लालसर, भोळसर**, इ०.

सा—— बहुधा सर्व विशेषणां वरून अथवा नामां वरून ईषदर्थी व समानार्थी हा प्रत्यय होऊन विशेषणें होतात ; जसें—**लहानसा, पिंवळीशी, काळेंसें, ब्राह्मणसा, थोडेंसें**, इ०.

सा हा प्रत्यय **असा** याचें संक्षिप्त रूप होय; हा विशेष्याच्या लिंगवचनानुरूप होतो.

५४५ मराठींत कित्येक शब्दांशीं कित्येक शब्दांचा सामासिक योग होत असतां त्यांत उत्तर शब्दांच्या स्थानीं तत्तदर्थवाचक प्रत्यय होऊन एक जातीचे साधितशब्द सिद्ध होतात ; ते असे—

पाणी या शब्दाच्या स्थानीं 'त्याचें जें पाणी' या अर्थी कित्येक मराठी शब्दां वरून **वणी** हा प्रत्यय होऊन शब्दसाधितें सिद्ध होतात; जसें—**चिंचवणी, सोलवणी, ताकवणी, गुळवणी**, इ०.

तेल या शब्दाच्या स्थानीं 'त्याचें जें तेल' या अर्थी ज्या पदार्थांतून तेल निघतें अशा पदार्थांच्या वाचक मराठी शब्दां वरून (अंत्यस्वराच्या स्थानीं) **एल** हा प्रत्यय

होऊन कित्येक शब्दसाधितें सिद्ध होतात ; जसें–**धुपेल, तिळेल, खोबरेल, एरंडेल, मोगरेल,** इ०.

घाण या शब्दाच्या स्थानीं 'त्याची जी घाण' या अर्थीं कित्येक शब्दां वरून (अंत्यस्वराच्या स्थानीं) **आण** व कोठे कोठे मूळ शब्दास **ष्टाण** हे प्रत्यय होऊन शब्द-साधितें सिद्ध होतात ; जसें–**आंबटाण, करपटाण, कुज-टाण, तेलटाण, आंबष्टाण, तेलष्टाण,** इ०.

५४६ या शिवाय आणखी एकदेशीय असे अनेक प्र-कारचे प्रत्यय होऊन शब्दसिद्धी होत्ये ; जसें–**डोळस, कानपिशा, गांवठी, खोलगट, पाणचट, धुपट, पाणवठा, दिवटाण,** इ०.

५४७ 'त्या त्या क्रियेचें अथवा व्यापाराचें मोल अ० मजुरी' या अर्थीं **ण**प्रत्ययान्त अथवा **णें**प्रत्ययान्त धातुसाधित नामां वरून **आवळ** प्रत्यय होऊन साधितशब्द होतात ; जसें–**खाणावळ, दळणावळ, लिहिणावळ, घडणावळ,** इ०.

हा लेख धातुसाधितप्रकरणीं असावा.

५४८ कित्येक शब्दां वरून 'ती ती क्रिया करितो' या अर्थीं धातुसाधित प्रत्यय होऊन एक जातीचीं साधित नामें होतात ; जसें– **पोटभरू, भाडखाऊ, गरजकाढू, वाघमाऱ्या, भाजीविक्या, लांकूडतोड्या, कळलाव्या, मासरांध्या, धोतरबडव्या,** इ०.

५४९ या शिवाय आणखी मराठी मध्यें शब्दसाधि-तांचा मोठा भरणा संस्कृत शब्दां वरून संस्कृत प्रत्यय अथवा शब्द लागून होतो. या विषयीं जर यथाक्रम संपूर्ण व्याख्यान करूं लागलों तर बहुधा संस्कृत व्याकरणांतील सर्व तद्धितप्रकरण घेतलें पाहिजे ; यास्तव संक्षेपरूपें करून जितके व्यवहारप्रसिद्ध संस्कृत शब्द या भाषेंत मिश्र

अनुक्रमणिका

आहेत, अथवा केव्हां केव्हां प्रत्यय अथवा शब्द लावून साधावे लागतात, त्यांचेंच खालीं ग्रहण केलें आहे. 'तें ज्यास आहे', 'तेणेंकरून युक्त', अथवा 'तेणेंकरून पीडित', इत्याद्यर्थीं संस्कृत शब्दांशीं—**अन्वित, आकुल, आक्रांत, आतुर, आपन्न, आवह, आविष्ट, ग्रस्त, शाली,** हे शब्द जोडून शब्दसाधितें होतात; जसें—**क्रोधान्वित, भयाकुल, तृषाक्रांत, कामातुर, दुःखापन्न, सुखावह, लोभाविष्ट, रोगग्रस्त, भाग्यशाली, दैवशाली,** इ०.

गुण—गुणित—— सर्व संस्कृत संख्यावाचकां वरून आवृत्यर्थीं हा प्रत्यय होऊन विशेषणें होतात; जसें—**एकगुण-गुणित, द्विगुण-गुणित, त्रिगुण-गुणित, चतुर्गुण-गुणित,** इ०.

युक्त——— 'तेणेंकरून युक्त' अशा अर्थीं त्या त्या शब्दां पुढें हा शब्द लागून विशेषणें होतात; जसें—**गुणयुक्त, भययुक्त, संशययुक्त, शर्करायुक्त,** इ०.

रूप———— 'सादृश्यार्थीं' अथवा 'स्वार्थीं' कित्येक शब्दां पुढें हा शब्द लागून साधित विशेषणें होतात; जसें—**दोषरूप, संकटरूप, ब्रह्मरूप, भवरूप,** इ०.

अतिरिक्त—रहित—विरहित—व्यतिरिक्त—शून्य—हीन. तत्तदर्थाची व्यावृत्ति असतां त्या त्या शब्दांशीं या शब्दांचा योग होऊन विशेषणें व क्रियाविशेषणें होतात; जसें—**ज्ञानातिरिक्त, विद्यारहित, धर्मविरहित, कर्मव्यतिरिक्त, ज्ञानशून्य, बुद्धिहीन, मतिहीन,** इ०.

स–सहित– त्या त्या अर्थाचें साहचर्य विवक्षित असतां, अथवा 'तेणेंकरून युक्त' अथवा 'तें ज्यास आहे', अशा अर्थाची विवक्षा असतां, त्या त्या शब्दाच्या आरंभीं **स** या आगमाचा, अथवा त्याच्या शेवटीं **सहित** या शब्दाचा, योग होऊन विशेषणें अथवा क्रियाविशेषणें होतात; जसें– **सकुटुंब**, **साश्रित**, **सदय**, **साकार**, **साकांक्ष**, **अलंकारसहित**, **व्याजसहित**, इ०.

५५० आणखी संस्कृत शब्दां वरून भावार्थी **य** प्रत्यय होऊन भाववाचकें होतात, तेव्हां त्या त्या शब्दांतील प्रथम स्वरास वृद्धि होत्ये; जसें– मधूर–**माधुर्य**, सुंदर–**सौंदर्य**, कुरूप–**कौरूप्य**, ईश्वर–**ऐश्वर्य**, शीत–**शैत्य**, उदार–**औदार्य**, कृपण–**कार्पण्य**, दृढ–**दार्ढ्य**, एक–**ऐक्य**, चोर–**चौर्य**, गौण–**गौण्य**, इ०.

आणखी संस्कृत शब्दां वरून 'तत्संबंधी', 'त्याचें अपत्य अ० वंश्य', 'त्या पासून उत्पन्न झालेलें,' इत्याद्यनेकार्थी ते ते प्रत्यय होऊन ते ते शब्द सिद्ध होतात; जसें– अश्वसंबंधी जें तें–**आश्व**, अरण्यसंबंधी जें तें–**आरण्य**, शरीर–**शारीर**, इंद्र–**ऐंद्र**, इंद्रिय–**ऐंद्रियक**, विष्णु–**वैष्णव**, शिव–**शैव**, शूद्र–**शौद्र**, शुंडा–**शौंड**, गृहपति–**गार्हपत्य**, केशिक–**कैशिक**, केदार–**कैदार**, गो–**गव्य**, नौ–**नाव्य**; कुरूचा जो पुत्र तो–**कौरव**, मधु–**माधव**, गंगा–**गांगेय**, शंडिल–**शांडिल्य**, दिति–**दैत्य**, तित्तिरि–**तैत्तिरीय**, विनता–**वैनतेय**, द्रुपद–**द्रौपदी**, पुत्र–**पौत्र**, उत्स–**औत्स**, भृगु–**भार्गव**, पृथा–**पार्थ**, पृथु–**पार्थव**, पृथिवी–**पार्थिव**, केकय–

कैकर्यी, द्रोण–**द्रौणि**, व्यास–**वैयासिक**, व्याकरण–**वैयाकरण**, श्वापद–**शौवापद**, इ०.

या प्रमाणें शतावधि साधित नामें आणि विशेषणें संस्कृत व्याकरणाच्या नियमाप्रमाणें सिद्ध होतात, त्या सर्वांचा एथें विस्तार करवत नाहीं. तें सर्व यथास्थित समजायास त्या शास्त्राचें अध्ययन अपेक्षित आहे.

भाग ३.

सामासिकशब्दविचार.

५५१ **सामासिक** शब्द ह्मणजे दोन किंवा अधिक शब्द एकत्र जुळून त्यां पासून झाला जो एक शब्द तो; असें– **विटीदांडू, साखरभात, देवाज्ञा, चक्रपाणि**, इ०. आतां पाहा कीं **विटीदांडू** एथें **विटी** आणि **दांडू** हे दोन शब्द मिळून **विटीदांडू** हा एक शब्द झाला आहे. या प्रमाणें दुसरीं उदाहरणें जाणावीं.

५५२ यां मध्यें परस्परांचा जो संबंध त्यास **समास** ह्मणतात; असें–**साखरभात** याचा मध्यमपदलोपी समास होय.

५५३ हा समास करून दाखविण्याचा जो प्रकार त्यास **विग्रह** ह्मणतात; असें– पूर्व उदाहरणांत– 'साखरयुक्त जो भात' हा विग्रह, आणि मध्यमपदलोपी हा समास.

५५४ हे समास सात आहेत;– **द्वंद्व, तत्पुरुष, कर्मधारय, द्विगु, मध्यमपदलोपी, बहुव्रीहि**, आणि **अव्ययीभाव**, यांचीं लक्षणें उदाहरणां सुद्धां पृथक् पृथक् विभाग करून त्यांत दाखवितों.

अनुक्रमणिका

विभाग १.

द्वंद्व.

५५५ दोन अथवा अधिक शब्दांचा संयोग होऊन मधल्या **आणि** या अव्ययाचा ज्यांत लोप होतो त्यास **द्वंद्व** समास ह्मणतात; जसें—**विटीदांडू** ह्मणजे '**विटी** आणि **दांडू** तो', याच प्रमाणें **बहीणभावंडें**, **बापलेक**, **हातपाय**, **ब्रह्माविष्णुमहेश**, **ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र**, इ०. आणखी उदाहरणें.

५५६ यांत कधीं **आईबापें**, **दादलाबायलें**, असाहि एक प्रकार होतो, तेव्हां या शब्दांचें नपुंसक लिंग आणि अनेकवचन असतें.

५५७ मराठी भाषेंत एक आणखी द्वंद्वाचा प्रकार होतो, तो असा कीं, दोन शब्द जोडले असतां त्यां पासून तदंतर्गत आणखी तत्साधर्म्यवाचक अशा पुष्कळ शब्दांचा संग्रह होतो; यास **समहारद्वंद्व** ह्मणावें; जसें— **हातपाय** ह्मटलें ह्मणजे केवळ **हात** आणि **पाय** या दोन अवयवांचेंच ग्रहण होतें असें नाहीं, परंतु येणेंकरून इतर अवयवांचाहि संग्रह होतो. अशीं समाहारद्वंद्वघटित नामें या भाषेंत पुष्कळ आहेत, त्यांतून कांहीं सांगतों;— **भाजीपाला**, **कोळीमाळी**, **शेटसावकार**, **पानपत्रावळ**, **घरदार**, **देवब्राह्मण**, **शेतमळा**, **फंदफितूर**, **दिवानदरबार**, **मीठभाकर**, इ०.

[अ] पूर्व शब्दाचा अनुकरणवाचक आणखी एक शब्द कल्पून त्यास त्या शब्दाशीं जोडिलें असतां आणखी एक प्रकारचा समाहारद्वंद होतो; जसें— **भाकरीबिकरी**, **धोंडागिंडा**, **दगडगिगड**, **वाईटसाईट**, **लहानसहान**, इ०.

याचा आणखी एक सामान्य नियम असा आहे कीं कोणत्याहि शब्दाच्या आद्याक्षराच्या स्थानीं **बि** किंवा क्वचित् **गि** आदेश करून जो अनुकरणवाचक शब्द होतो त्याचा त्या शब्दा पुढें योग केला असतांहि या प्रकारचे सामासिक शब्द होतात; जसें– **घोडाबिडा, घरबीर,*** **कागदबिगद, लेखणीबिखणी, दगडगिगड, तंटाबिंटा,** इ०. असे शब्द क्वचित् स्वार्थींहि होतात; जसें– **लेखणीबिखणी**, ह्मणजे लेखणी हाच अर्थ.

५५८ कित्येक द्वंद्वसमासघटित शब्दांमध्यें शब्दांची पूर्वापर योजना नियमित असत्ये; जो बहुमानार्थी दुसऱ्या पेक्षां अधिक मान्य तद्वाचक शब्दाची योजना प्रथम करावी लागत्ये; जसें– **आईबाप** या द्वंद्वसमासघटित शब्दांत **आई** शब्दाची योजना पूर्वी आणि **बाप** शब्दाची योजना मागून असें बहुधा असतें; **बापआई** ह्मणायाची रूढि नाहीं. तसेंच–**बहीणभाऊ, दादलाबायको, रामलक्ष्मण, ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र,** इ०.

विभाग २.

तत्पुरुष.

५५९ **तत्पुरुष**–ह्मणजे उत्तर शब्द मुख्य असून पूर्व शब्दाशीं त्याचा संबंध असतो, अथवा पूर्व शब्दाचा विभक्तिसंबंध उत्तर शब्दाशीं असून त्या विभक्तीचा ज्यांत लोप होतो तो; ह्मणूनच–**द्वितीयातत्पुरुष, तृतीयातत्पुरुष,** इ०

---

* **घरबीर** एथें उपांत्यास जें दीर्घत्व झालें आहे त्याज विषयींचा नियम पुढें येईल.

द्वितीये पासून जितक्या विभक्ति तितके बहुधा या समासाचे प्रकार होतात.

[अ] जेथें द्वितीयेचा लोप होतो तेथें त्यास **द्वितीयातत्पुरुष** ह्मणतात; जसें—**द्विजदंड**, ह्मणजे द्विजास अ० द्विजा प्रत जो दंड तो, तसेंच—**विप्रताडण**, **आर्तविमोचन**, **परपीडा**, इ०.

[आ] जेथें तृतीयेचा लोप होतो तेथें त्यास **तृतीयातत्पुरुष** ह्मणतात; जसें— **कृपावलोकन**, ह्मणजे कृपेनें, अथवा कृपेंकरून, जें अवलोकन तें, तसेंच—**दयार्द्र**, **भक्तिवश्य**, **द्रव्यसाध्य**, इ०.

[इ] जेथें चतुर्थीचा लोप होतो तेथें त्यास **चतुर्थीतत्पुरुष** ह्मणतात; जसें— **कृष्णार्पण**, ह्मणजे कृष्णा कारणें जें अर्पण तें, तसेंच— **यज्ञस्तंभ**, **पूजाद्रव्य**, **बाजारवाडा**, **पोळपाट**, **जांवईआग्रह**, इ०.

[ई] जेथें पंचमीचा लोप होतो तेथें त्यास **पंचमीतत्पुरुष** ह्मणतात; जसें—**पापविमोचन**, ह्मणजे 'पापा पासून जें विमोचन तें', तसेंच—**स्वर्गपतन**, **भवतारण**, इ०.

[उ] जेथें षष्ठीचा लोप होतो तेथें त्यास **षष्ठीतत्पुरुष** ह्मणतात; जसें—**केळफूल**, ह्मणजे 'केळीचें जें फूल तें', तसेंच—**पिंपळपान**, **राजदरबार**, **देवभक्ति**, इ०.

[ऊ] जेथें सप्तमीचा लोप होतो तेथें त्यास **सप्तमीतत्पुरुष** ह्मणतात; जसें—**स्वर्गवास**, ह्मणजे 'स्वर्गांत अथवा स्वर्गाच्या ठायीं जो वास तो', तसेंच— **गृहप्रवेश**, **कर्मकुशल**, **शास्त्रनिपुण**, **शिल्पपाटव**, इ०.

[ऋ] मराठी मध्यें आणखी एक तत्पुरुषसमासघटित शब्दांचा मोठा भरगा आहे, तो असा कीं ज्यांत पूर्वशब्द

पुढल्या धातुसाधिताशीं कर्मकरणसंप्रदानादिकारकसंबंधानें संयुक्त असतो; जसें—**आगलाव्या**, ह्मणजे 'आगीतें लावणारा', यांत **आग** हें पुढल्या **लाव्या** या धातुसाधिताचें कर्म होय; **घृतपक्व**, ह्मणजे 'घृतानें जें पक्व तें', यांत **घृत** हें **पक्व** या धातुसाधिताचें करण होय; याच प्रमाणें—**कंबरमोड्या, पायमळ्या, मानमोड्या, मासखाऊ, व्याजखाऊ**, इ०.

५६० प्रौढ भाषणांत अथवा लेखनांत जेव्हां सर्वनामांशीं इतर संस्कृत शब्दांचा समास करण्याचा प्रसंग येतो, तेव्हां तीं सर्वनामें संस्कृत योजावीं लागतात; नंतर तीं संधीच्या नियमां प्रमाणें पुढल्या शब्दांशीं जुळतात. तें असें—

मराठी स०.	**संस्कृत स०.**	**उदाहरणें.**
मीं	मत्	मत्कार्य, मदुद्धरण, मज्जन्म, मट्टीका, मत्तात, मन्मन, मच्छास्त्र, इ०.
तूं	त्वत्	त्वत्सौंदर्य, त्वल्लीला, त्वद्गुण, इ०.
तो, ती, तें, ते, त्या, तीं,	तत्	तच्चरित्र, तद्गौरव, तच्छाखा, तद्रूप, इ०.
आह्मीं	अस्मत्	अस्मद्भाग्य, अस्मदपराध, अस्मच्छक्ति, इ०.
तुह्मीं	युष्मत्	युष्मत्कीर्ति, युष्मदौदार्य, युष्मन्नाम, इ०.
हा, ही, हें, हे, या, हीं.	एतत्	एतद्देशीय, एतन्मात्र, एतच्छाखीय, इ०.

अनुक्रमणिका

५६१ संस्कृत नियमां प्रमाणें नामास **इन्** प्रत्यय लागून जे **ईकारान्त** शब्द होतात त्यांशीं इतर शब्दांचा संयोग होऊन जर विग्रह होत असला तर संस्कृत भाषेच्या नियमा प्रमाणें त्या ईकारास ऱ्हस्व होतो; जसें— **हस्तिदंत, प्राणिमत्सर,** इ०. एथें मूळचे **हस्ती** आणि **प्राणी** शब्द होत.

विभाग ३.

कर्मधारय.

५६२ **कर्मधारय** ह्मणजे वक्त्याच्या मनांत उभय शब्दांचा भाव ज्यांत समान असतो, किंवा उभय शब्दांचा परस्पर उपमानोपमेयभावसंबंध ज्यांत असतो, असा जो समास तो होय; अथवा, विशेष्यविशेषणांचें सान्निध्य असून त्यांचा जो समास घडतो तो होय; जसें—**भक्तिमार्ग** याचा विग्रह 'भक्ति तोच मार्ग, किंवा भक्तिरूप जो मार्ग तो,' तसेंच—**भवसागर, संसाराटवि, नीलोत्पल, काळपुरुष, ब्रह्मराक्षस, तांबडमाती, काळमांजर,** इ०.

५६३ शरीरादिसंबंधवाचक जे शब्द ते कर्मधारयसमासघटित शब्दांत विशेषणरूप उपपद होत असतां जे त्यांस विकार होतात ते उदाहरणां सुद्धां सांगतों.

शब्द.	विकार.	उदाहरणें.
चुलता	चुलत	चुलतभाऊ, चुलतबहीण, चुलतसासू, चुलतचुलता.
मामा	मामे	मामेभाऊ, मामेबहीण, मामेसासू, मामेसासरा.

शब्द.	विकार.	उदाहरणें.
मावशी	माऊस	माऊसभाऊ, माऊसबहीण, माऊससासू, माऊससासरा.
आत	आते	आतेभाऊ, आतेबहीण, आतेसासू, आतेसासरा, आतेगौरव, आतेचीर.
आजा	आजे	आजेसासरा, आजेसासू, आजेचीर, आजेगुरू.
नातू–नात	नात	नातजांवई, नातसून.
भाचा–भाची	भाचे अ० भाच	भाचेजांवई, भाचेसून, अ० भाचसून.

विभाग ४.

द्विगु.

५६४ संख्यावाचक पूर्वपद असतां पूर्वोत्तर पदांचा जेथें समास होतो, आणि हा समास बहुधा समाहारार्थी असतो, त्यास **द्विगुसमास** ह्मणतात; जसें–**पंचपाळें**, ह्मणजे पांचा पाळ्यांचा समूह', **पंचारती**, **पंचखाजें**, **बारभाई**, **अठराबाबू**, **चतुर्युग**, **अष्टाध्यायी**, इ०.

विभाग ५.

मध्यमपदलोपी.

५६५ **मध्यमपदलोपी**, ह्मणजे दोन शब्दांच्या मधल्या पदाचा ज्यांत लोप होऊन त्यांचा समास होतो त्यास

ह्मणतात; जसें—**साखरभात.** (याचा विग्रह पूर्वी करून दाखविला आहे.) तसेंच— **कर्वतकीस, लांकूडकाम, कातरविडा, घरजांवई,** इ०.

विभाग ६.

बहुव्रीहि.

५६६ जेणेंकरून दोन शब्दांचा संयोग असतां त्याजवरून तिसऱ्या पदार्थाची उपलब्धि होत्ये त्यास **बहुव्रीहि** समास ह्मणतात; जसें **चक्रपाणि,** याचा विग्रह— 'चक्र आहे पाणीच्या ठायीं ह्मणजे हस्तीं ज्याच्या तो'— विष्णु; याच प्रमाणें— **चतुर्भुज, शशिशेखर, मृगनयना,** इ०. हे बहुव्रीहिसमासघटित शब्द बहुधा विशेषणें असतात.

कोणी—**एकडोळ्या, बाबरओंठ्या, उंचमान्या, घोडतोंड्या,** इत्यादि शब्दांचा—'एक आहे डोळा ज्याचा तो' एकडोळ्या, असा विग्रह करून यांस बहुव्रीहिसमासघटित शब्द मानितात; परंतु मला हें प्रशस्त दिसत नाहीं; कारण या बहुव्रीहि समासाचें जें लक्षण कीं—दोन शब्दांचा संयोग असतां त्याजवरून तिसऱ्या पदार्थाची उपलब्धि होत्ये,—त्याची पूर्णपर्याप्ति होत नाहीं. हीं केवळ शब्दसाधितें होत;—**एकडोळा** ज्यास आहे तो **एकडोळ्या, घोडतोंड** ज्यास आहे तो **घोडतोंड्या,** इ०. पाहा पृ० २७२, **या**—.

५६७ जर उत्तरपद आकारान्त स्त्रीलिंग आहे, आणि त्याचा पूर्वपदाशीं बहुव्रीहि समास होऊन तें सारें पद पुल्लिंग शब्दाचें विशेषण होतें, तर संस्कृत नियमा प्रमाणें तें आकारान्तपद अकारान्त होतें, जसें— **लक्ष्मीभार्य, गौरीकांत,** इ०.

एथें 'लक्ष्मी आहे भार्या ज्याची तो', **लक्ष्मीभार्य,** 'गौरी आहे कांता ज्याची तो', **गौरीकांत,** असा विग्रह जाणावा.

विभाग ७.

अव्ययीभाव.

५६८ वर जे समास सांगितले त्यां शिवाय आणखी बहुतेक विद्वान् मराठी भाषेंत नामां पुढें शब्दयोगी अव्यय असतां त्याचा संस्कृता प्रमाणें अव्ययीभाव समास मानितात; जसें—**झाडावर**, झाडाच्या वर-**झाडावर**, असा **वर** या शब्दयोगी अव्ययाचा झाडाशीं समास करून **झाडावर** एथें अव्ययीभाव मानितात; परंतु माझ्या विचारास हें ठीक दिसत नाहीं. संस्कृता प्रमाणें मराठी भाषेंत हा समास अशा स्थळीं संभवत नाहीं; संस्कृतांत उपसर्ग पूर्वी येऊन त्यांशीं ज्या शब्दाचा योग असतो त्यास नपुंसकत्व होऊन अकारान्तांस पुढें **अम्** होतो; आणि तें सर्व पद क्रियाविशेषण असतें; जसें--'स**उपगंग**प्राप्तः' ह्मणजे, 'तो गंगे जवळ आला,' यांत **उपगंगं** एथें संकृत वैयाकरण अव्ययीभाव समास मानितात हें योग्यच आहे; कांकीं प्रथम तर त्या भाषेंत **उप** हा उपसर्ग पहिला येऊन त्याचा 'गंगायाः समीपं--उपगंगं', असा विग्रह होऊन तें सर्व विकृतरूप क्रियेचें विशेषण होतें. तेव्हां अशा ठिकाणीं त्यांस हा समास मानिल्या शिवाय गत्यंतर नाहीं. परंतु **गंगेजवळ** यांत कांहीं तसें विलक्षण रूप नाहीं, अथवा तशी आडचणहि नाहीं; **गंगे** हें **जवळ** या शब्दयोगी अव्ययाच्या योगानें **गंगा** शब्दाचें सामान्यरूप झालें आहे, कांकीं शब्दयोगी अव्यय आणि विकृत विशेष्य यांच्या योगानें नाम सर्वनाम आणि विशेषण यांचें सामान्यरूप होत असतें हा नियम मराठी भाषेंत सर्वव्यापक आहे. तेव्हां या नियमास नअनुसरतां जर **गंगेजवळ**, **घरावर**, **वाड्यास**-

मोर, इ० पदांचा अव्ययीभाव समास मानिला तर या सर्व पदास क्रियाविशेषण अव्यय मानिलेंच पाहिजे; कारण हीं जीं अव्ययीभावसमासघटित पदें होतात त्यांस अव्ययें मानणें आवश्यक आहे, दुसरा निर्वाह नाहीं; तेव्हां **घरावर**, **गंगेजवळ**, **परमदैदिप्यमानविमानारूढदेवासह**, या सर्व पदांस अव्यय मानणें मला केवळ अप्रशस्त वाटतें. ज्यांस असें वाटत नसेल त्यांहीं इष्ट असल्यास हीं अव्ययें मानावीं.

५६९ परंतु मराठी मध्यें **दर**, **हर**, **प्रति**, इ० कित्येक उपसर्गांचा नामांशीं अनुयोग असतां जर तन्निमित्त त्या नामांस अव्ययत्व प्राप्त होऊन तें सारें पद अव्ययरूप होत असलें तर तेथें **अव्ययीभाव** समास मानिला असतां संभावनीय होय; उदाह०— **दरमजल**, **दरदिवस**, **हरघडी**, **हरवक्त**, **प्रतिरात्र**, **प्रतिवर्ष**, इ०. 'सरकार शिपायांस दरमजल अ० दरदिवस दोन आणे भातें देतें', इत्यादि वाक्यांत—**दरमजल**, **दरदिवस**, इ० शब्दांत अव्ययीभाव समासाची उपलब्धि होऊन तीं सारीं क्रियाविशेषण अव्ययें होतात असें माझें मत आहे.

विभाग ८.

समासां विषयीं स्फुट विचार.

५७० मराठी भाषेंत जर सामासिक नामांचें पूर्वपद अकारवर्जितस्वरान्त असलें तर त्यास अकारादेश किंवा एकारादेश होतो; जसें-- **जितकोळसा**, **काळसांवळा**, **तोंडलेभात**, **घोडेराऊत**, **घोडेमात**, इ०.

५७१ एका सामासिक शब्दाचे दोन तीनहि समास होतात; परंतु त्यांतून कोणता समास ग्राह्य हें अर्थानुसंधाना वरून समजावें; जसें-- 'त्या राजाचा **सत्यव्रताचा** नियम मोठा आहे', ह्मणजे—'सत्यरूप जें व्रत' त्याचा नियम, असा कर्मधारय समास होतो; आणि 'तो राजा मोठा **सत्यव्रत** होता', ह्मणजे—'सत्य आहे व्रत ज्याचें' असा होता, एथें बहुव्रीहि समास होतो; 'तो राजा **सत्यव्रत** पाळण्याविषयीं मोठा दक्ष आहे', या वाक्यांत 'सत्याचें जें व्रत तें' असा षष्ठीतत्पुरूष, अथवा 'सत्य पाळण्या विषयीं आणि व्रत पाळण्या विषयीं' दक्ष असा द्वंद्व समासहि संभवतो.

व्याकरण पदच्छेदकरितें समयीं अशी अडचण फार येत असत्ये; एकादे समयीं दोन तीन प्रकारचे विग्रह केले तरीं ते सर्व अर्थास अनुकूल असतात, अशा प्रसंगीं ज्यास जो नीट दिसेल, व ज्याची जशी अर्थाविषयीं रुचि असेल, तदनुरूप त्याणें तो समास मानावा. हीं व्याकरणांत निरंतर वादाचीं स्थलें असतात.

संस्कृतकाव्यांत, व प्राकृतहि मोरोपंतवामनादिकृत जीं मोठमोठीं काव्यें त्यांत, बहुधा अनेक शब्द अनेक प्रकारच्या समासांनींयुक्त होत्साते तें सर्व पद सामासिक असतें, व असें सामासिक पद इतर शब्दांचें विशेषणहि असतें; उदाह०—'त्या कालीं श्रीमद्रघुवंशभूषणकोदंडपाणि राम भ्रातृशुश्रूषैकनिष्ठ लक्ष्मणा सह पंपासरतटीं आगमन करिता झाला', या वाक्यांत—**श्रीमत्**, आणि 'रघूचा जो वंश तो' **रघुवंश** (षष्ठीतत्पुरुष), 'रघुवंशाचें जें भूषण तें' **रघुवंशभूषण** (षष्ठीतत्पुरुष), अथवा, 'रघुवंशास आहे भूषण ज्याणें करून' असा बहुव्रीहि समास करून—**रघुवंशभूषण**, आणि 'कोदंड आहे पाणीच्या ठायीं ह्मणजे हस्तीं ज्याच्या' तो—**कोदंडपाणि** (बहुव्रीहि), या तिन्ही विशेषणांचा

पुनः द्वंद्व समास करून तें सारें **राम** याचें विशेषण करावें. यांत एक द्वंद्व, दोन तत्पुरुष, आणि एक बहुव्रीहि असे समास आहेत. तसेंच 'भ्रात्याची जी शुश्रूषा ती' **भ्रातृशुश्रूषा** (षष्ठीतत्पुरुष), 'एक अशी जी निष्ठा ती' **एकनिष्ठा** (कर्मधारय), 'भ्रातृशुश्रूषा आहे एकनिष्ठा ज्याची तो' **भ्रातृशुश्रूषैकनिष्ठ** असा शेवटीं बहुव्रीहि समास करून तें सर्व पद लक्ष्मणाचें विशेषण करावें.

५७२ 'त्याचा अभाव', 'त्या पासून भिन्न', अथवा 'तदभावविशिष्ट', असा अर्थ विवक्षित असतां संस्कृत शब्दांच्या मागें **अ** या वर्णाचा योग होऊन जो एक प्रकारचा समास होतो, त्यास संस्कृत व्याकरणांत **नञ्समास** ह्मणतात; उदाह०–नव्हे जो ब्राह्मण, अथवा ब्राह्मणा पासून जो भिन्न तो–**अब्राह्मण,** ज्ञानाचा जो अभाव तें–**अज्ञान,** अथवा ज्ञानाभावविशिष्ट जो तो–**अज्ञान.**

शब्दाचा प्रथम वर्ण जर स्वर असला तर हा **अ**वर्ण आणि पुढला शब्द यां मध्यें **न्** विकरण होतें; जसें-- अ+आदर=**अनादर**, अ+ईश्वरवादी=**अनीश्वरवादी,** अ+उपपत्ति=**अनुपपत्ति,** अ+एक=**अनेक,** इ०.

खंड ५.

कारकविचार.

५७३ क्रियेच्या अन्वयें जो विभक्तीचा अर्थ त्यास **कारक** असें ह्मणतात. हीं कारकें सहा आहेत;–**कर्त्ता,** **कर्म**, **करण**, **संप्रदान**, **अपादान** आणि **अधिकरण.**

अनुक्रमणिका

भाग १.

प्रथमा.

५७४ ही विभक्ति कोणत्याहि शब्दास असतां क्रियेच्या अन्वयें तिचे मराठी भाषेंत दोन अर्थ असतात;—**कर्त्ता** आणि **कर्म.**

[**अ**] प्रथमाविभक्त्यंत जितके शब्द तितक्यांतून कित्येकांच्या ठायीं क्रियाजनकत्वधर्म संभवतो, ह्मणजे ज्यां पासून क्रिया उत्पन्न होत्ये, असा अर्थ असतो, तेव्हां त्यांस त्या क्रियांचे कर्त्ते ह्मणावें; जसें—'**रामा मारितो**', यांत **मारितो** या क्रियेचा उत्पन्न कर्त्ता रामा, ह्मणजे रामा पासून ही क्रिया उत्पन्न होत्ये असा अर्थ, ह्मणोन **रामा** हा प्रथमान्त शब्द **मारितो** या क्रियेचा कर्ता होय; सांगायास तात्पर्य कोणत्याहि क्रियेचें कर्तृत्व प्रथमाविभक्त्यन्त अथवा तृतीयाविभक्त्यन्त* शब्दा वर असतें, मग ती क्रिया स्पष्ट त्या वाक्यांत उक्त असो, अथवा अध्याहृत असो; जसें— '**सूर्य उगवतो**', या वाक्यांत **सूर्य** ही प्रथमा विभक्ति होय, आणि **उगवतो** या क्रियेचा कर्त्ता होय; तसेंच 'काय चांगला मुलगा', यांत **मुलगा** हें प्रथमान्त नाम, **आहे** इत्यादि अध्याहृत क्रियेचा कर्ता होय.

[**आ**] अथवा, ज्या वर एकाद्या क्रियेचा व्यापार घडतो, असा ज्याच्या विभक्तीचा त्या क्रियेशीं संबंध असतो, आणि ज्यास त्या क्रियेचें **कर्म** असें ह्मणतात, अशा अर्थाचे दर्शक-

---

* हा भेद पुढें वाक्यरचनेंत कर्तृक्रियासंबंधा विषयीं जे नियम दाखविले आहेत यांत स्पष्ट केला आहे.

हि कित्येक शब्द प्रथमान्त असतात ; जसें–'**पारधी वाघ मारितो**', यांत **मारणें** या क्रियेचा व्यापार पारध्या पासून उत्पन्न होऊन वाघा वर घडतो, ह्मणोन **वाघ** ही जी प्रथमा विभक्ति आहे तिचा अर्थ **कर्म** जाणावें.

क्रियाजनकत्वधर्माचा संभव नसतां केवळ त्या त्या क्रियेचा व्यापार ज्या पदार्था वर होतो तद्वाचक जो प्रथमान्त शब्द तो त्या क्रियेचें कर्म जाणावें ; जसें—पूर्व उदाहरणांत **पारधी** हें प्रथमान्त नाम कर्त्ता, आणि **वाघ** हें प्रथमान्त नाम कर्म होय. हा प्रथमा विभक्तीचा कर्तृकर्मरूपभेद केवळ अर्था व-रून जाणावा.

[इ] जर वाक्या मध्यें एक कर्त्ता आहे, आणि दुसरे तत्पर्यायवाचक शब्द प्रथमान्त आहेत, तर क्रियाजनकत्व ज्याच्या ठायीं संभवतें, त्यास कर्त्ता मानून वरकड प्रथमा-विभक्तींचाहि कर्त्रर्थ मानावा, परंतु त्यांत जर एकाद्या अर्थाचें विधान आहे तर त्या विधेयार्थवाचक शब्दाच्या प्रथमेस **विधानार्थी** अथवा **विधेयार्थी** प्रथमा मानावी ; आणि त्या विधेयाचें जें उद्देश्य असेल त्याची तत्संबंधानें **उद्देश्यार्थी** प्रथमा मानावी ; उदाह०-- 'तो गृहस्थ ब्राह्मण आहे', एथें **गृहस्थ** हा **आहे** या क्रियेचा कर्त्ता होय, **तो** या पर्यायवाचक शब्दाचीहि प्रथमा कर्तरि होय, परंतु एथें गृहस्थास उद्देशून ब्राह्मणत्वाचें विधान आहे, ह्मणोन **ब्राह्मण** ही **विधानार्थी** अथवा **विधेयार्थी** प्रथमा ह्मणावी, आणि **गृहस्थ** ही **उद्देश्यार्थी** प्रथमा ह्मणावी.

[ई] या शिवाय आणखी जेथें कोणत्याहि द्रव्याच्या परिमाणाचें विधान असतें तेथें परिमाणवाचक शब्दा वरून जी प्रथमा होये ती **परिमाणार्थी** प्रथमा जाणावी ; जसें—

एक पायली मीठ, दोन तोळे सोनें, पांच चाहूर जमीन, पन्नास हात पागोटें; इ०. यांत—**पायली**, **तोळे**, **चाहूर**, **हात**, या शब्दांची परिमाणार्थी प्रथमा जाणावी.

भाग २.

द्वितीया.

५७५ पूर्वोक्त कर्मरूप अर्थ द्वितीयेच्या ठायींहि संभवतो; जसें-- 'पारधी सशास पळवितो', एथें **सशास** या द्वितीयेचा अर्थ कर्म होय ; तसेंच--'बाप मुलांस पोशितो', 'आई मुलीस सासरीं पाठवित्ये', 'कावळे कबुतरांस चोंचितात'; या वाक्यांत जितकीं द्वितीयान्त नामें तितकीं सारीं कर्मे होत. कर्मार्थव्यतिरिक्त इतर अर्थ संभवत असतां ती चतुर्थी मानावी. पाहा, पृ० ६१, ले० १७६, टीप.

भाग ३.

तृतीया.

५७६ तृतीयेचे मुख्य अर्थ पांच आहेत;– **कर्त्ता**, **करण**, **हेतु**, **अंगविकार**, आणि **साहित्य**.

[अ] **कर्ता**– पूर्वोक्त कर्त्रर्थी तृतीया होत्ये ; उदाह०– 'गोपाळानें गाय बांधिली', 'विनायकानें आपली पोथी लिहिली', इ०. एथें **गोपाळानें**, **विनायकानें**, हे तृतीयान्त शब्द अनुक्रमेंकरून **बांधिली**, **लिहिली**, या क्रियापदांचे कर्ते होत.

[आ] **करण**—कोणतीहि क्रिया करावयास जें साधन त्यास त्या क्रियेच्या अन्वयें **करण** असें ह्मणतात ; जसें–

'**रामानें बाणानें रावण मारिला**', यांत **मारणें** या क्रियेचें साधन **बाण** आहे, असा अर्थ **बाणानें** या तृतीयान्त शब्दानें दर्शविला ह्मणोन **बाणानें** ही करणी तृतीया होय. तसेंच–'गोपाळानें दांव्यानें गाय बांधिली', 'विनायकानें लेखणीनें पोथी लिहिली', 'भक्तीनें ईश्वर प्राप्त होतो', 'द्रव्यानें सर्व मिळतें', इ०.

[इ] **हेतु**–कोणतीहि क्रिया व्हावयास अथवा करावयास जें निमित्त अथवा कारण असतें, तद्वाचक जे शब्द त्यां वरून तृतीया होत्ये ; उदाह०–'पैक्यानें महाग', 'वयानें वडील', 'तो गांव दुकाळानें ओस पडला', 'तुह्मी आल्यानें माझें कार्य झालें'; इ०. यांत **पैक्यानें**, **वयानें**, **दुकाळानें**, **आल्यानें**, इ० हेत्वर्थीं तृतीया होत.

[ई] **अंगविकार**–कोठे अंगविकाराची विवक्षा असतां विकृतांगवाचक शब्दां वरूनहि तृतीया होत्ये; ईस **अंगविकारी** तृतीया ह्मणतात; उदाह०–'अंगानें पुष्ट','पायानें लंगडा', 'मुखानें जड', 'रंगानें गोरा', 'डोळ्यांनीं आंधळा', इ०.

[उ] **साहित्य**–कर्ता कोणतीहि क्रिया करित असतां त्याच्या साहचर्यानें राहणारा जो पदार्थ तद्वाचक शब्दा वरून तृतीया होत्ये; उदाह०–'भिकंभट एका अंगवस्त्रानें आले', यांत **अंगवस्त्रानें** ह्मणजे अंगवस्त्रा सहित. तसेंच–'अशा मळक्या पागोट्यानें तूं तेथें जाऊं नको', 'त्या काळीं बारा हजार स्वारांनीं शिवाजी मुसलमानां वर पडला', इ०. यांत– **अंगवस्त्रानें**, **पागोट्यानें**, **स्वारांनीं**, इ० साहित्यार्थीं तृतीया होत.

[ऊ] तृतीयेचा अर्थ **कर्त्ता** आणि **करण** असतां बहुधा **नें**, **एँ**, हे प्रत्यय होतात, आणि **सन्निधान** अ० **बरोबरी**

असा अर्थ असतां **शीं** प्रत्यय होतो, असा बहुधा या भाषेंत नियम आढळतो. 'पारध्यानें बंदुकीनें वाघ मारिला', 'या उंदरास त्याणें सांपळ्यानें धरिलें', 'रामेंदिलेंतिसउपद्रवको-णदेता', या उदाहरणांत तृतीयेचा अर्थ कर्त्ता आणि करण होय. 'त्याणें त्यांशीं मारामारी केली', 'तूं मजशीं कांहीं बोलूं नको', एथें **त्यांशीं, मजशीं**, या तृतीयेनें **सान्नि-धान संघट्टन**, अशा अर्थांची उपलब्धि होते.

कोठें **करण** अर्थ असतांहि **शीं** या प्रत्ययाचा प्रयोग करितात; जसें–'त्याणें चोरास काठीशीं मारिलें,' 'इंग्रेज लोक तरवारीशीं लढत नाहींत', इ०. परंतु असा प्रयोग बहुधा मुंबई प्रांतीं आढळतो, अशा ठिकाणीं **नें** याचा प्रयोग करणें हाच उत्तम पक्ष.

कोठें **करण** अथवा **साहित्य** अर्थ असतां **नीं*** आणि **शीं** हे तृतीयेचे दोन्ही प्रत्यय एकत्र जोडून लावितात; जसें– 'मग त्या पंवारानें एक हजार स्वारांनिशीं तो किल्ला घेतला', 'महमूद वीस हजार घोड्यांनिशीं पंजाबांत शिरला', इ०.

भाग ४.

चतुर्थी.

५७७ विभक्तिप्रकरणीं सांगितलेंच आहे कीं मराठी मध्यें द्वितीयेचीं आणि चतुर्थीचीं रूपें सारिखींच होतात; ह्मणोन हा विभक्तिभेद अर्था वरून जाणावा. त्यांत जेथें **कर्म** अर्थ असेल ती द्वितीया, आणि एतद्व्यतिरिक्त जे अर्थ ते असतां चतुर्थी मानावी.

---

* या ठिकाणीं **नीं**च्या स्थानीं **नि** होतो.

अनुक्रमणिका

संप्रदान ह्मणजे ज्या अर्थीं, अथवा ज्या कारणें, अथवा ज्यास उद्देशून, एकादी क्रिया घडल्ये असा जो त्या क्रियेशीं विभक्तीचा संबंध तें; जसें-- 'रावजी ब्राह्मणाला दक्षिणा देतात', 'ती मुलांनां भात जेऊं घालिल्ये', या वाक्यांत **ब्राह्मणाला** आणि **मुलांनां** ही चतुर्थी जाणावी.

कित्येक ठिकाणीं देशकालवाचक शब्दां वरून अधिकरणार्थीं चतुर्थी होल्ये; जसें--'तो पुण्यास गेला', 'त्याचें लश्कर दिल्हीला जाऊन पोंहचलें', 'तो दिवसास निजतो, आणि रात्रीस जागतो', इ०. तसेंच--'डोक्यास पागोटें', अंगास अंगरखा', अशा ठिकाणींहि अधिकरणीं चतुर्थी जाणावी; उदाह०--'तो आला त्या वेळेस त्याच्या डोक्यास पागोटें होतें', इ०.

भाग ५.

पंचमी.

५७८ एकाद्या क्रियेशीं विभक्तीचा संबंध असतां जेणेंकरून अवधीचा अथवा वियोगाचा अथवा न्यूनाधिक्याचा बोध होतो, त्यास **अपादान** ह्मणावें. पंचमी विभक्ती वरून अशा अर्थाची उपलब्धि होल्ये; जसें--'मुंबईहून पुणें साठ कोश आहे', एथें **मुंबईहून** या पंचमी पासून **मुंबई** आणि **पुणें** यांतील अवधीचा बोध होतो; तसेंच--'तो घरून आला', 'काशीहून कलकत्ता दूर आहे', 'गोपाळाहून राघोबा अधिक देखणा आहे', इ०.

भाग ६.

सप्तमी.

५७९ ज्या स्थळीं किंवा ज्या वर एकादी क्रिया घडत असल्ये त्यास **अधिकरण** ह्मणावें.

अनुक्रमणिका

सप्तमीचा अर्थ **अधिकरण** असतो; जसें–'तो घरांत जेवित नाहीं', एथें **घरांत** हें अधिकरण होय; तसेंच–'तो देशांत फिरतो', 'लोकांत वागतो', 'त्या पुरुषांत चातुर्य फार आहे', इ०.

मनरामींरंगलेंभवथेंमनचिरामझालें. एकनाथ.

५८० जीं वस्त्रालंकारादिक त्यांचा आधाराधेयभाव संबंध असतां या भाषेंत जनरूढी प्रमाणें आधेया वरून सप्तमी होत्ये; जसें-- 'जोड्यांत पाय' असा अर्थ असतां 'पायांत जोडा' असें बोलण्याची रूढि पडली आहे; तसेंच– 'अंगांत अंगरखा', 'डोकींत पागोटें', 'बोटांत आंगठी', इ०.

अकारान्त शब्दां वरून क्वचित् करणार्थींहि सप्तमी होत्ये; जसें– 'हें काम त्याणें आपल्या **हातीं** केलें', 'तो आपल्या **तोंडीं** बोलला', 'ती **पायीं** आली', इ०.

कोठें सप्तमीचाहि साहित्यार्थीं तृतीये सारिखा अर्थ होतो; जसें–'रिकाम्या **हातीं** बाजारांत जाऊं नये,' 'उघड्या **पायीं** रानांत फिरूं नये', इ०.

भाग ७.

षष्ठी.

५८१ संस्कृत वैयाकरण षष्ठीचा अर्थ जो **संबंध** तो कारकांत लेखित नाहींत हें सयुक्तिक आहे; कारण, **षष्ठी** कांहीं साक्षात् क्रियेशीं संबंध ठेवित नाहीं; षष्ठीचा संबंध इतर शब्दांशीं होऊन त्या शब्दांचा संबंध क्रियेशीं राहतो; जसें–'गोपाळाच्या बापानें एक दुकान घातलें', यांत **घातलें** या क्रियेशीं जो कर्त्रन्वयें संबंध तो **बाप** या शब्दांशीं

अनुक्रमणिका

होय; **गोपाळ** या शब्दाशीं **घातलें** याचा कांहीं संबंध नाहीं; ह्मणोन **षष्ठी** कारकांत नाहीं.

आतां हा षष्ठीचा संबंध अनेक प्रकारचा असतो, त्याचा विस्तार केला असतां ग्रंथ वाढेल, ह्मणोन त्यांतील केवळ मुख्य प्रकार एथें सांगतों.

अंगांगिभावसंबंध.	जसें–	हाताचें बोट.
स्वस्वामिभावसंबंध.	जसें–	बाजीरावाचा वाडा.
सेव्यसेवकभावसंबंध.	जसें–	राजाचा दूत.
आधाराधेयभावसंबंध.	जसें–	नदीचा मासा, रात्रीचा अंधार.
जन्यजनकभावसंबंध.	जसें–	या बाईचें अपत्य.
इ०.		इ०.

५८२ क्वचित् अधिकरणार्थींहि षष्ठी होत्ये; जसें–'तो **दिवसाचा*** निजतो आणि **रात्रीचा** काम करितो', यांत **दिवसाचा** आणि **रात्रीचा** ह्मणजे दिवसाच्या ठायीं आणि रात्रीच्या ठायीं असा अर्थ; तसेंच– 'तो **शिमग्यांचा** बाहेर पडत नाहीं', 'ती **पहांटेची** उठून ईश्वराचें स्मरण करित्ये'.

५८३ क्वचित् करणार्थींहि षष्ठी होत्ये; जसें– 'माझ्या **बोलण्याचा** इला राग येतो', ह्मणजे माझ्या **बोलण्यानें** असा अर्थ.

५८४ क्वचित् कालवाचक अथवा स्थलवाचक कित्येक शब्दांवरून अपादानार्थीं षष्ठी होत्ये; जसें–'मीं **कालचा** त्यास सांगतों आहें परंतु तो ऐकत नाहीं', ह्मणजे कालपासून असा अर्थ.

---

* या मधून कित्येक अव्ययें मानिलीं तरीं चालेल.

अनुक्रमणिका

या प्रमाणें हें कारकप्रकरण संक्षेपरूपानें सांगितलें, यांत शिकणारांनीं लक्षांत ठेवावें कीं एका विभक्तीचे जे अनेक अर्थ होतात, ते त्या त्या प्रसंगीं जसे अर्थास अनुकूल दिसतील तसे मानावे.

खंड ६.

वाक्यरचना.

५८५ वाक्या मध्यें शब्दांची योजना कसकशी करावी, व कोणता शब्द कोणत्या शब्दांशीं संबंध ठेवितो, व जो त्याशीं संबंध ठेवितो तो त्या वाक्यांत तत्संबंधानें मागें पुढें कसा असावा, हा विचार या खंडांत केला आहे. वाक्यरचनेंत जे कित्येक नियम आहेत, त्यां विषयीं पुढें कित्येक रीति लिहिल्या आहेत, त्यां वर शिकणारांचें लक्ष अवश्य असावें.

वाक्य ह्मणजे, ज्यांस उद्देशून कांहीं एक विधान करितों ते उद्देश्य शब्द, आणि ज्यांचें विधान करितों ते विधेय शब्द, यांचा समाहार; अर्थात्, उद्देश्य तो **कर्त्ता**, आणि विधेय ती **क्रिया**, ह्मणजे कर्त्ता आणि क्रिया यांचा जो समाहार त्यास वाक्य ह्मणावें; जसें–'रामा येतो', यांत रामास उद्देशून **येतो** या शब्देंकरून त्याच्या येण्याचें विधान केलें आहे; ह्मणोन यांत **रामा** हा कर्त्ता, आणि **येतो** ही क्रिया, हे दोन शब्द मिळून वाक्य झालें आहे.

या वरून कोणीं असें समजूं नये कीं वाक्यांत कर्त्ता आणि क्रियाच असत्ये; नाहीं, तर निदानपक्षीं कर्त्ता आणि क्रिया तरीं असली पाहिजे, या दोहों शब्दां शिवाय वाक्याची पूर्णता होत नाहीं असें समजलें पाहिजे.

अनुक्रमणिका

वाक्या मध्यें जो शब्दांचा परस्पर संबंध त्यास **अन्वय** ह्मणतात; जसें– 'दशरथाचा परम देदीप्यमान व अत्यंत पराक्रमी पुत्र जो राम', यांत **दशरथाचा** या शब्दाचा अन्वय **पुत्र** या शब्दा कडे आहे; तसेंच– 'गोपाळानें केलेली जी काळ्या बोरूची लेखणी', यांत **केलेली**, याचा **लेखणी** कडे अन्वय आहे.

एका शब्दाचा अन्वय दुसऱ्या शब्दा कडे असून त्या अन्वित शब्दाच्या रूपांत विकार करण्याचें जें त्याच्या ठायीं सामर्थ्य असतें त्यास **अधिकार** ह्मणतात, जसें– 'गोविंदाच्या बापानें' यांत **बापानें** या शब्दाचा अधिकार **गोविंदाच्या** या शब्दा वर आहे; कारण, त्यावरून **गोविंदाचा** असा मूळचा शब्द असतां त्याचें **गोविंदाच्या** असें विकृत रूपांतर झालें आहे.

५८६ वाक्यें तीन प्रकारचीं आहेत– **पूर्ण**, **अपूर्ण**, आणि **संयुक्त**.

[अ] **पूर्ण** वाक्य ह्मणजे ज्या वाक्यांत कर्त्ता आणि क्रिया असून अर्थाची समाप्ति होत्ये तें; जसें– 'रामा आला', गोपाळानें गाय बांधिली', इ०.

[आ] **अपूर्ण** वाक्य ह्मणजे ज्या वाक्यांत अर्थाची समाप्ति होत नाहीं, आणि ती होण्यास इतर शब्दाची अपेक्षा असत्ये तें; जसें– 'जो माणूस काल आला होता', 'त्याणें तें काम करून', यांत अर्थाची समाप्ति होत नाहीं.

[इ] **संयुक्त** वाक्य ह्मणजे अनेक वाक्यें एकत्र होऊन जें एक वाक्य होतें तें; जसें–'रामा तेथें आला, आणि तो निरोप त्या गृहस्थांस सांगून, मग त्या गोष्टीच्या योजनेस लागून, ती मसलत त्याणें सिद्धीस नेली'.

अनुक्रमणिका

[ई] संयुक्त वाक्यां मध्यें मुख्यार्थप्रतिपादक जें वाक्य त्यास **मुख्य** वाक्य ह्मणावें, आणि तदंर्गत जीं अवांतर वाक्यें तीं **गौण** वाक्यें ह्मणावीं; जसें– 'त्याणें तें पत्र लिहून पुण्यास रवाना केलें', यांत 'त्याणें रवाना केलें' हें मुख्य वाक्य, आणि 'पत्र लिहून' हें गौण वाक्य.

नियम १.

५८७ जर वाक्या मध्यें एकच विशेष्य असलें, तर त्याचें लिंग, वचन, आणि विभक्ति, यां वरून तदन्वित विशेषण आणि विशेषणसर्वनाम, यांचीं रूपें फिरतात; जसें– 'त्या वर्गांत सर्व मुलांमध्यें तो मुलगा **चांगला** आहे', 'त्या घरांत रमा समजूत घेण्या **जोगी** आहे', '**तीं** फुलें पिंवळीं आहेत'; **ही** पोरी दांडगी आहे'; इ०.

परंतु ज्या विशेषणादिकांचें रूपांतर लिंगादिभेदेंकरून होत नाहीं, त्यांस हा नियम लागत नाहीं; जसें– **सुंदर** फूल, **नारंगी** रंग, **गुलाबी** जांब, **लुटारू** लोक, **कोरींव** धोंडा, इ०.

जर त्या वाक्या मध्यें एका पेक्षां अधिक विशेष्यें असलीं, तर जें जवळचें विशेष्य असेल त्यांशीं तीं विशेषणादि संबंध ठेवितात; जसें–'त्या शिपायाची पगडी, डगलें, पट्टा, **तांबडा** आहे', 'माझी **लिहिलेली** पोथी, कागद, सर्व त्या जवळ आहेत', '**हा** अंगरखा, टोपी आणि धोतर, **कोणाचें**'?

नियम २.

५८८ जर एकलिंगी अनेक शब्द वाक्या मध्यें उभयान्वयी अव्ययाच्या योगेंकरून संकलित असले, तर त्यांच्या विशेषणादिकांचीं त्याच लिंगीं अनेकवचनाचीं रूपें योजितात. परंतु बहुधा त्या शब्दां पुढें **हा असा**, या

सर्वनामांची लिंगादिभेदेंकरून योजना करावी हें चांगलें; नुस्तें चांगलेंच नाहीं, परंतु कित्येक ठिकाणीं तर अवश्य केली पाहिजे; तसेंच आणखी जर ते शब्द भिन्न भिन्न जातींचे वाचक असले तर ज्या शब्देंकरून त्या अवघ्या व्यक्तींचा संग्रह होतो अशा शब्दाची योजना करावी लागत्ये; जसें—'तूं आणि मीं फळ भक्षणारे', 'खोबरेल आणि तिळेल सस्तीं आहेत'; 'गौरी, मथुरा, आणि काशी, या मोठ्या शहाण्या आहेत', 'घोडा, बैल, उंट, हत्ती, आणि गाढव, हे मोठे उपयोगी पशु आहेत'.

[अ] मराठी भाषेंत **हा**, **असा**, या सर्वनामांचा या प्रमाणें योग असतो ह्मणून अशा वाक्यांत मधल्या उभयान्वयी अव्ययाची समयविशेषीं अपेक्षा ठेवित नाहींत; जसें —'घोडा, बैल, उंट, गाढव, हे मोठे उपयोगी पशु आहेत', 'कागद, लेखणी, शाई, चाकू, हीं लिहिण्याचीं साहित्यें होत.'

[आ] एकलिंगी अनेक शब्द या प्रमाणें एका पुढें एक जोडिले असतां त्यां पुढें त्याच्या जातिवाचकाचा प्रयोग करणें हें मराठी भाषेंत चांगलें दिसतें, व कित्येक ठिकाणीं नकेला असतां तें वाक्य केवळ पूर्ते वाटत नाहीं, जसें पूर्वोक्त उदाहरणांत—'गौरी, मथुरा, काशी, या शाहाण्या आहेत', हें वाक्य कांहींसें अपूर्ण दिसतें; यांत या शाहाण्या **मुली** अथवा **बाया** असा जातिवाचक शब्द असल्यास हें वाक्य चांगलें पूर्ण दिसतें.

नियम ३.

५८९ जर तीं विशेष्यें भिन्नभिन्न लिंगीं असलीं, तर

अनुक्रमणिका

त्यांच्या विशेषणाचें रूप नपुंसकीं अनेकवचनीं असलें पाहिजे, परंतु एथेंहि दुसऱ्या रीती प्रमाणें **हा, असा**, या सर्वनामांचा प्रयोग केला पाहिजे; जसें– 'त्याचा मुलगा, मुलगी, भाऊ, हीं सारीं चांगलीं आहेत', 'त्यांहीं घोडा, गाडी, घर, शेत, बाग, हीं सारीं विकून फडशा केला'.

हा, असा, यांचा मध्यें प्रयोग केला असतां त्यांचा संबंध बहुधा पुढल्या जातिवाचकाशीं असतो, असें असलें ह्मणजे वर सांगितला नियम राहत नाहीं. जर तें पुढलें जातिवाचक नसलें, आणि नुसतीं सर्वनामेंच असलीं, तर मात्र वर सांगितला नियम चालतो; उदाहरण– 'तिणें शेला, पागोटें, धोत्रजोडा, आणि एक शालीचें फर्द, असा आपल्या जांवयास पोशाक दिला', या वाक्यांत **असा** या सर्वनामाचा अन्वय पुढला जातिवाचक शब्द जो **पोशाक** त्याशीं आहे, ह्मणोन त्याच्या लिंगवचनानुरूप त्या सर्वनामाचें व पुढल्या क्रियापदाचें रूप फिरतें.

नियम ४.

५९० वाक्या मध्यें विशेषण विशेष्याच्या अगोदर असलें पाहिजे; जसें– 'चांगला मुलगा', 'शहाणी मुलगी', 'बढाईखोर प्रवासी', इ०.

[अ] परंतु जर त्या विशेष्याच्या गुणाचें विधान कर्तव्य आहे तर तें विशेषण विशेष्याच्या पुढें येतें; जसें– 'तो घोडा पांढरा आहे', एथें घोड्यास उद्देशून त्याच्या पांढरेपणाचें विधान आहे.

[आ] क्वचित भाषणांत विधिविशेषण विशेष्याच्या मागू-

अनुक्रमणिका

नहि येतें, तेथें पूर्वोक्त नियम राहत नाहीं;- 'तो पांढरा घोडा आहे', या वाक्यांतहि घोड्यास उद्देशून त्याच्या पांढरेपणाचें विधान केलें आहे, परंतु जेथें स्वरस ठेवून दुसऱ्याच्या प्रतिज्ञेचा निषेध कर्तव्य आहे तेथें हें विधिविशेषण विशेष्याच्या पुढेंच असलें पाहिजे; जसें- 'तुह्मीं सांगता तो कांहीं पढला नाहीं, परंतु मीं पाहिलें तो फार विद्वान आहे', 'ती मोठी शाहणी आहे यांत संशय नाहीं'.

नियम ५.

५९१ संबंधी सर्वनामाचा ज्या नामा कडे अन्वय असतो, त्याच्या लिंग वचना प्रमाणें त्याचें रूप फिरतें; आणि तदन्वित जें दर्शक सर्वनाम तें पुढें त्या वाक्यांत याच्या लिंगवचनानुरूप असलें पाहिजे; जसें- 'जो मनुष्य विद्या शिकेल तो प्रतिष्ठा मिळवील', 'जो चाकरी करील तो भाकरी खाईल'.

[अ] जर दोन तीन नामें एकत्र जोडलीं असलीं, तर जवळचें जें नाम त्याशीं या संबंधी सर्वनामाचा अन्वय असतो; जसें- 'लिहायाच्या उपयोगी जो कागद, लेखणी, शाई, रेखाटणी, हीं निरंतर जवळ असावीं', 'शिकारीची जी कमाण, तीर, कुत्रीं, इ० सामान', इ०. परंतु अशीं अनेक नामें एकत्र जोडलेलीं असलीं ह्मणजे तें संबंधी सर्वनाम, व पुढलें जें दर्शक सर्वनाम, तें दुसऱ्या आणि तिसऱ्या नियमाप्रमाणें पुढल्या जातिवाचकाच्या लिंगवचनांशीं विशेषेंकरून संबंध ठेवितें; पूर्वोक्त वाक्य असें असावें,- 'लिहायाच्या उपयोगीं जें कागद लेखणी, शाई, रेखाटणी, इत्यादि सामान तें निरंतर जवळ असावें', 'शिकारीचें जें कमाण, तीर,

कुत्रीं, वाद्या, इत्यादि सामान तें'. 'श्रमपूर्वक साध्य केलें जें व्याकरण, न्याय, काव्य यांचें ज्ञान तें विसरूं नये'.

नियम ६.

५९२ अकर्मक धातूंचे प्रयोग दोन प्रकारचे होतात, एक कर्तरि आणि एक भावी; त्यांत कर्तरिप्रयोग असतां कर्त्ता प्रथमान्त पाहिजे, व भावीप्रयोग असतां कर्त्ता तृतीयान्त पाहिजे; जसें– 'तो उठतो', 'ती हंसत्ये', 'तें उडतें', 'त्या गेल्या', 'तीं जावीं'; हा कर्तरिप्रयोग; 'तिणे जावें', 'जात असावें', हा भावीप्रयोग.

अकर्मक धातूं मध्यें जे भावकर्तृक धातु आहेत, त्यांच्या प्रयोगास भावकर्तरिप्रयोग ह्मणावें; जसें– 'मला वाटतें', 'त्यास कळमळतें', 'मला आज सांजावलें'..

नियम ७.

५९३ सकर्मक धातूंचा वर्तमान व भविष्य काळीं कर्तरिप्रयोग असतो, तेव्हां पहिल्यानें कर्त्ता, मग कर्म, आणि शेवटीं क्रियापद, असा क्रम असावा; उ०– 'रामा गाई राखितो', 'गंगा चोळी शिवत्ये', इ०.

[अ] हें कर्म बहुधा प्रथमान्त असतें, व कोठें द्वितीयान्तहि असतें, पूर्वोक्त उदाहरणांत 'रामा गाई राखितो', एथें 'रामा गाईस राखितो', असेंहि होतें. परंतु यांत बहुधा कर्म प्रथमान्त असावें हा उत्तम पक्ष.

[आ] यांत सर्वनाम जर कर्म आहे, किंवा प्राणिवाचक विशेष नाम कर्म आहे, तर तें द्वितीयान्त असलें पाहिजे; उदाह०– 'तो त्यास धरितो', 'गोविंदा विठूला मारितो',

परंतु प्राणिवाचक जर सामान्य नाम असलें तर तें बहुधा प्रथमान्त असलें पाहिजे ; उदाह०– 'अरे तूं एक शिपाई तर घेऊन ये', 'मी एक गडी बलावितों'.

[इ] जर वाक्यां मध्यें संप्रदानीं चतुर्थी असली तर जें कर्मरूप नाम असतें तें जरीं विशेषनाम असलें तरीं तें बहुधा प्रथमान्त असावें; उदाह०–'मीं तुला रामा दाखवितों', 'जनक रामास जानकी देतो', इ०.

[ई] या वरल्या नियमास कोठें अर्थाच्या विपर्यासेंकरून व्यभिचारहि येतो, ह्मणजे, कर्मवाचक पद प्रथम येऊन मग कर्तृवाचक पद येतें; जसें– 'गाय रामा राखितो', 'चोळी गंगा शिवते'; यांत अर्थभेद इतकाच कीं प्रथम गाय ह्मटल्यानें इतर–ह्मशी, शेळ्या, इ० जीं संभाव्य कर्मवाचक पदें त्यांची व्यावृत्ति होते. 'गाई रामा राखितो', ह्मणजे अर्थात् बोलणाराच्या मनांत– ह्मशी दुसरा कोणी राखितो, असा आशय असतो; सारांश, जें मुख्य पद असेल, ह्मणजे ज्या वर त्याचा श्लेष असेल तें पद प्रथम येतें, असें समजावें.

नियम ८.

५९४ पढधातूचा गण वर्जून सकर्मक धातूंचा प्रयोग भूतकाळीं व विध्यर्थीं कर्मणि आणि भावी असतो; जेव्हां कर्मणिप्रयोग असतो, तेव्हां कर्त्ता तृतीयान्त आणि कर्म प्रथमान्त असलें पाहिजे; (वाक्यांत शब्दांचा क्रम वर ७ व्या नियमांत सांगितल्या प्रमाणें असतो.) उदाह०– 'त्याणें पुस्तक वाचिलें', 'कृष्णीनें आपला परकर रंगविला'; 'त्याणें तें काम करावें', 'म्यां गाय सोडावी', 'त्वां ईश्वरभक्ति करावी', इ०.

अनुक्रमणिका

[अ] अकरणरूपींहि विध्यर्थीं तृतीयान्त कर्त्ता असतो, आणि भावीप्रयोग होतो; जसें– 'त्याणें तेथें जाऊं नये', 'मनुष्यानें इतर क्षुद्र जीवांस त्रास देऊं नये'.

[आ] जेव्हां भावीप्रयोग असतो, तेव्हां तें कर्म द्वितीयान्तच असलें पाहिजे; उदाह०– 'त्याणें गाईस धरिलें', 'रामानें आपल्या बापास पाहिलें', इ०.

कोणी ह्मणतात कीं हा नियम चालत नाहीं, ह्मणोन हें एक आणखी वादाचें स्थळ आहे. ते ह्मणतात, जरीं कर्म द्वितीयान्त असलें तथापि कर्मणिच प्रयोग होतो; जसें– 'तिणें त्यास धरिला', 'त्याणें तिला पाहिली', 'त्यांहीं त्या वाघास मारिला', इ०. व हा नियम हिंदुस्तानी आणि गुजराथी भाषेस अनुसरून आहे, जसें हिंदुस्तानींत– 'उन्ने उसको पकडा', 'मैंने उस घोडीको बोहत प्यारसे पाली'; तसेंच गुजराथींत– 'में ते माणसने मार्यो', 'तेणे आजे छोकरीने जमवा तेडी', इ०. या उदाहरणांत कर्में द्वितीयान्त असून त्यांचा अधिकार क्रियापदांच्या रूपां वर असतो. त्यास, हिंदुस्तानींत तर मुळीं नपुंसकलिंग नाहीं. आणि भावीप्रयोगहि नाहीं; तेव्हां हिंदुस्तानी भाषेच्या नियमानें एथें कांहीं विशेष समर्थन होत नाहीं; आतां गुजराथी भाषेंत– मात्र द्वितीयान्त कर्म असतां कर्मणिप्रयोग होतो; परंतु तींत मराठी भाषे प्रमाणें विकल्प नाहीं, ह्मणजे, मराठी भाषेंत जसा विकल्पें कर्मणिप्रयोग अथवा भावीप्रयोग होतो, तसा तींत होत नाहीं; तेव्हां आतां या विकल्पांत काय तो तारतम्यभाव पाहायाचा. वास्तविक सूक्ष्म बुद्धीनें पाहतां कर्त्ता आणि कर्म हीं प्रथमान्त असतां त्यांचा अधिकार क्रियापदां वर असावा, आणि तीं सविभक्तिक असतां क्रियापदाचें भावी रूप व्हावें, हा उत्तम पक्ष दिसतो.– 'त्याणें त्यास धरिला', या पेक्षां– 'त्याणें त्यास धरिलें', हा प्रयोग विशेष ग्राह्य होय. 'म्यां तुला चोरी वर भली धरिली', या पेक्षां– 'म्यां तुला चोरी वर भलें धरिलें', हें व्याकरणदृष्ट्या अधिक शुद्ध होय; कारण, मराठी भाषेंत कर्त्ता

अथवा कर्म जें क्रियापदास वागवितें, त्याचें सूक्ष्म दृष्टीनें रहस्य पाहतां, व इतर भाषेशींहि तोलून पाहतां, असें लक्षांत येतें कीं, तेथें त्याचा आणि क्रियापदाचा विशेष्यविशेषणभावसंबंध असतो; व तें जें कर्त्ता आणि कर्म यांहींकरून वागणारें क्रियापद, तें मूळचें धातुसाधित विशेषण असून क्रियापदाच्या रूपांत आलेलें असें असतें;– 'त्याणें वाघ मारिला', 'अथवा, 'ती चमत्कार करित्ये', यांत पूर्व वाक्यांत– 'त्याणें वाघ मारिला' ह्मणजे– तो जो तेणें वाघ जो तो मारिला गेला, अथवा मारिलेला असा आहे, असा मूळचा अर्थ; तेव्हां एथें **मारिला** हें मूळचें वाघाचें धातुसाधित विशेषण होय. तसेंच– 'ती चमत्कार करित्ये', यांत मूळ **करता** या धातुसाधित विशेषणाचें **करती** हें स्त्रीलिंगीं एकवचनाचें रूप होय. आतां, मराठी भाषेंत असा नियम आहे कीं जेथें हा विशेष्यविशेषणभावसंबंध असतो, तेथें विशेष्य जर प्रथमान्त असलें, तर त्याच्या विशेषणाचें रूप त्याच्या लिंगवचनाच्या अनुरोधानें प्रथमान्त तटस्थ असतें; परंतु जर त्या विशेष्यास कांहीं विकार झाला, तर विशेषणाचें जें असें तटस्थ राहिलेलें रूप त्यास सामान्यरूपादि लागलाध विकार होतो. परंतु, 'त्याणें वाघाला मारिला', अथवा, 'त्याणें आपल्या बायकोला घरीं ठेविली', यांत **वाघ** आणि **बायको** हे विशेष्यरूप शब्द जर प्रथमान्त असते, तर ते **मारिला** आणि **ठेविली** या मूळच्या विशेषणरूप धातुसाधितांस वागविते, परंतु हीं विशेष्यें सविभक्तिक आहेत, तेव्हां एथें केवळ शुद्ध भूतकाळाच्या क्रियापदाचें साधारण जें नपुंसक रूप तें असून भावीप्रयोग व्हावा असा निर्णय केला ह्मणजे या वैकल्पिक प्रयोगांत विशेष ग्राह्यत्व या भावीप्रयोगा कडेसच येतें. ह्मणोन, माझ्या विचारास सकर्मक धातूंच्या भूतकाळीं कर्म जर सविभक्तिक आहे, तर तेथें भावीप्रयोग करावा, हें चांगलें दिसतें;– 'त्याणें वाघाला मारिला', 'त्याणें आपल्या बायकोला घरीं ठेविली', या पेक्षां 'त्याणें वाघाला मारिलें', आणि, 'त्याणें आपल्या बायकोला घरीं ठेविलें', असा भावीप्रयोग विशेष ग्राह्य होय.

अनुक्रमणिका

[इ] परंतु केव्हां केव्हां कर्म द्वितीयान्त असून क्रियाविशेषण जर त्याच्या लिंगवचना वरून साधत असलें, तर कर्मणिप्रयोग करण्याचा परिपाठ आहे; जसें– 'त्याणें तिला बरी केली', 'त्याणें आपल्या घोड्याला चांगला पुष्ट केला', 'त्या मुलीनें आपल्या बाहुलीस पाटा वर उभी केली', इ०.

परंतु अशा ठिकाणीं कर्म प्रथमान्त केलें असतां वर जो नियम सांगितला त्यास बाध येत नाहीं; जसें– 'त्याणें ती बरी केली', 'त्यां आपला घोडा चांगला पुष्ट केला', इ० अथवा तें क्रियाविशेषण नपुंसकी करून भावीप्रयोग करावा; जसें– 'त्याणें तिला बरें केलें', 'त्याणें आपल्या घोड्याला चांगलें पुष्ट केलें', असा नियम ठेविला ह्मणजे वरल्या अपवादाची कांहीं आवश्यकता राहत नाहीं.

[ई] जर वस्तुवाचक अथवा प्राणिवाचक सामान्यनाम कर्म असलें, तर बहुधा कर्मणिप्रयोग योजितात; जसें– त्याणें एक सुंदर पशु पाहिला'; परंतु सर्वनाम किंवा मनुष्यवाचक विशेषनाम जर कर्म असलें, तर बहुधा निरंतर भावीप्रयोग योजितात; उदाह०– 'तिणें त्याला शिकविलें', 'गोपाळानें खंडूला बोलाविलें'.

'रमानें विष्णु आराधिला', 'पार्वतीनें शिव प्रार्थिला', अशीं या नियमास विरुद्ध उदाहरणें कोठे कोठे आढळतात; परंतु हीं काव्यांतच शोभतात, व्यवहारी लिहिण्यांत अथवा भाषणांत– 'विष्णूस आराधिलें', 'शिवास प्रार्थिलें', अशीं द्वितीयान्त रूपें असावीं.

[उ] शिकणें, जेवणें, इत्यादि कित्येक सकर्मक धातु असून त्यांचा अकर्मक धातूं प्रमाणें भूतकाळीं कर्तरिप्रयोग होतो; उ०– 'मीं जेवलों', 'ती शिकली', इ०. कर्माची

सत्ता असली तरीं कर्तरिप्रयोगच होतो; उदाह०– 'मीं भात जेवलों', मीं 'पक्कानें जेवलों', 'ती धडा शिकली', इ०.

'मीं तोंड धुतलों', 'तो अंग धुतला', 'ती स्नान केली', अशी कोंकणस्थांत बोलण्याची रूढि आहे, परंतु अशा ठिकाणीं– 'मीं तोंड धुतलें', 'त्याणें आंग धुतलें', 'तिणें स्नान केलें', असा कर्मणिप्रयोग करावा हें शुद्ध; कांकीं धूधातूचा भूतकाळीं कर्मणिप्रयोगच होतो; जसें– 'मीं धोत्र धुतलें', 'रूमाल धुतला'; मग आंग, तोंड, इ० शब्द असतांच हा अपवाद कशास पाहिजे.

नियम ९.

५९५ जर एका क्रियापदास अनेक कर्त्ते असले, तर शेवटचा जो कर्त्ता त्याच्या लिंगवचना वरून तें क्रियापद फिरतें; उदाहरण– 'हा आणि तो गेला', 'तुला तो आणि त्या बाया हंसल्या', 'हा हत्ती आणि तुमचे घोडे तेथें गेले असते तर बरें होतें', इ०.

नियम १०.

५९६ जर एका क्रियेस अनेक कर्में असून कर्मणिप्रयोग होत असला, तर शेवटच्या कर्माचा अधिकार क्रियापदा वर असतो; जसें– 'तुह्मीं आपले कागद, लेखण्या, चाकू, आणि रेखाटणी कोठे सांडिलीं', 'त्यांहीं आपले घोडे, रथ, उंटें, गाड्या, शिपायांच्या स्वाधीन केल्या', इ०.

नियम ११.

५९७ कोणतेंहि क्रियापद ह्मटलें ह्मणजे त्यास कर्त्ता पाहिजे, मग तो कर्त्ता त्या वाक्यांत प्रत्यक्ष असो किंवा अ-

अनुक्रमणिका

ध्याहृत असो; उ०– 'रामा काल गोपाळा कडे गेला होता; परंतु त्याचा सन्मान केला नाहीं', या वाक्यांत **केला** या क्रियेस कर्त्ता नाहीं ह्मणोन हें वाक्य अशुद्ध होय; यांत– 'परंतु त्याणें त्याचा सन्मान केला नाहीं', असें असावें.

नियम १२.

५९८ मराठींत कोठे कोठे क्रियापदाचा अध्याहार करितात; उ०– 'कोश ह्मणजे शब्दसंग्रहाचें पुस्तक', यांत **आहे** किंवा **होय** हें क्रियापद अध्याहृत आहे. जेथें एकाद्या गोष्टीचें सामान्यतः विधान कर्तव्य आहे, ह्मणजे, एकाद्या क्रियेच्या कर्तृत्वाचें आरोपण निश्चयपूर्वक अमुक्याच्याच ठायीं करितां येत नाहीं, तो कर्तृत्वरूप अर्थ, सामान्यें करून ज्यांच्या ज्यांच्या ठायीं तत्तत्क्रियासंपादकशक्तीची संभावना होते, त्यांच्या त्यांच्या ठायीं आरोपित केला असतां संभवतो, तेथें कर्त्याचा अध्याहार करावा लागतो. उदाह०– 'ओल्या जमिनी वर **निजलें** तर लागलेंच अंग धरतें', 'पुष्कळ **पढलें**, आणि मोठमोठे ग्रंथ **पाहिले**, परंतु जर सारासारविवेचक बुद्धि नसली, तर तें सर्व निष्फल', 'लोकांचे गुण नघेतां दोष **पहावे** हा दुष्टांचा स्वभाव होय', 'या गावांत सर्व पदार्थ तोलून **विकतात**', 'पूर्वी शंभर वर्षां वर **लिहित होते** खरे, परंतु आतां जसें डौलदार अक्षर **काढितात** तसें तेव्हां कोणास काढितां येत नसे'. या उदाहरणांत जितकीं क्रियापदें मोठ्या अक्षरांत दिसतात, तितक्यांचे कर्ते अध्याहृत जाणावे.

नियम १३.

५९९ जर एका क्रियेचे अनेक पुरुषवाचक सर्वनामें

कर्त्ते असले, तर शेवटचें जें सर्वनाम, त्याच्या लिंगवचनपुरुषा प्रमाणें पुढच्या क्रियेचें रूप फिरतें; जसें– ‘मीं, तूं, आणि तो गेला’, ‘तो, तुह्मीं, आणि त्या तेथें होत्या’, ‘तूं, तो, आणि मीं जातों’, इ०.

नियम १४.

६०० जर एका वाक्यांत प्रथम, द्वितीय, आणि तृतीय पुरुष, अथवा प्रथम आणि द्वितीय पुरुष, कर्त्ते असले तर आज्ञाकाळीं क्रियापदाचें रूप प्रथम पुरुषीं असलें पाहिजे; असें– ‘मीं तूं आणि तो तेथें जाऊं’, ‘तूं आणि मीं तें काम करूं’. जर द्वितीय आणि तृतीय असे दोन पुरुष कर्ते असले, तर क्रियेचें रूप द्वितीयपुरुषीं असलें पाहिजे;– ‘तूं आणि ती जा’, ‘तुह्मीं आणि त्या जा’, इ०.

परंतु अशा प्रसंगीं क्रियापदास अनुकूल जो पुरुष असेल, तो त्याच्या जवळ आणावा हें बरें.

नियम १५.

६०१ जर **राजश्री, महाराज, साहेब, सरकार,** इ० बहुमानवाचक शब्द द्वितीय पुरुषीं असले, तर त्यांचें क्रियापद तृतीय पुरुषीं अनेकवचनीं असलें पाहिजे, अशी बहुधा रूढि आहे; जसें– ‘सरकार जसा हुकूम करतील तसें करायास मीं तयार आहें’, ‘राजश्री तेथें गेले होते मग काय झालें’! क्वचित्– ‘राजश्री तेथें गेला होता’, असाहि प्रयोग आढळतो; ‘कालच मीं महाराजांस विज्ञप्ति केली, कीं महाराज जसें सांगतील त्या बाहेर मीं वागणार नाहीं’, इ०.

अनुक्रमणिका

नियम १६.

६०२ स्त्रियांस अत्यादरपूर्वक बोलायाचें असतां तृतीय पुरुषीं नपुंसकाच्या अनेकवचनाचीं रूपें योजिलीं पाहिजेत. उ०– 'तीं बाई तेथें गेलीं', 'मांईसाहेब कालच आलीं असतीं', इ०.

नियम १७.

६०३ पदार्थांची जात, समुदाय, किंवा अतिशयपणा, दाखवायाचा असतां बहुधा एकवचनाचा प्रयोग होतो; उदाह०– 'पुढल्या सालीं हरबरा फार सस्ता होईल', 'शिवाजीच्या स्वारी बराबर दहा हजार घोडा निघत असे', 'यंदा यात्रेस हजारो माणूस लोटलें होतें', इ०.

नियम १८.

६०४ द्रवरूप पदार्थ आणि धातु इ० पदार्थ, जातिस्थानपरत्वें भिन्न भिन्न प्रकारचे असल्यास, त्यांस क्वचित् अनेकवचनीं बोलतात; उदाह०– 'बाजारांत दोन चार प्रकारचीं तुपें आलीं आहेत', 'यंदां तीळ पिकला नाहीं, व नारळाचाहि नाश झाला, ह्मणोन तिळेल खोबरेल हीं तेलें महाग होतील'; 'बाजारांत दोन तीन दराचीं सोनीं आहेत', असेंहि कोणी क्वचित् बोलतात.

नियम १९.

६०५ जर अनेक नामांस एकच विभक्ति लावायाची आहे, तर ती त्या सर्वांस पृथक् पृथक् लावावी हें बरें, जर असें नकेलें, तर त्यांच्या शेवटीं हा या सर्वनामाची योजना करून त्यास लावावी; असें–'तुह्मीं जेवूं नका, पण सुपारीस,

पानास, आणि नारळास तर चिंता नाहीं'; 'रामा, गोपाळा, यांस धरून आण', 'कृष्णी, वेणू, आणि साळू, यांची ही खेळायाची बाहुली आहे', 'मुंबई, दिल्ही, मद्रास, यांहून कलकत्ता शहर मोठें आहे'.

[अ] त्या नामांची जरीं प्रथमा विभक्ति असली तरीं त्या पुढें **हा** अथवा **असा** या सर्वनामांचा प्रयोग करितात; उ० – 'रामा, गोपाळा, आणि दाजी, हे अ० असे तेथें गेले'.

[आ] जो वर विभक्ती विषयीं नियम सांगितला तोच शब्दयोगी अव्ययां विषयींहि लागू पडतो; जसें– 'रामा, सखो, गोपाळ, आणि मनी, यां पेक्षां लक्षुमण आणि शिवराम यांज वर बापाची प्रीति अधिक आहे', 'घोडा, बैल, गाढव, या तिघां वर जितकें ओझें घालावें तितकें एक उंट घेतें'.

[इ] जर एकादें नाम फारसें प्रसिद्ध असलें, अथवा फार लांब असलें, तर मराठी भाषेंत त्यास विभक्ति अथवा शब्दयोगी अव्यय नलावितां त्याज पुढें **हा** या सर्वनामाची योजना करितात; तेव्हां त्याचें लिंगवचन, पुढें जर जातिवाचक शब्द असला तर त्याच्या अनुरोधानें असतें; जसें– 'महम्मद जलालुद्दीन याणें त्या काळीं फौजेस कुमक केली', 'क्रिस्टाफर कोलंबस या कडून अमेरिका खंडाचा शोध लागला', 'सेंटपीटर्सबर्ग ही रूस देशाची राजधानी', 'औरंगजेब हा शहाजहान बादशाह याचा पुत्र', 'द्रौपदी ही द्रुपदाची कन्या', इ०.

प्रथमा विभक्ति असतां **हा** याचा प्रयोग केवळ स्वेच्छेवर आहे; जसें– 'रामा माझा चाकर', अ०, 'रामा हा माझा चाकर', 'माझी मुलगी सगुणा तेथें होती', अ०, 'मा-

अनुक्रमणिका

शी मुलगी सगुणा ही तेथें होती', 'माझा चाकर रामा मोठा विश्वासु आहे', अ०, 'माझा चाकर रामा हा मोठा विश्वासु आहे'.

[ई] स्थलवाचक शब्दास पंचमी आणि सप्तमी विभक्ति नलावितां क्वचित् त्या पुढें **एथून**, **एथें**, या अव्ययांचा प्रयोग करितात; जसें– 'तो कोरेगांव एथून निघून झांसीस गेला', 'नंतर तो हिंदुस्तान एथें जाण्यास निघाला', इ०.

नियम २०.

६०६ ज्या नामाशीं अथवा सर्वनामाशीं शब्दयोगी अव्ययाचा अन्वय असतो, त्या नामाचें अथवा सर्वनामाचें, त्या शब्दयोगी अव्ययाच्या योगानें सामान्यरूप होतें; जसें– 'झाडा खालीं, डोंगरा वर, त्या पुढें इ०.

जर दोन तीन नामां पुढें शब्दयोगी अव्यय लावायाचें असलें, तर त्यांचीं सामान्यरूपें नकरितां पुढें **हा** किंवा **असा** या सर्वनामांचा योग करून त्या पुढें तें अव्यय लिहावें'; जसें–'त्याणें बैल, घोडा, उंट, यां वर ओझें लादलें','चोर, चहाड, लबाड, व्यसनी, अशां बराबर व्यवहार ठेवूं नये'.

नियम २१.

६०७ नामाचें, विशेषणाचें, आणि विशेषणरूप सर्वनामादि शब्दांचें, जें सामान्यरूप होणें तें पुढल्या शब्दयोगी अव्ययाच्या योगानें, अथवा सविभक्तिक, सशब्दयोगिक, आणि सामान्यरूपी अशा विकृत विशेष्याच्या योगानें होतें; जसें–'**घरां** पुढें', '**गांवा** समोर', '**तुझ्या** कडे'; 'एका शिपायानें **दोघां** मनुष्यांस धरिलें'; '**शहाण्या** पुत्रा

वर **चांगल्या** बापानें प्रीति करावी', **भल्या** स्त्रियेनें द्वाड स्त्रियांच्या वाऱ्यासहि उभें राहूं नये', **'माझ्या फडताळा-च्या** समोरच्या **कोनाड्यांतल्या** बटव्या मध्यें पुडी आहे ती आण'.

आकारान्त विशेषणासच सामान्यरूप असतें, या विषयीं पाहा–पृ० १४१, ले० ३४२ वा.

१ हें पूर्वोक्त विशेषण वाक्यांत कितीहि दूर असलें तथापि त्याचें विशेष्य जर वर सांगितल्या प्रमाणें विकृत आहे, तर त्याचें सामान्यरूपच असलें पाहिजे; जसें–**'त्या** परमप्रतापी, शौर्योदार्याद्यनेकगुणयुक्त, परमदेदीप्यमान अ-वंतीच्या राजपुत्रानें', इ०.

आकारान्त विशेषणाचीं रूपें विकृत विशेष्याच्या योगानें दोन प्रकारचीं होतात; कोणीं **बऱ्या** मनुष्यानें ह्मणतात, कोणीं **बरे** मनुष्यानें ह्मणतात; कोणीं **भल्या** बायकोस ह्मणतात, कोणीं **भले** बायकोस ह्मणतात; परंतु केवळ व्याकरणरीतीनें पाहिलें तर **बरा**, **भला**, इत्यादि आकारान्त विशेषणांचीं सामान्यरूपें **बऱ्या**, **भल्या**, अशींच होतात. ह्मणोन विशेष्याच्या नियमा वर कांहीं धोरण नठेवितां हीं विभक्तिसामान्यरूपें योजावीं हें बरें. या विषयीं विस्तारपूर्वक उपपादन केलें आहे तें पाहावें–पृ० १३९,१४० ले० ३४०–३४१ वा. वर सांगितलें या वरून षष्ठ्यंतसामान्यरूपाचा नियम असाच समजावा.

नियम २२.

६०८ क्रियेचा शक्यभेद असतां कर्त्ता सविकरणतृतीयान्त असावा, अथवा चतुर्थ्यन्त असावा; जसें– **'माझ्यानें** अ० **मला** तें काम करवत नाहीं', **तुझ्यानें** अ० **तुला** तेथें जाववतें', **अमच्यानें** अ० **आह्मांला** तितकी दक्षिणा देव

वली असती तर आह्मींहि दिली असती', 'देवादिकांच्यांनीं जे झालें नाहीं, तें तुह्मां मनुष्यांच्यांनीं कसें करवेल', इ०.

हें स्थळ मोठें वादास्पद आहे. 'माझ्यानें अथवा मला तें काम करवत नाहीं', इत्यादि वाक्यांत **माझ्यानें** आणि **मला** हा कर्त्ता, **काम** हें कर्म, आणि **करवत नाहीं** हें सकर्मक क्रियापद मानून सर्वत्र निर्वाह करितात; व असा निर्वाह करण्यास कांहींसा संस्कृत भाषेचा आधारहि आहे. तथापि भाषेच्या रहस्या वर दृष्टि देऊन पाहिलें असतां, अथवा अर्थाचा सूक्ष्म विचार केला असतां, माझ्या विचारास हें मत प्रशस्त दिसत नाहीं. माझ्या बुद्धीस असें वाटतें कीं, क्रियेस शक्यभेदाच्या रूपांत आणिलें असतां तिच्या ठायीं अकर्मकत्वाची उपलब्धि होत्ये;—'माझ्यानें अ० मला तें काम करवत नाहीं', एथें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां **काम** हा कर्त्ता, आणि **करवत नाहीं** हें क्रियापद होय; **माझ्यानें** ही कर्तरितृतीया नव्हे. यास या भाषेचा निर्बंधच मोठें प्रमाण आहे; पाहा, इतर सर्व ठिकाणीं कर्तरितृतीया असतां **म्यां, त्वां, त्याणें**, अशीं तृतीयेचीं नियमित रूपें होतात; आणि हा शक्यरूप भेद होतांच **माझ्यानें, तुझ्यानें, त्याच्यानें**, इ० सविकरणतृतीयेचीं रूपें, ज्यांचा इतर प्रसंगीं कधींहि प्रयोग होत नाहीं, तीं या अवसरीं अपरिचित आगंतुका सारिखीं येऊन बसतात. जर **करवतें** इ० शक्यभेदाच्या रूपांचा **मीं** हाच वस्तुतः कर्त्ता असता, तर जसें—'म्यां केलें', 'त्वां देवविलें', इ० सकर्मक क्रिया असतां **म्यां, त्वां,** इ० रूपें प्रयोजिलीं जातात, तशीं शक्यभेदीं सकर्मक क्रियापद असतां कां जात नाहींत? '**म्यां** तें काम **करवलें**', असें कां होत नाहीं? तेव्हां **म्यां**च्या स्थानीं ज्या पेक्षां **माझ्यानें** असें विलक्षण रूप होतें, अथवा **मला** असें चतुर्थीचें रूप होतें त्या पेक्षां मराठी भाषेच्या मतें **माझ्यानें** हा कर्त्ता नव्हे, असें स्पष्ट दिसतें. आणखी, जितकीं शक्यभेदाच्या रूपांत आणिलेलीं क्रियापदें तितक्यांच्या वर्त्तमान काळाचीं आणि भविष्य काळाचीं रूपें अकर्मक क्रियापदांच्या नियमास अनुसरून असतात; हें एक शक्यभेदीं

धातु अकर्मक असतो यास मोठें प्रमाण होय. जसें–'त्याच्यानें तें काम **करवितें**, अथवा **करवील**', अशीं इतर सकर्मक धातूंच्या नियमां प्रमाणें रूपें होत नाहींत, परंतु अकर्मक धातूंच्या नियमां प्रमाणें–'त्याच्यानें तें काम **करवतें**, अथवा **करवेल**' अशीं रूपें होतात. 'माझ्यानें तें काम करवतें', ह्मणजे, 'मीं जो त्या मद्वारा, अथवा, साधनरूप जो मीं त्या मज करवीं तें काम करवतें ह्मणजे केलें जातें' असा या वाक्याचा अर्थ होतो; ह्मणोन माझ्या विचारास असें येतें कीं, '**माझ्यानें** अ० **मला** तें काम करवतें' इ० वाक्यांत **माझ्यानें** यास करणी तृतीया करून, अथवा **मला** ही चतुर्थी करून, **काम** हें या वाक्यांत **करवतें** या क्रियापदाचा कर्त्ता मानावें; तसेंच–'माझ्यानें अ० मला धांववतें', इ० मूळच्या अकर्मक धातूं वरून शक्य भेदाच्या रूपाचा प्रयोग असतां त्यास भावकर्तरि धातु मानावें, हें बरें दिसतें.

परंतु ज्या पेक्षां हें केवळ नवीन मत होय, आणि आज पावेतों सर्वत्र 'माझ्यानें अ० मला तें काम करवतें' इ० स्थळीं **माझ्यानें** अ० **मला** यास कर्त्ता मानून **काम** हें **करवतें** या क्रियापदाचें कर्म मानण्याचा परिपाठ पडला आहे, व 'मया तत्कार्यं क्रियते' इ० संस्कृत वाक्यास अनुसरून हें वाक्य आहे असें सर्व मानितात, त्या पेक्षां एथें मला विशेष आडवें येतां कामा नये.

नियम २३.

६०९ **ला**प्रत्ययान्त भूतकालवाचक क्रियापदां पुढें **तोंच** हा सावधारण शब्द असतां, **ला**प्रत्ययाचा लोप होतो, आणि **तों** या अव्ययास **तां** आदेश होतो; जसें–'धन्यानें हाक **मारतांच** चाकर उठला', 'एकानें आंब्यास हात **लावतांच** त्या वर सर्वांची उडी पडली', 'त्याणें पिशवींत हात **घालतांच** त्यास मोहर सांपडली', 'राजानें आज्ञा **करतांच** सर्व धांवले', इ०.

अनुक्रमणिका

हें स्थळ मोठें विचारणीय होय. हीं जीं वर उदाहरणें सांगितलीं त्यां विषयीं जर चांगला खोल विचार नकेला तर त्यांतील **मारतां, लावतां, घालतां, करतां,** हीं प्रथम दर्शनीं **तां**प्रत्ययान्त वर्तमानकालवाचक धातुसाधितेंशीं दिसतात; परंतु अंमळ विचार केला असतां लागलेंच ध्यानास येतें कीं हीं या प्रकारचीं धातुसाधितें नव्हत; कारण, जर हीं वर्तमानकालवाचक धातुसाधितें ह्मणावीं, तर यांस तृतीयान्त कर्ता आहे; व यां पासून वर्तमानकालाचाही स्पष्ट बोध होत नाहीं; यां पासून भूतकाल ध्वनित होतो; आतां जर भूतकालवाचक क्रियापदें मानावीं, तर **तां**प्रत्ययान्त धातुसाधितें कदापि भूतकालवाचक असत नाहींत; तेव्हां ही दुर्निवार अडचण आहे; इच्या दूरीकरणास वर जो नियम सांगितला त्या शिवाय दुसरी सयुक्तिक कल्पना मला दिसत नाहीं. 'धन्यानें हाक **मारतांच**', 'एकानें आंब्यास हात **लावतांच**', 'त्याणें पिशवींत हात **घालतांच**', 'राजानें आज्ञा **करतांच**', ह्मणजे—हाक **मारिली तोंच**, हात **लावला तोंच**, हात **घातला तोंच**, आज्ञा **केली तोंच**; यांत **तोंच** या साधारण शब्दाच्या योगानें—**मारली, लावला,** यांतील **ला** प्रत्ययाचा लोप होऊन—**मार, लाव,** हीं रूपें अवशिष्ट राहिलीं, आणि **तोंच** यांतील **तोंच्या** स्थानीं **तां** आदेश होऊन—**मारतांच, लावतांच,** अशीं रूपें झालीं आहेत. **घालतांच, करतांच** यांतहि हाच नियम उमगतो; पाहा,—**तोंच** याच्या योगानें **घातला, केली,** यांतल्या **ला** प्रत्ययाचा लोप झाला असतां तन्निमित्त जें **घाल, कर,** या धातूंस **घात, के,** एतदादेशरूप कार्य त्याचाहि नाश होऊन—**घाल, कर,** हीं जीं मूळचीं रूपें तींच राहिलीं; कारण—निमित्ताभावेनैमित्तिकस्याप्यभावः—ह्मणजे निमिताचा नाश झाला असतां नैमित्तिक कार्याचाहि नाश होतो, असा न्याय आहे; तेव्हां—**घाल, कर,** अशीं रूपें अवशिष्ट राहून **घालतांच, करतांच,** अशीं रूपें झालीं असें जाणावें.

अनुक्रमणिका

नियम २४.

६१० समासघटित शब्दांत, मध्येंच उभयान्वयी अव्ययें आणून एका पदांचा अन्वय, या अव्ययानें निराळे पडले जे शब्द, त्यांशीं लावूं नये ; जसें—'सन्मार्ग आणि सद्धर्मप्रवर्तक जे आचार्य', हा वाक्यांश— 'सन्मार्गसद्धर्मप्रवर्तक जे आचार्य', अथवा,—'सन्मार्गप्रवर्तक आणि सद्धर्मप्रवर्तक जे आचार्य', असा पाहिजे; अथवा— 'सन्मार्ग आणि सद्धर्म यांचे प्रवर्तक जे आचार्य', असा पाहिजे; कारण, **आणि** हें उभयान्यी अव्यय मध्यें आल्या मुळें **सद्धर्मप्रवर्तक** या समासघटित शब्दांतील **प्रवर्तक** या पदाचा अन्वय **सन्मार्ग** याशीं होत नाहीं.

ज्ञापक, वाचक, बोधक, सूचक, दर्शक, विशिष्ट, पूर्वक, इत्यादि प्रकारचे शब्द, वाक्यांत अनेक शब्दांस जोडायाचे असतां सर्वांस पृथक् पृथक् नजोडितां, अथवा, उभयान्वयी अव्यय मध्यें आणून शेवटल्या शब्दास नजोडितां, त्या सर्व शब्दांच्या पुढें **हा** किं० **असा** या सर्वनामाचा प्रयोग करून त्या शब्दांतून जी ज्यास अनुकूल विभक्ति असेल तींत तें सर्वनाम आणून, त्याशीं हे शब्द जोडावे, हा उत्तम पक्ष. समयविशेषीं ते दोन शब्द असले तर यांतून एकेका शब्दांशीं हे शब्द पृथक् पृथक् जोडिले असतां, अथवा, ते एका योग्यतेचे प्रौढ संस्कृत शब्द दोहों पेक्षां अधिक असले तर्‍ही त्यांस समासांत आणून मग त्यांशीं हे शब्द जोडिले असतां, चिंता नाहीं; परंतु तिहीं पेक्षां अधिक शब्द असतां वर नियम सांगितला तोच चालवावा. उदाह०— 'संबंध अथवा अधिकरणवाचक', अशी योजना करूं नये;—'संबंधवाचक अथवा अधिकरण-

वाचक', अशी योजना करावी; अथवा, 'संबंध अथवा अधिकरण याचे वाचक', अशी योजना करावी. मध्यें समुच्चयार्थवाचक अव्यय असल्यास–'संबंधाधिकरणवाचक, अशीहि योजना करावी. परंतु प्रथम जी योजना दाखविली ती केवळ अशुद्ध जाणावी; तसेंच– 'काम, क्रोध, मोह, आणि मत्सरप्रेरित जीं जीं कर्मे', ही योजना अशुद्ध जाणावी. 'कामक्रोधमोहमत्सरप्रेरित जीं जीं कर्मे', अशी योजना असावी; अथवा,–'काम, क्रोध, मोह, आणि मत्सर, यांनीं प्रेरित जीं जीं कर्मे', अशी शुद्ध मराठी योजना असावी. 'सौजन्य, सौंदर्य, सरलता, किंवा नम्रता-विशिष्ठ पुरूष कोणत्याहि कुळांत जन्मलेला असला, तथापि तो प्रीतीस पात्र होतो', ही वाक्यरचना अशुद्ध जाणावी– 'सौजन्य, सौंदर्य, सरलता, किंवा नम्रता, येणेंकरून विशिष्ट पुरूष इ०', अथवा,–सौजन्य, सौंदर्य, सरलता, किंवा नम्रता, यांतून कोणत्याही गुणानें विशिष्ट पुरूष इ०', अशी वाक्यरचना असावी. 'आदर, स्नेह, आणि नम्रतापूर्वक जें भाषण', अशी योजना असूं नये;–'आदर, स्नेह, आणि नम्रता, एतत्पूर्वक जें भाषण', अथवा,–आदरस्नेहनम्रतापूर्वक जें भाषण, अशी योजना असावी.

नियम २५.

६११ रूढींत असल्या शिवाय बहुधा प्राकृत आणि संस्कृत शब्दांचा परस्परांशीं समास करूं नये; 'घरप्रवेश', 'गांवप्रदक्षिणा', 'हत्तीचर्म', 'टोळउंदीरअग्निउपद्रव', 'श्यामरक्तरंग', 'आम्लकटुखारटऔषध', 'ढालतरवारबंदूकबाणादि शस्त्रें', इ० असा संस्कृत आणि प्राकृत शब्दांचा

अनुक्रमणिका

विजातीय संकर कदापि करूं नये; हे शब्द–'गृहप्रवेश', 'ग्रामप्रदक्षिणा', 'हस्तिचर्म अ० गजचर्म', 'टोळ, उंदीर, अग्नि, यांचा उपद्रव', अ०, 'शलभमूषकाग्न्युपद्रव', 'काळा आणि तांबडा रंग', अ०, 'श्यामरक्तवर्ण', 'आंबट, कडू, आणि खारट असें औषध', अ०, 'आम्लकटुक्षारौषध', 'ढाल, तरवार, बंदूक, बाण, आदिकरून शस्त्रें',– असे असले पाहिजेत.

राज्यकारभार, बायकोमनुष्य, बापजन्मीं, गांवदेवी, पायमार्ग, मालधनी, राजदरबार, राजवाडा, अंगमर्दाई, इत्याद्यनेक शब्द रूढींत आल्या मुळें त्यांज वर आतां दुःसह विजातीयसंकरत्वाची छाया मारत नाहीं; हे, आणि यांच्या कोटींतले सहस्रशः आणखी शब्द, आतां कर्णास सुसह झाले आहेत; ह्मणोन वरल्या नियमांत जो निषेध केला आहे, तो अशा रूढींत आलेल्या शब्दां विषयीं लागू होत नाहीं.

नियम २६.

६१२ वाक्यां मध्यें शब्दांची मागें पुढें योजना करायाची ती ज्या ज्या शब्दांशीं ज्या ज्या शब्दांचे यथार्थ अन्वय असतात, त्या त्या प्रमाणें करावी; ह्मणजे, प्रथम कर्ता, त्या पुढें कर्म, आणि शेवटीं क्रियापद, असें असावें; विशेषण, अथवा विशेषणरूप शब्द, त्याच्याच विशेष्याच्या मागें असावा; धातुसाधितें प्रथम येऊन पुढें शेवटीं त्याच वाक्यांतील अथवा वाक्यांगांतील मुख्य जें क्रियापद तें यावें; संबंधी सर्वनाम प्रथम येऊन तदनंतर त्याचें प्रतिसंबंधी जें दर्शक सर्वनाम असेल तें यावें; असे अनेक नियम आहेत. उदाह०–'गणू पोथी लिहितो'; 'अशा विद्वान मनुष्यानें जर या शाळेचें काम आस्थापूर्वक चालविलें, तर

विद्यार्थी लौकर तयार होतील'; 'तो आतांच येऊन जेऊन गेला'; जो याचक जें जें जितकें मागे, त्यास तो उदार गृहस्थ तें तें तितकें देई, असा त्याचा या गांवांत मोठा लौकिक आहे'.

हा नियम फार उपयोगी आहे, याज वर शिकणाराचें फार लक्ष असावें. या नियमास आणखी गौण नियम, व बाधकेंहि पुष्कळ आहेत, त्यांच्या विचारांत पडलें असतां ग्रंथविस्तार फार होईल, ह्मणोन या प्रसंगीं इतकेंच सांगतों कीं आपल्या अभिप्रायानुरूप वाक्यरचना करण्याचें ज्यास अगत्य वाटत असेल, त्याणें या नियमा वर मुख्यत्वें करून लक्ष द्यावें.

या प्रमाणें वाक्यरचने संबंधी जे कित्येक मुख्य नियम प्रसंगीं सुचले ते मीं एथें लिहिले.

खंड ७.

लेखनपद्धति.

६१३ मराठी मध्यें गद्यात्मक ग्रंथ लिहिण्याची विशेष प्रवृत्ति नव्हती; महाराष्ट्र देशांत जे जे ग्रंथकार आणि कवि झाले त्यांनीं ओंव्या, श्लोक, आर्या, अभंग, पदें, सवाया, कटिबंध, साक्या, लावण्या, इत्याद्यनेक प्रकारचे छंद बांधून पद्यात्मक ग्रंथ पुष्कळ लिहून ठेविले आहेत, परंतु पूर्वोक्तप्रकारें ग्रंथ लिहिण्याची अलिकडेस नूतन प्रवृत्ति पडली आहे; आणि मागल्या पंचवीस वर्षांत, जितके व्हावे तितके तर नाहींत, परंतु बरेच ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, व पुढें उत्तरोत्तर अधिकाधिक होत जातील असा संभवहि होतो, ह्मणोन या ग्रंथाच्या शेवटीं लेखनपद्धती विषयीं कांहीं उपयुक्त नियम सांगणें आवश्यक

अनुक्रमणिका

आहे; कारण, मराठी लिहिण्यांत अद्यापि अव्यवस्था फार आढळत्ये; ती मोडून टाकून सर्वांची लेखनपद्धति सारखी करण्या विषयीं प्रयत्न करणें फार इष्ट आहे.

१ पंक्तींत शब्द तोडून निरनिराळे लिहावे.

२ समासघटित शब्द एक जाणून एका पंक्तींत अव्यवहित असावे; ह्मणजे, ज्या शब्दांचा समास होतो ते पंक्तींत तोडून लिहूं नयेत ; जसें–विटीदांडू, काळमाजर, तांबडमाती, भक्तवत्सल, सर्वगुणैकरत्नाकर, अखंडलक्ष्म्यलंकृतैश्वर्यविराजित, इ०.

३ विभक्त्यंत शब्दां प्रमाणें सामान्यरूपहि तोडून निराळें लिहावें; जसें–ब्र्या मनुष्यानें, झाडाच्या डाहळी वर, मज जवळ, त्या पुढें.

बहुधा सर्वत्र सामान्यरूप पुढल्या शब्दयोगी अव्ययाशीं जोडून लिहिण्याचा परिपाठ पडला आहे; परंतु या व्याकरणाच्या नियमा प्रमाणें, संबोधना प्रमाणें सामान्यरूप हें एक विभक्तीचें नववें रूप मानिलें आहे, ह्मणोन ज्यास हा नियम मान्य असेल त्याणें वरील नियमास अनुसरावें.

जर सविभक्तिक विशेष्याच्या योगानें जें विशेषणाचें सामान्यरूप होतें तें त्या विशेष्याशीं जोडून लिहिण्याचा परिपाठ नाहीं, तर मग शब्दयोगी अव्ययाच्या योगानें झालें जें सामान्यरूप तेंच त्या अव्ययाशीं जोडून लिहिण्यास विशेष हेतु कोणता? अस्तु, एथें विकल्प आहे, परंतु हा विकल्प दूर करून सर्वांची लिहिण्याची एक पद्धति पडली असतां बरें आहे.

४ **च, हि, ना,** हीं जीं एकाक्षरी शुद्ध शब्दयोगी अव्ययें तीं तोडून लिहूं नयेत; ज्या शब्दांशीं यांचा योग असतो त्यांशीं जोडून लिहावीं; जसें–'चतुष्पदांत हत्तीसच सोंड आढळत्ये', 'तूंहि ये', 'ती तेथें जात्येना'!, इ०.

५ तृतीयार्थदर्शक जें **करून** हें शब्दयोगी अव्यय, तें तृतीयान्त शब्दांशीं जोडून लिहिण्याचा परिपाठ पडला आहे; जसें—तेणेंकरून, बाणेंकरून, त्यांहींकरून, यांहींकरून इ०.

६ वाक्यां मध्यें जे सावधारण व सांकेतिक शब्द असतील, ह्मणजे ज्या शब्दां कडेस वाचणाराचें लक्ष विशेष असावें असा लिहिणाराचा अभिप्राय असेल, ते शब्द चालत्या अक्षरांहून कांहीं भिन्न तऱ्हेनें लिहावे; जसें—'बहुधा **सासू** आदिकरून शब्दांचीं **सासवेला**, **सासवेस**, अशीं रूपें लिहिण्याचा प्रघात पडला आहे'.

७ **असा**, **अहो**, **अरे**, **अगे**, हे शब्द इतर शब्दांशीं जुळून लिहिले असतां, यांतील अचा लोप होतो; जसें—'तो जातोसा दिसतो', 'ती आजारीशी दिसत्ये', 'गडेहो तुह्मीं असें करूं नका', 'भवरे तरा बापहो', 'बाईगे माझा धंदा', इ०.

भाग १.

विरामचिन्हें.

६१४ अलिकडेस जे मराठी भाषेंत ग्रंथ होतात, त्यांत इंग्लिश भाषेंतील ग्रंथांच्या नियमां प्रमाणें विरामचिन्हें देण्याचा प्रघात पडला आहे; आणि, वाक्यार्थ स्पष्ट होण्या करितां या चिन्हांचा उपयोग फार आवश्यक आहे, यांत अगदीं भ्रांति नाहीं; ह्मणोन त्यां विषयींचे जे नियम आहेत ते एथें संक्षेपरूपानें तरीं सांगितले पाहिजेत. परंतु ते सांगायाच्या पूर्वीं विरामचिन्हें दाखविलीं पाहिजेत.

विरामचिन्हें.	संज्ञा.
,	स्वल्पविराम.
;	अर्धविराम.
:	अपूर्णविराम.
.	पूर्णविराम.
?	प्रश्नचिन्ह.
!	उद्गारचिन्ह.
—	संयोगचिन्ह.
“ ”	अवतरणचिन्ह.
( )	कौंस.

६१५ जें वाक्य सरळ आहे, ह्मणजे ज्यांत दुसरीं वाक्यें अथवा वाक्यांगें नाहींत, त्यांत विरामचिन्हें लिहिण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. जसें—वाघ रानांत असतो. गाई पेक्षां ह्मैस अधिक दूध देते. राजा न्यायेंकरून प्रजेचें पालन करितो. या आपल्या महाराष्ट्र देशांत व्याकरणरीतीनें शुद्ध लिहिण्याची चाल आतां आतां पडत चालली आहे.

स्वल्पविराम.

६१६ सरळ वाक्यांत जर दुसरीं वाक्यें अथवा वाक्यांगें आलीं, तर त्या वाक्यांच्या अथवा वाक्यांगांच्या पूर्वी व शेवटीं स्वल्पविराम घातले पाहिजेत. जसें—‘एक मुलगा, आपल्या आंधळ्या बापास हातीं धरून, भीक मागत होता’. ‘मनुष्यानें जर आपल्या सामर्थ्याचा विचार नकेला, आणि एकाद्या कार्यास हात घातला, तर तो बहुधा फसल्या वांचून राहणार नाहीं’.

अनुक्रमणिका

यांत प्रथम उदाहरणांत–'एक मुलगा भीक मागत होता', हें सरळ वाक्य, यांत–'आपल्या बापास हातीं धरून,' हें दुसरें अपूर्ण वाक्य अथवा वाक्यांग मध्यें आलें आहे, तेव्हां याच्या आरंभीं व शेवटीं स्वल्प विराम देऊन यास निराळे पाडिलें आहे. कोणी हें सर्व सरळ वाक्य मानून हे स्वल्प विराम न दिले तरीं विशेष बाध येतो असें नाहीं. याच प्रमाणें दुसरें उदाहरण जाणावें.

[अ] जर वाक्या मध्यें दोन तीन अथवा अधिक कर्ते, अथवा कर्में, अथवा धातुसाधितें, अथवा क्रियापदें, अथवा कोणत्याहि एका जातीचे शब्द एका पुढें एक आले, तर त्यां मध्यें स्वल्पविराम घालून ते शब्द निरनिराळे दाखवावे; जसें– 'रामा, हरी, गोपाळा, यमुना, आणि इच्या बाप गोपाळशेट, इतकीं मनुष्यें जेवायास आलीं होतीं', 'म्यां काल एका वाडींत कुत्रा, मांजर, आणि कोंबडा, यांस झुंजतां पाहिलें', 'त्या मुलीस लिहितां, वाचतां, गातां, नाचतां, आणि शिवतां येतें', 'तो गेला, फसला, मेला, तरीं मीं त्याची गोष्ट मना वर घेणार नाहीं,' 'तो मोठा शहाणा, विचारी, आणि विद्वान् आहे'.

[आ] या प्रकारच्या दोहों शब्दां मध्यें जर उभयान्वयी अव्यय आलें तर स्वल्पविरामाचें प्रयोजन नाहीं. जसें–'बाळा आणि हरी जेवायास बसले आहेत', 'साळू आणि मनी फुलें आणायास गेल्या', 'तो बारीक आणि सुवाच्य अक्षर लिहितो', 'तो एथून तेथें जातो आणि येतो'.

[इ] जर या उभयान्वयी अव्ययाच्या योगानें निरनिराळीं सरळ वाक्यें, अथवा वाक्यांगें पडत गेलीं, तर तीं दाखविण्या करितां स्वल्पविराम दिले पाहिजेत; जसें–'मीं तेथें गेलों, आणि तूं तेथें नसलास, तर मग मात्र कठीण', 'इतका तिणें विलाप केला, परंतु त्यास दया आली नाहीं',

'पृथ्वी निराधार आहे ह्मणतां, तर मग ती पडत कां ना-हीं?', 'माझें सर्वस्व गेलें, किंबहुना प्राणहि गेला, तथापि मीं असत्य बोलणार नाहीं'.

[ई] वाक्यारंभीं अथवा वाक्यांत कोठेंहि संबोधन आलें, तर त्याच्या पुढें अथवा त्याच्या मागें पुढें स्वल्पविराम देऊन त्यास निराळें दाखवावें; जसें—'देवा, मला क्षमा कर', 'बाळा, तूं काल शाळेंत कां गेला नाहींस?' 'रावसाहेब, आपण मज वर दया करावी', 'मीं त्यास ह्मणालों, गड्या, तूं असें करूं नको'.

[उ] वाक्यांत एकाद्या शब्दा पुढें जर त्याचाच पर्यायशब्द आला, तर त्याच्या मागें व पुढें स्वल्पविराम दे-ऊन तो पर्यायशब्द निराळा दाखवावा हें बरें; जसें—'मुस-लमानांचा पैगंबर, महंमद, याची जन्मभूमि मक्का', 'मरा-ठ्यांनीं त्या काळीं आपली मोठी भयंकर तोफ, महाकाळी, किल्ल्या वर चढविली'.

हा नियम सर्वत्र चालतो असें नाहीं; 'माझा भाऊ विश्व-नाथ, यास जर तूं पाहशील, तर तूं अधिक विस्मय करशील'—असेंहि लिहिण्याचा प्रचार आढळतो.

[ऊ] जर हें अव्यय, किंवा संबंधी सर्वनाम, जर एका-द्या मोठ्या वाक्याच्या आरंभीं असलें, तर अनुक्रमें त्याचें प्रतिसंबंधी जें तर हें अव्यय, किंवा पुरुषवाचक सर्वनाम, अथवा दर्शक सर्वनाम, यांच्या मागें स्वल्पविरामचिन्ह दिलें पाहिजे; जसें—'ज्या घोड्या वर काल मीं स्वार झालों होतों, तोच आज घेऊन ये', 'जशी त्याणें आपल्या भावा-ची अवस्था केली, तशीच तो तुमची करील', 'या प्रक-रणांत जर तुह्मीं मला बोलूं देत नाहीं, तर मग तुह्मी आ-पलें संभाळा'.

[ऋ] लांब वाक्य असून जर त्यांत वर्तमानकालवाचक भूतकालवाचक, पूर्वकालवाचक, अथवा विधिवाचक धातुसाधितें आलीं, तर त्यां पुढें स्वल्पविराम द्यावा हें बरें; जसें 'शिवाजी आपल्या बराबर दहा हजार स्वार घेऊन नर्मदा उतरत असतां, त्याची आणि औरंगजेबाच्या स्वारांची गांठ पडली', 'त्याणें पुण्यास जाऊन, आपणा करितां दरबारांत इतकी मेहनत केली असतां, आतां त्यास या कामांतून दूर करावें, हें मला ठीक दिसत नाहीं', 'हें वर्तमान ऐकतांच, त्यांहीं आपल्या हाता खालच्या सर्व मानकरी लोकांस बलावून, तुह्मीं आतां लागलीच आपली तयारी करून मज बराबर निघावें, असें त्यांस सांगितलें'.

[ॠ] कीं हें अव्यय वाक्यांत असतां याच्या मागें अथवा पुढें स्वल्पविराम देणें, तो बहुधा अर्थास अनुकूल आणि कानास गोड लागे, अशा समजुतीनें द्यावा; जसें—'तो ह्मणाला, कीं आतां जर या कामांत तुह्मां कडून सुस्ती झाली, तर मज कडेस दोष नाहीं', त्या कामाचा त्याणें उलगडा केला, तो असा कीं, ज्याणें ही मसलत प्रथम दिली, त्याणें तें नुकसान भरावें'.

[ऌ] दुसऱ्याचा स्वल्प लेख अथवा ह्मणणें जर वाक्यांत आणायाचें असलें, तर त्या लेखाच्या अथवा ह्मणण्याच्या आरंभीं व शेवटीं स्वल्पविराम द्यावा; जसें-'साहेब ह्मणतात, तुम्हीं येऊं नका, मींच येईन'.

अर्धविराम.

६१७ जेथें एकादें मोठें सरळ वाक्य संपतें, आणि पुढें दुसऱ्या वाक्यास आरंभ होतो, अथवा एकादें मोठें

अनुक्रमणिका

लांब वाक्य आहे, आणि त्यांत एका अर्थास मुख्य करून त्याचे सोईवार विभाग करून तें वाक्य जोडायाचें असलें, तर हीं विभक्त केलेलीं जीं निरनिराळीं त्याच्या पोटांतलीं वाक्यें, त्यां पुढें अर्धविराम द्यावा; जसें–'ईश्वराची भक्ति मनानें केली पाहिजे; मनाचें अर्पण नकरितां नुसत्या द्रव्याचें अर्पण केल्यानें देव प्रसन्न होईल असें दिसत नाहीं; आणि या प्रकारें महंतांचीं वाक्येंही आहेत; परंतु त्यांचा लोक अगदीं विचार करित नाहींत'.

अपूर्णविराम.

६१८ एकाद्या लांब आणि पूर्ण वाक्यांत सरळ वाक्यरूपानें अथवा वाक्यांग रूपानें विभाग पडले असतात, तेथें जेव्हां एकाद्या उक्तार्थाचें समर्थन करण्यास कांहींसें दृष्टांतरूपवाक्यांतर प्रविष्ट करावें लागतें, तेव्हां अशा वाक्यांतराच्या पूर्वी अपूर्णविराम द्यावा लागतो; उदाह०–'ईश्वरभक्तिपरायण साधु सर्व देशांत होऊन गेले आहेत; ते सारे असेंच म्हणतातः दुराचरणानें देवास क्रोध येतो, आणि सदाचरणानें देव प्रसन्न होतो; ह्मणोन हीच गोष्ट प्रमाण'.

हें अपूर्णविरामाचें चिन्ह बहुधा कोठे आढळत नाहीं, याच्या ठिकाणीं या ग्रंथांत बहुधा–असें संयोगचिन्ह मांडलें आहे. कोणीं याच्या स्थानीं स्वल्पविराम देतात, व कोणीं अर्धविरामहि देतात; परंतु यांत सूक्ष्म भेद वर सांगितल्या प्रमाणें आहे तो शिकणारांनीं लक्षांत ठेविला असतां बरें आहे.

पूर्णविराम.

६१९ उद्देश्यार्थाचें यथेष्ट विधान होऊन त्या अर्थाचा संबंध नराहतां वाक्य संपतें तेथें पूर्णचिन्ह करावें; जसें–

रामा आला. सावित्रीनें पाणीं आणिलें. एका कुळंब्यानें एक हरण धरिला, आणि तो त्यास मारित होता, इतक्यांत एका गृहस्थानें तो त्या जवळून विकत घेतला. पुढें हें त्याचें सदाचरण त्यास लौकरच फळास आलें. ही कथा फार लांब आहे म्हणोन मीं एथें सांगत नाहीं'.

प्रश्नचिन्ह.

६२० ज्या वाक्यांत प्रश्न करायाचा तें वाक्य जेथें संपतें तेथें प्रश्नचिन्ह मांडावें; जसें–'तूं कोण आहेस?', तूं कोठें जातोस?', 'तुम्हीं मला इतकें सांगतां, तर मग तुम्हींच कां करित नाहीं?'

उद्गारचिन्ह.

६२१ ज्या शब्दांत, अथवा ज्या वाक्यांत, हर्षशोकविस्मयादि मनोविकारांचें उल्लेखन असतें, त्या शब्दा पुढें, अथवा त्या वाक्याच्या शेवटीं, उद्गारचिन्ह मांडावें; जसें– अहा!. कायहो मौज ही!. अरे देवा, या दुष्टांनीं आमची कशी विटंबना मांडली आहे! रावसाहेबां कडेस काल लग्नाचा केवढा समारंभ जमला होता!.

[अ] मनोविकाराचें बाहुल्य दाखवायाचें असतां समयविशेषीं दोनतीनहि उद्गारचिन्हें लिहितात; जसें–'दुष्टांपासून अपकार होणें हा स्वभावच होय, परंतु अशा साधूंपासून इतकी अन्यायाची गोष्ट झाली, यांत किती आश्चर्य आहे तें पाहा!!!'.

संयोगचिन्ह.

६२२ एकाच शब्दांतील कांहीं अक्षरें लिहून ओळ

संपल्या मुळें बाकीचीं अक्षरें पुढल्या ओळीशीं जोडायाचीं असतां, अथवा एकादा मोठ्या वाक्यांत मध्येंच एकादें वाक्य अथवा वाक्यांग प्रविष्ट करायाचें असतां, अथवा उ-क्तार्थ वाक्यांतरें करून दाखवायाचा असतां, त्या दोहों अक्षरां मध्यें, आणि त्या प्रविष्ट वाक्याच्या मागें, अथवा कोठें मागें आणि पुढें, संयोगचिन्ह मांडितात. जसें–संसारोपयोगी जे पदार्थ. तुकोबाहि असेंच ह्मणतो,–तीर्था जाउनियां काय तुवां केलें चर्म प्रक्षाळिलें वरच्यावरी. तुकोबाहि ह्मणतो–जित्या पित्रा नमिळे अन्न, मेल्या वरी पिंडदान–मग तुमचेंच अज्ञान प्रमाणभूत मानावें हें आह्मा-स योग्य वाटत नाहीं.

यांत पहिल्या उदाहरणांत, तुकोबा जें काय ह्मणतो तें या संयोगचिन्हानें लागलेंच त्या पुढें दाखविलें जातें. दुसऱ्या उदाहरणांत या दोन संयोगचिन्हांनीं तुकोबाच्या ह्मणण्याचा ग्रंथकाराच्या वाक्यांत मध्येंच संग्रह दाखविला जातो, असा यांत भेद जाणावा.

अवतरणचिन्ह.

६२३ वाक्यांत अथवा ग्रंथांत वांक्यांतराचा, अथवा ग्रंथांतरांतील एकादा वेंचा घेऊन त्याचा, संग्रह कर्तव्य असतां, तें वाक्यांतर अथवा तो वेंचा " " या अवतरणचि-न्हाच्या मध्यें आणावा; जसें–'एथें जो **ऊहापोह** शब्द योजिला आहे, त्याचा हा लाक्षणिक अर्थ जाणावा; याचा मूळ अर्थ मराठी कोशांत असा लिहिला आहे कीं "यथा-कथंचित् लिहिलेलें किंवा ऐकलेलें जें श्लोक, वाक्य, किंवा कोणेकाचें भाषण, इ० त्याचा यथास्थित सुसंगतपणा क-

अनुक्रमणिका

रायासाठीं इकडचें पद तिकडे, तिकडचें पद इकडे, किंवा कांहीं अंश गाळावा, कांहीं नवें आपलें पदरचें आंत घालावें, अशी विचारपूर्वक जी योजना तो", या वर वाचणारानें मुख्य दृष्टि ठेविली असतां इतका वादविवाद होणार नाहीं'.

ग्रंथांतरांतून एकादें मोठें अवतरण केलें असलें तर बहुधा तें जाणावया करितां त्याच्या आरंभा पासून शेवट पर्यंत दर पंक्तीच्या आरंभीं " " असें चिन्ह करितात. उदाहरणा करितां लहानसें अवतरण असलें, तर '' या प्रमाणें एक एक उलटा स्वल्प विराम द्यावा ह्मणजे पुरे.

कौंस.

६२४ एकाद्या पूर्ण वाक्यांत शब्दांचा क्रम यथास्थित चालत असतां लिहिणारास मध्येंच कांहीं नवें सांगायाचें सुचलें, आणि तें लिहणें तेथें गौण असलें, तर तें कौंसांत घालितात; जसें—'कित्येक अकारान्त स्त्रिलिंग नामांचें अनेकवचन आकारान्त होतें, (पाहा, पृ० ४४ वें, लेख १४० वा.) परंतु तीं नामें जर धातू पासून व्युत्पन्न झालेलीं आणि द्व्यक्षरी असलीं, तर त्यांच्या अनेकवचनीं बहुधा ई विकार होतो (पाहा. पृ० ४५, ले० १४१).

या प्रमाणें संक्षेपेंकरून लेखनपद्धती विषयींचे मुख्य मुख्य नियम सांगितले.

खंड ८.

वाचनाविचार.

६२५ मागल्या प्रकरणांत लेखना विषयीं जसे नियम सांगितले तसे वाचना विषयीं सांगतां येत नाहींत; कांकीं

अनुक्रमणिका

वाचनक्रिया स्वाधीन पडली; तथापि तिज विषयीं कांहीं सूचना करणें इष्ट होय. वाचन ही एक कला होय; तिचें मुख्य फल हें कीं, ग्रंथकाराचा अथवा लिहिणाराचा जो अभिप्राय तो ऐकणाराच्या मनांत व्याख्यानादि साधनांतरास नअनुसरतां यथास्थित, व शीघ्र, भरून देणें. ही फलसिद्धि वाचनकालीं विराम, स्वराघात, उदात्तानुदात्तादि स्वरभेद, यांजवर नीट लक्ष दिल्या वांचून यथास्थित होत नाहीं; इतकेंच नाहीं, परंतु जर यां विषयीं दुर्लक्ष केलें तर समयविशेषीं अर्थाचे अनर्थहि होतात. या विषयीं एक दंतकथा आहे, तिचा दृष्टांत बहुधा लोकांत वाचण्या पासून अर्थाचा अनर्थ झाला ह्मणजे देत असतात; तिणें करून शुद्ध व चांगल्या रीतीनें वाचण्याचा उपयोग जसा शिष्यांच्या मनांत ठसेल, तसा त्यांच्या गुरूच्या मोठ्या पांडित्यानें ठसणार नाहीं. ह्मणोन ती कथा एथें सांगतों;—पूर्वीं कोणा एका न्यायाधीशानें एका चोरास धरून त्याज वर अपराध लागू केला, आणि त्यास योग्य शिक्षा देऊन, पुढें त्याणें अशी वर्त्तणूक करूं नये ह्मणोन त्याज जवळून मुचलका लिहून घेतला कीं, 'मीं आज पासून चोरी करणार नाहीं केली असतां मला मारावें'. तोच चोर त्या उपरांत पुनः एकदां चोरीच्या अन्यायांत सांपडला; त्या काळीं त्या न्यायाधीशानें त्याचा मुचलका आणवून त्यास तो न्यायसभेंत वाचायास सांगितला, तेव्हां त्याणें त्या सभे पुढें या प्रमाणें वाचला—'मीं आज पासून चोरी करणार, नाहीं केली तर मला मारावें'. यांत त्याणे **करणार** या शब्दा पुढें विराम घेऊन सर्व सभासदांस हंसविलें, आणि कायद्या बरहुकूम आपणास शिक्षा लागू होत नाहीं ह्मणोन न्याया-

धीशा बराबर तकरार करूं लागला. सारांश, वाचण्यांत विरामादि जीं वाचनाचीं **अंगें** त्यांज वर लक्ष देणें फार आवश्यक आहे.

६२६ ग्रंथांत अथवा लेखांत जेथें **स्वल्पविराम** असेल तेथें किंचित्* विराम घ्यावा, आणि पुढें वाचूं लागावें; जसें—'रामा, गोपाळा, आणि सावित्री, हीं जर माझ्या घरीं आलीं, तर मीं त्यांचा मोठा सत्कार करीन', यांत—रामा, गोपाळा, आणि सावित्री, या शब्दां पुढें स्वल्प विराम घेऊन पुढें **आलीं** या शब्दा पुढें तितकाच विराम घेऊन हें वाक्य वाचावें. 'मनुष्यानें जर आपल्या सामर्थ्याचा विचार नकेला, आणि एकाद्या कार्यास हात घातला, तर तो बहुधा फसल्या वांचून राहणार नाहीं'. या वाक्यांत **नकेला**, आणि **घातला**, या शब्दां पुढें स्वल्पविराम घेऊन हें वाक्य वाचावें.

६२७ जेथें **अर्धविराम** असेल, तेथें स्वल्पविरामाच्या दुप्पट विराम घेऊन वाचावें; जसें—'तूं जें मज जवळ बोललास, तें त्याच्या भावानें त्यास जाऊन सांगितलें; त्याणें तें रावजींच्या काना वर घातलें; बरें, रावजी इतके थोर गृहस्थ ह्मणवितात, त्यांणीं ह्मटलें असतां ही गोष्ट पोटांत ठेवायाची होती; तसें नकरितां त्याणीं ती गोष्ट या नारदमुनीस सूचविली; मग हा अनर्थ कसा झाला ह्मणून पुसतोस हें आश्चर्य'. या वाक्यांत—**सांगितलें**, **घातलें**, **होती**, आणि **सुचविली**, या शब्दां पुढें स्वल्पविरामाच्या दुप्पट काळ घेऊन वाचावें.

---

* वाचणारा जितक्या त्वरेनें वाचित असेल, तितक्याच त्वरेनें **एक** हा शब्द उच्चारायास जितका काळ लागेल, तितका काळ.

अनुक्रमणिका

६२८ जेथें **पूर्णविराम** असेल, तेथें तें वाक्य संपलें असें जाणून यथेच्छ विराम घ्यावा; जर पुढलें वाक्य आरंभायाचें असलें तर अर्धविरामाच्या दुप्पट काळ एथें विराम घेऊन पुढें वाचावें. 'एका कुळंब्यानें एक हरण धरिला; आणि तो त्यास मारित होता, इतक्यांत एका गृहस्थानें त्यास त्याज जवळून विकत घेतलें. पुढें हें त्याचें सदाचरण त्यास लौकरच फळास आलें. ही कथा फार लांब आहे ह्मणोन मीं एथें आतां सांगत नाहीं'. यांत तीन पूर्ण वाक्यें आहेत, तीं—**घेतलें**, **आलें**, आणि **नाहीं**, या शब्दांच्या शेवटीं संपत गेलीं, ह्मणोन यां पुढें यथेच्छ विराम घ्यावा; अथवा, **धरिला** या पुढें जितका विराम घेतला त्याच्या दुप्पट यां पुढें विराम घेऊन वाचित जावें.

६२९ ज्या वाक्यांत **प्रश्नचिन्ह** असेल, तें वाक्य दुसऱ्यास प्रश्न करतांनां ज्या स्वरभेदानें बोलतों, त्याच स्वरभेदानें वाचावें, जसें— 'तो कोण तेथें बसला आहे आहे?' 'तूं कोठें जातोस?', 'ही काय रावजीची कन्या?'.

६३० जेथें **उद्गारचिन्ह** असतें, तेथें हर्षशोकविस्मयादि जे मनोविकार त्यांचें उद्घाटन कर्तव्य असतां ज्या स्वरभेदानें बोलतों त्याच स्वरभेदानें तें वाक्य वाचावें; जसें–'हरहर!', 'कायहो अनर्थ हा!', 'रावसाहेबां कडेस काल लग्नाचा केवढा समारंभ होता!', 'अरे देवा, या दुष्टांनीं आमची कशी विटंबना मांडिली आहे!'.

६३१ वाक्यांत अनेकार्थदर्शक अनेक शब्द असतात, त्यांतून एकाद्या अर्था विषयीं कांहीं विशेष विधान कर्तव्य असलें, अथवा विशेषेंकरून त्या विषयींच कांहीं सांगायाचें अथवा पुसायाचें असलें, तर जसा बोलण्यांत

तसा वाचण्यांतहि तदर्थदर्शक शब्दा वर स्वराघात द्यावा, ह्मणजे तो शब्द त्या वाक्यांत विशेष नेट देऊन वाचावा. हें आतां उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखवितों.

प्रश्न.	उत्तर.
तूं आज किल्यांत चालत जाशील ?	नाहीं, माझा भाऊ जाईल.
तूं **आज** किल्यांत चालत जाशील ?	नाहीं, उद्यां जाईन.
तूं आज **किल्यांत** चालत जाशील ?	नाहीं, मीं वाळुकेश्वरीं जाईन.
तूं आज किल्यांत **चालत** जाशील ?	नाहीं, घोड्यावर बसून जाईन.
तूं आज किल्यांत चालत **जाशील** ?	नाहीं, किंवा होय.

पाहा, यांत प्रश्न तर एकच, परंतु पुसणाराच्या अभिप्रायानुरूप त्या त्या शब्दा वर स्वराघात केल्यानें उत्तरेंहि भिन्न भिन्न येत गेलीं. या वरून ग्रंथकाराच्या अभिप्रायानुरूप वाचणें किती आवश्यक आहे हें स्पष्ट होतें.

खंड ९.

व्याकरणपदच्छेद करणें, अ० व्याकरण सांगणें.

६३२ कोणत्याहि एकाद्या वाक्याचा व्याकरणदृष्ट्या पदच्छेद करणें, ह्मणजे आरंभा पासून शेवटा पर्यंत त्यांतील सर्व शब्दांचा अथवा त्यांतील एका एका शब्दांचा प्रकार व्याकरणरीतीनें दाखविणें, ह्मणजे त्याचें लिंगवचनविभक्त्यादि

अनुक्रमणिका

भेद सांगणें, आणि त्या वाक्यांत शब्दांचा अन्योन्यसंबंध कसकसा आहे हें सांगणें, यास **व्याकरणपदच्छेद करणें**, अथवा **व्याकरण सांगणें** ह्मणावें. हा व्याकरणपदच्छेद, वाक्यार्थाच्या यथार्थज्ञानाची किल्ली होय; ह्मणोन याची पद्धति या ग्रंथाच्या शेवटीं अवश्य सांगितली पाहिजे.

"रामानें वाघ मारिला".

रामानें— हें **राम** या अकारान्त पुल्लिंगी विशेष नामाचें तृतीयेचें एकवचन; ही कर्तरितृतीया; हा **मारिला** या क्रियापदाचा कर्ता.

वाघ— हें अकारान्त पुल्लिंगी सामान्य नामाचें प्रथमेचें एकवचन; ही कर्मणिप्रथमा; हें **मारिला** या सकर्मक क्रियापदाचें कर्म.

मारिला— हें क्रियापद, **मार** या सकर्मक धातूचें करणरूपीं, मूलरूपभेदीं, स्वार्थीं, भूतकाळीं, पुल्लिंगीं, तृतीय पुरूषाचें एकवचन.

यांत **राम** हा कर्ता, **वाघ** हें कर्म, आणि **मारिला** हें क्रियापद; हा कर्मणिप्रयोग.

"कृष्णानें साहाय्य करून पांडवांचें रक्षण केलें,
अशी कथा आह्मीं काल श्रवण केली."

कृष्णानें— हें **कृष्ण** या अकारान्त पुल्लिंगी विशेष नामाचें तृतीयेचें एकवचन; ही कर्तरितृतीया; हा **केलें** या क्रियापदाचा कर्ता.

साहाय्य— हें अकारान्त नपुंसकलिंगी सामान्य नामाचें प्रथमेचें एकवचन; ही कर्मणिप्रथमा; हें **करून** या सकर्मकधातुसाधित अव्ययाचें कर्म.

अनुक्रमणिका

करून--- हें पूर्वकालवाचक सकर्मकधातुसाधित अव्यय.

पांडवांचें--- हें **पांडव** या अकारान्त पुलिंगी विशेष नामाचें षष्ठीचें अनेकवचन; ही संबंधी षष्ठी; इचा **रक्षण** या नामा कडे संबंध.

रक्षण--- हें अकारान्त नपुंसकलिंगी धातुसाधित नामाचें प्रथमेचें एकवचन; ही कर्मणि-प्रथमा; हें **केलें** या सकर्मक क्रियापदाचें कर्म.

केलें--- हें क्रियापद, **कर** या सकर्मक धातूचें करणरूपीं, मूलरूपभेदीं, स्वार्थी, भूतकाळीं, नपुंसकलिंगीं, तृतीय पुरुषाचें एकवचन.

यांत **कृष्ण** हा कर्ता, **रक्षण** हें कर्म, आणि **केलें** हें क्रियापद; हा कर्मणिप्रयोग.

अशी--- हें विशेषण, याचें विशेष्य **कथा.**

कथा--- हें आकारान्त स्त्रीलिंगी सामान्य नामाचें तृतीयेचें एकवचन; ही कर्मणिप्रथमा; हें **श्रवण केली** या सकर्मक संयुक्त क्रियापदाचें कर्म.

आह्मी--- हें **मी** या पुरुषवाचक सर्वनामाचें सामान्य लिंगीं प्रथम पुरुषाचें तृतीयेचें अनेकवचन; ही कर्तरितृतीया; हा **श्रवण केली** या क्रियापदाचा कर्ता.

काल--- हें क्रियाविशेषण अव्यय, याचा **श्रवण केली** या क्रियापदा कडे संबंध.

श्रवण केली- हें क्रियापद; **श्रवण करणें** या सकर्मक

संयुक्त क्रियेचें करणरूपीं, मूलरूपभेदीं, स्वार्थी, भूतकाळीं, स्त्रीलिंगीं, तृतीय पुरुषाचें एकवचन.

यांत **आह्मीं** हा कर्त्ता, **कथा** हें कर्म, आणि **श्रवण केली**, हें सकर्मक संयुक्त क्रियापद; हा कर्मणिप्रयोग.

श्रवण करणें, संपादन करणें, भक्षण करणें, दान देणें, दान घेणें, विकत घेणें, पाठ करणें, इत्यादि प्रकारच्या पदांचा जेव्हां सकर्मक क्रियापदा प्रमाणें प्रयोग करितात, तेव्हां व्याकरण सांगते समयीं यांस संयुक्त क्रियापदें मानून निर्वाह केल्या शिवाय दुसरा उपाय नाहीं–'कथा श्रवण केली', 'अर्थ संपादन केला', 'मृतिका भक्षण करितो', 'गाई दान देतो', 'सुवर्ण दान घेतलें', 'वेद पाठ करितात', अशा प्रकारच्या वाक्यांचा व्याकरणपदच्छेद कर्तव्य असतां, **श्रवण करणें, संपादन करणें**, इ०, (पृ० २४०, ले० ५१३ वा, यांत सांगितल्या प्रमाणें) यांस सकर्मक संयुक्त क्रियापदें मानावें, हा पक्ष मला उत्तम दिसतो. अथवा, **कथा, अर्थ, मृतिका, गाई**, इ० या संयुक्त क्रियापदांचीं जीं कर्में त्यांची षष्ठी विभक्ती मानून तिचा लोप मानावा; आणि **श्रवण, संपादन, भक्षण, दान** इ० शब्द **केली, देतो**, इ० सकर्मक धातूंचीं कर्में मानावीं. या उभय पक्षांत जो ज्यास सयुक्तिक दिसेल तो त्याणें घ्यावा.

आतां–**उत्पन्न करणें, निर्माण करणें, प्रकट होणें, दग्ध करणें**, इ० प्रकारचीं पदें हीं पूर्वोक्त संयुक्त क्रियापदा प्रमाणें दिसतात; परंतु विचारानें पाहिलें असतां **उत्पन्न, निर्माण, दग्ध**, इ० शब्द संस्कृतांत **क्त**प्रत्ययान्त धातुसाधित विशेषणें होत. आणि जीं विशेषणें असतात त्यांस कांहीं विशेष नहोतां तीं मराठींत क्रियाविशेषणां प्रमाणेंहि प्रयोजिलीं जातात; ह्मणोन, 'ईश्वरानें जग उत्पन्न केलें', 'जगास प्रकाश देण्या करितां भगवंतानें सूर्य आणि चंद्र निर्माण केले', इ० वाक्यांत **उत्पन्न, निर्माण**, हीं **जग, सूर्य**, इ० शब्दांचीं विशेषणें मानावीं; अथवा, यांस त्या

अनुक्रमणिका

त्या क्रियापदांच्या संबंधानें क्रियाविशेषणें मानावीं; अर्थाकडेस लक्ष दिलें असतां मला हा शेवटला पक्ष अधिक ग्राह्य दिसतो.

"हरी, काय करितोस ?"

हरी— हें **हरि** या इकारान्त पुंलिंगी विशेष नामाचें संबोधनाचें एकवचन.

काय— हें **काय** या प्रश्नार्थक सर्वनामाचें नपुंसकलिंगी प्रथमेचें एकवचन; ही कर्मणिप्रथमा; हें **करितोस** या सकर्मक क्रियापदाचें कर्म.

करितोस— हें क्रियापद, **कर** या सकर्मक धातूचें करणरूपीं, मूलरूपभेदीं, स्वार्थीं, वर्तमान काळीं, पुंलिंगीं, द्वितीय पुरुषाचें एकवचन.

यांत तूं हा अध्याहृत कर्ता, **काय** हें कर्म, आणि **करितोस** हें क्रियापद; हा सकर्मक कर्तरिप्रयोग.

"अंकगणित ह्मणजे अंकांनीं मोजण्याची विद्या."

अंकगणित— हें अकारान्त नपुंसकलिंगी सामासिक सामान्य नामाचें प्रथमेचें एकवचन; ही कर्तरिप्रथमा; हा **आहे** अ० **होय** या अध्याहृत क्रियापदाचा कर्ता; **अंकगणित** हा तृतीयातत्पुरुष समास.

ह्मणजे— हें उभयान्वयी अव्यय.

अंकांनीं— हें **अंक** या अकारान्त पुंलिंगी सामान्य नामाचें तृतीयेचें अनेकवचन; ही करणी तृतीया.

मोजण्याची— हें **मोजणें** या एँकारान्त नपुंसकलिंगी धातुसाधित नामाचें षष्ठीचें एकवचन; इचा **विद्या** या नामाकडे संबंध.

विद्या— हें आकारान्त स्त्रीलिंगी सामान्य नामाचें

प्रथमेचें एकवचन; ही पर्यायार्थी प्रथमा.

यांत **अंकगणित** हा कर्ता, आणि **आहे** अ० **होय** हें अध्याहृत क्रियापद; हा अकर्मक कर्तरिप्रयोग.

"तुझ्यानें आपलीं मुलें पोसवत नसलीं तर त्यांस माझ्या स्वाधीन कां करीनास?"

तुझ्यानें— हें **तूं** या पुरुषवाचक सर्वनामाचें सामान्य लिंगीं द्वितीय पुरुषाचें सविकरणतृतीयेचें एकवचन.

आपलीं— हें **आपण** या सामान्य सर्वनामाचें सामान्य-लिंगीं षष्ठीचें एकवचन; इचा **मुलें** या कडे संबंध.

मुलें— हें **मूल** या अकारान्त नपुंसकलिंगीं सामान्य नामाचें प्रथमेचें अनेकवचन; ही कर्तरिप्रथमा; हा **पोसवत नसलीं** या क्रियापदाचा कर्त्ता.

पोसवत नसलीं– हें क्रियापद, **पोस** या सकर्मक धातूचें अकरणरूपीं, शक्यभेदीं, संशयार्थी, वर्तमान काळीं, नपुंसकलिंगीं, तृतीय पुरुषाचें अनेकवचन.

यांत **मुलें** हा कर्त्ता, **पोसवत नसलीं** हें क्रियापद; हा अकर्मक कर्तरिप्रयोग.

तर— हें उभयान्वयी अव्यय.

त्यांस— हें **तें** या पुरुषवाचक सर्वनामाचें नपुंसकलिंगीं तृतीय पुरुषाचें द्वितीयेचें अनेकवचन; ही कर्मणिद्वितीया; हें **करीनास** या क्रियापदाचें कर्म.

माझ्या— हें **मी** या पुरुषवाचक सर्वनामाचें सामान्यलिंगीं प्रथम पुरुषाचें एकवचनीं सामान्यरूप, **स्वाधीन** याच्या योगानें.

स्वाधीन— हें क्रियाविशेषण अव्यय ; याचा **करणें** या क्रियेकडेस संबंध.

कां— हें क्रियाविशेषण अव्यय; याचा **करणें** या क्रियेकडे संबंध.

करीनास— हें क्रियापद; **कर** या सकर्मक धातूचें अकरणरूपीं, मूलरूपभेदीं, स्वार्थी, वर्तमान काळीं, सामान्यलिंगीं, द्वितीय पुरुषाचें एकवचन.

यांत तूं हा अध्याहृत कर्त्ता, **त्यांस** हें कर्म, आणि **करीनास** हें क्रियापद; हा सकर्मक कर्तरिप्रयोग.

"दक्षिण देशीं महिलानगरीच्या समीप एक मोठा वडाचा वृक्ष होता; त्याज वर मेघवर्णनामा कावळ्यांचा राजा सपरिवार राहत असतां, तेथें ऊरुमर्दन उलूकाधिप समुदायासह प्रत्यहीं रात्रीस पर्वताच्या गुहेंतून येऊन, वटवृक्षाभोंवता फिरून, जे काक सांपडत त्यांस मारून, जाऊं लागला."

दक्षिण— हें वि०, देशाचें.

देशीं— हें **देश** या अ० पु० सा० ना० स० एक०.

महिलानगरीच्या— हें **महिलानगरी** या ई० स्त्री० सामासि० वि० ना० ष० एक० सा० रू०. **समीप** या श० अव्य० योगानें; हा कर्मधा० समा०.

समीप— हें श० अव्य०.

एक— हें संख्यावि०, वृक्षाचें.

मोठा— हें वि०, वृक्षाचें.

वडाचा— हें वड या अ० पु० सा० ना० ष० एक०; इचा वृक्षाकडे संबंध.

वृक्ष— हें अ० पु० सा० ना० प्र० एक०; ही कर्त० प्र०; हा **होता** या क्रि० कर्ता.

होता— हें क्रि०, **अस** या अक० धा०, क० रू०, मू० भे०, स्वा०, भू० का०, पु०, तृ० पुरु० एक०.

यांत **वृक्ष** हा कर्ता, **होता** हें क्रि०; हा अक० कर्त० प्रयोग.

त्याज— हें **तो** या पुरु० स० पु० तृ० पुरु० एक० सा० रू०. **वर** या श० अव्य० योगानें.

वर— हें श० अव्य०.

मेघवर्णनामा— हें सामासि० वि०, **राजाचें**; हा ब० समा०.

कावळ्यांचा— हें **कावळा** या आ० पु० सा० ना० ष० अने०; इचा संबंध **राजा** कडे.

राजा— हें आ० पु० सा० ना० प्र० एक०; ही कर्त० प्र०; हा **राहत असतां** या धातुसा० अव्य० कर्ता.

सपरिवार— हें क्रियावि० अव्य०; याचा **राहत असतां** या धातुसा० अव्य० संबंध.

राहत असतां— हें वर्तमानकालवाचक धातुसा० अव्य०.

तेथें— हें क्रियावि० अव्य०; याचा **येऊन** या धातुसा० अव्य० कडे संबंध.

ऊरुमर्दन— हें अ० पु० वि० ना० प्र० एक०; ही

कर्त० प्र०; हा **लागला** या क्रि० कर्ता.

उलूकाधिप— हें सामासि० वि०, **ऊरुमर्दनाचें**; हा ष० त० समा०.

समुदाया— हें **समुदाय** या अ० पु० सा० ना० सा० रू०, **सह** या श० अव्य० योगानें.

सह— हें श० अव्य०.

प्रत्यहीं— हें क्रियावि० अव्य०; याचा **येऊन**, इ० धा० अ० कडे, संबंध.

रात्रीस— हें **रात्र** या अ० स्त्री० सा० ना० द्वि० एक०; ही अधिकरणी द्वि०. (अथवा यास क्रियाविशेषण मानिलें तथापि प्रशस्त.)

पर्वताच्या— हें **पर्वत** या अ० पु० सा० ना० ष० एक० सा० रू०, **गुहेंतून** या सविभक्तिक विशेष्याच्या योगानें.

गुहेंतून— हें **गुहा** या आ० स्त्री० सा० ना० पं० एक०.

येऊन— हें पूर्वकालवाचक धातुसा० अव्य०.

वटवृक्षा— हें **वटवृक्ष** या अ० पु० सामासि० सा० ना० एक० सा० रू०, **भोंवता** या श० अव्य० योगानें.

भोंवता— हें श० अव्य०.

फिरून— हें पूर्वकालवाचक धातुसा० अव्य०.

ओं— हें **ओं** या सं० स० पु० प्र० अने०, याचा **काक** या शब्दा कडे संबंध.

काक— हें **काक** या अ० पु० सा० ना० प्र०

अने०; ही कर्त० प्र०; हा **सांपडत** या क्रि० क०.

सांपडत— हें क्रि०, **सांपड** या अक० धा०, क० रू०, मू० भे०, स्वा०, री० भू० का०, पु०, तृ० पुरु० अने०.

यांत **काक** हा कर्ता; **सांपडत** हें क्रि०; हा अक० कर्त० प्र०.

त्यांस— हें **तो** या पुरु० स० पु० द्वि० अने०; ही कर्म० द्वि०; हें **मारून** या सक० धातुसा० अव्य० कर्म.

मारून— हें पूर्वकालवाचक धातुसा० अव्य०.

जाऊं— हें निमित्तवाचक धातुसा० अव्य०.

लागला— हें क्रि०, **लाग** या अक० धा०, क० रू०, मू० भे०, स्वा०, भू० का०, पु०, तृ० पुरु० एक०.

यांत **ऊरुमर्दन** हा कर्ता, आणि **लागला** हें क्रि०; हा अक० कर्त० प्र०.

हें काम तो त्याजकडून कां करावित नसेल? जर हें खरें असलें, तर त्याच्यानें तें करवत नाहीं असें ह्मणायास आह्मांस काय चिंता आहे.

हें— हें द० स०, न० प्र० एक; याचा **काम** या कडे संबंध.

काम— हें अ० न० सा० ना० प्र० एक०; ही कर्म० प्र०; हें **करावित नसेल** या क्रि० कर्म.

तो— हें पुरु० स०, पु० तृ० पुरु० प्र० एक०;

ही कर्त० प्र०; हा **करवित नसेल** या क्रि० कर्ता.

त्याउ— हें तो या पुरु० स० पु० तृ० पुरु० एक० सा० रू०, **कडून** या श० अव्य० योगानें.

कडून— हें श० अव्य०.

कां— हें क्रियावि० अव्य०, याचा **करवित नसेल** या क्रि० कडे संबंध.

करवित नसेल— हें क्रि०, **कर** या सक० धा०, अ० रू०, प्र० भे०, संश०, अपू० व० का०, पु०, तृ० पुरु०, एक०.

यांत **तो** हा कर्ता, **काम** हें कर्म, आणि **करवित नसेल**, हें क्रि०; हा सक० कर्त० प्र०.

उर— हें उ० अव्य०.

हें— हें द० स०, न० प्र० एक०; ही कर्त० प्र०; हा **असलें** या क्रि० कर्ता.

खरें— हें वि०, **हें** याचें.

असलें— हें क्रि०, **अस** या अक० धा०, क० रू०, मू० भे०, संश०, भू० का०, न०, तृ० पुरु० एक०.

यांत **हें** हा कर्ता, **असलें** हें क्रि०; हा अक० कर्त० प्र०.

तर— हें उ० अव्य०.

त्याच्यानें— हें तो या पुरु० स० पु० तृ० पु० सवि० तृ० एक०.

तें— हें द० स०, न०, प्र० एक०; ही कर्त० प्र०; हा **करवत नाहीं** या क्रि० कर्ता.

करवत नाहीं— हें क्रि०, **कर** या सक० धा०, अ० रू०,

श० भे०, स्वा०, व० का०, न०, तृ० पुरु० एक०.

यांत तें हा कर्ता, **करवत नाहीं** हें क्रि०; हा अक० कर्त० प्र०.

असें— हें द० स०, न० प्र० एक०, याचा संबंध मागल्या वाक्या कडे; हीं कर्म० प्र०; हें **ह्मणायास** या धातुसा० अव्य० कर्म.

ह्मणायास— हें धातुसा० अव्य०.

आह्मांस— हें **मीं** या पुरु० स० सा० लिं० प्र० पुरु० च० अने०.

काय— हें प्र० स०, याचा संबंध **चिंते** कडे.

चिंता— हें आ० स्त्री० सा० ना० प्र० एक०; हीं कर्त० प्र०; हा **आहे** या क्रि० कर्ता.

आहे— हें क्रि०, **अस** या अ० धा०, क० रू०, मू० भे०, स्वा०, व० का०, स्त्री०, तृ० पुरु० एक०.

यांत **चिंता** हा कर्ता, **आहे** हें क्रि०, हा अक० कर्त० प्र०.

"त्याणें पिश्वींत हात घालतांच त्यास एक मोहर सांपडली."

त्याणें— हें **तो** या पुरु० स० पु० तृ० पुरु० तृ० एक०; हीं कर्त० तृ०; हा **घातला** या क्रि० कर्ता.

पिश्वींत— हें **पिश्वी** या ई० स्त्री० सा० ना० स० एक०.

हात— हें अ० पु० सा० ना० प्र० एक; हीं

कर्म० प्र०; हें **घातला** या क्रि० कर्म.

घातला— हें क्रि०, **घाल** या सक० धा०, क० रू०, मू० भे०, स्वा०, भू० का०, पु०, तृ० पुरु० एक०.

यांत **त्याणें** हा कर्ता, **हात** हें कर्म, आणि **घातला** हें क्रि०; हा कर्म० प्र०. (पाहा पृ० ३१९, नि० २३ वा).

तोंच— हें क्रियावि० अव्य०, याचा **सांपडली** या क्रि० कडे संबंध.

त्यास— हें **तो** या पुरु० स० पु० च० एक०.

एक— हें संख्यावि०, **मोहरेचें**.

मोहर— हें अ० स्त्री० सा० ना० प्र० एक०; ही कर्त० प्र०; हा **सांपडली** या क्रि० कर्ता.

सांपडली— हें क्रि०, **सांपड** या स० धा०, क० रू०, मू० भे०, स्वा०, भू० का०, स्त्री०, तृ० पुरु० एक०.

यांत **मोहर** हा कर्ता, आणि **सांपडली** हें क्रि०; हा अक० कर्त० प्र०.

आर्या.

जातांपरार्थहीबहुतापातेंपावलीसुरामाती
नकरीलकांपित्याचीदुर्गतिचीमावलीसुरामाती ॥

जातां— हें धातुसा० अव्य०.

परार्थ— हें क्रियावि० अव्य०.

ही— हें श० अव्य०.

बहु— हें वि०, **तापाचें**.

तापातें— हें **ताप** या अ० पु० सा० ना० च० एक०.

अनुक्रमणिका

पावली— हें क्रि०, **पाव** या अक० धा०, क० रू०, मू० भे०, स्वा०, भू०, स्त्री०, तृ० पुरु० एक०.

सुरामा— हें आ० स्त्री० सामासि० सा० ना० प्र० एक०; ही कर्त० प्र०; हा **पावली** या क्रि० कर्ता. **सुरामा** हा कर्मधा० स०.

ती— हें द० स०, स्त्री० प्र० एक०, याचा संबंध **सुरामा** या कडे.

यांत **सुरामा** हा कर्ता; **पावली** हें क्रि०; हा अक० कर्त० प्र०.

न— हें क्रियावि० अव्य०; याचा **करील** या क्रि० कडे संबंध.

करील— हें क्रि०, **कर** या स० धा०, क० रू०, मू० भे०, स्वा०, भ० का०, स्त्री०, तृ० पुरु० एक०.

कां— हें क्रियावि० अव्य०, याचा **करील** या क्रि० कडे संबंध.

पित्याची— हें **पिता** या आ० पु० कर्तृवाचक धातुसा० ना० ष० एक०, याचा संबंध **माती** कडे.

दुर्गतिची— हें **दुर्गति** या इ० स्त्री० सामासि० सा० ना० ष० एक०, इचा संबंध **मावली** कडे. **दुर्गति** हा कर्मधा० स०.

मावली— हें ई० स्त्री० सा० ना० प्र० एक०.

सुरा— हें आ० स्त्री० सा० ना० प्र० एक०; ही कर्त० प्र०; हा **करील** या क्रि० कर्ता.

माती— हें ई० स्त्री० सा० नां० प्र० एक०;

ही कर्म० प्र०; हें **करील** या क्रि० कर्म.

यांत **सुरा** हा कर्ता, **माती** हें कर्म, आणि **करील** हें क्रि०; हा सक० कर्त० प्र०.

व्याकरणाचा उपयोग किती आहे, व कठीण कवितांचे अर्थ लावायास व्याकरणाचें साहाय्य किती लागतें, हें विद्यार्थ्यांच्या लक्षांत आणण्या करितां ही आर्या खालीं लिहिली आहे; तर विद्यार्थ्यांनीं आपल्या बुद्धिचातुर्यँकरून इचा यथार्थ व्याकरणपदछेद केला ह्मणजे ग्रंथकर्त्याचे श्रम बरेच सफल झाले, असें तो समजल्या वांचून राहणार नाहीं.

आर्या.

अनलसमीहितसाधीरायावारामहीवराकामा
अनलसमीहितसाधीरायावारामहीवराकामा ॥

समाप्त.

अनुक्रमणिका

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
८	१९	सारिखांच	सारिखाच
,,	२२	यांत	यांत,
९	४	अ, मिळतो	अमिळतो,
१९	१२	शब्द	नियम
२१	१९	न करितां	नकरितां
२२	१६	उद्गारवाची	उद्गारवाची,–
२३	२	भाषे मध्यें	भाषेंत
२५	५	विशेषनामें	विशेषनामें;
,,	२०	करितात	करितात,
३१	२२	गहूं	गंहू
३४	४	जसें	जसें–
३६	१९	विशेषकरून	विशेषेंकरून
५२	१०	लागल्या परंतु,	लागल्या, परंतु
५४	२१	आर्द	आर्द्र
६६	१	सर्वनामा	सर्व नामां
,,	२०	व्याकरण पदच्छेद	व्याकरणपदच्छेद
६७	१५	आकारान्त	अकारान्त
८५	९	———	यांत–हद्द, अक्कल, परात, वरात, वखार, इजार, कटार, तरवार, या शब्दांचीं रूपें वैकल्पिक नाहींत.
९१	१४	[पृ० ४०, लें० १३०]	[पृ० ४३, लें० १३७]
,,	२३	[पृ० ४४, लें० १३९]	[पृ० ४३, लें० १३९]
९३	२	जाणावि	जाणावीं
,,	१८	लें० १६०	लें० १५९
९९	५	कुलपें, कुलुपें	कुलुंपें, कुलंपें
,,	१५–१६	कृर्तत्ववाचक	कर्तृवाचक
१०२	१७	बंदुक	बंदूक
११०	१२	अवश्यकता	आवश्यकता
११८	१४	तुझ्यांत	तुझ्यांत

पृष्ठ.	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
११८	१५	तूज	तुज
१२२	२९	शद्ध	शुद्ध
१२५	२४	वर्ज	वर्ज्य
१२६	२०	वर्ज	वर्ज्य
१३१	२	गाय	काय
,,	२०	वस्तू	वस्तु
१३४	३	अथ	अर्थ
१४८	२५	वर्ज	वर्ज्य
१६१	९	मुळभेद	मूळरूपभेद
१६३	१८	वर्ज	वर्ज्य
१६५	२३	अर्थांचा	अर्थांचा
१६७	२०	करितों हें	करितोंहें
१७५	१९	एतंत्	एतत्
१८०	१७	चतुर्थी	चतुर्थीचीं
१८१	१८	पपच्छेद	पदच्छेद
१८२	१४	अवधी	अवधि
१८४	१	अहांत, अहां,	आहांत, आहां,
,,	१	अशीं द्वितीय	(यांची द्विरुक्ति नको)
,,	३	गेलां होता	गेलां होतां
१८७	२६	———	असताहेत
१८९	५	होतीत	होतींत
,,	२२	असेस,	असेस, असस,
१९०	२	व्याकरशुद्ध	व्याकरणशुद्ध
१९२	२	,,	ओकाराची, आणि सकर्मक असतां ऊकाराची, प्रवृत्ति असत्ये. हे नियम सर्वत्र चालतात असें नाहीं, परंतु जेथें संशय उत्पन्न होईल तेथें या नियमावर लक्ष देणें फार उपयोगी आहे. आणखी दुसरा एक असा नियम आढळतो कीं एकाक्षरी धातु असल्यास त्यास ऊकार, आणि अनेकाक्षरी असल्यास ओकार होतो.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१९५	१४	गेलों असावास	गेला असावास
१९९	४	आह्मीं	तुह्मीं
२१०	१	———	माझ्यानें अ० मला
२१५	१८	वर्तमान	भूत
,,	,,	अपूर्ण वर्तमान	अपूर्ण भूत
२२२	१	———	माझ्यानें अ० मला
२३७	१९	योग्य	प्रयोग
,,	२२	योग	प्रयोग
२४८	१०	परिपाट	परिपाठ
२५३	२२	भाषेमध्यें	भाषेंत
२५६	१६	पक्षांतर	पक्षांतर बोधक.
२५८	५	अव्ययांमध्यें	अव्ययां मध्यें
२६७	८	अन्यक्रियासापेक्ष	अन्यक्रियासापेक्षत्व
२७३	१३	चालविणारा,	चालविणारा,’
२७४	१९	भांगे	भांगें
२८७	२०	पृ० २७२	पृ० २७४
,,	२६	‘गौरी लक्ष्मीभार्य,	लक्ष्मीभार्य,‘गौरी
२८८	२०	आडचण	अडचण
२९६	२	अढळतो	आढळतो
,,	२१	मराठी मध्यें	मराठींत
२९९	१५	शिमग्यांचा	शिमग्याचा
३०१	११	त्यावरून	त्या वरून
,,	१८	बांधिलीं	बांधिलों
३०२	२	तदंर्गत	तदंतर्गत
३०७	४	वाक्यां मध्यें	वाक्यांत
३०९	२४	प्रयोगांत	प्रयोगां मध्यें
३१७	३	समोरच्या	समोरच्या
,,	,,	बटव्या	बटव्या
,,	२६	अमच्यानें	आमच्यानें
३१८	२	जें	जें
३१९	६	मद्वारा	मद्द्वारा
३२३	१५	वाक्यांमध्यें	वाक्यांत

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध	शुद्ध.
३२४	२	जो	'जो
,,	१५	मराठी मध्यें	मराठी भाषेंत
३२८	५	मानून	मानितात, तेव्हां
३३०	१६	त्या	'त्या
३३२	५	नाहीं,	नाहीं
३३७	१५	आहे आहे	आहे
३४१	१४	पृ० २४०	पृ० २४९
३४३	२०	नसली	नसलीं
३४४	२	सामान्यरूप	षष्ठीचें सामान्यरूप
,,	१७	समुदायासह	समुदाया सह
,,	१८	वटवृक्षाभोंवता	वटवृक्षा भोंवता
३४६	७	इ०	या पूर्वकालवाचक
३५०	१३	स०	अ०